पारं यास्यति वै शुभा । भर्तुः समागमात्साध्वी रोहिणी शशिनो यथा २२
अस्या नूनं पुनर्लाभान्नैषधः प्रीतिमेष्यति । राजा राज्यपरिभ्रष्टः पुन-
र्लब्ध्वा च मेदिनीम् २३ तुल्यशीलवयोयुक्तां तुल्याभिजनसंवृताम् । नैषधो-
र्हति वैदर्भी तं चेयमसितेक्षणा २४ युक्तं तस्याप्रमेयस्य वीर्यसत्त्ववतो
मया । समाश्वासयितुं भार्यां पतिदर्शनलालसाम् २५ अहमाश्वासया-
म्येनां पूर्णचन्द्रनिभाननाम् । अदृष्टपूर्वां दुःखस्य दुःखार्तां ध्यानतत्प-
राम् २६ बृहदश्व उवाच ॥ एवं विमृश्य विविधैः कारणैर्लक्षणैश्च ताम् ।
उपागम्य ततो भैमीं सुदेवो ब्राह्मणोऽब्रवीत् २७ अहं सुदेवो वैदर्भि भ्रातुस्ते
दयितः सखा । भीमस्य वचनाद्राज्ञस्त्वामन्वेष्टुमिहागतः २८ कुशली ते
पिता राज्ञि जननी भ्रातरश्च ते । आयुष्मन्तौ कुशलिनौ तत्रस्थौ दारकौ
च तौ २९ त्वत्कृते बन्धुवर्गाश्च गतसत्त्वा इवासते। अन्वेष्टारो ब्राह्मणाश्च
भ्रमन्ति शतशो महीम् ३० बृहदश्व उवाच ॥ अभिज्ञाय सुदेवं तं दम-

दुःख होत आहे २१. ह्या कल्याणी दमयंतीचें दुःख कधीं बरें संपेल ? व चंद्राच्या समागमामुळें आनंदित होणाऱ्या रोहिणीप्रमाणें भर्त्याच्या समागमामुळें ही केव्हां बरें आनंदित होईल ? २२. ज्याप्रमाणें राज्यापासून च्युत झालेल्या राजाला पुनरपि पृथ्वी प्राप्त झाली असतां आनंद होतो त्याप्रमाणें ह्या दमयंतीचा लाभ झाला असतां निषधराज नलाला खरोखर आनंद होईल २३. शील, वय आणि कुल ह्यांनीं नलाप्रमाणेंच असलेली दमयंती नलाला प्राप्त होणें योग्य असून ह्या कृष्णनयन दमयंतीलाही तो नल प्राप्त होणें योग्य आहे २४ आणि पति भेटण्याविषयीं उत्सुक झालेली जी ही त्या महात्म्या वीर्यवान् व धैर्यवान् नलराजाची भार्या तिला धीर देणें मला अगदीं उचित आहे २५. ह्यास्तव, पूर्ण चंद्राप्रमाणें आल्हादकारक मुखानें युक्त, पूर्वीं कधींही दुःखाचा अनुभव नसलेली परंतु सांप्रत दुःखपीडित आणि एकसारखा पतीचा ध्यास लागलेल्या ह्या दमयंतीला मी धीर देतों २६. बृहदश्व सांगतातः—ह्याप्रमाणें नानाप्रकारच्या कारणांनीं व लक्षणांनीं विचार करून तो सुदेव ब्राह्मण दमयंतीसमीप गेला आणि तिला ह्मणाला २७ " हे विदर्भराजकन्ये, मी तुझ्या भ्रात्याचा प्रिय सखा सुदेव भीमराजाच्या आज्ञेनें तुझा शोध लावण्याकरितां येथें आलों आहें २८. हे राजपत्नि, तुझा पिता, माता आणि त्यांचे जवळ असलेलीं तुझीं दोन्हीं दीर्घायु मुलें कुशल आहेत २९. तुझ्याकरितां तुझे बांधव गतप्राण झाल्यासारिखे दिसत असून तुला शोधण्याकरितां शेंकडों ब्राह्मण पृथ्वीवर हिंडत आहेत " ३०. बृहदश्व सांगतातः—हे युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें सुदेवानें तिला सांगितलें असतां तिनें त्याला ओळ-

यन्ती युधिष्ठिर। पर्यपृच्छत तान्सर्वान्क्रमेण सुहृदः स्वकान् ३१ रुरोद च भृशं राजन्वैदर्भी शोककर्शिता । दृष्ट्वा सुदेवं सहसा भ्रातुरिष्टं द्विजोत्तमम् ३२ ततो रुदन्तीं तां दृष्ट्वा सुनन्दां शोककर्शिताम्। सुदेवेन सहैकान्ते कथयन्तीं च भारत ३३ जनित्र्याः कथयामास सैरन्ध्री रुदते भृशम् । ब्राह्मणेन सहागम्य तां वेद यदि मन्यसे ३४ अथ चेदिपतेर्माता राज्ञश्चान्तःपुरात्तदा । जगाम यत्र सा बाला ब्राह्मणेन सहाभवत् ३५ ततः सुदेवमानाय्य राजमाता विशांपते । पप्रच्छ भार्या कस्येयं सुता वा कस्य भाविनी ३६ कथं च नष्टा ज्ञातिभ्यो भर्तुर्वा वामलोचना । त्वया च विदिता विप्र कथमेवंगता सती ३७ एतदिच्छाम्यहं श्रोतुं त्वत्तः सर्वमशेषतः । तत्त्वेन हि ममाचक्ष्व पृच्छन्त्या देवरूपिणीम् ३८ एवमुक्तस्तया राजन्सुदेवो द्विजसत्तमः । सुखोपविष्ट आचष्ट दमयन्त्या यथातथम् ३९ [२७१७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि दमयन्तीसुदेवसंवादेऽष्टषष्टितमोऽध्यायः ॥ ६८ ॥

खिलें आणि क्रमानें आपल्या सर्व सुहृदांची हकीकत ती त्याला विचारूं लागली ३१. हे धर्मराजा, शोकानें कृश झालेली विदर्भराजकन्या आत्याला प्रिय असलेला सुदेव ब्राह्मण अवलोकन करितांक्षणीं एकाएकीं अतिशय रडूं लागली असतां ३२, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, शोकानें आधींच कृश झालेली ती दमयंती रडत रडत एकांतामध्यें त्या सुदेव ब्राह्मणाशीं कांहीं बोलत बसली आहे असें पाहून सुनंदा ३३ आपल्या मातेला ह्मणाली " ब्राह्मणाची भेट झाल्यापासून सैरंध्री अतिशय रडत आहे. तेव्हां, तुला वाटेल तर ह्याचें कारण तूं तिला विचार " ३४. ह्याप्रमाणें सुनदेनें सांगितल्यानंतर चेदिराजाची माता राजाच्या अंतःपुरांतून निघून जिकडे ती बाला दमयंती ब्राह्मणाबरोबर बोलत बसली होती तिकडे गेली ३५ आणि नंतर सुदेवाला बोलावून आणून, हे प्रजाधिपते धर्मराजा, त्या राजमातेनें त्याला विचारिलें " हे विप्रा, ही कोणाची भार्या अथवा ही सुंदरी कोणाची कन्या हें तूं मला सांग. मनोहर नेत्रांनीं युक्त असलेली ही स्त्री आपल्या माणसांना कशी मुकली आणि अशी स्थिति ह्या साध्वीला कशी प्राप्त झाली हें तुला विदित (असल्याचें दिसत) आहे ३६,३७ आणि हें सर्व तुझ्यापासून श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. ह्यास्तव, ह्या देवरूपी स्त्रीची खरी खरी हकीकत मी विचारीत आहें ती मला कथन कर " ३८. हे राजा, ह्याप्रमाणें त्या राजमातेनें त्या सुदेव ब्राह्मणाला विचारिलें असतां त्यानें स्वस्थ बसून दमयंतीची इत्थंभूत हकीकत तिला निवेदन केली ३९. ह्याप्रमाणें ० वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वा-

सुदेव उवाच ॥ विदर्भराजो धर्मात्मा भीमो नाम महाद्युतिः। सुतेयं तस्य कल्याणी दमयन्तीति विश्रुता १ राजा तु नैषधो नाम वीरसेन-सुतो नलः। भार्येयं तस्य कल्याणी पुण्यश्लोकस्य धीमतः २ स द्यूतेन जितो भ्रात्रा हृतराज्यो महीपतिः। दमयन्त्या गतः सार्धं न प्राज्ञायत कस्यचित् ३ ते वयं दमयन्त्यर्थे चरामः पृथिवीमिमाम्। सेयमासा-दिता बाला तव पुत्रनिवेशने ४ अस्या रूपेण सदृशी मानुषी न हि विद्यते। अस्या ह्येष भ्रुवोर्मध्ये सहजः पिप्लुरुत्तमः ५ श्यामायाः पद्मसंकाशो लक्षितोऽन्तर्हितो मया। मलेन संवृतो ह्यस्याश्छन्नोऽभ्रेणेव चन्द्रमाः ६ चिह्न-भूतो विभूत्यर्थमयं धात्रा विनिर्मितः। प्रतिपत्कलुषस्येन्दोर्लेखा नाति-विराजते ७ न चास्या नश्यते रूपं वपुर्मलसमाचितम्। असंस्कृतमभि-व्यक्तं भाति काञ्चनसंनिभम् ८ अनेन वपुषा बाला पिप्लुनानेन सूचिता। लक्षितेयं मया देवी निभृतोऽग्निरिवोष्मणा ९ तच्छ्रुत्वा वचनं तस्य सुदे-वस्य विशांपते। सुनन्दा शोधयामास पिप्लुप्रच्छादनं मलम् १० स

पैकीं दमयंती आणि सुदेव ह्यांच्या संवादाविषयीं अडुसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६८ ॥

सुदेव ह्मणतोः—भीम ह्मणून महातेजस्वी व धर्मात्मा असा एक विदर्भदेशाचा राजा आहे. त्याची ही कन्या असून ही कल्याणी दमयंती ह्मणून प्रख्यात आहे १. वीरसेनाचा पुत्र नल ह्मणून निषधदेशाचा जो राजा आहे त्या बुद्धिमान् पुण्यकीर्ति राजाची ही कल्याणी भार्या होय २. त्या भूपतीला भ्रात्यानें द्यूतामध्यें जिंकून त्याचें राज्य हरण केलें. तेव्हां तो दमयंतीला बरोबर घेऊन कोठें निघून गेला आणि त्याचा कोणालाही पत्ता नाहीं ३. आह्मीं दमयंतीकरितां ही पृथ्वी हिंडत आहोंत व तुझ्या पुत्राच्या घरामध्यें ही बाला दमयंती (हिंडतां हिंडतां) आह्मांला आढळली आहे ४. रूपानें हिच्यासारिखी स्त्री मनुष्यजातीमध्यें नाहीं. ह्या दमयंतीच्या भिंवयांमध्यें एक नैस-र्गिक उत्कृष्ट तिल आहे ५ व ह्या नित्य तरुण असणाऱ्या स्त्रीचा कमलासारिखा तिल मलानें व्याप्त झाल्यामुळें अभ्राच्या योगानें चंद्राप्रमाणें आच्छादित झालेला माझ्या दृष्टीं पडला आहे ६. हा तीळ वैभवाचें चिन्ह ह्मणून विधात्यानें निर्माण केलेला आहे व सांप्रत प्रतिपदेचे दिवशीं प्रकाशरहित असलेल्या चंद्राप्रमाणें ह्याची रेषा विशेष प्रकाशमान दिसेनाशी झाली आहे ७. हिचें रूप जरी मलानें व्याप्त झालें आहे तरी झांकत नाहीं. (मलाच्या योगानें) हें फक्त अशुद्ध सुवर्णासारिखें दिसत आहे ८. गुप्त अग्नि जसा उबाऱ्यामुळें समजून येतो तशी ह्या रूपानें व ह्या तिलानें सुचविल्यामुळें ही बाला राजपत्नी दम-यंती असावी असें माझ्या लक्ष्यांत आलें ९. हे प्रजाधिपते धर्मराजा, हें त्या सुदेवाचें

मलेनापकृष्टेन पिप्लुस्तस्या व्यरोचत । दमयन्त्या यथा व्यभ्रे नभसीव निशाकरः ११ पिप्लुं दृष्ट्वा सुनन्दा च राजमाता च भारत । रुदन्त्यौ तां परिष्वज्य मुहूर्तमिव तस्थतुः १२ उत्सृज्य बाष्पं शनकै राजमातेदमब्रवीत् । भगिन्या दुहिता मेसि पिप्लुनानेन सूचिता १३ अहं च तव माता च राज्ञस्तस्य महात्मनः । सुते दशार्णाधिपतेः सुदाम्नश्चारुदर्शने १४ भीमस्य राज्ञः सा दत्ता वीरबाहोरहं पुनः । त्वं तु जाता मया दृष्टा दशार्णेषु पितुर्गृहे १५ यथैव ते पितुर्गेहं तथैव मम भाविनि । यथैव च ममैश्वर्यं दमयन्ति तथा तव १६ तां प्रहृष्टेन मनसा दमयन्ती विशांपते । प्रणम्य मातुर्भगिनीमिदं वचनमब्रवीत् १७ अज्ञायमानापि सती सुखमस्म्युषिता त्वयि । सर्वकामैः सुविहिता रक्ष्यमाणा सदा त्वया १८ सुखात्सुखतरो वासो भविष्यति न संशयः । चिरविप्रोषितां मातर्मामनुज्ञातुमर्हसि १९ दारकौ च हि मे नीतौ वसतस्तत्र बालकौ । पित्रा

म्हणणें एकिल्यावर सुनदेनें तिळावरील मळ धुऊन काढिला १०. तेव्हां, मल काढून टाकिल्यावर त्या दमयंतीचा तो तिल मेघरहित आकाशांतील चंद्राप्रमाणें शोभूं लागला ११. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, तो तिल दृष्टीं पडतांक्षणींच सुनंदा आणि राजमाता ह्या दोघीही रडूं लागल्या आणि एक मुहूर्तपर्यंत त्या दमयंतीला कवटाळून धरून राहिल्या १२. नतर डोळे पुसून राजमाता हलक्या स्वरानें म्हणाली " तू माझ्या भागिनीची कन्या आहेस हे ह्या तिळानें मला सुचविलें १३. मी आणि तुझी माता अशा दोघी त्या महात्म्या दशार्णदेशाधिपति सुदामसंज्ञक राजाच्या सुंदर कन्या होत १४. तिला भीमराजाला दिली आणि मला वीरबाहूला दिली. मीं तुला दशार्णदेशामध्यें माझ्या पित्याचे घरी जन्मलेली पाहिली आहे १५. असो. बाई, ज्याप्रमाणें तुला तुझ्या पित्याचें घर आहे त्याचप्रमाणें माझें घर आहे आणि, हे दमयंति, हें जसें माझें ऐश्वर्य आहे तसें तुझेंही आहे " १६. ह्यावर, हे प्रजाधिपते धर्मराजा, त्या मातृभगिनीला प्रसन्न अंतःकरणानें प्रणाम करून दमयंती म्हणाली १७ " मी कोण हें जरी तुला माहीत नव्हतें तरी मी तुझे जवळ सुखानें राहिलें. माझे सर्व प्रकारचे कोडे उत्तमप्रकारें पुरवून तू माझें सर्वदां रक्षण करीत आहेस १८. आतां मी कोण हें तुला समजून आल्यामुळें ह्याहीपेक्षां अधिक सुखकर असें माझें वास्तव्य येथें होईल ह्यांत संशय नाहीं. परतु, हे माते, तूं मला पित्याचे घरीं जाण्याची अनुज्ञा दे ; पित्याचें घर सोडून मला पुष्कळ दिवस झाले आहेत १९. तेथें नेलेलीं माझीं दोन अल्पवयी मुलें तेथें रहात आहेत. त्यांना पित्याचा व माझाही वियोग झाला आहे. तेव्हां तीं शोकाकुल होऊन कशीं

विहीनौ शोकार्तौ मया चैव कथं नु तौ २० यदि चापि प्रियं किंचि-
न्मयि कर्तुमिहेच्छसि । विदर्भान्यातुमिच्छामि शीघ्रं मे यानमादिश २१
बाढमित्येव तामुक्त्वा हृष्टा मातृष्वसा नृप । गुप्तां बलेन महता पुत्र-
स्यानुमते ततः २२ प्रास्थापयद्राजमाता श्रीमतीं नरवाहिना । यानेन
भरतश्रेष्ठ स्वन्नपानपरिच्छदाम् २३ ततः सा न चिरादेव विदर्भानगम-
त्पुनः । तां तु बन्धुजनः सर्वः प्रहृष्टः समपूजयत् २४ सर्वान्कुशलिनो
दृष्ट्वा बान्धवान्दारकौ च तौ । मातरं पितरं चोभौ सर्वं चैव सखीज-
नम् २५ देवताः पूजयामास ब्राह्मणांश्च यशस्विनी । परेण विधिना
देवी दमयन्ती विशांपते २६ अतर्पयत्सुदेवं च गोसहस्रेण पार्थिवः ।
प्रीतो दृष्ट्वैव तनयां ग्रामेण द्रविणेन च २७ सा व्युष्टा रजनीं तत्र
पितुर्वेश्मनि भाविनी । विश्रान्ता मातरं राजन्निदं वचनमब्रवीत् २८
दमयन्त्युवाच ॥ मां चेदिच्छसि जीवन्तीं मातः सत्यं ब्रवीमि ते ।

बरें तेथें रहात असतील ? २०. खरोखर माझें जर कांहीं ह्या ठिकाणीं प्रिय करण्याची तुझी इच्छा असेल तर विदर्भदशाला जाण्याचें माझ्या मनांत आहे ; मला सत्वर वाहन देवीव " २१. हे धर्मराजा, ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितल्यावरून तिची मातृभगिनी " ठीक आहे " असें ह्मणाली आणि आनंदित होऊन पुत्राचें अनुमोदन घेतल्यावर रक्षणाकरितां तिनें मोठें सैन्य तिच्याबरोबर दिलें २२ आणि त्या वैभवशाली दमयंतीची उत्कृष्ट अन्न, पान व वस्त्रें ह्यांसहवर्तमान, हेभरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, मेण्यामध्यें तिनें रवानगी करून दिली २३. नंतर ती दमयंती लवकरच विदर्भदेशाला जाऊन पोंचली. तेव्हां सर्व बंधुजनांनीं आनंदित होऊन तिचा चांगल्याप्रकारें सत्कार केला २४. पितृगृहीं गेल्यावर बांधव, तीं मुलें, उभयतां मातापितर व यच्चयावत् सख्या हीं सर्व कुशल आहेत असें दृष्टोत्पत्तीस आल्यावर २५ उत्कृष्ट प्रकारानें त्या यशस्विनी राजपत्नी दमयंतीनें, हे प्रजाधिपते धर्मराजा, देवतांचें व ब्राह्मणांचें पूजन केलें २६. नंतर कन्येला अवलोकन करितांक्षणीं भूपति भीमाला आनंद झाला आणि त्यानें त्या सुदेव ब्राह्मणाला सहस्र गाई, एक गांव आणि द्रव्य देऊन तृप्त केलें २७. हे धर्मराजा, ह्याप्रमाणें पित्याचे घरीं गेलेली दमयंती रात्रभर तेथें राहिली आणि मार्गसंबंधीं श्रम परिहार झाल्यावर मातेला सांगूं लागली २८. दमयंती सांगते:— हे माते, मीं जिवंत रहावें अशी जर तुझी इच्छा असेल तर तुला खरोखर सांगतें तूं ह्या नरवीर नलाला आणण्याचा प्रयत्न कर २९. ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितलें असतां ती राजपत्नी अत्यंत दुःखित झाली आणि अश्रूंनीं कंठ दाटून आल्यामुळें त्या

नरवीरस्य चैतस्य नलस्यानयने यत २९ दमयन्त्या तथोक्ता तु सा देवी भृशदुःखिता । बाष्पेणाभिहिता राज्ञी नोत्तरं किंचिदब्रवीत् ३० तदवस्थां तु तां दृष्ट्वा सर्वमन्तःपुरं तदा । हाहाभूतमतीवासीद्भृशं च प्ररुरोद ह ३१ ततो भीमं महाराजं भार्या वचनमब्रवीत् । दमयन्ती तव सुता भर्तारमनुशोचति ३२ अपकृष्य च लज्जां सा स्वयमुक्तवती नृप । प्रयतन्तु तव प्रेष्याः पुण्यश्लोकस्य मार्गणे ३३ तया प्रचोदितो राजा ब्राह्मणान्वशवर्तिनः । प्रास्थापयद्दिशः सर्वा यतध्वं नलमार्गणे ३४ ततो विदर्भाधिपतेर्नियोगाद्ब्राह्मणास्तदा । दमयन्तीमथो स्तुत्वा प्रस्थितास्ते तथाब्रुवन् ३५ अथ तानब्रवीद्भैमी सर्वराष्ट्रेष्विदं वचः । ब्रुयास्त जनसंसत्सु तत्र तत्र पुनः पुनः ३६ क्व नु त्वं कितव च्छित्वा वस्त्रार्धं प्रस्थितो मम । उत्सृज्य विपिने सुप्तामनुरक्तां प्रियां प्रिय ३७ सा वै यथा त्वया दृष्टा तथास्ते त्वत्प्रतीक्षिणी । दह्यमाना भृशं बाला वस्त्रार्धेनाभिसंवृता ३८ तस्या रुदन्त्याः सततं तेन शोकेन पार्थिव । प्रसादं कुरु वै वीर प्रतिवाक्यं

राजपत्नीनें दमयंतीला कांहींच उत्तर दिलें नाहीं ३०. तेव्हां तशी अवस्था झालेल्या त्या राजपत्नीला अवलोकन करून सर्व अंतःपुरामध्यें जिकडे तिकडे अत्यंत हाहाकार सुरू झाला ३१. तदनंतर (रडे आंवरून धरून) महाराज भीमाला त्याची भार्या ह्मणाली " आपली कन्या दमयंती पतीकरितां शोक करीत आहे ३२. हे भूपते, (वियोगदुःखाचा अतिरेक झाल्यामुळें) लज्जा बाजूला ठेवून ती स्वतः ह्याविषयीं माझ्यापाशी बोलली. ह्यास्तव, पुण्यकीर्ति नलाला शोधण्याचा आपल्या सेवकांनीं प्रयत्न करावा " ३३. ह्याप्रमाणें तिनें सांगितलें असतां भीमराजानें आपल्या आज्ञेंत वागणाऱ्या ब्राह्मणांना " नलाला शोधून काढण्याच्या उद्योगाला लागा " ह्मणून सांगून चोहोंकडें पाठवून दिले ३४ व विदर्भदेशाधिपति भीमराजाच्या आज्ञेवरून नलाला शोधण्याकरितां निघालेले ते ब्राह्मण प्रथम दमयंतीकडे गेले आणि " आह्मीं नलाला शोधण्याकरिता निघालों आहोंत " ह्मणून तिला ह्मणाले ३५. तेव्हां ती भीमकन्या दमयंती त्यांना ह्मणाली:—सर्व राष्ट्रांतील ठिकाठिकाणीं जनसमुदायांमध्यें जाऊन तुह्मी वारंवार असें ह्मणत जा ३६ " हे धूर्त, माझें अर्धे वस्त्र फाडून घेऊन तूं कोठें रे निघून गेलास ? हे प्रिय, तुझ्यावर प्रेम करणारी व तुलाही प्रिय असलेली अशी भार्या अरण्यामध्यें निद्रिस्थ असतांना तिला सोडून देऊन तूं कोठें रे गेलास ? ३७. अरे, तूं जशी तिला पाहिलीस तशीच ती बाला अद्यापि अर्ध्या वस्त्रानें आच्छादित असून तुझ्याकडे डोळे लावून बसली आहे व दुःखानें ती एकसारखा जळत आहे ३८. हे

वदस्व च ३९ एवमन्यच्च वक्तव्यं कृपां कुर्याद्यथा मयि । वायुना धूयमानो हि वनं दहति पावकः ४० भर्तव्या रक्षणीया च पत्नी हि पतिना सदा । तन्नष्टमुभयं कस्माद्धर्मज्ञस्य सतस्तव ४१ ख्यातः प्राज्ञः कुलीनश्च सानुक्रोशो भवान्सदा । संवृत्तो निरनुक्रोशः शङ्के मद्भाग्यसंक्षयात् ४२ तत्कुरुष्व नरव्याघ्र दयां मयि नरर्षभ । आनृशंस्यं परो धर्मस्त्वत्त एव हि मे श्रुतः ४३ एवं ब्रुवाणान्यदि वः प्रतिब्रूयात्कथंचन । स नरः सर्वथा ज्ञेयः कश्चासौ क्व नु वर्तते ४४ यश्चैवं वचनं श्रुत्वा ब्रूयात्प्रतिवचो नरः । तदादाय वचस्तस्य ममावेद्यं द्विजोत्तमाः ४५ यथा च वो न जानीयाद्ब्रुवतो मम शासनात् । पुनरागमनं चैव तथा कार्यमतन्द्रितैः ४६ यदि वासौ समृद्धः स्याद्यदिवाप्यधनो भवेत् । यदि वाप्यसमर्थः स्याज्ज्ञेयमस्य चिकीर्षितम् ४७ एवमुक्तास्त्वगच्छंस्ते ब्राह्मणाः सर्वतोदिशम् । नलं मृगयितुं राजंस्तदा व्यसनिनं तथा ४८ ते पुराणि सुराष्ट्राणि ग्रामान्घो-

---

राजा, तशाप्रकारें शोक करीत करीत सतत रडत बसलेल्या त्या स्त्रीवर आतां कृपा कर आणि, हे वीरा, ह्याचें उत्तर दे ३९. हें आणि तो माझ्यावर कृपा करील अशा प्रकारचें दुसरेंही कांहीं भाषण तुह्मीं करीत जा. अहो, ह्या शोकाग्नीला कालरूप वायूचें साहाय्य मिळत असल्यामुळें तो ह्या दमयंतीशरीररूप वनाला दग्ध करीत आहे ४०. असो. (तुह्मीं आणखी असें ह्मणत जा कीं) " पतीनें पत्नीचें सर्वदां पोषण व रक्षण केलें पाहिजे; परंतु, तूं धर्मज्ञ असतांनाही ह्या गोष्टींचा तुझे ठिकाणीं कां बरें अभाव झाला ? ४१. अरे, तूं विचारी, कुलीन आणि दयाळु ह्मणून नेहमीं प्रख्यात आहेस; परंतु, माझें भाग्य संपल्यामुळें आतां तूं निर्दय बनला आहेस कीं काय अशी मला शंका येते ४२. तस्मात्, हे पुरुषश्रेष्ठा, हे नरोत्तमा, तूं मजवर दया कर. अरे, "दया हाच मुख्य धर्म" असें तुझ्यापासूनच मीं ऐकिलें आहे ४३. ह्याप्रमाणें तुह्मीं बोलूं लागला असतांना जो कोणी तुह्मांला कशाही प्रकारचें उत्तर देईल त्या पुरुषाविषयीं तुह्मीं तो कोण, कोठें असतो वगैरे सर्व प्रकारें शोध लावा ४४ आणि हें तुमचें ह्मणणें ऐकून जो पुरुष तुह्मांला प्रत्युत्तर देईल त्याचें तें प्रत्युत्तर, हे द्विजश्रेष्ठ हो, तुह्मीं मला सांगा ४५. अहो, माझ्या सांगण्यावरून तुह्मीं बोलत आहांत हें तुह्मीं त्याला समजूं देऊं नका आणि (तुह्मांला जो कोणी प्रत्युत्तर देईल त्याची सर्वप्रकारें माहिती मिळवून) तुह्मीं मोठ्या दक्षतेनें परत या ४६. तुह्मांला उत्तर देणारा समृद्ध असो, निर्धन असो अथवा असमर्थ असो तुह्मीं त्याचा उद्देश समजून घ्या " ४७. हे धर्मराजा, ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितलें असतां ते ब्राह्मण तशाप्रकारें संकटांत सांपड-

पांस्तथाश्रमान्। अन्वेषन्तो नलं राजन्नाधिजग्मुर्द्विजातयः ४९ तच्च वाक्यं
तथा सर्वे तत्र तत्र विशांपते। श्रावयांचक्रिरे विप्रा दमयन्त्या यथेरितम् ५०
[२७६७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके
पर्वणि नलोपाख्यानपर्वणि नलान्वेषण एकोनसप्ततितमोऽध्यायः ॥ ६९ ॥

बृहदश्व उवाच ॥ अथ दीर्घस्य कालस्य पर्णादो नाम वै द्विजः।
प्रत्येत्य नगरं भैमीमिदं वचनमब्रवीत् १ नैषधं मृगमाणेन दमयन्ति मया
नलम्। अयोध्या नगरीं गत्वा भाङ्गासुरिमुपस्थितः २ श्रावितश्च मया
वाक्यं त्वदीयं स महाजने। ऋतुपर्णो महाभागो यथोक्तं वरवर्णिनि ३
तच्छ्रुत्वा नाब्रवीत्किंचिदृतुपर्णो नराधिपः। न च पारिषदः कश्चिद्भाष्य-
माणो मयासकृत् ४ अनुज्ञातं तु मां राज्ञा विजने कश्चिदब्रवीत्। ऋतु-
पर्णस्य पुरुषो बाहुको नाम नामतः ५ सूतस्तस्य नरेन्द्रस्य विरूपो ह्रस्व-
बाहुकः। शीघ्रयानेषु कुशलो मृष्टकर्ता च भोजने ६ स विनिःश्वस्य
बहुशो रुदित्वा च पुनःपुनः। कुशलं चैव मां पृष्ट्वा पश्चादिदमभाषत ७

लेल्या नलाला शोधण्याकरितां लगेच चोहोंकडे गेले ४८. हे राजा, ते ब्राह्मण नलाला शोधीत चालले असतां नगरें, राष्ट्रें, गांवें आणि खेडीं पाडीं देखील त्यांनीं शोधिलीं. परंतु त्यांना नलाचा पत्ता लागला नाहीं ४९. तथापि, हे प्रजाधिपते धर्मराजा, दमयंतीनें सांगितल्याप्रमाणें तें भाषण त्या सर्व ब्राह्मणांनीं ठिकठिकाणीं जाऊन ऐकविण्याचा क्रम सुरूच ठेविला ५०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यान-पर्वापैकीं नलाला शोधण्याविषयीं एकुणसत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ६९ ॥

बृहदश्व सांगतातः—ब्राह्मण पाठविल्यानंतर बराच काल लोटल्यावर एक पर्णाद नांवाचा ब्राह्मण विदर्भ नगरीला परत येऊन भीमकन्या दमयंतीला सांगूं लागला १ "हे दमयंति, नलाला शोधीत शोधीत मी अयोध्या नगरीमध्यें जाऊन ऋतुपर्ण राजाची गांठ घेतली २ आणि, हे श्रेष्ठ स्त्रिये, मोठ्या समाजामध्यें त्या महाभाग्यवान् ऋतुपर्ण राजाला तुझें तें बोलणें ऐकविलें ३. तें ऐकून ऋतुपर्णराजा कांहीं एक बोलला नाहीं आणि मीं वारंवार जरी तें भाषण उच्चारिलें तरी त्या समाजांतूनही कोणी उत्तर दिलें नाहीं ४, परंतु, ऋतुपर्ण राजाचा निरोप घेऊन मी निघालों असतां एकांत प्रदेशामध्यें बाहुक म्हणून प्रसिद्ध असलेल्या ऋतुपर्णराजाच्या सेवकानें मात्र मला उत्तर दिलें ५. तो त्या ऋतुपर्णराजाचा सारथि होता; तो दिसण्यांत कुरूप होता व त्याचे हात अखूड होते; परंतु, अश्व सत्वर चालविण्याविषयीं तो कुशल असून तो पाकसिद्धिही चांगली स्वच्छ करीत असतो ६. वारंवार सुस्कारे टाकून आणि पुन्हां पुन्हां डोळ्यांत आसवें आणून

वैषम्यमपि संप्राप्ता गोपायन्ति कुलस्त्रियः । आत्मानमात्मना सत्यो जितः
स्वर्गो न संशयः ८ रहिता भर्तृभिश्चैव न कुप्यन्ति कदाचन । प्राणां-
श्चारित्रकवचान्धारयन्ति वरस्त्रियः ९ विषमस्थेन मूढेन परिभ्रष्टसुखेन च ।
यत्सा तेन परित्यक्ता तत्र न क्रोद्धुमर्हति १० प्राणयात्रां परिप्रेप्सोः शकु-
नैर्हृतवाससः । आधिभिर्दह्यमानस्य श्यामा न क्रोद्धुमर्हति ११ सत्कृता-
सत्कृता वापि पतिं दृष्ट्वा तथागतम् । भ्रष्टराज्यं श्रिया हीनं क्षुधितं व्यसना-
प्लुतम् १२ तस्य तद्वचनं श्रुत्वा त्वरितोहमिहागतः । श्रुत्वा प्रमाणं
भवती राज्ञश्चैव निवेदय १३ एतच्छ्रुत्वाश्रुपूर्णाक्षी पर्णादस्य विशांपते ।
दमयन्ती रहोभ्येत्य मातरं प्रत्यभाषत १४ अयमर्थो न संवेद्यो भीमे मातः
कदाचन । त्वत्संनिधौ नियोक्ष्येहं सुदेवं द्विजसत्तमम् १५ यथा न नृप-
तिर्भीमः प्रतिपद्येत मे मतम् । तथा त्वया प्रकर्तव्यं मम चेत्प्रियमिच्छसि १६

कुशल प्रश्न केल्यावर मला तो ह्मणाला ७ " पतिव्रता कुलस्त्रिया संकटात जरी सांप-
डल्या तरी मनःसंयमनपूर्वक त्या आपले रक्षण करीत असतात व त्याच आपल्या
आचरणानें स्वर्ग प्राप्त करून घेतात ह्यांत संशय नाहीं ८. पतीनीं जरी त्यांचा त्याग
केला तरी त्या कधींही क्रुद्ध होत नाहींत; परंतु, त्या श्रेष्ठ स्त्रिया सदाचरणरूप कव-
चानें युक्त असलेले प्राण धारण करीत असतात ९. तेव्हां, संकटात सांपडल्या कार-
णानें कांहीं एक सुचेनासें होऊन कोणत्याही प्रकारचें सुख होईनासें झाल्यामुळें जर
त्यानें तिचा त्याग केला आहे तर अशा प्रसंगीं तिनें त्याच्यावर क्रोध करणें योग्य
नाहीं १०. अरे, प्राणरक्षणार्थ कांहीं मिळावें ह्मणून झटत असतांना ज्याचें वस्त्र
पक्ष्यांनीं हरण केलें आणि मानसिक दुःखांनीं ज्याच्या अंगाचा भडका झालेला आहे
त्याच्यावर त्या नित्यतरुण स्त्रीनें क्रोध करणें योग्य नाहीं ११. पतीचे हातून तिचा
सत्कार झालेला असो वा नसो राज्यापासून भ्रष्ट झालेला, निर्धन, क्षुधित आणि सक-
टांत बुडालेला असा पति पाहून त्या नित्यतरुण स्त्रीनें त्याच्यावर क्रोध करणें योग्य
होणार नाहीं " १२. हें त्याचें भाषण श्रवण केल्याबरोबर मी सत्वर येथें आलों.
आतां हें ऐकून घेऊन तुला काय करावयाचें असेल तें कर आणि ही गोष्ट राजाला
निवेदन कर " १३. हे प्रजाधिपते धर्मराजा, हें पर्णादाचें भाषण श्रवण केल्याबरोबर
दमयंतीचे नेत्र अश्रूंनीं भरून आले आणि लगेच एकांतामध्यें मातेची गांठ घेऊन ती
तिला ह्मणाली १४ " हे मात, मी जी गोष्ट सांगत आहें ती पित्या भीमराजाला
तूं कधींही सांगता उपयोगीं नाहीं; मी तुझ्याकडे द्विजश्रेष्ठ सुदेवाला पाठवून देतें १५.
माझें प्रिय करण्याची जर तुला इच्छा असेल तर माझा उद्देश भीमराजाला न समजेल

यथा चाहं समानीता सुदेवेनाशु बान्धवान् । तेनैव मङ्गलेनाशु सुदेवो यातु मा चिरम् १७ समानेतुं नलं मातरयोध्यां नगरीमितः । विश्रान्तं तु ततः पश्चात्पर्णादं द्विजसत्तमम् १८ अर्चयामास वैदर्भी धनेनातीव भाविनी । नले चेहागते तत्र भूयो दास्यामि ते वसु १९ त्वया हि मे बहु कृतं यदन्यो न करिष्यति । यद्भर्त्राहं समेष्यामि शीघ्रमेव द्विजोत्तम २० स एवमुक्तोथाश्वास्य आशीर्वादैः सुमङ्गलैः । गृहानुपययौ चापि कृतार्थः सुमहामनाः २१ ततः सुदेवमानाय्य दमयन्ती युधिष्ठिर । अब्रवीत्संनिधौ मातुर्दुःखशोकसमन्विता २२ गत्वा सुदेव नगरीमयोध्यावासिनं नृपम् । ऋतुपर्णं वचो ब्रूहि संपतन्निव कामगः २३ आस्थास्यति पुनर्भैमी दमयन्ती स्वयंवरम् । तत्र गच्छन्ति राजानो राजपुत्राश्च सर्वशः २४ तथा च गणितः कालः श्वोभूते स भविष्यति । यदि संभावनीयं ते गच्छ शीघ्रमरिन्दम २५ सूर्योदये द्वितीयं सा भर्तारं वरयिष्यति । न हि स

अशी तू तजवीज कर १६. हे माते, सुदेवानें ज्याअर्थीं मला आपल्या बांधवांकडे सत्वर आणिली आहे त्याअर्थीं तेच मंगल कार्य हातीं घेऊन सुदेवालाच नलाला आणण्या करितां येथून अयोध्या नगरीला जाऊं दे; आतां विलंब नको". ह्याप्रमाणें मातेला सांगितल्यानंतर विश्रांति घेतलेल्या द्विजश्रेष्ठ पर्णादाचें, त्या विदर्भराजकन्या दमयंतीनें, अत्यंत द्रव्य देऊन, पूजन केलें आणि पूजन केल्यावर ती त्याला ह्मणाली "नल येथे आल्यानंतर मी तुला आणखीही द्रव्य देईन १७, १८, १९. दुसऱ्याच्यानें होणार नाहीं असें फारच मोठें तूं माझें कार्य केलें आहेस. कारण, हे द्विजश्रेष्ठा, त्याच्याच योगानें माझा आतां लवकरच भर्त्याशीं समागम होणार आहे २०" ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितलें असतां चांगल्या मंगलप्रद आशीर्वादांनीं त्या पर्णादानें तिला धीर दिला आणि कार्यसिद्धि झाल्यामुळें मनामध्ये अतिशयच आनंदित होऊन तो घरीं चालता झाला २१. तदनंतर, हे युधिष्ठिरा, दुःख आणि शोक ह्यांनीं व्याप्त झालेली दमयंती सुदेवाला मातेचे संनिध बोलावून आणून ह्मणाली २२ "हे सुदेवा, स्वेच्छेनुरूप शीघ्र गमन करण्यास समर्थ असलेल्या पक्ष्यांप्रमाणें तूं अयोध्या नगरीमध्यें रहाणाऱ्या ऋतुपर्णराजाकडे जा आणि त्याला सांग कीं, २३ "दमयंती पुनरपि स्वयंवर करणार आहे आणि त्याकरितां तेथें चोहोंकडील राजे व राजपुत्र जात आहेत २४. स्वयंवराची वेळ तर अगदींच जवळ येऊन ठेपली आहे; ती इतकी कीं तो समारंभ उद्यांच होणार आहे. तेव्हां, हे शत्रुदमना, इतक्या अवकाशामध्यें तेथें जाणें जर शक्य असेल तर तूं सत्वर चालता हो २५. उद्यां सूर्योदय होतांक्षणीं ती दुसरा पति

ज्ञायते वीरो नलो जीवति वा नवा २६ एवं तया यथोक्तो वै गत्वा राजानमब्रवीत् । ऋतुपर्णं महाराज सुदेवो ब्राह्मणस्तदा २७ [२७९४]

इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि दमयन्तीपुनःस्वयंवरकथने सप्ततितमोऽध्यायः ॥ ७० ॥

बृहदश्व उवाच ॥ श्रुत्वा वचः सुदेवस्य ऋतुपर्णो नराधिपः । सान्त्वयञ्श्लक्ष्णया वाचा बाहुकं प्रत्यभाषत १ विदर्भान्यातुमिच्छामि दमयन्त्याः स्वयंवरम् । एकाह्ना हयतत्त्वज्ञ मन्यसे यदि बाहुक २ एवमुक्तस्य कौन्तेय तेन राज्ञा नलस्य ह । व्यदीर्यत मनो दुःखात्प्रदध्यौ च महामनाः ३ दमयन्ती वदेदेतत्कुर्याद्दुःखेन मोहिता । अस्मदर्थे भवेद्वायमुपायश्चिन्तितो महान् ४ नृशंसं बत वैदर्भी भर्तृकामा तपस्विनी । मया क्षुद्रेण निकृता कृपणा पापबुद्धिना ५ स्त्रीस्वभावश्चलो लोके मम दोषश्च दारुणः । स्यादेवमपि कुर्यात्सा विवासाद्गतसौहृदा ६ मम शोकेन संविग्ना नैराश्या-

---

वरणार. कारण, तो तिचा भर्ता वीर नल जिवंत आहे किंवा नाहीं ह्याचा कांहीं पत्ताच लागत नाहीं " २६. ह्याप्रमाणें तिनें सांगितल्यावर, हे महाराज युधिष्ठिरा, त्या सुदेव ब्राह्मणानें ऋतुपर्ण राजाकडे जाऊन तसें सांगितलें २७. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकीं दमयंती पुन्हां स्वयवर करणार ह्मणून सुदेव ब्राह्मणानें ऋतुपर्ण राजाला कळविल्याविषयीं सत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥७०॥

बृहदश्व सांगतात:—सुदेवानें सांगितलेली बातमी ऐकिल्यावर ऋतुपर्णराजा सांत्वनपूर्वक मधुर वाणीनें बाहुकाला ह्मणाला १ " हे हयतत्त्वज्ञा बाहुका, एका दिवसांत दमयंतीच्या स्वयंवराकरितां विदर्भदेशाला जाण्याचें माझ्या मनांत आहे " २. ह्याप्रमाणें त्या ऋतुपर्णराजानें सांगितलें असतां, हे कुंतीपुत्रा धर्मराजा, नलाचें हृदय दुःखानें अगदीं विदीर्ण झालें आणि तो उदार नल आपल्याशींच विचार करूं लागला कीं, ३ "दुःखानें अगदीं मोहित झालेली दमयंती असे शब्द तोंडांतून काढील ? किंवा अशी गोष्ट तिच्या हातून होईल ? कदाचित् आमच्याकरितांच हा उत्कृष्ट उपाय तिनें योजिला असेल ४. पतीचीच इच्छा करणाऱ्या बिचाऱ्या विदर्भराजकन्या अनाथ दमयंतीला मीं पापबुद्धि नीचानें फसविलें ही खरोखर वाईट गोष्ट झाली ५. स्त्रीचा स्वभाव ह्मणजे चंचल हें तर जगतामध्यें प्रसिद्ध आहे आणि माझाही दोष भयंकर आहे. तेव्हां, पुष्कळ दिवस दूर राहिल्यामुळें माझेविषयीं प्रेम नाहींसें होऊन ती असेंही करील व ह्या ब्राह्मणानें सांगितलेलें खरेंही असेल ६. ती सुंदरी माझ्या शोकानें जरी अगदीं त्रस्त झाली आहे तरी धीर सोडून अशी गोष्ट करण्याला ती कधींही प्रवृत्त

स्तनुमध्यमा । नैवं सा कर्हिचित्कुर्यात्सापत्या च विशेषतः ७ यदत्र सत्यं वासत्यं गत्वा वेत्स्यामि निश्चयम् । ऋतुपर्णस्य वै काममात्मार्थं च करोम्यहम् ८ इति निश्चित्य मनसा बाहुको दीनमानसः । कृताञ्जलिरुवाचेदमृतुपर्णं जनाधिपम् ९ प्रतिजानामि ते वाक्यं गमिष्यामि नराधिप । एकाह्ना पुरुषव्याघ्र विदर्भनगरीं नृप १० ततः परीक्षामश्वानां चक्रे राजन्स बाहुकः । अश्वशालामुपागम्य भाङ्गासुरिनृपाज्ञया ११ स त्वर्यमाणो बहुश ऋतुपर्णेन बाहुकः । अश्वाञ्जिज्ञासमानो वै विचार्य च पुनः पुनः १२ अध्यगच्छत्कृशानश्वान्समर्थानध्वनि क्षमान् । तेजोबलसमायुक्तान्कुलशीलसमन्वितान् १३ वर्जितांल्लक्षणैर्हीनैः पृथुप्रोथान्महाहनून् । शुद्धान्दशभिरावर्तैः सिन्धुजान्वातरंहसः १४ दृष्ट्वा तानब्रवीद्राजा किंचित्कोपसमन्वितः । किमिदं प्रार्थितं कर्तुं प्रलब्धव्या न ते वयम् १५ कथमल्पबलप्राणा वक्ष्यन्तीमे हया मम । महानध्वा च तुरगैर्गन्तव्यः कथमी-

---

होणार नाहीं आणि ती अपत्यवती असल्यामुळें अशी गोष्ट विशेषतः तिच्या हातून तर होणारच नाहीं ७. असो. ह्या ब्राह्मणाच्या सांगण्यांत खरें खोटें काय आहे ह्याचा निर्णय तेथें गेल्यावर आपणांला समजेल. तस्मात्, तूर्त ऋतुपर्णाची इच्छा व आपलाही उद्देश मी सिद्धीस नेतों " ८. असा मनामध्यें निश्चय करून अंतःकरणामध्यें दीन झालेला बाहुक हात जोडून ऋतुपर्ण राजाला ह्मणाला ९ " हे भूपते, आपलें ह्मणणें मला कबूल आहे. हे पुरुषश्रेष्ठा राजा, एका दिवसांत विदर्भ देशाच्या राजधानीला मी जाईन " १०. ह्याप्रमाणें ऋतुपर्णाला सांगितल्यावर, हे राजा युधिष्ठिरा, ऋतुपर्ण राजाच्या आज्ञेनें पागेमध्यें जाऊन तो बाहुक अश्वांची परीक्षा करूं लागला ११. परंतु, तो फिरून फिरून विचार करून अश्वांची परीक्षा करूं लागला असतां ऋतुपर्ण राजा वारंवार त्याला घाई करूं लागला. तेव्हां सरतेशेवटीं एका दिवसांत मनांत योजिलेला मार्ग चालून जाण्यास समर्थ ह्मणून त्या पागेंतील कृश अश्व त्या बाहुकानें परीक्षा करून काढिले. ते अश्व कांति व सामर्थ्य ह्यांनीं युक्त असून चांगले जातिवंत व सुशील होते १२,१३, हीनतादर्शक अशीं लक्षणें त्यांचे ठिकाणीं नव्हतीं; त्यांच्या नासिका विशाल असून हनुवट्याही मोठ्या होत्या; छाती वगैरेंच ठिकाणीं असणाऱ्या कुलक्षणरूप दहा भोंवऱ्यापासून ते अलग होते; सिंधु देशांत ते निपजलेले होते आणि वायूप्रमाणें ते वेगवान् होते १४. परंतु, त्यांना अवलोकन केल्याबरोबर ऋतुपर्णराजाला थोडासा राग आला आणि तो ह्मणाला " अरे, हें काय करण्याचें तूं मनामध्यें आणिलें आहेस ? तूं आह्मांला फसवीत तर नाहींस ना ? १५. अरे, ह्यांचें

हयैः १६ बाहुक उवाच ॥ एको ललाटे द्वौ मूर्ध्नि द्वौ द्वौ पार्श्वोपपार्श्वयोः । द्वौ द्वौ वक्षसि विज्ञेयौ प्रयाणे चैक एव तु १७ एते हया गमिष्यन्ति विदर्भान्नात्र संशयः । यानन्यान्मन्यसे राजन्ब्रूहि तान्योजयामि ते १८ ऋतुपर्ण उवाच ॥ त्वमेव हयतत्त्वज्ञः कुशलो ह्यसि बाहुक । यान्मन्यसे समर्थांस्त्वं क्षिप्रं तानेव योजय १९ ततः सदश्वांश्चतुरः कुलशीलसमन्वितान् । योजयामास कुशलो जवयुक्तान्रथे नलः २० ततो युक्तं रथं राजा समारोहत्त्वरान्वितः । अथ पर्यपतन्भूमौ जानुभिस्ते हयोत्तमाः २१ ततो नरवरः श्रीमान्नलो राजा विशांपते । सान्त्वयामास तानश्वांस्तेजोबलसमन्वितान् २२ रश्मिभिश्च समुद्यम्य नलो यातुमियेष सः । सूतमारोप्य वार्ष्णेयं जवमास्थाय वै परम् २३ ते चोद्यमाना विधिवद्बाहुकेन हयोत्तमाः । समुत्पेतुरथाकाशं रथिनं मोहयन्निव २४ तथा तु दृष्ट्वा

सामर्थ्य अल्प दिसत असून वेगही अगदीं कमी दिसत आहे. तेव्हां हे माझे अश्व रथ ओढून नेतील तरी कसे ? आणि एवढ्या मोठ्या मार्गाचें आपणांला तरी अशा अश्वांच्या योगानें आक्रमण करितां येईल कसें ? १६. बाहुक ह्मणतो:—ललाटाचे ठिकाणीं एक, मस्तकाचे ठिकाणीं दोन, दोन्ही बाजूंना दोन दोन, वक्षस्थलाच्या पुढें-मागें दोन दोन आणि पृष्ठभागीं एक असे बारा भोंवरे अश्वांना असावेत व तसे ह्यांना आहेत १७. तस्मात्, हेच अश्व एका दिवसांत विदर्भ देशाला जातील ह्यांत संशय नाहीं. अथवा, हे राजा, तुला जे दुसरे योग्य वाटत असतील ते सांग ह्मणजे मी तेच तुझ्या रथाला जोडितों १८. ऋतुपर्ण ह्मणतो:—हे बाहुका, तूंच अश्वांचें रहस्य जाणणारा असून कुशल आहेस. ह्याकरितां, तुला जे अश्व योग्य वाटत असतील त्यांनाच तूं सत्वर जोड १९. असें ऋतुपर्ण राजानें सांगितल्यानंतर अश्वविद्येमध्यें निपुण असलेल्या नलानें जातिवंत, सुशील आणि वेगवान् असे चांगले चार अश्व रथाला जोडिले २०. नंतर अश्व जोडिलेल्या रथावर ऋतुपर्णराजा सत्वर आरूढ झाला तेव्हां राजा आरूढ होतांक्षणीं त्या श्रेष्ठ अश्वांनीं भूमीवर गुडघे टेकिले २१. तदनंतर, हे प्रजाधिपते धर्मराजा, त्या वैभवशाली पुरुषश्रेष्ठ नलराजानें त्या तेजस्वी व समर्थ अश्वांना (ऋतुपर्ण नीट बसेपर्यंत) चुचकारून चुचकारून आंवरून धरिलें २२. ऋतुपर्णराजा आरूढ झाल्यावर त्या नलानें वार्ष्णेय सारथ्याला रथावर घेतलें आणि लगाम उचलून धरून त्या नलानें पराकाष्ठेच्या वेगानें गमन करण्याविषयीं अश्वांना इषारा केला २३ व ह्याप्रमाणें तो बाहुक योग्य रीतीनें इषारा देऊं लागला असतां ते उत्कृष्ट अश्व आंत बसलेल्या ऋतुपर्णराजाला मोहित करीतच कीं काय भरधांव उडूं लागले २४.

तानश्वान्वहतो वातरंहसः । अयोध्याधिपतिः श्रीमान्विस्मयं परमं ययौ २५ रथघोषं तु तं श्रुत्वा हयसंग्रहणं च तत् । वार्ष्णेयश्चिन्तयामास बाहुकस्य हयज्ञताम् २६ किं नु स्यान्मातलिरयं देवराजस्य सारथिः । तथा तल्लक्षणं वीर बाहुके दृश्यते महत् २७ शालिहोत्रोथ किं नु स्याद्धयानां कुलतत्त्ववित् । मानुषं समनुप्राप्तो वपुः परमशोभनम् २८ उताहोस्विद्भवेद्राजा नलः परपुरंजयः । सोयं नृपतिरायात इत्येवं समचिन्तयत् २९ अथ चेह नलो विद्यां वेत्ति तामेव बाहुकः । तुल्यं हि लक्षये ज्ञानं बाहुकस्य नलस्य च ३० अपि चेदं वयस्तुल्यं बाहुकस्य नलस्य च । नायं नलो महावीर्यस्तद्विद्यश्च भविष्यति ३१ प्रच्छन्ना हि महात्मानश्चरन्ति पृथिवीमिमाम् । दैवेन विधिना युक्ताः शास्त्रोक्तैश्च निरूपणैः ३२ भवेत्तु मतिभेदो मे गात्रवैरूप्यतां प्रति । प्रमाणात्परिहीणस्तु भवेदिति मतिर्मम ३३ वयःप्रमाणं तत्तुल्यं रूपेण तु विपर्ययः । नलं

तेव्हां वायुवेगानें युक्त असलेल्या त्या अश्वांना अवलोकन करून अयोध्याधिपति वैभवशाली ऋतुपर्णराजाला पराकाष्ठेचा विस्मय झाला २५ व तो रथघोष आणि तें अश्वसंयमन अवलोकन करून बाहुकाच्या अश्वज्ञानाविषयीं वार्ष्णेय चिंतन करूं लागला की, २६ " अहो हा देवराज इंद्राचा मातलि सारथि तर नसेल नां ? कारण, ह्या वीर बाहुकाचे ठिकाणीं तें लक्षण तर पुष्कळच दिसून येत आहे २७. अथवा अश्वांच्या जातींतलें अगदीं तत्त्व जाणणारा शालिहोत्र तर हा अत्यंत सुंदर मानुष रूप धारण करून ह्या भूतलावर प्राप्त झाला नसेल नां ? २८. किंवा शत्रुसमूह जिंकणारा हा नलराजा तर नसेल नां ? आणि पत्ताही नाहींसा झालेला तो हा नल राजाच ऋतुपर्ण राजाच्या घरीं येऊन राहिला नसेल नां " ! अशाप्रकारें तो वार्ष्णेय विचार करूं लागला २९. (नंतर तो आपल्या मनामध्यें ह्मणाला) आतां हा जर नलराजा नसेल तर जी विद्या नल जाणीत आहे तीच हा बाहुक जाणीत असला पाहिजे. कारण, बाहुक आणि नल ह्या उभयतांचें ज्ञान तर मला अगदीं सारखें दिसत आहे ३०. इतकेंच नव्हें परंतु, बाहुक आणि नल ह्यांचें वयही अगदीं सारखेंच दिसत आहे. तस्मात्, हा बाहुक नव्हे; हा महावीर्यवान् नलच अश्वशास्त्रवेत्ता असला पाहिजे ३१. कारण, अमानुष कृत्य आणि शास्त्रोक्त रूपें ह्यांनीं युक्त असलेले महात्मे गुप्त रूपानें ह्या पृथ्वीवर संचार करीत असतात ३२. आतां ह्याचा देह विरूप दिसत आहे; परंतु, ह्या संबंधानें माझ्याच मतींत कांहीं बदल झाला नसेल नां ? छेः पण कांतीच्या मानानें विचार केला असतां नलापेक्षां हा कमी दिसतोच असें मला वाटतें ३३ व याचें

सर्वगुणैर्युक्तं मन्ये बाहुकमन्ततः ३४ एवं विचार्य बहुशो वार्ष्णेयः पर्यचिन्तयत्। हृदयेन महाराज पुण्यश्लोकस्य सारथिः ३५ ऋतुपर्णश्च राजेन्द्रो बाहुकस्य हयज्ञताम्। चिन्तयन्मुमुदे राजा सहवार्ष्णेयसारथिः ३६ ऐकाग्र्यं च तथोत्साहं हयसंग्रहणं च तत्। परं यत्नं च संप्रेक्ष्य परां मुदमवाप ह ३७ [२८३१] इति श्रीमहाभारते ० आरण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि ऋतुपर्णविदर्भगमने एकसप्ततितमोऽध्यायः ॥ ७१ ॥

बृहदश्व उवाच ॥ स नदीः पर्वतांश्चैव वनानि च सरांसि च। अचिरेणातिचक्राम खेचरः खे चरन्निव १ तथा प्रयाते तु रथे तदा भाङ्गासुरिर्नृपः। उत्तरीयमधोपश्यद्भ्रष्टं परपुरञ्जयः २ ततः स त्वरमाणस्तु पटे निपतिते तदा। ग्रहीष्यामीति तं राजा नलमाह महामनाः ३ निगृह्णीष्व महाबुद्धे हयानेतान्महाजवान्। वार्ष्णेयो यावदेनं मे पटमानयतामिह ४ नलस्तं प्रत्युवाचाथ दूरे भ्रष्टः पटस्तव। योजनं समतिक्रान्तो नाहर्तुं

प्रमाण अगदीं नलाच्या वयाइतकेंच आहे; परंतु, रूप पहावें तर उलट दिसत आहे आणि (नलावांचून हा दुसरा कोणी असावा असें ह्मणावें तर नलाच्या अंगीं असणाऱ्या ") सर्व गुणांनीं हा संपन्न आहे. तेव्हां, वास्तविक विचार करून पाहिलें असतां हा बाहुक नलच आहे असा माझा पक्का निश्चय होतो ३४. ह्याप्रमाणें अनेक प्रकारांनीं विचार केल्यावर, हे महाराज युधिष्ठिरा, पुण्यश्लोक नलाच्या त्या वार्ष्णेय सारथ्यानें आपल्या मनामध्यें हा नलच असावा असा निश्चय केला ३५. नृपश्रेष्ठ ऋतुपर्ण वार्ष्णेय सारथ्यासहवर्तमान बाहुकाच्या अश्वविद्याज्ञानाचा विचार करूं लागला असतां आनंदित झाला ३६ आणि ती एकाग्रता, तो उत्साह, तें अश्वांना धरणें व ती अतिशय दक्षता अवलोकन करून तर त्याला पराकाष्ठेचाच आनंद झाला ३७. ह्याप्रमाणें० लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकीं ऋतुपर्णराजा विदर्भदेशाला निघाल्याविषयीं एकाहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७१ ॥

बृहदश्व सांगतात:— आकाशांतून जात आहे कीं काय अशा रीतीनें चालणारा तो रथ थोडक्याच वेळांत नद्या, पर्वत, वनें आणि सरोवरें ओलांडून गेला १ व त्याप्रमाणें तो रथ जाऊं लागला असतां आपला शेला खालीं पडलेला त्या शत्रुसमूह जिंकणाऱ्या ऋतुपर्ण राजानें पाहिला २. तेव्हां वस्त्र पडतांक्षणीं तें घेईन ह्मणून तो उदार ऋतुपर्ण राजा त्या नलाला ह्मणाला ३ " हे महाबुद्धिमान् बाहुका, हा वार्ष्णेय हें वस्त्र घेऊन येईपर्यंत ह्या महावेगवान् अश्वांना तूं जरा आंखडून धर" ४. असें ऋतुपर्णराजानें सांगितलें असतां नल त्याला ह्मणाला " आपलें वस्त्र फारच लांब पडलें आहे-

शक्यते पुनः ५ एवमुक्ते नलेनाथ तदा भाङ्गासुरिर्नृपः । आससाद वने राजन्फलवन्तं बिभीतकम् ६ तं दृष्ट्वा बाहुकं राजा त्वरमाणोभ्यभाषत । ममापि सूत पश्य त्वं संख्याने परमं बलम् ७ सर्वः सर्वं न जानाति सर्वज्ञो नास्ति कश्चन । नैकत्र परिनिष्ठास्ति ज्ञानस्य पुरुषे क्वचित् ८ वृक्षेस्मिन्यानि पर्णानि फलान्यपि च बाहुक । पतितान्यपि यान्यत्र तत्रैकमधिकं शतम् ९ एकपत्राधिकं चात्र फलमेकं च बाहुक । पञ्चकोट्योथ पत्राणां द्वयोरपि च शाखयोः १० प्रचिनु ह्यस्य शाखे द्वे याश्चाप्यन्याः प्रशाखिकाः । आभ्यां फलसहस्रे द्वे पञ्चोनं शतमेव च ११ ततो रथमवस्थाप्य राजानं बाहुकोब्रवीत् । परोक्षमिव मे राजन्कत्थसे शत्रुकर्शन १२ प्रत्यक्षमेतत्कर्तास्मि शातयित्वा बिभीतकम् । अथात्र गणिते राजन्विद्यते न परोक्षता १३ प्रत्यक्षं ते महाराज शातयिष्ये बिभीतकम् । अहं हि नाभिजानामि भवेदेवं न वेति वा १४ संख्यास्यामि फलान्यस्य

तेथून हा रथ एक योजन पुढें आला; आतां वस्त्र परत आणितां येणें शक्य नाहीं " ५. ह्याप्रमाणें नलानें सांगितलें असतां, हे धर्मराजा, तो ऋतुपर्ण भूपति वनामध्यें फलांनीं भरलेल्या एका बिभीतक वृक्षापाशीं येऊन पोंचला ६ व तो वृक्ष अवलोकन करितांक्षणीं तो ऋतुपर्ण राजा त्वरेत्वरेनें बाहुकाला ह्मणाला " हे सारथे, परिगणन करण्याविषयीं तूं माझेंही उत्कृष्ट सामर्थ्य कसें आहे तें पहा ७. सर्वच गोष्टी सर्वांना माहीत नसतात. सर्वज्ञ असा कोणीही नाहीं. तात्पर्य, एका पुरुषाचे ठिकाणीं ज्ञानाची पूर्णता कोठेंही दृष्टोत्पत्तीस येत नाहीं ८. असो. हे बाहुका, ह्या वृक्षावर जीं पानें व फलें आहेत आणि जीं ह्या ठिकाणीं गळून पडलेलीं आहेत त्यांपैकीं ९, हे बाहुका, वरच्यापेक्षां खालीं पडलेलीं पानें वृक्षावरील पानांपेक्षां व खालीं पडलेलीं फळें वृक्षावरील फळांपेक्षां एकशें एक ह्या संख्येनें अधिक आहेत आणि ह्या दोन्हींही खांद्यांना मिळून पांच कोटि पानें आहेत १०. (इच्छा असल्यास) तूं ह्या दोन्हीं खांद्या व ह्या खांद्यांना फुटलेल्या इतरही फांद्या तोडून पहा. ह्या दोन खांद्यांना मिळून दोन हजार व पंचाण्णव इतकींच फळें आहेत " ११. ह्याप्रमाणें ऋतुपर्ण राजानें सांगितलें असतां रथ उभा करून बाहुक त्याला ह्मणाला " हे शत्रुनाशका राजा, तूं अगदीं प्रत्यक्ष गणती केल्यासारिखें (खात्रीनें) सांगत आहेस १२. तस्मात्, हा वृक्ष तोडून मी प्रत्यक्ष मोजून पहातों. हे राजा, परिगणन केल्यावर ह्यांत कांहीं संशय उरणार नाहीं १३. हे महाराजा, मी हा बिभीतक वृक्ष तोडितों. कारण, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें आहे किंवा नाहीं ह्याची मला खात्री नाहीं १४. ह्यास्तव, हे प्रजाधिपते,

पश्यतस्ते जनाधिप । मुहूर्तमपि वार्ष्णेयो रश्मीन्यच्छतु वाजिनाम् १५
तमब्रवीन्नृपः सूतं नायं कालो विलम्बितुम् । बाहुकस्त्वब्रवीदेनं परं यत्नं
समास्थितः १६ प्रतीक्षस्व मुहूर्तं त्वमथवा त्वरते भवान् । एष याति
शिवः पन्था याहि वार्ष्णेयसारथिः १७ अब्रवीदृतुपर्णस्तु सान्त्वयन्कुरु-
नन्दन । त्वमेव यन्ता नान्योऽस्ति पृथिव्यामपि बाहुक १८ त्वत्कृते यातु-
मिच्छामि विदर्भान्हयकोविद । शरणं त्वां प्रपन्नोऽस्मि न विघ्नं कर्तुमर्हसि १९
कामं च ते करिष्यामि यन्मां वक्ष्यसि बाहुक । विदर्भान्यदि यात्वाद्य
सूर्यं दर्शयितासि मे २० अथाब्रवीद्बाहुकस्तं संख्याय च बिभीतकम् ।
ततो विदर्भान्यास्यामि कुरुष्वैवं वचो मम २१ अकाम इव तं राजा
गणयस्वेत्युवाच ह । एकदेशं च शाखायाः समादिष्टं मयानघ २२ गण-
यस्वाश्वतत्त्वज्ञ ततस्त्वं प्रीतिमावह । सोऽवतीर्य रथात्तूर्णं शातयामास तं
द्रुमम् २३ ततः स विस्मयाविष्टो राजानमिदमब्रवीत् । गणयित्वा यथो-

---

तुझ्या समक्ष मी ह्या वृक्षाचीं फळें मोजून पहातों. तोंपर्यंत एक मुहूर्तभरच घोड्यांचे लगाम वार्ष्णेयाला धरूं दे " १५. ह्यावर ऋतुपर्ण राजा बाहुक सारथ्याला ह्मणाला " विलंब लावण्याचा हा समय नव्हे ". तथापि (फलांचें परिगणन करण्याविषयीं) पक्का निश्चय करून राहिलेला बाहुक त्याला ह्मणाला १६ " एक मुहूर्तभर दम धरा. अथवा आपणांला जर त्वरा असेल तर, हा निर्भय मार्ग विदर्भ देशाला चालला आहे. आपण वार्ष्णेय सारथ्याला घेऊन चालूं लागावें " १७. परंतु, हे कुरुनंदना धर्मराजा, ह्यावर ऋतुपर्ण राजा ह्मणाला " हे बाहुका, सारथि एक तूंच आहेस. पृथ्वीमध्ये तुझ्या सारिखा दुसरा सारथि कोणीही नाहीं १८. हे अश्वशास्त्रवेत्त्या, तुझ्यामुळें मी (एका दिवसांत) विदर्भ देशाला जाण्याची इच्छा करीत आहें. माझ्या सत्वर जाण्याला तूं विघ्न करूं नकोस. मी तुला शरण आलों आहें १९. हे बाहुका, आज विदर्भ देशाला जाऊन पोंचल्यावर जर तूं सूर्य दाखविशील (अर्थात् दिवस असतांना जर तूं आज विदर्भ देशाला मला नेऊन पोंचविशील) तर तूं मला सांगशील तो तुझा मनोरथ मी शेंवटास नेईन " २०. ह्यावर बाहुक त्याला ह्मणाला " ह्या बिभीतक वृक्षाचीं फळें मोजून विदर्भ देशाला जाईन हें तूं माझें ह्मणणें शेंवटास ने " २१. ह्यानंतर ह्यावेळीं फळें मोजीत बसण्याची आपली इच्छा नाहीं असें दर्शविल्यासारिखें करून ऋतुपर्ण राजा त्याला ह्मणाला " मोज; खांदीचा एक भाग, हे निष्पापा बाहुका, मी मोजण्यास सांगितला आहे २२. हे अश्वतत्त्ववेत्त्या, तूं प्रत्यक्ष मोज आणि आपल्या मनाचें समाधान करून घे ". असें ऋतुपर्ण राजानें सांगितल्यावर रथांतून सत्वर

कानि तावन्त्येव फलानि तु २४ अत्यद्भुतमिदं राजन्दृष्टवानस्मि ते बलम्। श्रोतुमिच्छामि तां विद्यां यथैतज्ज्ञायते नृप २५ तमुवाच ततो राजा त्वरितो गमने नृप। विद्ध्यक्षहृदयज्ञं मां संख्याने च विशारदम् २६ बाहुकस्तमुवाचाथ देहि विद्यामिमां मम। मत्तोपि चाश्वहृदयं गृहाण पुरुषर्षभ २७ ऋतुपर्णस्ततो राजा बाहुकं कार्यगौरवात्। हयज्ञानस्य लोभाच्च तं तथेत्यब्रवीद्वचः २८ यथोक्तं त्वं गृहाणेदमक्षाणां हृदयं परम्। निक्षेपो मेऽश्वहृदयं त्वयि तिष्ठतु बाहुक २९ एवमुक्त्वा ददौ विद्यामृतुपर्णो नलाय वै। नलस्याक्षहृदयज्ञस्य शरीरान्निःसृतः कलिः ३० कर्कोटकविषं तीक्ष्णं मुखात्सततमुद्वमन्। कलेस्तस्य तदार्तस्य शापाग्निः स विनिःसृतः ३१ स तेन कर्शितो राजा दीर्घकालमनात्मवान्। ततो विषवि-

---

उतरून बाहुकानें तो वृक्ष तोडिला आणि तीं फळें मोजिलीं २३ व (तीं अगदीं बरोबर भरलीं असें आढळून आल्यावर) तो विस्मयचकित होऊन राजाला ह्मणाला " तूं जितकीं सांगितलीं होतींस तितकींच फळें मोजून पहातां भरलीं २४. हे राजा, हें तुझें कांहीं अतिशयच अद्भुत सामर्थ्य मीं आज अवलोकन केलें. आता, हे राजा, जिच्या योगानें हें समजतें ती विद्या समजून घेण्याची माझी इच्छा आहे " २५. असें बाहुक ह्मणाल्यावर, हे धर्मराजा, जाण्याची त्वरा झालेला तो ऋतुपर्णराजा " मी परिगणन करण्याविषयीं निपुण असून द्यूताचेंही तत्त्व जाणणारा आहे असें तूं समज " ह्मणून त्याला ह्मणाला असतां २६ " हे पुरुषश्रेष्ठा, ही विद्या मला दे आणि अश्वशास्त्राचें तत्त्व तूंही माझ्या पासून समजून घे " असें बाहुकानेंही त्याला सांगितलें २७. तेव्हां, (ह्यानें दिवस असतांना विदर्भदेशाला जाऊन पोंचविलें तर) आपलें मोठें कार्य सिद्धीस जावयाचें आहे असें समजून व अश्वशास्त्रविषयक ज्ञानाच्याही लोभांत गुंतून ऋतुपर्णराजा त्याला ह्मणाला २८ " ठीक आहे. " हे बाहुका, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें हें अक्षांचें (ह्मणजे फाशांचें) उत्कृष्ट तत्त्व तूं माझ्या पासून घे आणि अश्वशास्त्रतत्त्व ही माझी ठेव तुझ्यापाशीं तशीच असूं दे" २९.ह्याप्रमाणें बोलून ऋतुपर्णराजानें नलाला ती विद्या दिली. तेव्हां द्यूततत्त्वज्ञ झालेल्या त्या नलाच्या शरीरापासून कलि बाहेर निघाला ३० आणि मुखांतून त्या कर्कोटक नागाचें तीक्ष्ण विषाच्या एकसारख्या गुळण्या टाकूं लागला. कारण, दमयंतीनें उत्पन्न केलेला शापरूप अग्नि विषरूपानें त्या दुःखित झालेल्या कलीच्या शरीरापासून बाहेर पडूं लागला ३१. कलीनें नलराजाला विवेकहीन करून दीर्घकालपर्यंत दुःख दिलें (हें दमयंतीचा त्याला शाप होण्याचें कारण होय). असो. शरीर विषरहित झाल्यावर

मुक्त्वात्मा स्वं रूपमकरोत्कलिः ३२ तं शप्तुमैच्छत्कुपितो निषधाधिपतिर्नलः। तमुवाच कलिर्भीतो वेपमानः कृताञ्जलिः ३३ कोपं संयच्छ नृपते कीर्तिं दास्यामि ते पराम्। इन्द्रसेनस्य जननी कुपिता माशपत्पुरा ३४ यदा त्वया परित्यक्ता ततोहं भृशपीडितः। अवसं त्वयि राजेन्द्र सुदुःखमपराजित ३५ विषेण नागराजस्य दह्यमानो दिवानिशम्। शरणं त्वां प्रपन्नोस्मि शृणु चेदं वचो मम ३६ ये च त्वां मनुजा लोके कीर्तयिष्यन्त्यतन्द्रिताः। मत्प्रसूतं भयं तेषां न कदाचिद्भविष्यति ३७ भयार्तं शरणं यातं यदि मां त्वं न शप्स्यसे। एवमुक्तो नलो राजा न्ययच्छत्कोपमात्मनः ३८ ततो भीतः कलिः क्षिप्रं प्रविवेश बिभीतकम्। कलिस्त्वन्यैस्तदादृश्यः कथयन्नैषधेन वै ३९ ततो गतज्वरो राजा नैषधः परवीरहा। संप्रणष्टे कलौ राजा संख्यायास्य फलान्युत ॥ मुदा परमया युक्तस्तेजसाथ परेण वै ४० रथमारुह्य तेजस्वी प्रययौ जवनैर्हयैः। बिभीतक-

---

कलीनें आपलें रूप प्रकट केले असतां ३२ निषधदेशाधिपति नलानें त्याला शाप देण्याचें मनामध्यें आणिलें. तेव्हां, भयभीत झालेला तो कलि कांपत कांपत हात जोडून त्याला ह्मणाला ३३ " हे राजा, क्रोधाचे संयमन कर; मी तुझी पराकाष्ठेची कीर्ति करीन. इंद्रसेनाच्या मातेचा (ह्मणजे दमयंतीचा) जेव्हां तूं त्याग केलास तेव्हां तिनें क्रुद्ध होऊन मला पूर्वी शाप दिला आणि तेव्हांपासूनच, हे अजिंक्य राजाधिराज, मी अतिशय पीडित होऊन तुझे ठिकाणीं अत्यंत दुःखानें राहिलों होतों ३४,३५. कारण, नागराजाच्या विषानें माझ्या अंगाची रात्रंदिवस आग होत होती. आतां मी तुला शरण आलों आहें व तूं हें माझें ह्मणणें ऐकून ठेव ३६. मी भयानें व्याकुल होऊन तुला शरण आलो आहे. तेव्हां तूं जर मला शाप न देशील तर जे मनुष्य मनःपूर्वक ह्या भूलोकामध्यें तुझें नांव घेतील त्यांना माझ्यापासून उत्पन्न झालेलें असें भय कधींही होणार नाहीं ". असें कलीनें सांगितलें असतां नलराजानें आपला क्रोध आंवरून धरिला ३७,३८ व नंतर तो भयभीत झालेला कलि सत्वर त्या बिभीतक वृक्षामध्यें प्रविष्ट झाला. तो कलि निषधराज नलाशीं बोलत असतांना नलावांचून इतरांना अदृश्य होता ३९. असो. तदनंतर शत्रुपक्षीयवीरनाशक निषधदेशाधिपति नलराजा निर्घोर झाला. कलि नाहींसा झाल्यावर (ऋतुपर्णराजानें दिलेल्या विद्येच्या सामर्थ्यानें) त्यानें त्या वृक्षाचीं फळें मोजून (ताडून) पाहिलीं व (तीं बरोबर आहेत असें आढळून आल्यावर) त्याला अत्यंत आनंद झाला, आणि त्याच्या अंगावर कांहीं पराकाष्ठेचें तेज आलें ४०. नंतर तो तेजस्वी नल रथावर आरूढ होऊन

श्चाप्रशस्तः संवृत्तः कलिसंश्रयात् ४१ हयोत्तमानुत्पततो द्विजानिव पुनः पुनः । नलः संनोदयामास प्रहृष्टेनान्तरात्मना ४२ विदर्भाभिमुखो राजा प्रययौ स महायशाः । नले तु समतिक्रान्ते कलिरप्यगमद्गृहम् ४३ ततो गतज्वरो राजा नलोऽभूत्पृथिवीपतिः । विमुक्तः कलिना राजन्रूपमात्रवियोजितः ४४ [२८७५] इति श्रीमहाभारते० आरण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि कलिनिर्गमे द्विसप्ततितमोऽध्यायः ॥ ७२ ॥

बृहदश्व उवाच ॥ ततो विदर्भान्संप्राप्तं सायाह्ने सत्यविक्रमम् । ऋतुपर्णं जना राज्ञे भीमाय प्रत्यवेदयन् १ स भीमवचनाद्राजा कुण्डिनं प्राविशत्पुरम् । नादयन्रथघोषेण सर्वाः स विदिशो दिशः २ ततस्तं रथनिर्घोषं नलाश्वास्तत्र शुश्रुवुः । श्रुत्वा तु समहृष्यन्त पुरेव नलसंनिधौ ३ दमयन्ती तु शुश्राव रथघोषं नलस्य तम् । यथा मेघस्य नदतो गम्भीरं जलदागमे ४ परं विस्मयमापन्ना श्रुत्वा नादं महास्वनम् । नलेन संगृहीतेषु पुरेव नलवाजिषु ५ सदृशं रथनिर्घोषं मेने भैमी तथा हयाः ६ प्रासादस्थाश्च

वेगवान् अश्वांच्या योगानें सत्वर चालता झाला व इकडे तो बिभीतक वृक्षही कलीच्या संसर्गामुळें अप्रशस्त झाला ४१. (नल रथावर आरूढ झाल्याबरोबर) एकसारिखे पक्ष्याप्रमाणें उडत असलेल्या त्या उत्कृष्ट अश्वांना सुप्रसन्न अंतःकरणानें नलानेंही (सत्वर जाण्याविषयीं) इशारा दिला ४२. ह्याप्रमाणें तो महाकीर्तिमान् नलराजा विदर्भदेशाकडे चालता झाला व नल निघून गेल्यावर कलिही आपल्या घरीं गेला ४३. तदनंतर, हे राजा युधिष्ठिरा, तो पृथ्वीपति नलराजा कलीनें सोडून दिल्यामुळें निश्चिंत झाला; परंतु (कर्कोटक नागानें दिलेलें वस्त्र परिधान न केल्यामुळें) त्याला मूळचें रूप मात्र प्राप्त झालें नव्हतें ४४. ह्याप्रमाणें ० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वांपैकीं कलिनिर्गमनाविषयीं बाहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७२ ॥

बृहदश्व सांगतात:—नंतर सायंकाळीं अमोघपराक्रमी ऋतुपर्णराजा विदर्भ देशा-(च्या राजधानी) ला पोंचल्यावर तेथून लोकांनीं तो आल्याचें वर्तमान भीमराजाला कळविलें १ व रथघोषामुळें सर्व दिशा आणि उपदिशा नादित करीत करीत तो ऋतुपर्णराजा भीमराजाच्या आज्ञेनें कुंडिनपुरांत प्रविष्ट झाला २. तेव्हां तो रथाचा नाद (तेथें इंद्रसेनाला पोंचविण्याकरितां गेलेल्या) नलाच्या अश्वांनीं ऐकिला व तो नाद ऐकतांक्षणीं पूर्वी नलाचे संनिध असल्याप्रमाणें त्या अश्वांना हर्ष झाला ३. दमयंतीनेंही वर्षाकाल सुरू झाला असतां गर्जना करणाऱ्या मेघाच्या गंभीर नादाप्रमाणें नलाच्या रथाचा घोष ऐकिला ४ आणि तो प्रचंड रथघोष ऐकतांक्षणीं तिला

शिखिनः शालास्थाश्चैव वारणाः । हयाश्च शुश्रुवुस्तस्य रथघोषं महीपतेः ७ तच्छ्रुत्वा रथनिर्घोषं वारणाः शिखिनस्तथा । प्रणेदुरुन्मुखा राजन्मेघनाद इवोत्सुकाः ८ दमयन्त्युवाच ॥ यथासौ रथनिर्घोषं पूरयन्निव मेदिनीम् । ममाह्लादयते चेतो नल एष महीपतिः ९ अद्य चन्द्राभवक्त्रं तं न पश्यामि नलं यदि । असंख्येयगुणं वीरं विनङ्क्ष्यामि न संशयः १० यदि वै तस्य वीरस्य बाह्वोर्नाद्याहमन्तरम् । प्रविशामि सुखस्पर्शं न भविष्याम्यसंशयम् ११ यदि मां मेघनिर्घोषो नोपगच्छति नैषधः । अद्य चामीकरप्रख्यं प्रवेक्ष्यामि हुताशनम् १२ यदि मां सिंहविक्रान्तो मत्तवारणविक्रमः । नाभिगच्छति राजेन्द्रो विनङ्क्ष्यामि न संशयः १३ न स्मराम्यनृतं किंचिन्न स्मराम्यपकारिताम् । न च पर्युषितं वाक्यं स्वैरेष्वपि कदाचन १४ प्रभुः क्षमावान्वीरश्च दाता चाप्यधिको नृपैः । रहोनीचानु-

---

पराकाष्ठेचा विस्मय झाला ५. सारांश, पूर्वी नलानें आपले अश्व धरिले असतां जसा रथघोष होत असे तसाच हा रथघोष आहे असें त्या भीमकन्या दमयंतीला व अश्वांना वाटलें ६. त्या भूपतीच्या रथाचा ध्वनि राजवाड्यावर असलेल्या मयूर पक्ष्यांनीं, गजशालेमध्यें असलेल्या गजांनीं व अश्वांनी ऐकिला ७ आणि तो रथघोष कानावर येतांक्षणींच, हे राजा युधिष्ठिरा, मेघाची गर्जनाच आहे की काय असें समजून गज व मयूर पक्षी जिकडून तो ध्वनि येत होता तिकडे तोंडें करून उत्सुकतेनें गर्जना करूं लागले ८. दमयंती ह्मणते:—ज्याअर्थी पृथ्वी दणाणून टाकणारा हा रथाचा ध्वनि माझ्या अंतःकरणाला आनंद देत आहे त्याअर्थी हा भूपति नलच असावा ९. चंद्रतुल्य मुखानें युक्त असलेला तो असंख्यगुणसंपन्न वीर नल जर माझ्या दृष्टीं नाहीं पडला तर मी निःसंशय नाहींशी होईन १०. ज्याचा स्पर्श सुखावह आहे अशा त्या वीराच्या बाहूंचें आलिंगन जर आज मला मिळालें नाहीं तर मी निःसंशय जिवंत राहणार नाही ११. मेघासारिख्या गंभीर वाणीनें युक्त असलेला नैषध जर आज माझ्याकडे न येईल तर मी तप्त सुवर्णासारिख्या अग्नीमध्यें प्रवेश करीन १२. गतीमध्यें मत्त गजाची बरोबरी करणारा व सिंहासारिखा पराक्रमी राजाधिराज नल जर आज मला न भेटेल तर मी निःसंशय नाहींशी होईन १३. अनृत भाषण यत्किंचितूही केल्याचें मला स्मरण नाहीं; कोणालाही अपकार केल्याचें मला आठवत नाहीं आणि थट्टेमध्येंही केलेली प्रतिज्ञा शेवटास नेण्यास कालातिक्रमण झाल्याचें मला माहीत नाहीं १४. माझा प्रभु नैषध क्षमाशील, वीर, दातृत्वामध्यें इतर राजांपेक्षां अधिक, एकांतामध्येंही नीच वृत्तीचें अवलंबन न करणारा आणि परस्त्रीविषयीं

र्ती च क्लीबवन्मम नैषधः १५ गुणांस्तस्य स्मरन्त्या मे तत्पराया दिवानिशम् । हृदयं दीर्यत इदं शोकात्प्रियविनाकृतम् १६ एवं विलपमाना सा नष्टसंज्ञेव भारत । आरुरोह महद्वेश्म पुण्यश्लोकदिदृक्षया १७ ततो मध्यमकक्षायां ददर्श रथमास्थितम् । ऋतुपर्णं महीपालं सहवार्ष्णेयबाहुकम् १८ ततोऽवतीर्य वार्ष्णेयो बाहुकश्च रथोत्तमात् । हयांस्तानवमुच्याथ स्थापयामास वै रथम् १९ सोऽवतीर्य रथोपस्थादृतुपर्णो नराधिपः । उपतस्थे महाराजं भीमं भीमपराक्रमम् २० तं भीमः प्रतिजग्राह पूजया परया ततः । स तेन पूजितो राज्ञा ऋतुपर्णो नराधिपः २१ स तत्र कुण्डिने रम्ये वसमानो महीपतिः । न च किंचित्तदापश्यत्प्रेक्षमाणो मुहुर्मुहुः २२ स तु राज्ञा समागम्य विदर्भपतिना तदा । अकस्मात्सहसा प्राप्तं श्रीमन्तं न स्म विन्दति २३ किं कार्यं स्वागतं तेऽस्तु राज्ञा पृष्टः स भारत । नाभिजज्ञे स नृपतिर्दुहित्रर्थे समागतम् २४ ऋतुपर्णोऽपि राजा

नपुंसकाप्रमाणें वागणारा आहे १५. माझें मन रात्रंदिवस त्याच्याकडे वेधलेलें असून त्याच्या गुणांचें मला एकसारिखें स्मरण होत आहे आणि त्या प्रियाचा वियोग झालेलें हें माझें हृदय तर विदीर्ण होऊन जात आहे " १६. अशाप्रकारें भान न राहूनच कीं काय विलाप करितां करितां ती दमयंती, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, पुण्यश्लोक नलाला पहाण्याच्या उद्देशानें उच्च गच्चीवर चढली १७. तेव्हां वार्ष्णेय आणि बाहुक ह्यांसहवर्तमान रथामध्यें बसलेला ऋतुपर्ण भूपति मधल्या तटाशीं आला आहे असें तिनें अवलोकन केलें १८. तेथें आल्यावर वार्ष्णेय आणि बाहुक हे त्या श्रेष्ठ रथावरून खालीं उतरले आणि नंतर ते अश्व सोडून बाहुकानें तो रथ उभा केला १९. तदनंतर ऋतुपर्णराजा रथांतून खालीं उतरला आणि तो प्रचंडपराक्रमी महाराज भीमराजाकडे गेला २०. तेव्हां भीमराजानें मोठ्या मानमान्यतेनें त्याचें स्वागत केलें. नंतर त्या भीमराजानें स्वागत केलेला तो ऋतुपर्ण भूपति २१ त्या रमणीय कुंडिनपुरामध्यें उतरतांना वारंवार इकडे तिकडे पाहूं लागला असतांही (स्वयंवरासंबंधानें) त्याला कांहींच दृष्टी पडेना २२. तो ऋतुपर्ण विदर्भदेशाधिपति भीमराजाची भेट घेऊन तेथें उतरला; तथापि हा वैभवशाली ऋतुपर्णराजा अकस्मात् एकाएकीं येथें कां आला ह्याची त्या भीमराजाला अटकळ होईना २३. तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, " आपलें स्वागत असो " असें ह्मणून आपण कोणत्या उद्देशानें येथें आला आहां ? " असा भीमराजानें त्याला प्रश्न केला. कारण, आपल्या कन्येकरितां हा आला आहे हें त्या भीमराजाला विदित नव्हतें २४. असो. त्या बुद्धिमान् अमोघपराक्रमी ऋतुपर्णराजालाही

स धीमान्सत्यपराक्रमः । राजानं राजपुत्रं वा न स्म पश्यति कंचन २५
नैव स्वयंवरकथां न च विप्रसमागमम् । ततो विगणयद्राजा मनसा कोस-
लाधिपः २६ आगतोस्मीत्युवाचैनं भवन्तमभिवादकः । राजापि च स्मय-
न्भीमो मनसा समचिन्तयत् २७ अधिकं योजनशतं तस्यागमनकारणम् ।
ग्रामान्बहूनतिक्रम्य नाध्यगच्छद्यथातथम् २८ अल्पकार्यं विनिर्दिष्टं तस्या-
गमनकारणम् । पश्चादुदर्के ज्ञास्यामि कारणं यद्भविष्यति २९ नैतदेवं स
नृपतिस्तं सत्कृत्य व्यसर्जयत् । विश्राम्यतामित्युवाच क्लान्तोसीति पुनः
पुनः ३० स सत्कृतः प्रहृष्टात्मा प्रीतः प्रीतेन पार्थिवः । राजप्रेष्यैरनुगतो दिष्टं
वेश्म समाविशत् ३१ ऋतुपर्णे गते राजन्वार्ष्णेयसहिते नृपे । बाहुको रथमा-
दाय रथशालामुपागमत् ३२ स मोचयित्वा तानश्वानुपचर्य च शास्त्रतः ।
स्वयं चैतान्समाश्वास्य रथोपस्थ उपाविशत् ३३ दमयन्त्यपि शोकार्ता
दृष्ट्वा भाङ्गासुरिं नृपम् । सूतपुत्रं च वार्ष्णेयं बाहुकं च तथाविधम् ३४

(स्वयंवराकरितां ह्मणून) राजा अथवा राजपुत्र असा कोणीच तेथें आलेला दिसेना २५; स्वयवराची गोष्टही त्याच्या कानावर येईना व ब्राह्मणसमुदायही आलेला त्याला कोठें दिसेना. तेव्हा त्या कोसलदेशाधिपति ऋतुपर्णराजानें स्वयवराची वार्ताच सोडून दिली व २६ "आपणाला अभिवदन करण्याकरितां मी येथें आलों आहें" असें तो भीमराजाला ह्मणाला. असे त्यानें ह्मटल्यावर भीमराजा विस्मित होऊन "शंभर योज-नांपेक्षां ह्याला लांब येण्याचे कारण काय?" ह्मणून विचार करूं लागला; परतु, त्यानें जें उत्तर सांगितलें तेवढ्यानें अनेक गांव ओलांडून येण्याचे खरें कारण काय असावें ह्याविषयीं त्या भीमराजाची खात्री होईना २७,२८. कारण, त्या ऋतुपर्ण-राजाच्या येण्याचें जें निमित्त सागण्यांत आलें होतें तें अगदींच क्षुल्लक होतें. करितां, कांहीं काल लोटल्यावर ह्याच्या येण्याचें कारण काय हें समजून येईल असे आपल्या मनाशीं ठरवून २९ त्या वेळीं ऋतुपर्णराजाला निरोप न देतां भीमराजा त्याचा सत्कार करून " आतां विश्रांति घे· तुला फार श्रम झाले आहेत " असे पुन्हां पुन्हां त्याला ह्मणाला ३० व ह्याप्रमाणें भीमराजानें प्रसन्न होऊन ऋतुपर्णराजाचा सत्कार केला असतां त्या ऋतुपर्णराजाच्याही अंतःकरणाला आनंद होऊन तो सुप्रसन्न झाला आणि आपणां-बरोबर आलेल्या राजसेवकांनी दाखवून दिलेल्या घरामध्यें जाऊन उतरला ३१. हे राजा युधिष्ठिरा, वार्ष्णेय सारथ्यासहवर्तमान ऋतुपर्णराजा गेल्यानंतर बाहुक रथ घेऊन रथशालेमध्यें गेला ३२ व तेथें गेल्यावर अश्व सोडून व त्यांची यथाशास्त्र सेवा चाकरी करून स्वतः त्यांची पाठ थापटल्यावर तो रथावर जाऊन बसला ३३.

श्चिन्तयामास वैदर्भी कस्यैष रथनिःस्वनः । नलस्येव महानासीन्न च पश्यामि नैषधम् ३५ वार्ष्णेयेन भवेन्नूनं विद्या सैवोपशिक्षिता । तेनाद्य रथनिर्घोषो नलस्येव महानभूत् ३६ आहोस्विदृतुपर्णोपि यथा राजा नलस्तथा । यथायं रथनिर्घोषो नैषधस्येव लक्ष्यते ३७ एवं सा तर्कयित्वा तु दमयन्ती विशांपते । दूतीं प्रस्थापयामास नैषधान्वेषणे शुभा ३८ [२९१३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि भीमपुरीप्रवेशे त्रिसप्ततितमोऽध्यायः ॥ ७३ ॥

दमयन्त्युवाच॥ गच्छ केशिनि जानीहि क एष रथवाहकः । उपविष्टो रथोपस्थे विकृतो ह्रस्वबाहुकः १ अभ्येत्य कुशलं भद्रे मृदुपूर्वं समाहिता । पृच्छेथाः पुरुषं ह्येनं यथातत्त्वमनिन्दिते २ अत्र मे महती शङ्का भवेदेष नलो नृपः । यथा च मनसस्तुष्टिर्हृदयस्य च निर्वृतिः ३ ब्रूयाश्चैनं कथान्ते त्वं पर्णादवचनं यथा । प्रतिवाक्यं च सुश्रोणि बुद्ध्ये-

---

इकडे दमयंतीही ऋतुपर्णराजाला, सूतपुत्र वार्ष्णेयाला आणि तशाप्रकारें असलेल्या बाहुकाला अवलोकन करून शोकानें अगदी व्याकुल झाली ३४ आणि नंतर ती विदर्भराजकन्या दमयंती असें मनामध्यें आणूं लागली कीं, " अहो, कोणाच्या रथाचा हा ध्वनि असावा बरे ? नलाच्या रथाप्रमाणें ध्वनि तर मोठा गंभीर झाला; परंतु, नल कोठें माझ्या दृष्टीं पडत नाहीं ३५. खरोखर वार्ष्णेय सारथ्यानें तीच विद्या ग्रहण केली असेल आणि त्यामुळेंच त्यानें आणिलेल्या रथाचा ध्वनि नलाच्या रथाप्रमाणें मोठा गंभीर झाला असेल ३६. अथवा ज्याअर्थी हा रथाचा घोष निषधराज नलाच्या रथघोषाप्रमाणें दिसत आहे त्याअर्थी कदाचित् ऋतुपर्णराजाही नलराजाप्रमाणें अश्वविद्येंत निपुण असेल " ३७. ह्याप्रमाणें तर्क केल्यावर, हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, त्या कल्याणी दमयंतीनें नलराजाला पहाण्याकरितां एक दासी पाठवून दिली ३८. ह्याप्रमाणें ०श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं भीमराजाच्या नगरामध्यें नलराजाचा प्रवेश झाल्याविषयीं त्र्याहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७३ ॥

दमयंती ह्मणतेः—हे केशिनि, त्या रथावर, विद्रूप आणि ऱ्हस्व बाहूंनीं युक्त असा, जो हा सारथि बसला आहे तो कोण ह्याचा शोध लाव १ आणि, हे कल्याणि, हे निर्दोष केशिनि, त्याच्या जवळ गेल्यावर स्वस्थांतःकरणपूर्वक त्या पुरुषाला कुशलप्रश्न करून त्याची इत्थंभूत हकीगत विचारून घे २. ह्या पुरुषाविषयीं मला मोठी शंका आहे. कदाचित् हाच नलराजा असेल. कारण, ह्याला पाहिल्यापासून माझें मन संतुष्ट झालें आहे. (हे केशिनि,) त्याला अवलोकन केल्यापासून माझ्या अंतःकरणाला

थास्त्वमनिन्दिते ४ ततः समाहिता गत्वा दूती बाहुकमब्रवीत् । दमयन्त्यपि कल्याणी प्रासादस्था ह्युपैक्षत ५ केशिन्युवाच ॥ स्वागतं ते मनुष्येन्द्र कुशलं ते ब्रवीम्यहम् । दमयन्त्या वचः साधु निबोध पुरुषर्षभ ६ कदा वै प्रस्थिता यूयं किमर्थमिह चागताः । तत्त्वं ब्रूहि यथान्यायं वैदर्भी श्रोतुमिच्छति ७ बाहुक उवाच ॥ श्रुतः स्वयंवरो राज्ञा कोसलेन महात्मना । द्वितीयो दमयन्त्या वै भविता श्व इति द्विजात् ८ श्रुत्वैतत्प्रस्थितो राजा शतयोजनयायिभिः । हयैर्वातजवैर्मुख्यैरहमस्य च सारथिः ९ केशिन्युवाच ॥ अथ योसौ तृतीयो वः स कुतः कस्य वा पुनः । त्वं च कस्य कथं चेदं त्वयि कर्म समाहितम् १० बाहुक उवाच ॥ पुण्यश्लोकस्य वै सूतो वार्ष्णेय इति विश्रुतः । स नले विद्रुते भद्रे भाङ्गासुरिमुपस्थितः ११ अहमप्यश्वकुशलः सूतत्वे च प्रतिष्ठितः । ऋतुपर्णेन सारथ्ये भोजने च वृतः स्वयम् १२ केशिन्युवाच ॥ अथ जानाति

सुख होत आहे ३. हे सुंदरि, बोलणें चाललें असतांना तूं तें पर्णादाचें ह्मणणें त्याला ऐकीव आणि, हे निर्दोष स्त्रिये, त्याच्यावर तो उलट उत्तर काय देईल तेंही तूं लक्ष्यांत ठेव ४. ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितलें असतां ती दासी स्वस्थपणानें जाऊन बाहुकाशीं बोलूं लागली व कल्याणी दमयंतीही गच्चीवर उभी राहून तिकडे पाहूं लागली ५. केशिनी ह्मणतेः—हे मनुष्याधिपते, तुझें स्वागत असो. मी तुला कुशल सांगत आहें. हे पुरुषश्रेष्ठा, दमयंतीचें ह्मणणें तूं नीट ऐकून घे ६. तुह्मी निघाला केव्हां ? व येथें कशाकरितां आला ? हें तूं यथायोग्य रीतीनें खरें खरें सांग. विदर्भराजकन्या दमयंतीला तें ऐकण्याची इच्छा आहे ७. बाहुक सांगतोः—उदयिक दमयंतीचें दुसरें स्वयंवर होणार आहे असें एका ब्राह्मणापासून कोसलदेशाधिपति महात्म्या ऋतुपर्ण राजानें ऐकिलें ८ व तें ऐकतांक्षणीं एका दिवसांत शेंकडों योजनें जाणारे असे वायुसारिखे वेगवान् श्रेष्ठ अश्व रथाला जोडून तो निघाला. मी त्याचा सारथि आहे ९. केशिनी विचारितेः—तुमच्यांत जो तिसरा होता तो कुठला व कोणाचा ? त्याचप्रमाणें तूं कोणाचा आणि हें (ऋतुपर्णराजाचें) सारथ्यकर्म तुझ्याकडे कसें आलें? १० बाहुक ह्मणतोः—हे भद्रे, पुण्यश्लोक नलाचा वार्ष्णेय ह्मणून जो प्रख्यात सारथि होता तो नल पळून गेल्यावर ऋतुपर्ण राजाच्या आश्रयाला राहिला ११. मीही अश्वशास्त्रामध्यें निपुण आहें व सारथ्यकर्मही मला चांगलें येत आहे. ह्मणून ऋतुपर्ण राजानें माझी सारथ्याकडे नेमणूक केली आहे आणि पाकसिद्धीकडेही त्यानें मला स्वतःच नेमिलें आहे १२. केशिनी ह्मणतेः—तर मग नलराजा कोणीकडे गेला हें

वार्ष्णेयः क्व नु राजा नलो गतः । कथं च त्वयि वा तेन कथितं स्यात्तु बाहुक १३ बाहुक उवाच ॥ इहैव पुत्रौ निक्षिप्य नलस्य शुभकर्मणः । गतस्ततो यथाकामं नैष जानाति नैषधम् १४ न चान्यः पुरुषः कश्चिन्नलं वेत्ति यशस्विनि । गूढश्चरति लोकेस्मिन्नष्टरूपो महीपतिः १५ आत्मैव तु नलं वेद या चास्य तदनन्तरा । न हि वै स्वानि लिङ्गानि नलः शंसति कर्हिचित् १६ केशिन्युवाच ॥ योसावयोध्यां प्रथमं गतोसौ ब्राह्मणस्तदा । इमानि नारीवाक्यानि कथयानः पुनः पुनः १७ क्व नु त्वं कितव च्छित्त्वा वस्त्रार्धं प्रस्थितो मम । उत्सृज्य विपिने सुप्तामनुरक्तां प्रियां प्रिय १८ सा वै यथा समादिष्टा तथास्ते त्वत्प्रतीक्षिणी । दह्यमाना दिवा रात्रौ वस्त्रार्धेनाभिसंवृता १९ तस्या रुदन्त्याः सततं तेन दुःखेन पार्थिव । प्रसादं कुरु मे वीर प्रतिवाक्यं वदस्व च २० तस्यास्तत्प्रियमाख्यानं प्रवदस्व महामते । तदेव वाक्यं वैदर्भी श्रोतुमिच्छत्यनिन्दिता २१

वार्ष्णेयाला विदित आहे काय ? कारण, त्याला ही गोष्ट ठाऊक असल्यावांचून, हे बाहुका, (नलराजा पळून गेल्यावर मी ऋतुपर्ण राजाच्या आश्रयाला राहिलों असें) त्यानें तुला कसें बरें सांगितलें असेल ? १३. बाहुक ह्मणतोः—पुण्यकर्म करणाऱ्या नलाचीं दोन मुलें येथेंच ठेवून तो वार्ष्णेय आपल्या इच्छेप्रमाणें चालता झाला. त्याला नल कोठें गेला हें विदित नाहीं १४. इतकेंच नव्हे परतु, हे यशस्विनि, दुसऱ्या कोणत्याही पुरुषाला नलाची खबर नाहीं. रूप नष्ट झालेला तो भूपति ह्या भूलोकामध्यें गुप्त राहून संचार करीत आहे १५. स्वतां नलच आपल्याला जाणीत आहे आणि आत्मतुल्य असलेली जी त्याची भार्या ती त्याला जाणीत आहे. आपल्या खाणाखुणा नल कधींही सांगत नाहीं १६. केशिनी ह्मणतेः—(नलाच्या) स्त्रीनें सांगितलेले हे शब्द वारंवार उच्चारीत उच्चारीत तो जो (पर्णादनामक) ब्राह्मण प्रथम अयोध्या नगरीला गेला होता १७ ह्मणजे " हे धूर्ता, हे प्रिया, माझें अर्धें वस्त्र फाडून घेऊन आणि—तुझे ठिकाणीं मी प्रेम करीत असून तुलाही प्रिय असतांना अरण्यांत—मला निद्रिस्थ टाकून तूं कोणीकडे चालता झालास ? १८. ती अगदीं तुझ्या आज्ञेप्रमाणें तुझी वाट पहात बसली आहे व अर्धें वस्त्र परिधान केलेली ती रात्रंदिवस (शोकानें अगदीं) जळत आहे १९. हे राजा, त्या वियोगदुःखानें एकसारिखी ती रडत बसली आहे. करितां, हे वीरा, तूं तिच्यावर कृपा कर आणि ह्या ह्मणण्याचें उत्तर दे २०. हे महामते, तिला प्रिय असलेलें तें उत्तर तूं दे. ती निर्दोष दमयंती तेंच तुझें भाषण श्रवण करण्याची इच्छा करीत आहे " २१. असें सांगत

एतच्छ्रुत्वा प्रतिवचस्तस्य दत्तं त्वया किल। यत्पुरा तत्पुनस्त्वत्तो वैदर्भी श्रोतुमिच्छति २२ बृहदश्व उवाच ॥ एवमुक्तस्य केशिन्या नलस्य कुरुनन्दन। हृदयं व्यथितं चासीदश्रुपूर्णे च लोचने २३ स निगृह्यात्मनो दुःखं दह्यमानो महीपतिः। बाष्पसंदिग्धया वाचा पुनरेवेदमब्रवीत् २४ बाहुक उवाच ॥ वैषम्यमपि संप्राप्ता गोपायन्ति कुलस्त्रियः। आत्मानमात्मना सत्यो जिताः स्वर्गो न संशयः २५ रहिता भर्तृभिश्चापि न क्रुध्यन्ति कदाचन। प्राणांश्चारित्रकवचान्धारयन्ति वरस्त्रियः २६ विषमस्थेन मूढेन परिभ्रष्टसुखेन च। यत्सा तेन परित्यक्ता तत्र न क्रोद्धुमर्हति २७ प्राणयात्रां परिप्रेप्सोः शकुनैर्हृतवाससः। आधिभिर्दह्यमानस्य श्यामा न क्रोद्धुमर्हति २८ सत्कृतासत्कृता वापि पतिं दृष्ट्वा तथाविधम्। राज्यभ्रष्टं

सांगत जो ब्राह्मण प्रथम अयोध्यानगरीमध्यें गेला होता त्याचें तें भाषण श्रवण करून तूं त्याला प्रत्युत्तर दिलें होतेंस असें ऐकण्यांत आहे आणि पूर्वीं जें तूं प्रत्युत्तर दिलेंस तेंच पुनरपि श्रवण करण्याची विदर्भराजकन्या दमयंतीची इच्छा आहे २२. बृहदश्व सांगतात:— हे कुरुनंदना धर्मराजा, ह्याप्रमाणें केशिनीनें नलाला सांगितलें असतां त्याच्या अंतःकरणाला दुःख होऊन त्याचे नेत्र अश्रूंनीं भरून आले २३; परंतु, दुःखानें जळत असलेल्या त्या भूपतीनें आपलें दुःख आंवरून धरिलें आणि अश्रूंनीं कंठ दाटून आल्यामुळें संदिग्ध उच्चारांनीं युक्त अशा वाणीनें त्यानें पुनरपि तेंच उत्तर दिलें २४. बाहुक ह्मणतोः—पतिव्रता कुलस्त्रिया दुःसह संकटांत जरी सांपडल्या तरी त्या स्वतः आपलें रक्षण करीत असतात आणि त्याच (आपल्या आचरणानें) स्वर्ग प्राप्त करून घेतात ह्यांत संशय नाहीं २५. भर्त्यांनीं त्यांचा जरी त्याग केला तरी त्या त्यांच्यावर कधीं क्रुद्ध होत नाहींत; परंतु, त्या श्रेष्ठ स्त्रिया पातिव्रत्यरूप कवचानें युक्त असलेले आपले प्राण धारण करीत असतात. (सारांश, अशा अवस्थेमध्यें प्राणसंरक्षण होणें जरी कठीण असतें तरी त्यांचें पातिव्रत्य व्रत प्राणांचें संरक्षक असल्यामुळें त्या जिवंत रहात असतात;) २६. विवेकहीन झाल्यामुळें संकटांत सांपडून सर्व सुखाला अंचवल्यावर जर त्यानें तिचा (निरुपाधास्तव) त्याग केलेला आहे तर त्याबद्दल त्याच्यावर क्रोध करणें तिला योग्य होणार नाहीं २७. प्राणरक्षणार्थ कांहीं तरी मिळावें ह्मणून यत्न करीत असतांना पक्ष्यांनीं त्याचें वस्त्र हरण करून नेलें. तेव्हां अशाप्रकारच्या मानसिक दुःखांनीं अंगाची आग झाल्यामुळें त्यानें जी गोष्ट केली त्याबद्दल त्या सदैव तारुण्यसंपन्न असलेल्या स्त्रीनें त्याच्यावर क्रोध करणें योग्य होणार नाहीं २८. पतीच्या हातून तिचा सत्कार झालेला असो किंवा अपमान झालेला

श्रिया हीनं क्षुधितं व्यसनाप्लुतम् २९ एवं ब्रुवाणस्तद्वाक्यं नलः परमदु-
र्मनाः। न बाष्पमशकत्सोढुं प्ररुरोद च भारत ३० ततः सा केशिनी
गत्वा दमयन्त्यै न्यवेदयत्। तत्सर्वं कथितं चैव विकारं तस्य चैव तम् ३१
[२९४४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके
पर्वणि नलोपाख्यानपर्वणि नलकेशिनीसंवादे चतुःसप्ततितमोऽध्यायः॥७४॥

बृहदश्व उवाच॥ दमयन्ती तु तच्छ्रुत्वा भृशं शोकपरायणा। शङ्क-
माना नलं तं वै केशिनीमिदमब्रवीत् १ गच्छ केशिनि भूयस्त्वं परीक्षां
कुरु बाहुके। अब्रुवाणा समीपस्था चरितान्यस्य लक्षय २ यदा च
किंचित्कुर्यात्स संलक्ष्यं तत्र भामिनि। तत्र संचेष्टमानस्य लक्षयन्ती
विचेष्टितम् ३ न चास्य प्रतिबन्धेन देयोऽग्निरपि केशिनि। याचते न
जलं देयं सर्वथा त्वरमाणया ४ एतत्सर्वं समीक्ष्य त्वं चरितं मे निवेदय।
निमित्तं यत्त्वया दृष्टं बाहुके दैवमानुषम्॥ यच्चान्यदपि पश्येथास्तच्चाख्येयं

असो परंतु, आपला पति राज्यापासून भ्रष्ट, संपत्तिहीन, क्षुधित आणि संकटामध्यें बुडून गेलेला आहे असा विचार करून ती त्याच्यावर क्रोध करणार नाहीं २९. ह्याप्रमाणें मनामध्यें अत्यंत खिन्न होऊन नल तें उत्तर उच्चारीत असतांना त्याच्यानें जेव्हां अश्रु आवरून धरवेनात तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, तो रुदन करूं लागला ३०. तदनंतर ती केशिनी दासी दमयंतीकडे गेली आणि त्यानें सांगितलेलें तें उत्तर व तें सांगतां सांगतां त्याचे ठिकाणीं उत्पन्न झालेला तो विकार हें सर्व तिनें दमयंतीला निवेदन केलें ३१. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं नल आणि केशिनी ह्यांच्या संवादाविषयीं चौऱ्याहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७४ ॥

बृहदश्व सांगतातः—तें ऐकिल्यावर दमयंती अतिशय शोक करूं लागली आणि तो नल असावा असें वाटून ती केशिनीला ह्मणाली १ " हे केशिनि, तूं पुनरपि जा आणि बाहुकाची परीक्षा कर. तूं त्याच्या जवळ उभी रहा आणि कांहीं एक न बोलता त्याच्या हालचालीकडे लक्ष्य दे २. बाई, लक्ष्य देण्यासारिखें जेव्हां तो कांहीं करील तेव्हां तिकडे तूं लक्ष्य देत जा अथवा तो हालचाल करूं लागला असतां त्याच्या सर्वही वर्तनाकडे तुझें लक्ष्य असूं दे ३. हे केशिनि, तो जल मागूं लागला असतां तूं कधींही उत्सुक होऊन त्याला जल देऊं नको आणि अग्नि मागूं लागला असतां तोही त्याला तूं निश्चयानें देऊं नको ४. ह्या सर्वांचा परिणाम काय होतो हें तूं पहा, त्या बाहुकाचे ठिकाणीं दैविक अथवा मानवी असा जो जो प्रकार तुझ्या आढळण्यांत येईल तो तो तूं त्याच्या आचरणासहवर्तमान मला निवेदन कर आणि

त्वया मम ५ दमयन्त्यैवमुक्ता सा जगामाथ च केशिनी । निशम्याथ हयज्ञस्य लिङ्गानि पुनरागमत् ६ सा तत्सर्वं यथावृत्तं दमयन्त्यै न्यवेदयत् । निमित्तं यत्तया दृष्टं बाहुके दैवमानुषम् ७ केशिन्युवाच ॥ दृढं शुच्युपचारोसौ न मया मानुषः क्वचित् । दृष्टपूर्वः श्रुतो वापि दमयन्ति तथाविधः ८ ह्रस्वमासाद्य संचारं नासौ विनमते क्वचित् । तं तु दृष्ट्वा यथासङ्गमुत्सर्पति यथासुखम् ९ संकटेप्यस्य सुमहान्विवरो जायतेऽधिकः १० ऋतुपर्णस्य चार्थाय भोजनीयमनेकशः । प्रेषितं तत्र राज्ञा तु मांसं बहु च पाशवम् ११ तस्य प्रक्षालनार्थाय कुम्भास्तत्रोपकल्पिताः । ते तेनावेक्षिताः कुम्भाः पूर्णा एवाभवंस्ततः १२ ततः प्रक्षालनं कृत्वा समधिश्रित्य बाहुकः । तृणमुष्टिं समादाय सवितुस्तं समादधत् १३ अथ प्रज्वलितस्तत्र महसा हव्यवाहनः । तदद्भुततमं दृष्ट्वा विस्मिताहमिहागता १४ अन्यच्च तस्मिन्सुमहदाश्चर्यं लक्षितं मया । यदग्निमपि संस्पृश्य

ह्याशिवायही जें कांहीं तुझ्या दृष्टी पडेल तेंही तूं मला सांग" ५. ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितलें असतां ती केशिनी तिकडे गेली; नंतर त्या अश्वशास्त्रज्ञाचीं लक्षणें पाहून परत आली ६ आणि परत आल्यावर बाहुकाचे ठिकाणीं दैविक अथवा मानुष असा जो जो प्रकार तिनें अवलोकन केला होता तो सर्व इत्थंभूत तिनें दमयंतीला निवेदन केला ७. केशिनी ह्मणते:—हे दमयंति, हा स्वच्छता राखण्याविषयीं फारच तत्पर आहे. ह्याच्यासारिखा स्वच्छतेनें वागणारा मनुष्य ह्यापूर्वीं मीं कधीं पाहिला नाहीं व ऐकिलाही नाहीं ८. दार जरी ठेंगणें असलें तरी हा कोठेंही वाकत नाहीं. तो जवळ आलेला पाहून त्याला जेथें जेथें लागण्याचा संभव असेल तेथें तेथें तो तो प्रदेश आपोआपच खुशाल मोठा होत जातो ९. अति संकुचित जागा जरी असली तरी त्याठिकाणीं फारच प्रचंड खड्डा झाला पाहिजे असल्यास आपोआप होतो १०. भीमराजानें ऋतुपर्णाकरितां अनेक प्रकारचे भोज्य पदार्थ आणि पशूचें विपुल मांस पाठवून दिलें होतें ११ व तें प्रक्षालन करण्याकरितां त्या ठिकाणीं घागरीही ठेविलेल्या होत्या; परंतु, त्या घागरीमध्यें प्रत्यक्ष पाणी न भरतां त्या बाहुकानें त्यांच्याकडे दृष्टि फेंकतांक्षणींच त्या जलानें परिपूर्ण झाल्या १२. नंतर सडासंमार्जन करून त्यानें चुलीवर भांडें चढविलें आणि हातामध्यें एक मूठभर गवत घेऊन तें सूर्याच्या संमुख धरिलें १३. तेव्हां, एकाएकीं त्या ठिकाणीं अग्नि प्रज्वलित झाला. हें अत्यंत आश्चर्य अवलोकन करून मी विस्मित झालें आणि इकडे निघून आलें १४. आणखीही एक फारच मोठें आश्चर्य मीं त्याचे ठिकाणीं अवलोकन केलें. अग्नि हातांत धरिला असतांही, हे

नैवासौ दृश्यते शुभे १५ छन्देन चोदकं तस्य वहत्यावर्जितं द्रुतम् । अतीव चान्यत्सुमहदाश्चर्यं दृष्टवत्यहम् १६ यत्स पुष्पाण्युपादाय हस्ताभ्यां ममर्द शनैः । मृद्यमानानि पाणिभ्यां तेन पुष्पाणि नान्यथा १७ भूय एव सुगन्धीनि हृषितानि भवन्ति हि । एतान्यद्भुतलिङ्गानि दृष्ट्वाहं द्रुतमागता १८ बृहदश्व उवाच ॥ दमयन्ती तु तच्छ्रुत्वा पुण्यश्लोकस्य चेष्टितम् । अमन्यत नलं प्राप्तं कर्मचेष्टाभिसूचितम् १९ सा शङ्कमाना भर्तारं बाहुकं पुनरिङ्गितैः । केशिनीं श्लक्ष्णया वाचा रुदती पुनरब्रवीत् २० पुनर्गच्छ प्रमत्तस्य बाहुकस्योपसंस्कृतम् । महानसाच्छ्रितं मांसमानयस्वेह भाविनि २१ मा गत्वा बाहुकस्याग्रे तन्मांसमपकृष्य च । अत्युष्णमेव त्वरिता तत्क्षणात्प्रियकारिणी । दमयन्त्यै ततः प्रादात्केशिनी कुरुनन्दन २२ संचिता नलसिद्धस्य मांसस्य बहुशः पुरा । प्राश्य मत्वा नलं सूतं प्राक्रोशद्भृशदुःखिता २३ वैक्लव्यं परमं गत्वा प्रक्षाल्य च मुखं ततः । मिथुनं प्रेषयामास केशिन्या सह भारत २४ इन्द्रसेनां सह भ्रात्रा सम-

---

कल्याणि दमयंति, त्याचा हात भाजतच नाहीं १५ व त्याची इच्छा असेल त्याप्रमाणें उदक आपल्याआपण वळून सत्वर वाहूं लागतें. आणखीही मीं एक फारच मोठें आश्चर्य त्याचे ठिकाणीं पाहिलें १६. तें असें कीं, त्यानें पुष्पें घेऊन हातांनीं हळूहळू चुरगाळिलीं; परंतु, हातांनीं तो तीं चुरगळूं लागला असतांही त्यांमध्यें कांहीं एक विकार न होतां १७ तीं पहिल्यापेक्षांही अधिकच टवटवीत व सुगंधयुक्त होत. असो. हीं अद्भुत लक्षणें अवलोकन करून मी सत्वर निघून आलें १८. बृहदश्व सांगतातः—हें पुण्यकीर्ति नलराजाचें आचरण पाहून कृति आणि हालचाल ह्यांच्यावरून हा नलच प्राप्त झाला आहे असें तिला वाटलें १९ आणि लक्षणांवरून पाहतां तो बाहुक आपला भर्ताच असावा असा तिला चांगलाच संशय येऊन मधुर वाणीनें ती पुनरपि केशिनीला ह्मणाली २० "हे स्त्रिये, तूं पुनरपि तिकडे जा आणि बाहुकाचें लक्ष्य जेव्हां दुसरीकडे असेल तेव्हां त्याच्या स्वयंपाकघरांतून त्यानें तयार केलेलें शिजलेलें मांस इकडे घेऊन ये" २१. असें केशिनीला दमयंतीनें सांगितल्यावर ती बाहुकाजवळ गेली आणि तेथील उन्हून उन्हून मांस घेऊन ती दमयंतीचें प्रिय करणारी दासी सत्वर तत्क्षणीं तेथून आली व नंतर, हे कुरुवंशजा धर्मराजा, तिनें तें दमयंतीला दिलें २२. पूर्वीं पुष्कळवेळां नलानें तयार केलेलें मांस दमयंतीनें सेविलें असल्यामुळें तें मांस सेवन केल्याबरोबर तिनें तो सारथि नलच आहे असें जाणिलें आणि अत्यंत दुःखित होऊन ती आक्रोश करूं लागली २३. नंतर अत्यंत खिन्न होऊन मुखप्रक्षालन केल्यावर, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, केशिनीबरोबर तिनें

भिज्ञाय बाहुकः । अभिद्रुत्य ततो राजा परिष्वज्याङ्कमानयत् २५ बाहुकस्तु समासाद्य सुतौ सुरसुतोपमौ । भृशं दुःखपरीतात्मा सुस्वरं प्ररुरोद ह २६ नैषधो दर्शयित्वा तु विकारमसकृत्तदा । उत्सृज्य सहसा पुत्रौ केशिनीमिदमब्रवीत् २७ इदं च सदृशं भद्रे मिथुनं मम पुत्रयोः । अतो दृष्ट्वैव सहसा बाष्पमुत्सृष्टवानहम् २८ बहुशः संपतन्तीं त्वां जनः शङ्केत दोषतः । वयं च देशातिथयो गच्छ भद्रे यथासुखम् २९ [२९७३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि कन्यापुत्रदर्शने पञ्चसप्ततितमोऽध्यायः ॥ ७५ ॥

बृहदश्व उवाच ॥ सर्वं विकारं दृष्ट्वा तु पुण्यश्लोकस्य धीमतः । आगत्य केशिनी सर्वं दमयन्त्यै न्यवेदयत् १ दमयन्ती ततो भूयः प्रेषयामास केशिनीम् । मातुः सकाशं दुःखार्ता नलदर्शनकाङ्क्षया २ परीक्षितो मे बहुशो बाहुको नलशङ्कया । रूपे मे संशयस्त्वेकः स्वयमिच्छामि वेदितुम् ३ स वा प्रवेश्यतां मातर्मां वानुज्ञातुमर्हसि । विदितं

आपलीं दोन मुलें तिकडे पाठवून दिलीं २४. तेव्हां भ्रात्यासहवर्तमान इंद्रसेनाला ओळखून बाहुक नांव धारण केलेला नलराजा सत्वर त्या मुलांकडे धांवला आणि आलिंगन देऊन त्यानें तीं मुलें आपल्या मांडीवर बसविलीं २५. इतकेंच नव्हे परंतु, देवपुत्राप्रमाणें असलेलीं तीं मुलें अंकावर घेतल्यानंतर तो नल दुःखानें व्याकुल होऊन उच्च स्वरानें रुदन करूं लागला २६. असो. ह्याप्रमाणें वारंवार रुदनादिविकार दर्शविल्यावर त्या मुलांना एकाएकीं पलीकडे करून नल केशिनीला ह्मणाला २७ "हे कल्याणि, हीं दोन्हीं मुलें माझ्या मुलांसारिखीं आहेत. ह्मणून ह्यांना पाहिल्याबरोबर एकाएकीं माझ्या नेत्रांतून अश्रु आले २८. आह्मी परदेशाहून येथें आलों आहों; तेव्हां तूं वारंवार आह्मांकडे येत आहेस ह्यामुळें लोक कांहीं भलतीच शंका घेऊन तुला दोष लावूं लागतील. ह्याकरितां, हे कल्याणि, तूं खुशाल येथून चालती हो २९. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत ०श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं कन्या आणि पुत्र नलराजाच्या दृष्टीस पडल्याविषयीं पंचाहात्तरावा अध्याय समाप्त झाला॥ ७५ ॥

बृहदश्व सांगतातः—विचारी व पुण्यकीर्ति नलराजाचे ठिकाणीं झालेला तो विकार अवलोकन केल्यावर केशिनीनें दमयंतीकडे येऊन तिला तो सर्व निवेदन केला १. तदनंतर दुःखाकुल झालेल्या त्या दमयंतीनें नलाची भेट व्हावी एतदर्थ केशिनीबरोबर मातेकडे असा निरोप पाठविला कीं २, "(हे माते) हा नल असावा अशी शंका आल्यामुळें मीं पुन्हां पुन्हां बाहुकाची परीक्षा केली; परंतु, फक्त रूपासंबंधानें माझा एक संशय

वाथवाज्ञातं पितुर्मे संविधीयताम् ४ एवमुक्ता तु वैदर्भ्या सा देवी भीम-
मब्रवीत् । दुहितुस्तमभिप्रायमन्वजानात्स पार्थिवः ५ सा वै पित्राभ्यनु-
ज्ञाता मात्रा च भरतर्षभ । नलं प्रवेशयामास यत्र तस्याः प्रतिश्रयः ६
तां स्म दृष्ट्वैव महसा दमयन्तीं नलो नृपः । आविष्टः शोकदुःखाभ्यां बभू-
वाश्रुपरिप्लुतः ७ तं तु दृष्ट्वा तथायुक्तं दमयन्ती नलं तदा । तीव्रशोक-
समाविष्टा बभूव वरवर्णिनी ८ ततः काषायवसना जटिला मलपङ्किनी ।
दमयन्ती महाराज बाहुकं वाक्यमब्रवीत् ९ पूर्वं दृष्टस्त्वया कश्चिद्ध-
र्मज्ञो नाम बाहुक । सुप्तामुत्सृज्य विपिने गतो यः पुरुषः स्त्रियम् १०
अनागसं प्रियां भार्यां विजने श्रममोहिताम् । अपहाय तु को गच्छेत्पु-
ण्यश्लोकमृते नलम् ११ किमु तस्य मया बाल्यादपराद्धं महीपतेः । यो
मामुत्सृज्य विपिने गतवान्निद्रयार्दिताम् १२ साक्षाद्देवानपाहाय वृतो

उरला आहे व त्याविषयीं स्वतःच खात्री करून घ्यावी अशी माझी इच्छा आहे ३. ह्यास्तव, हे माते, त्याला तरी येथें आण किंवा मला तरी तिकडे जाण्याची अनुज्ञा दे. हे माते " माझ्या पित्याला विदित करून अथवा (तुला योग्य वाटत असेल तर) त्याला न समजतां अशी व्यवस्था झालीच पाहिजे " ४. ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितलें असतां त्या राजपत्नीनें भीमराजाला ती गोष्ट निवेदन केली व त्या राजानेंही आपल्या कन्येच्या त्या इच्छेला अनुमोदन दिलें ५. हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, ह्याप्रमाणें पित्याचें व मातेचें अनुमोदन मिळाल्यावर दमयंतीनें आपल्या गृहामध्यें नलाला आणविलें असतां ६ त्या दमयंतीला अवलोकन करितांक्षणींच नलराजा एकाएकीं शोक व दुःख ह्यांनीं व्याप्त झाला आणि त्याचे नेत्र अश्रूंनीं अगदीं भरून आले ७. तेव्हां तशाप्रकारें शोक व दुःख ह्यांनीं व्याप्त झालेल्या त्या नलाला अवलोकन करून त्या श्रेष्ठ स्त्री दमयंतीलाही प्रचंड शोकाचें अगदीं भरतें आलें ८ आणि, हे महाराज युधिष्ठिरा, नंतर काषाय वस्त्र परिधान करून केंस मोकळे सोडिलेली आणि मळ व चिखल ह्यांनीं भरलेली ती दमयंती बाहुकाला ह्मणाली ९ " हे बाहुका, स्त्री निद्रिस्थ असतांना तिला अरण्यांत टाकून देऊन पूर्वी निघून गेलेला असा एकादा धर्मज्ञ ह्मणून प्रसिद्ध असलेला पुरुष तुझ्या दृष्टोत्पत्तीस आला आहे काय ? १०. आपली निरपराधी प्रिय भार्या श्रमानें मूर्छित होऊन पडली असतांना पुण्यकीर्ति नलावांचून दुसरा कोण बरें तिला अरण्यांत टाकून जाईल ? ११. निद्रेनें व्याकुल झालेल्या मला अरण्यांत सोडून देऊन जो चालता झाला त्या भूपतीचा माझ्या हातून अज्ञानामुळें काय बरें अपराध घडलेला होता ? १२. अरे, प्रत्यक्ष देवांना सोडून ज्याला मीं पूर्वी वरिलें त्यानें—त्याच्या इच्छे-

यः स पुरा मया । अनुव्रतां साभिकामां पुत्रिणीं त्यक्तवान्कथम् १३ अग्नौ पाणिं गृहीत्वा तु देवानामग्रतस्तथा । भविष्यामीति सत्यं तु प्रतिश्रुत्य क्व तद्गतम् १४ दमयन्त्या ब्रुवन्त्यास्तु सर्वमेतदरिन्दम । शोकजं वारि नेत्राभ्यामसुखं प्रास्रवद्बहु १५ अतीव कृष्णताराभ्यां रक्तान्ताभ्यां जलं तु तत् । परिस्रवन्नलो दृष्ट्वा शोकार्तामिदमब्रवीत् १६ मम राज्यं प्रणष्टं यन्नाहं तत्कृतवान्स्वयम् । कलिना तत्कृतं भीरु यच्च त्वामहमत्यजम् १७ यत्त्वया धर्मकृच्छ्रे तु शापेनाभिहतः पुरा । वनस्थया दुःखितया शोचन्त्या मां दिवानिशम् १८ स मच्छरीरे त्वच्छापाद्दह्यमानोवसत्कलिः । त्वच्छापदग्धः सततं सोग्नावग्निरिवाहितः १९ मम च व्यवसायेन तपसा चैव निर्जितः । दुःखस्यान्तेन चानेन भवितव्यं हि नौ शुभे २० विमुच्य मां गतः पापस्ततोहमिह चागतः । त्वदर्थं विपुलश्रोणि न हि मेन्यत्प्रयोजनम् २१ कथं नु नारी भर्तारमनुरक्तमनुव्रतम् । उत्सृज्य वरयेदन्यं यथा त्वं भीरु कर्हिचित् २२ दूताश्चरन्ति

प्रमाणें वागून त्याच्याचविषयीं उत्सुक असलेल्या—मज पुत्रवती स्त्रीचा कसा बरें त्याग केला ? १३. देवांसमक्ष अग्निसंनिध माझें पाणिग्रहण करून " हिचें पालन करीन " अशी जी त्यानें खरी खरी प्रतिज्ञा केली ती कोणीकडे रे गेली ? १४. हें सर्व दमयंती बोलूं लागली असतां, हे शत्रुदमना युधिष्ठिरा, तिच्या नेत्रांतून शोकामुळें अतिशय दुःखाश्रु चालले १५. तेव्हां आरक्तवर्ण अंतांनी युक्त आणि अतिशयच कृष्णवर्ण अशा दमयंतीच्या नेत्रांतून चाललेलें तें जल अवलोकन करून नलराजा त्या शोकाकुल झालेल्या दमयंतीला ह्मणाला १६ " माझें जें राज्य गेलें तें कृत्य माझें स्वतःचें नव्हे. तें कृत्य कलीनें केलें आणि, हे भीरु, मीं जो तुझा त्याग केला तेंही कलीचेंच कृत्य होय १७. धर्मसंकट प्राप्त झाल्यावर तूं दुःखित होऊन रात्रंदिवस माझ्याकरितां वनांत राहून शोक करीत असतांना पूर्वी ज्याला शाप दिलास १८ तो तुझ्या शापामुळें अंगाची आग होत असलेला कलि माझ्या शरीरामध्यें राहिला. तुझ्या शापामुळें तो एकसारिखा दग्ध होत असल्यामुळें अग्नींत ठेविलेल्या अग्नीप्रमाणेंच तो माझ्या शरीरामध्यें वास्तव्य करीत होता १९; परंतु, माझ्या उद्योगानें आणि तपानें तो पराजित झाला. आतां, हे कल्याणि, आपल्या दुःखाचा शेंवट एवढ्यानेंच होईल २०. कारण, तो पापी कलि मला सोडून चालता झाला. आतां, हे सुंदरि, मी येथें तुझ्याकरितां आलों आहें. मला येथें येण्याचें दुसरें कांहींच कारण नाहीं २१. हे भीरु, भार्येवर प्रीति करणाऱ्या व तिच्या इच्छेप्रमाणें वागणाऱ्या भर्त्याचा त्याग करून तुझ्याप्रमाणें दुसऱ्याचा

पृथिवीं कृत्स्नां नृपतिशासनात् । भैमी किल स्म भर्तारं द्वितीयं वरयिष्यति २३ स्वैरवृत्ता यथाकाममनुरूपमिवात्मनः । श्रुत्वैव चैवं त्वरितो भाङ्गासुरिरुपस्थितः २४ दमयन्ती तु तच्छ्रुत्वा नलस्य परिदेवितम् । प्राञ्जलिर्वेपमाना च भीता वचनमब्रवीत् २५ दमयन्त्युवाच ॥ न मामर्हसि कल्याण दोषेण परिशङ्कितुम् । मया हि देवानुत्सृज्य वृतस्त्वं निषधाधिप २६ तवाभिगमनार्थं तु सर्वतो ब्राह्मणा गताः । वाक्यानि मम गाथाभिर्गायमाना दिशो दश २७ ततस्त्वां ब्राह्मणो विद्वान्पर्णादो नाम पार्थिव । अभ्यगच्छत्कोसलायामृतुपर्णनिवेशने २८ तेन वाक्ये कृते सम्यक्प्रतिवाक्ये तथाहृते । उपायोयं मया दृष्टो नैषधानयने तव २९ त्वामृते न हि लोकेन्य एकाह्ना पृथिवीपते । समर्थो योजनशतं गन्तुमश्वैर्नराधिप ३० स्पृशेयं तेन सत्येन पादावेतौ महीपते । यथा नासत्कृतं किंचिन्मनसापि चराम्यहम् ३१ अयं चरति लोकेस्मिन्भूतसाक्षी सदागतिः । एष मे मुञ्चतु प्राणान्यदि पापं चराम्यहम् ३२ यथा चरति तिग्मांशुः

स्वीकार करण्यास, कसाही प्रसंग आला तरी, स्त्री कशी बरे उद्युक्त होईल ? २२. "स्वच्छंदचारिणी भीमकन्या आपल्या इच्छेप्रमाणें आपणांला योग्य असा दुसरा भर्ता वरणार" ह्मणून राजाच्या आज्ञेनें सर्व पृथ्वीभर दूत सांगत हिंडत आहेत व तें ऐकतांक्षणीं ऋतुपर्णराजा स्वयंवराकरितां येथें सत्वर आला आहे" २३.२४. हें नलाचें दीन भाषण श्रवण केल्याबरोबर दमयंती भयभीत होऊन लटलट कांपूं लागली आणि हात जोडून त्याला ह्मणाली २५ "हे कल्याणा निषधराजा, मीं देवांचा त्याग करून आपणांला वरिलें आहें. ह्यास्तव, माझ्याविषयी दोषाची शंका घेणें आपणांला योग्य नाही २६. आपण येथें यावें एतदर्थ मीं सांगितलेलीं वाक्यं इतरहीं वचनांसहवर्तमान उच्चारीत उच्चारीत ब्राह्मण सर्व प्रदेशांवर—ह्मणजे दशदिशा—हिंडत होते २७ आणि हिंडतां हिंडतां, हे माहराज, पर्णाद नांवाचा एक विद्वान् ब्राह्मण कोसलदेशाच्या राजधानीमध्यें ऋतुपर्ण राजाचे घरीं आपणांला भेटला २८. आपली गांठ पडल्यावर त्यानें मीं सांगितलेले भाषण केलें असतां आपणांकडून त्याला प्रत्युत्तर मिळालें. तेव्हां, हे निषधराज, आपणांला येथें आणण्याकरितां मला हा उपाय सुचला २९. हे भूपते, हे नराधिपते, एका दिवसांत अश्वांच्या योगानें शंभर योजनें मार्ग चालून जाण्यास समर्थ असा आपणांवांचून ह्या जगतांत दुसरा कोणीही नाहीं ३०. हे भूपते,(आपली भेट व्हावी एतदर्थ मीं हा उपाय योजिला) हें मी आपल्या पायांशपत खरें सांगत आहें. आपला अपमान होईल अशी कोणतीही गोष्ट मी मनामध्यें आणीत नाहीं ३१. ह्या भूलोकामध्यें हा भूतसाक्षी वायु संचार करीत आहे. तेव्हां माझ्या

परेण भुवनं सदा । स मुञ्चतु मम प्राणान्यदि पापं चराम्यहम् ३३
चन्द्रमाः सर्वभूतानामन्तश्चरति साक्षिवत् । स मुञ्चतु मम प्राणान्यदि
पापं चराम्यहम् ३४ एते देवास्त्रयः कृत्स्नं त्रैलोक्यं धारयन्ति वै। विब्रु-
वन्तु यथासत्यमेतद्देवास्त्यजन्तु माम् ३५ एवमुक्तस्तथा वायुरन्तरि-
क्षादभाषत । नैषा कृतवती पापं नल सत्यं ब्रवीमि ते ३६ राजञ्छी-
लनिधिः स्फीतो दमयन्त्या सुरक्षितः । साक्षिणो रक्षिणश्चास्या वयं
त्रीन्परिवत्सरान् ३७ उपायो विहितश्चायं त्वदर्थमतुलोनया। न ह्येकाह्ना
शतं गन्ता त्वामृतेन्यः पुमानिह ३८ उपपन्ना त्वया भैमी त्वं च भैम्या
महीपते । नात्र शङ्का त्वया कार्या संगच्छ सह भार्यया ३९ तथा ब्रुवति
वायौ तु पुष्पवृष्टिः पपात ह । देवदुन्दुभयो नेदुर्ववौ च पवनः शिवः ४०
तदद्भुतमयं दृष्ट्वा नलो राजाथ भारत । दमयन्त्यां विशङ्कां तामुपाकर्ष-
दरिन्दमः ४१ ततस्तद्वस्त्रमरजः प्रावृणोद्वसुधाधिपः । संस्मृत्य नागराजं

मनांत जर पाप असेल तर हा माझे प्राण घेवो ३२. हा सूर्य जगताच्या पलीकडेही सर्वदां प्रकाशत आहे. तेव्हां माझ्या मनांत जर पाप असेल तर तो माझे प्राण घेवो ३३. (अंतःकरणाचा अधिष्ठाता) चंद्रमा प्राणिमात्रांच्या अंतःकरणामध्यें साक्षीप्रमाणें संचार करीत आहे. तेव्हां माझ्या अंतःकरणांत जर कांहीं पाप असेल तर तो माझे प्राण हरण करो ३४. सारांश, (वायु, चंद्र आणि सूर्य) हे तीन देव संपूर्ण त्रैलोक्य धारण करीत आहेत. तेव्हां माझ्या मनांत काय असेल ते ह्यांनीं सत्य सांगावें आणि पाप असल्यास ह्या देवांनीं माझा त्याग करावा " ३५. ह्याप्रमाणें दमयंतीनें सांगितलें असतां अंतरिक्षांतून वायु ह्मणाला " हे नला, हिनें पाप केलें नाहीं; हें मी तुला सत्य सांगत आहें ३६. हे राजा, सुशील वर्तनाचें भव्य भांडार दमयंतीनें सुरक्षित ठेविलें आहे आणि आह्मी तीन संवत्सरपर्यंत हिचे साक्षी व रक्षक आहोंत ३७. एका दिवसामध्यें शंभर योजनें जाणारा तुझ्यावांचून इतर कोणीही पुरुष ह्या जगतामध्यें नाहीं असें समजून हा अनुपम उपाय हिनें तुझ्याकरितां योजिला आहे ३८. हे भूपते, भीमकन्या तुला येऊन भेटली आहे व तूंही तिला येऊन भेटला आहेस. तेव्हां ह्याविषयीं तूं शंका मनामध्यें न आणितां भार्येशीं संगत हो " ३९. ह्याप्रमाणें वायु बोलत असतांना आकाशांतून पुष्पवृष्टि झाली; देवदुंदुभि वाजूं लागल्या आणि कल्याणकारक असा वाराही वाहूं लागला ४०. तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, तो आश्चर्यमय प्रकार अवलोकन केल्यावर शत्रूंचें दमन करणाऱ्या नलराजानें निर्भय झालेल्या त्या दमयंतीला जवळ घेतलें ४१. नंतर नागराज कर्कोटकाचें स्मरण करून त्या भूपतीनें तें निर्मल वस्त्र परिधान केलें असतां त्याला

तं ततो लेभे स्वकं वपुः ४२ स्वरूपिणं तु भर्तारं दृष्ट्वा भीमसुता तदा । प्राक्रोशदुच्चैरालिङ्ग्य पुण्यश्लोकमनिन्दिता ४३ भैमीमपि नलो राजा भ्राजमानो यथा पुरा । सस्वजे स्वसुतौ चापि यथावत्प्रत्यनन्दत ४४ ततः स्वोरसि विन्यस्य वक्त्रं तस्य शुभानना । परीता तेन दुःखेन निशश्वासायतेक्षणा ४५ तथैव मलदिग्धाङ्गीं परिष्वज्य शुचिस्मिताम् । सुचिरं पुरुषव्याघ्रस्तस्थौ शोकपरिप्लुतः ४६ ततः सर्वं यथावृत्तं दमयन्त्या नलस्य च । भीमायाकथयत्प्रीत्या वैदर्भ्या जननी नृप ४७ ततोऽब्रवीन्महाराजः कृतशौचमहं नलम् । दमयन्त्या सहोपेतं कल्ये द्रष्टा सुखोषितम् ४८ ततस्तौ सहितौ रात्रिं कथयन्तौ पुरातनम् । वने विचरितं सर्वमूषतुर्मुदितौ नृप ४९ गृहे भीमस्य नृपतेः परस्परसुखैषिणौ । वसेतां हृष्टसंकल्पौ वैदर्भी च नलश्च ह ५० स चतुर्थे ततो वर्षे संगम्य सह भार्यया । सर्वकामैः सुसिद्धार्थो लब्धवान्परमां मुदम् ५१ दमयन्त्यपि भर्तारमा-

---

स्वतःचें रूप प्राप्त झालें ४२. तेव्हां स्वतःचें रूप धारण करणाऱ्या पुण्यकीर्ति भर्त्याला अवलोकन करितांक्षणीं ती निर्दोष भीमकन्या दमयंती त्याला कवटाळून धरून उच्च स्वरानें आक्रोश करूं लागली ४३ आणि पूर्वीप्रमाणें देदीप्यमान झालेल्या त्या नलराजानेंही भीमकन्या दमयंतीला व आपल्या उभयतां मुलांना कवटाळून धरून यथायोग्य रीतीनें त्यांचें अभिनंदन केलें ४४. तदनंतर उत्कृष्ट मुखकमलानें युक्त असलेल्या त्या दमयंतीनें त्या नलराजाचें मुख आपल्या पोटाशीं धरिलें आणि त्या दुःखानें व्याकुल झालेली ती विशालनयना दमयंती दीर्घ श्वास टाकूं लागली ४५. तेव्हां जिचें सर्वांग मलानें भरलें आहे व जिचें हास्य उत्तम आहे अशा त्या दमयंतीलाही कवटाळून धरून शोकामध्यें मग्न झालेला तो पुरुषश्रेष्ठ नल पुष्कळवेळपर्यंत तसाच राहिला ४६. तदनंतर, हे धर्मराजा, दमयंतीच्या मातेनें दमयंती व नल ह्या उभयतांचें सर्व इत्थंभूत वर्तमान भीमराजाला आनंदानें कथन केलें असतां ४७ " दमयंतीची भेट होऊन नल आज सुखानें राहील आणि उद्यां स्नान करून तो शुचिर्भूत झाल्यानंतर मी प्रातःकालीं त्याची भेट घेईन " असें तो भीम महाराज त्या आपल्या पत्नीला ह्मणाला ४८. नंतर, हे धर्मराजा, ते एकत्र झालेले स्त्रीपुरुष वनामध्यें घडलेला पूर्वींचा सर्व प्रकार एकमेकाला सांगूं लागले व त्या उभयतांनींही ती रात्र आनंदित होऊन काढिली ४९ आणि ह्याप्रमाणें कृतकृत्य होऊन एकमेकांच्या सुखाची इच्छा करणारे ते उभयतां स्त्रीपुरुष दमयंती आणि नल भीमराजाच्या घरीं पुढें कांहीं दिवस राहिले ५०. सारांश, वियोग झाल्यानंतर चवथ्या वर्षीं भार्येशीं समागम होऊन सर्व भोग्य वस्तु प्राप्त झाल्यामुळें उत्तम प्रकारें ज्याचे

साप्याप्यायिता भृशम् । अर्धसंजातशस्येव तोयं प्राप्य वसुन्धरा ५२ सैवं समेत्य व्यपनीय तन्द्रां शान्तज्वरा हर्षविवृद्धसत्त्वा । रराज भैमी समवाप्तकामा शीतांशुना रात्रिरिवोदितेन ५३ [३०२६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि नलदमयन्तीसमागमे षट्सप्ततितमोऽध्यायः ॥ ७६ ॥

बृहदश्व उवाच ॥ अथ तां व्युषितो रात्रिं नलो राजा स्वलंकृतः । वैदर्भ्या सहितः काले ददर्श वसुधाधिपम् १ ततोऽभिवादयामास प्रयतः श्वशुरं नलः । ततोऽनु दमयन्ती च ववन्दे पितरं शुभा २ तं भीमः प्रतिजग्राह पुत्रवत्परया मुदा । यथार्हं पूजयित्वा च समाश्वासयत प्रभुः ३ नलेन सहितां तत्र दमयन्तीं पतिव्रताम् । तामर्हणां नलो राजा प्रतिगृह्य यथाविधि ४ परिचर्यां स्वकां तस्मै यथावत्प्रत्यवेदयत् । ततो बभूव नगरे सुमहान्हर्षजः स्वनः ५ जनस्य संप्रहृष्टस्य नलं दृष्ट्वा तथागतम् । अशोभयच्च नगरं पताकाध्वजमालिनम् ६ सिक्ताः सुमृष्टपुष्पाढ्या राज-

---

मनोरथ सिद्धीस गेले आहेत अशा त्या नलाला पराकाष्ठेचा आनंद झाला ५१ आणि धान्य अर्धवट उगवून आलें असतां जल प्राप्त झाल्यावर वृद्धिंगत होणाऱ्या पृथ्वीप्रमाणें (वियोगदुःखानें पूर्वी कृश झालेली दमयंती) भर्ता प्राप्त झाल्यावर हर्षानें अतिशय वृद्धिंगत झाली ५२. तात्पर्य, भर्त्याचा समागम झाल्यावर तंद्रा व चिंता दूर होऊन हर्षानें दमयंतीचें अंतःकरण प्रफुल्लित झालें आणि कृतकृत्य झालेली ती दमयंती उदय पावलेल्या चंद्राशीं संगत झालेल्या रात्रीप्रमाणें शोभूं लागली ५३. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं नलदमयंतीसमागमाविषयीं शाहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७६ ॥

बृहदश्व सांगतातः—नंतर उत्तम अलंकार धारण केलेला तो नलराजा दमयंतीसहवर्तमान रात्रभर राहून ठरलेल्या वेळीं भूपति भीमराजाच्या दर्शनास गेला १. प्रथमतः शुचिर्भूत झालेल्या नलराजानें श्वशुराला अभिवंदन केलें आणि त्यानंतर कल्याणी दमयंतीनेंही पित्याला वंदन केलें २. तेव्हां नलराजाचें, अत्यंत आनंदानें, भीमराजानें स्वागत केलें आणि योग्यतेप्रमाणें त्याचें पूजन केल्यावर त्या समर्थ भीमराजानें नलासहवर्तमान पतिव्रता दमयंतीला आश्वासन दिलें. त्या पूजेचा नलानें यथाविधि स्वीकार केला ३,४ आणि योग्य रीतीनें स्वतःही त्या भीमराजाचें पूजन केलें. असो. तशाप्रकारें आलेल्या नलाला अवलोकन करून आनंदित झालेल्या लोकांच्या हर्षाचा त्या नगरामध्यें फारच मोठा शब्द होऊं लागला आणि पताका व ध्वज ह्यांनीं

मार्गाः स्वलंकृताः । द्वारि द्वारि च पौराणां पुष्पभङ्गोपकल्पिताः ७
अर्चितानि च सर्वाणि देवतायतनानि च । ऋतुपर्णोपि शुश्राव बाहुक-
च्छद्मिनं नलम् ८ दमयन्त्या समायुक्तं जहृषे च नराधिपः । तमानाय्य
नलं राजा क्षमयामास पार्थिवम् ९ स च तं क्षमयामास हेतुभिर्बुद्धिसंमितः ।
स सत्कृतो महीपालो नैषधं विस्मिताननः १० उवाच वाक्यं तत्त्वज्ञो
नैषधं वदतां वरः । दिष्ट्या समेतो दारैः स्वैर्भवानित्यभिनन्दितः ११
कच्चित्तु नापराधं ते कृतवानस्मि नैषध । अज्ञातवासे वसतो मद्गृहे वसु-
धाधिप १२ यदि वाबुद्धिपूर्वाणि यदि बुद्ध्यापि कानिचित् । मया कृता-
न्यकार्याणि तानि त्वं क्षन्तुमर्हसि १३ नल उवाच ॥ न मेपराधं कृत-
वांस्त्वं स्वल्पमपि पार्थिव । कृतेपि च न मे कोपः क्षन्तव्यं हि मया तव १४
पूर्वं ह्यपि सखा मेसि संबन्धी च जनाधिप । अत उर्ध्वं तु भूयस्त्वं प्रीति-
माहर्तुमर्हसि १५ सर्वकामैः सुविहितैः सुखमस्म्युषितस्त्वयि । न तथा स्वगृहे
राजन्यथा तव गृहे सदा १६ इदं चैव हयज्ञानं त्वदीयं मयि तिष्ठति ।

युक्त झालेलें तें नगर शोभूं लागलें ५.६. राजमार्गांवर सडे घातले; लोकांच्या दारों-दारीं पुष्पांचा खच पडला आणि अत्यंत उज्ज्वल अशा पुष्पांनीं राजमार्ग भरून जाऊन ते चांगल्याप्रकारें सुशोभित झाले ७ व सर्व देवालयें भूषित झालीं. नंतर बाहुक ह्मणून ह्मणवीत असलेला नलराजा दमयंतीशीं संगत झाला असें ऐकल्यावर ऋतु-पर्णराजालाही हर्ष झाला आणि त्या ऋतुपर्णराजानें नलराजाला भेटीला बोलवून त्याची क्षमा मागितली ८,९ व त्या बुद्धिमान् नलराजानेंही कारणें लक्ष्यात घेऊन त्याला क्षमा केली. नंतर नलानें ऋतुपर्णराजाचा सत्कार केला असतां त्या भूपति ऋतु-पर्ण राजाची मुद्रा विस्मयचकित दिसूं लागली आणि वक्त्यांमध्यें श्रेष्ठ अस-लेला तो तत्त्ववेत्ता ऋतुपर्णराजा आनंदित होऊन निषधराज नलाला ह्मणाला "स्व-स्त्रीशी आपला समागम झाला ही फारच उत्तम गोष्ट झाली १०,११. हे निषधराज भूपते, आपण माझ्या घरीं अज्ञात वासामध्यें रहात असतांना माझ्या हातून आपला कांहीं अपराध झाला नाहीं नां ? १२. नसमजून अथवा समजून कांहीं माझ्या हातून आपले अपराध झाले असतील तर त्यांची आपण मला क्षमा करावी "१३. नल ह्मणतोः—हे राजा, तूं माझा सूक्ष्मसुद्धां अपराध केलेला नाहींस आणि जरी केला असलास तरी माझा तुझ्यावर कोप न होतां तुला क्षमा करणेंच मला योग्य आहे १४. हे राजा, पूर्वीं तरी तूं माझा मित्र व संबंधी होतामच आणि अतःपर तर तुला माझे ठिकाणीं अधिकच प्रेम करणें योग्य आहे १५. हे राजा, माझ्या सर्व इच्छा उत्तमप्रकारें परिपूर्ण होऊन जसा मी नेहमीं तुझ्या घरीं सुखानें राहिलों तसा स्वतःच्या घरीं सुद्धां राहिलों नाहीं १६. हें तुझें अश्वशास्त्रज्ञान ठेव ह्मणून माझ्यापाशीं आहे; करितां, हे राजा, तुझ्या मनांत

तदुपाकर्तुमिच्छामि मन्यसे यदि पार्थिव १७ एवमुक्त्वा ददौ विद्यामृतुपर्णाय नैषधः । स च तां प्रतिजग्राह विधिदृष्टेन कर्मणा १८ गृहीत्वा चाश्वहृदयं राजन्भाङ्गासुरिर्नृपः । निषधाधिपतेश्चापि दत्त्वाक्षहृदयं नृपः । सूतमन्यमुपादाय ययौ स्वपुरमेव ह १९ ऋतुपर्णे गते राजन्नलो राजा विशांपते । नगरं कुण्डिने कालं नातिदीर्घमिवावसत् २० [३०४६]

इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि ऋतुपर्णस्वदेशगमने सप्तसप्ततितमोऽध्यायः ॥ ७७ ॥

बृहदश्व उवाच ॥ स मासमुष्य कौन्तेय भीममामन्त्र्य नैषधः । पुरादल्पपरीवारो जगाम निषधान्प्रति १ रथेनैकेन शुभ्रेण दन्तिभिः परिषोडशैः । पञ्चाशद्भिर्हयैश्चैव षटशतैश्च पदातिभिः २ स कम्पयन्निव महीं त्वरमाणो महीपतिः । प्रविवेशाथ संरब्धस्तरसैव महामनाः ३ ततः पुष्करमासाद्य वीरसेनसुतो नलः । उवाच दीव्याव पुनर्बहुवित्तं मयार्जितम् ४ दमयन्ती च यच्चान्यन्मम किंचन विद्यते । एष वै मम संन्यासस्तव राज्यं तु पुष्कर ५ पुनः प्रवर्ततां द्यूतमिति मे निश्चिता मतिः ।

असेल तर ते तुझे तुला देण्याची मला इच्छा आहे १७. ह्याप्रमाणे सांगून नैषधराजाने ऋतुपर्णाला ती विद्या दिली व त्यानेंही शास्त्रोक्त अनुष्ठानानें तिचा स्वीकार केला १८. हे धर्मराजा, अश्वशास्त्राचें तत्त्व ग्रहण केल्यावर आणि निषधाधिपति नलालाही अक्षविद्येचें रहस्य दिल्यावर तो भांगासुरि ह्मणून प्रसिद्ध असलेला ऋतुपर्ण राजा दुसरा सारथि घेऊन आपल्या नगराला चालता झाला १९ व, हे प्रजाधिपते धर्मराजा, ऋतुपर्ण गेल्यावर नलराजाही कुंडिनपुरामध्यें फार दिवस राहिला नाहीं २०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं ऋतुपर्णाच्या स्वदेशगमनाविषयीं सत्याहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७७ ॥

बृहदश्व सांगतात:—हे कुंतीपुत्रा धर्मराजा, (कुंडिनपुरामध्यें) एक महिनाभर राहिल्यानंतर निषधराज नलानें भीमराजाचा निरोप घेतला आणि थोडकासा परिवार बरोबर घेऊन तो तें कुंडिनपुर सोडून निषधदेशाला निघाला १. एक शुभ्रवर्ण रथ, सर्व मिळून सोळा हत्ती, पन्नास घोडे आणि सहाशें पदाति इतक्या परिवारासहवर्तमान २ भूमि कांपित करीत करीत तो भूपति सत्वर चालला आणि उदार अंतःकरणानें युक्त असलेला तो भूपति क्षुब्ध होऊन वेगावेगानें आपल्या नगरामध्यें प्रविष्ट झाला ३. तदनंतर तो वीरसेनपुत्र नल पुष्कराला गांठून ह्मणाला " आपण पुनरपि द्यूत खेळूं; मीं आतां विपुल द्रव्य संपादन करून आणिलें आहे ४. हे पुष्करा, दमयंती आणि इतर जें कांहीं माझ्यापाशीं असेल तें हें देऊन टाकण्याचा मी पण लावितों आणि राज्य देण्याचा तूं पण लाव ५. अशा रीतीनें पुनरपि आपणांमध्यें द्यूत सुरू करावें हा

एकपाणेन भद्रं ते प्राणयोश्च पणावहे ६ जित्वा परस्वमाहृत्य राज्यं वा यदि वा वसु । प्रतिपाणः प्रदातव्यः परमो धर्म उच्यते ७ न चेद्वाञ्छसि त्वं द्यूतं युद्धद्यूतं प्रवर्तताम् । द्वैरथेनास्तु वै शान्तिस्तव वा मम वा नृप ८ वंशभोज्यमिदं राज्यमर्थितव्यं यथातथा । येन केनाप्युपायेन वृद्धानामिति शासनम् ९ द्वयोरेकतरे बुद्धिः क्रियतामद्य पुष्कर । कैतवेनाक्षवत्यां तु युद्धे वा नाम्यतां धनुः १० नैषधेनैवमुक्तस्तु पुष्करः प्रहसन्निव । ध्रुवमात्मजयं मत्वा प्रत्याह पृथिवीपतिम् ११ दिष्ट्या त्वयार्जितं वित्तं प्रतिपाणाय नैषध । दिष्ट्या च दुष्कृतं कर्म दमयन्त्याः क्षयं गतम् १२ दिष्ट्या च ध्रियमे राजन्सदारोद्य महाभुज । धनेनानेन वै भैमी जितेन समलंकृता १३ मामुपस्थास्यति व्यक्तं दिवि शक्रमिवाप्सराः । नित्यशो हि स्मरामि त्वां प्रतीक्षेपि च नैषध १४ देवने न मम प्रीतिर्न भवत्यसुहृद्गणैः । जित्वा त्वद्य वरारोहां दमयन्तीमनिन्दिताम् १५ कृतकृत्यो भविष्यामि सा हि मे नित्यशो हृदि । श्रुत्वा तु तस्य ता वाचो

माझा निश्चित विचार झालेला आहे. तुझे दैव बरें करो. आपण आतां वर निर्दिष्ट केलेल्या द्रव्याचा व प्राणाचा मिळून एकच पण लावून खेळूं ६. अरे, दुसऱ्याचें द्रव्य जिंकून-किंवा राज्य अथवा धन हरण करून-आणिल्यावर त्याच्याशीं आपण उलट पण लावावा हा उत्कृष्ट धर्म होय ७. तस्मात् ,द्यूताची जर तुला इच्छा नसेल तर युद्धरूप द्यूत आपणांमध्यें प्रवृत्त होऊं दे किंवा, हे राजा, एकेकट्याचें युद्ध होऊन तुझी अथवा माझी शांति होऊं दे ८. कारण, वंशानें उपभोग घेण्यास योग्य असलेलें हें राज्य कोणत्या तरी रीतीनें कोणताही उपाय योजून संपादन करण्याची इच्छा धरावी असें वृद्धांचें सांगणें आहे ९. तस्मात्, हे पुष्करा, दोहोंपैकीं कोणतें तरी एक करण्याचें तूं मनामध्यें आणिलें पाहिजे. जुगारी बनून तूं द्यूताला तरी प्रवृत्त हो किंवा युद्ध करण्याकरितां तरी धनुष्य सज्ज कर " १०. ह्याप्रमाणें नलानें सांगितलें असतां द्यूतामध्यें आपलाच जय निःसंशय होणार असें समजून पुष्करानें हंसत हंसत त्या भूपति नलाला उत्तर केलें कीं ११, " हे नैषधा, उलट पण लावण्याकरितां तूं वित्त संपादन करून आणिलेंस ही गोष्ट फार चांगली झाली आणि दमयंतीचें पूर्वसंचित दुष्कर्म एकदाचें संपलें हेंही फार चांगलें झालें १२. हे महापराक्रमी राजा, स्त्रीसहवर्तमान तूं आज जिवंत राहिला आहेस ही फारच चांगली गोष्ट आहे. कारण, ह्या जिंकिलेल्या द्रव्यासहवर्तमान ही भूषित झालेली भीमकन्या इंद्राची सेवा करणाऱ्या अप्सरांप्रमाणें आतां निःसंशय माझी सेवा करूं लागेल. हे नैषधा, मला तुझें नित्य स्मरण होत असून मी तुझी वाटच पहात बसलों आहें १३, १४. कारण, शत्रुगणाबरोबर द्यूत खेळणें मला आवडत नाहीं असें मुळींच नाहीं. जिच्या रूपाला कोठेंही दोष देण्यास जागा

बहुबद्धप्रलापिनः १६ इयेष स छिरश्छेत्तुं खड्गेन कुपितो नलः । स्मयंस्तु रोषताम्राक्षस्तमुवाच नलो नृपः १७ पणावः किं व्याहरसे जितो न व्याहरिष्यसि । ततः प्रावर्तत द्यूतं पुष्करस्य नलस्य च १८ एकपाणेन भद्रं ते नलेन स पराजितः । स रत्नकोशनिचयैः प्राणेन पणितोपि च १९ जित्वा च पुष्करं राजा प्रहसन्निदमब्रवीत् । मम सर्वमिदं राज्यमव्यग्रं हतकण्टकम् २० वैदर्भी न त्वया शक्या राजापसद वीक्षितुम् । तस्यास्त्वं सपरीवारो मूढ दासत्वमागतः २१ न त्वया तत्कृतं कर्म येनाहं विजितः पुरा । कलिना तत्कृतं कर्म त्वं च मूढ न बुध्यसे २२ नाहं परकृतं दोषं त्वय्याधास्ये कथंचन । यथासुखं वै जीव त्वं प्राणानवसृजामि ते २३ तथैव सर्वसंभारं स्वमंशं वितरामि ते । तथैव च मम प्रीतिस्त्वयि वीर न संशयः २४ सौहार्दं चापि मे त्वत्तो न कदाचित्प्रहास्यति । पुष्कर त्वं हि मे भ्राता संजीव शरदः शतम् २५ एवं नलः सान्त्वयित्वा भ्रातरं

नाही अशा सुंदरी दमयंतीला आज जिंकून १५ मी कृतकृत्य होईन. ती माझ्या हृदयामध्यें सर्वदा खिळून राहिलेली आहे. " ह्याप्रमाणे अतिशयच असबद्ध प्रलाप करणाऱ्या त्या पुष्कराचे हे शब्द एकून १६ क्रुद्ध झालेल्या त्या नलाला खड्गाच्या योगानें त्याचा शिरच्छेद करावा असें वाटलें ; परंतु, क्रोधानें नेत्र आरक्तवर्ण झालेला तो नलराजा त्याला ह्मणाला १७ " आपण द्यूत खेळूं बडबड कशाला करीत आहेस ? द्यूतामध्यें पर जित झालास ह्मणजे तू अशी बडबड करणार नाहीस " असें नलानें सांगितल्यानंतर पुष्कर व नल ह्यांमध्यें द्यूत सुरूं झालें १८. तुझें देव बरें करो, हे युधिष्ठिरा, एकाच पणानें तें द्यूत झालें व त्यामध्यें नलानें त्या पुष्कराचा पराजय केला. प्राण आणि रत्नभांडाराचे समुदाय हे द्रव्य पुष्करानें पणाला लाविलेलें होतें १९. असो. ह्याप्रमाणें पुष्कराला जिंकिल्यावर नलराजा हसत हसत त्याला ह्मणाला " हे सर्व निष्कटक राज्य आतां अनायासें माझें झालें आहे २०. हे राजाधमा, दमयंती तर तुझ्या दृष्टी पडणेंही शक्य नाहीं; हे मूढा, परिवारासहवर्तमान तूं आतां तिचा दास झाला आहेस २१. अरे, ज्याच्या योगानें पूर्वी तूं माझा पराजय केलास तें कृत्य तूं केलेलें नव्हेस. कलीनें ते कर्म केलें. परंतु, हे मूढा, तू तें जाणीत नाहींस २२. दुसऱ्यानें केलेला दोष तुझ्यावर मी कधींहीं लादणार नाहीं. करितां, तूं खुशाल जिवत रहा; मी तुला प्राणदान देतो २३. इतकेंच नव्हें परंतु, अवश्य अशा सर्व वस्तूंसहवर्तमान मी तुझा अंशही तुला देतों. हे वीरा, तुझे ठिकाणीं माझें प्रेम अगदीं पूर्वीप्रमाणेंच कायम राहील ह्यांत संशय नाहीं २४ आणि तुझेंही मज विषयीं प्रेम कधींही कमी होणार नाहीं. हे पुष्करा, तूं माझा भ्राता आहेस. ह्यास्तव, शंभर वर्षेपर्यंत तूं खुशाल रहा " २५. ह्याप्रमाणे अमोघपराक्रमी नलानें भ्रात्याचें सांत्वन

सत्यविक्रमः । स्वपुरं प्रेषयामास परिष्वज्य पुनःपुनः २६ सान्त्वितो नैषधेनैवं पुष्करः प्रत्युवाच तम् । पुण्यश्लोकं तदा राजन्नभिवाद्य कृताञ्जलिः २७ कीर्तिरस्तु तवाक्षय्या जीव वर्षायुतं सुखी । यो मे वितरसि प्राणानधिष्ठानं च पार्थिव २८ स तथा सत्कृतो राज्ञा मासमुष्य तदा नृपः । प्रययौ पुष्करो हृष्टः स्वपुरं स्वजनावृतः २९ महत्या सेनया सार्धं विनीतैः परिचारकैः । भ्राजमान इवादित्यो वपुषा पुरुषर्षभ ३० प्रस्थाप्य पुष्करं राजा वित्तवन्तमनामयम् । प्रविवेश पुरं श्रीमानत्यर्थमुपशोभिताम् ३१ प्रविश्य सान्त्वयामास पौरांश्च निषधाधिपः ३२ पौरा जानपदाश्चापि संप्रहृष्टतनूरुहाः । ऊचुः प्राञ्जलयः सर्वे सामात्यप्रमुखा जनाः ३३ अद्य स्म निर्वृता राजन्पुरे जनपदेऽपि च । उपासितुं पुनः प्राप्ता देवा इव शतक्रतुम् ३४ [३०८०] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि पुष्करपराभवपूर्वकं राज्यप्रत्यानयनेऽष्टसप्ततितमोऽध्यायः ॥ ७८ ॥

बृहदश्व उवाच ॥ प्रशान्ते तु पुरे हृष्टे संप्रवृत्ते महोत्सवे । महत्या सेनया

करून व पुन्हा पुन्हां कवटाळून त्याला आपल्या राजधानीला पाठवून दिलें २६. हे धर्मराजा, ह्याप्रमाणें नलानें पुष्कराचें सांत्वन केलें असतां तो पुष्कर त्या पुण्यकीर्ति नलाला अभिवंदन करून व हात जोडून ह्मणाला २७ " हे राजा, तूं मला ज्याअर्थी प्राण व राहण्याकरितां स्थान देत आहेस त्याअर्थी तुझी कीर्ति अक्षय्य राहून तूं दहा हजार वर्षें सुखानें नांद " २८. ह्याप्रमाणें नलराजानें त्या पुष्कराचा सत्कार केला असतां तो एक महिनाभर तेथें राहिला आणि नंतर स्वजनांनीं परिवेष्टित असलेला तो पुष्कर राजा आनंदित होऊन आपल्या नगराला चालता झाला २९. हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, नम्र सेवक आणि प्रचंडसेना ह्यांसहवर्तमान जात असलेला तो पुष्कर सूर्याप्रमाणें झळकत होता ३०. असो. सधन आणि आरोग्ययुक्त अशा पुष्कराला पाठवून दिल्यावर तो वैभवशाली नलराजा अत्यंत सुशोभित केलेल्या आपल्या नगरीमध्यें प्रविष्ट झाला ३१ आणि प्रविष्ट झाल्यावर त्या निषधदेशाधिपति नलानें पौरजनांचें सांत्वन केलें ३२. तेव्हां ते नगरवासी लोक आणि इतरही प्रजाजन ह्यांच्या शरीरावर हर्षानें रोमांच उठले आणि अमात्यप्रभृति ते सर्वही लोक हात जोडून त्याला ह्मणाले ३३ " हे राजा, आज आह्मी ह्या नगरांतील व ह्या देशांतीलही लोक सुखी झालों असून इंद्राकडे जाणाऱ्या देवांप्रमाणें तुझी सेवा करण्याकरितां आज पुनरपि तुझ्यासमीप आलों आहोंत ३४. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं पुष्कराचा पराभव होऊन नलाला पुनरपि राज्यप्राप्ति झाल्याविषयीं अठ्याहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७८ ॥

बृहदश्व सांगतात:—नगरांतील लोक स्वस्थ व आनंदित होऊन (राजाच्या आग-

राजा दमयन्तीमुपानयत् १ दमयन्तीमपि पिता सत्कृत्य परवीरहा। प्रास्थापयदमेयात्मा भीमो भीमपराक्रमः २ आगतायां तु वैदर्भ्यां सपुत्रायां नलो नृपः। वर्तयामास मुदितो देवराडिव नन्दने ३ तथा प्रकाशतां यातो जम्बूद्वीपे स राजसु। पुनः शशास तद्राज्यं प्रत्याहृत्य महायशाः ४ ईजे च विविधैर्यज्ञैर्विधिवच्चाप्तदक्षिणैः। तथा त्वमपि राजेन्द्र ससुहृद्वक्ष्यसेचिरात् ५ दुःखमेतादृशं प्राप्तो नलः परपुरंजयः। देवनेन नरश्रेष्ठ सभार्यो भरतर्षभ ६ एकाकिनैव सुमहन्नलेन पृथिवीपते। दुःखमासादितं घोरं प्राप्तश्चाभ्युदयः पुनः ७ त्वं पुनर्भ्रातृसहितः कृष्णया चैव पाण्डव। रमसेऽस्मिन्महारण्ये धर्ममेवानुचिन्तयन् ८ ब्राह्मणैश्च महाभागैर्वेदवेदाङ्गपारगैः। नित्यमन्वास्यसे राजंस्तत्र का परिदेवना ९ अक्षाणां हृदये प्राप्ते ऋतुपर्णस्य संनिधौ। नलेन याचितं राज्ञा कलिना च प्रतिश्रुतम् १० कर्कोटकस्य नागस्य दमयन्त्या नलस्य च। ऋतुपर्णस्य राजर्षेः कीर्तनं कलिनाशनम् ११ य इदं पठते नित्यं य इदं शृणुयान्नरः। न तस्य विद्यते राजन्भयं वै कलिकारकम् १२ धर्म-

---

मनासंबंधानें) महोत्सव सुरू झाला असतां नलराजानें मोठी सेना पाठवून दमयंतीला आणविली १ आणि शत्रुपक्षीयवीरनाशक, अत्यंत उदार अंतःकरणानें युक्त आणि प्रचंड पराक्रमी अशा पित्या भीमराजानेंही सत्कारपूर्वक दमयंतीला पाठवून दिलें २. नंतर विदर्भराजकन्या दमयंती अपत्यांसहवर्तमान आली असतां नंदनवनामध्यें क्रीडा करणाऱ्या देवराज इंद्राप्रमाणें नलराजा आनंदित होऊन तिला वागवूं लागला ३; जंबुद्वीपांतील राजांमध्यें झळकूं लागलेल्या त्या महाकीर्तिमान् नलराजानें आपलें तें राज्य पुनरपि परत घेऊन चालविलें ४ आणि विपुल दक्षिणांनीं युक्त असे नानाप्रकारचे क्रतु त्यानें यथाविधि केले. त्याचप्रमाणें, हे राजाधिराज युधिष्ठिरा, तूंही आपल्या सुहृदांसहवर्तमान लवकरच झळकूं लागशील ५. हे भरतवंशजोत्तमा, पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, शत्रुसमूह जिंकणाऱ्या नलराजाला द्यूतामुळें अशा प्रकारचें दुःख प्राप्त झालें होतें ६. हे पृथ्वीपते धर्मराजा, नल एकटा असतांनाच त्याला अतिशय मोठें घोर दुःख प्राप्त झालें व पुनरपि अभ्युदयही प्राप्त झाला ७. परंतु, हे पांडुपुत्रा धर्मराजा, तूं तर भ्राते आणि द्रौपदी ह्यांसहवर्तमान आहेस आणि ह्या महारण्यामध्यें धर्माचेंच चिंतन करीत करीत आनंदामध्यें काल घालवीत आहेस ८. इतकेंच नव्हे परंतु, हे राजा, वेदवेदांगपारंगत असे महाभाग्यवान् ब्राह्मण नित्य तुझ्या संनिध येऊन बसत आहेत. तेव्हां ह्याबद्दल तुला कां बरें वाईट वाटावें ? ९. अक्षद्यूताचें रहस्य प्राप्त झाल्यावर ऋतुपर्णराजाचे संनिध नलराजानें मागणें मागितलें असून कलीनेंही तें दिलें आहे १०. कर्कोटक नाग, दमयंती, नल आणि ऋतुपर्ण राजर्षि ह्यांचें नांव घेणें कलिदोषनाशक आहे (हे कलीनें दिलें व नलानें मागितलें) ११. जो पुरुष हें आख्यान

नित्यस्य युक्तस्य सदार्जवरतस्य च । दानस्य च वदान्यस्य कलिः पुंसः करोति किम् १३ इतिहासमिमं चापि कलिनाशनमच्युत । शक्यमाश्वसितुं श्रुत्वा त्वद्विधेन विशांपते १४ अस्थिरत्वं च संचिन्त्य पुरुषार्थस्य नित्यदा। तस्योदये व्यये चापि न चिन्तयितुमर्हसि १५ श्रुत्वेतिहासं नृपते समाश्वसिहि मा शुचः । व्यसने त्वं महाराज न विषीदितुमर्हसि १६ विषमावस्थिते दैवे पौरुषेफलतां गते । विषादयन्ति नात्मानं सत्त्वोपाश्रयिणो बुधाः १७ ये चेदं कथयिष्यन्ति नलस्य चरितं महत् । श्रोष्यन्ति चाप्यभीक्ष्णं वै नालक्ष्मीस्तान्भजिष्यति १८ अर्थास्तस्योपपत्स्यन्ते धन्यतां च गमिष्यति । इतिहासमिमं श्रुत्वा पुराणं शश्वदुत्तमम् १९ पुत्रान्पौत्रान्पशूंश्चापि लभते नृषु चाग्र्यताम् । आरोग्यप्रीतिमांश्चैव भविष्यति न संशयः २० भयात्त्रस्यसि यच्च त्वमाह्वयिष्यति मां पुनः । अक्षज्ञ इति तत्तेऽहं नाशयिष्यामि पार्थिव २१ वेदाक्षहृदयं कृत्स्नमहं सत्यपराक्रम । उपपद्यस्व कौन्तेय प्रसन्नोऽहं ब्रवीमि ते २२ वैशम्पायन उवाच ॥ ततो हृष्टमना राजा बृहदश्वमुवाच ह । भग-

---

नित्य पठण करितो आणि जो नित्य श्रवण करितो त्याला, हे धर्मराजा, कलिकृत भय प्राप्त होत नाहीं १२. नेहमी धर्मनिष्ठ, जितेंद्रिय, सर्वदा सरळ रीतीनें वागण्याविषयी तत्पर, दानशूर आणि सदय भाषण करणाऱ्या पुरुषाचें कलि काय करणार ? १३ तस्मात्, हे धर्मापासून च्युत न होणाऱ्या प्रजाधिपते युधिष्ठिरा, हा कलिदोषनाशक इतिहास श्रवण करून सुद्धां तुझ्यासारिख्यानें धीर धरिला पाहिजे १४. अरे, वैभव अस्थिर आहे हा विचार नेहमी मनामध्यें ठेविला म्हणजे त्याची हानि होवो अथवा अभिवृद्धि होवो त्या संबधानें कसलीही चिंता करणें तुला योग्य नाही १५. हे धर्मराजा, हा इतिहास श्रवण करून तू धीर धर; शोक करू नकोस. हे महाराजा, असल्या संकटामध्यें धीर खचू देणें तुला योग्य नाहीं १६. दैव उलटून पौरुष व्यर्थ झालें असता सत्त्वावलंबी प्राज्ञ जन अंतःकरण खिन्न होऊं देत नाहीत १७. हे नलाचें मोठें चरित्र जे वारंवार कथन करितील आणि जे नेहमी श्रवण करितील त्यांना दरिद्रता प्राप्त होणार नाही १८. हा उत्कृष्ट पुरातन इतिहास जो पुरुष नेहमीं श्रवण करितो त्याला संपत्ति प्राप्त होते व तो पुण्यशील होतो १९. इतकेंच नव्हे परंतु, पुत्र, पौत्र, पशु, आरोग्य आणि आनंद हीं प्राप्त होत असून मनुष्यांमध्यें त्याला श्रेष्ठताही प्राप्त होते ह्यांत संशय नाहीं २०. हे राजा युधिष्ठिरा, " अक्षद्यूतवेत्ता दुर्योधन पुनरपि मला द्यूतार्थ आह्वान करील " ह्या भीतीनें जो तू घाबरून गेला आहेस तें तुझें भय मी नाहींसें करून टाकितों २१. हे अमोघपराक्रमी कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, अक्षद्यूताचें मी संपूर्ण रहस्य जाणीत आहें. तूं त्याचा स्वीकार कर. मी प्रसन्न होऊन तुला सांगतों २२. वैशंपायन सांगतातः—(हे जनमेजया) तदनंतर " हे भगवन्, अक्षद्यूताचें रहस्य खरें खरें

चाक्षहृदयं ज्ञातुमिच्छामि तत्त्वतः २३ ततोक्षहृदयं प्रादात्पाण्डवाय महात्मने । दत्त्वा चाश्वशिरोगच्छदुपस्प्रष्टुं महातपाः २४ बृहदश्वे गते पार्थमश्रौषीत्सव्यसाचिनम् । वर्तमानं तपस्युग्रं वायुभक्षं मनीषिणम् २५ ब्राह्मणेभ्यस्तपस्विभ्यः संपतद्भ्यस्ततस्ततः । तीर्थशैलवनेभ्यश्च समेतेभ्यो दृढव्रतः २६ इति पार्थो महाबाहुर्दुरापं तप आस्थितः । न तथा दृष्टपूर्वोन्यः कश्चिदुग्रतपा इति २७ यथा धनञ्जयः पार्थस्तपस्वी नियतव्रतः । मुनिरेकचरः श्रीमान्धर्मो विग्रहवानिव २८ तं श्रुत्वा पाण्डवो राजंस्तप्यमानं महावने । अन्वशोचत कौन्तेयः प्रियं वै भ्रातरं जयम् २९ दह्यमानेन तु हृदा शरणार्थी महावने । ब्राह्मणान्विविधज्ञानान्पर्यपृच्छद्युधिष्ठिरः ३० [३११०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि नलोपाख्यानपर्वणि बृहदश्वगमन ऊनाशीतितमोऽध्यायः ॥ ७९ ॥

समाप्तं च नलोपाख्यानपर्व ॥

जाणण्याची माझी इच्छा आहे " ह्मणून अंतःकरण सुप्रसन्न झालेल्या धर्मराजानें बृहदश्व मुनींना सांगितलें २३. तेव्हां महात्म्या पांडुपुत्र युधिष्ठिराला त्यांनीं अक्षद्यूताचें रहस्य दिलें आणि तें रहस्य दिल्यावर ते महातपस्वी बृहदश्वमुनि स्नान वगैरे करण्याकरितां अश्वशिरोनामक तीर्थाकडे गेले २४. असो. बृहदश्वमुनि गेल्यानंतर घेतलेलें व्रत निश्चयानें चालविणाऱ्या युधिष्ठिरानें कुंतीपुत्र विचारी अर्जुन वायुभक्षण करून उग्र तपश्चर्या करीत आहे असें वर्तमान तीर्थांवरून, पर्वतावरून आणि वनांतून एकत्र जुळून येणाऱ्या आणि ठिकठिकाणीं जाणाऱ्या तपस्वी ब्राह्मणांपासून श्रवण केलें २५, २६. (हे जनमेजय राजा) महापराक्रमी अर्जुनानें अशा प्रकारचें दुर्घट तप आरंभिलें होतें व नियमपूर्वक व्रताचें परिपालन करणारा, मननशील, एकाकी आणि मूर्तिमान् धर्मच कीं काय असा श्रीमान् अर्जुन ज्याप्रमाणें तप करीत होता त्याप्रमाणें उग्र तपश्चर्या करणारा ह्मणून दुसरा कोणीही पूर्वीं दृष्टोत्पत्तीस आलेला नव्हता २७, २८. हे जनमेजयराजा, महावनामध्यें तो अर्जुन तपश्चर्या करीत आहे असें पांडुपुत्र युधिष्ठिराला समजल्यावर तो कुंतीपुत्र युधिष्ठिर आपल्या विजयशील प्रिय भ्रात्याविषयीं शोक करूं लागला २९; त्याचें अंतःकरण काळजीनें अगदीं पोळूं लागलें आणि ह्या संकटांतून आपलें रक्षण करणारा कोणी तरी मिळावा अशी इच्छा धरून तो युधिष्ठिर अनेक प्रकारची माहिती असलेल्या ब्राह्मणांना अर्जुनाचें वर्तमान विचारूं लागला ३०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील नलोपाख्यानपर्वापैकीं बृहदश्वमुनींच्या गमनाविषयीं एकुणऐंशीवा अध्याय समाप्त झाला ॥ ७९ ॥

ह्या ठिकाणीं नलोपाख्यानपर्वही समाप्त झालें ॥

अथ तीर्थयात्रापर्व ॥ जनमेजय उवाच ॥ भगवन्काम्यकात्पार्थे गते मे प्रपितामहे । पाण्डवाः किमकुर्वंस्त तमृते सव्यसाचिनम् १ स हि तेषां महेष्वासो गतिरासीदनीकजित् । आदित्यानां यथा विष्णुस्तथैव प्रतिभाति मे २ तेनेन्द्रसमवीर्येण सङ्ग्रामेष्वनिवर्तिना । विनाभूता वने वीराः कथमासन्पितामहाः ३ वैशम्पायन उवाच ॥ गते तु पाण्डवे तात काम्यकात्सत्यविक्रमे । बभूवुः पाण्डवेयास्ते दुःखशोकपरायणाः ४ आक्षिप्तसूत्रा मणयश्छिन्नपक्षा इव द्विजाः । अप्रीतमनसः सर्वे बभूवुरथ पाण्डवाः ५ वनं तु तदभूत्तेन हीनमक्लिष्टकर्मणा । कुबेरेण यथा हीनं वनं चैत्ररथं तथा ६ तमृते ते नरव्याघ्राः पाण्डवा जनमेजय । मुदमप्राप्नुवन्तो वै काम्यके न्यवसंस्तदा ७ ब्राह्मणार्थे पराक्रान्ताः शुद्धैर्बाणैर्महारथाः । निघ्नन्तो भरतश्रेष्ठ मेध्यान्बहुविधान्मृगान् ८ नित्यं हि पुरुषव्याघ्रा वन्याहारमरिन्दमाः । उपाकृत्य उपाहृत्य ब्राह्मणेभ्यो न्यवेदयन् ९ सर्वे संन्यवसंस्तत्र सोत्कण्ठाः पुरुषर्षभाः । अहृष्टमनसः सर्वे गते राजन्धनञ्जये १० विशेषतस्तु पाञ्चाली स्मरन्ती मध्यमं पतिम् । उद्विग्नं पाण्डवश्रेष्ठमिदं वचनम-

---

येथून तीर्थयात्रापर्व सुरू झाले. जनमेजय प्रश्न करितो:—हे भगवन्, काम्यकवनातून माझा प्रपितामह अर्जुन गेल्यावर त्या सव्यसाची अर्जुनावांचून त्या पांडवांनीं काय केले ? १. कारण, आदित्यांचे रक्षण करणाऱ्या विष्णूप्रमाणें तो महाधनुर्धारी व संग्रामविजयी अर्जुनच त्यांचें रक्षण करणारा होता असें मला वाटतें २. तेव्हां, संग्रामामध्ये कधीही परावृत्त न होणाऱ्या त्या इंद्रतुल्य पराक्रमी अर्जुनावांचून असलेल्या त्या वीर पितामहांनीं वनामध्यें आपले दिवस कसे काढिले ? ३. वैशंपायन सांगतात:— बा जनमेजया, तो अमोघपराक्रमी पांडुपुत्र अर्जुन काम्यकवनांतून गेल्यानंतर ते पांडव अगदीं दुःखी कष्टी होऊन बसले ४. इतकेंच नव्हे परंतु, सूत तुटून गेलेल्या मण्याप्रमाणें अथवा पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणें झालेल्या त्या सर्वही पांडवाचें मन खिन्न झालें ५ व त्या पुण्यकर्मी अर्जुनाने रहित झालेले ते वन कुबेररहित झालेल्या चैत्ररथ वनाप्रमाणें (शून्य) दिसूं लागलें ६. हे जनमेजया, त्यावाचून असलेले ते पुरुषश्रेष्ठ पांडव आनंद न होतां काम्यक वनामध्यें राहिले ७. हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, ब्राह्मणांकरितां पराकाष्ठेचे झटणारे ते महारथि पांडव शुद्ध बाणांनीं अनेक प्रकारचे पवित्र पशु मारीत असत ८. ते शत्रुदमन करणारे पुरुषश्रेष्ठ पांडव पशु मारून यज्ञाकरितां आणीत असत आणि ब्राह्मणांना वनभक्ष्य देत असत ९. हे राजा, धनंजय गेल्यानंतर ते सर्वही पुरुषश्रेष्ठ पांडव खिन्न मनानें चिंताक्रांत होऊन रहात

ब्रवीत् ११ योऽर्जुनेनार्जुनस्तुल्यो द्विबाहुर्बहुबाहुना । तमृते पाण्डवश्रेष्ठ वनं न प्रतिभाति मे । शून्यामिव प्रपश्यामि तत्र तत्र महीमिमाम् १२ बह्वाश्चर्यमिदं चापि वनं कुसुमितद्रुमम् । न तथा रमणीयं वै तमृते सव्यसाचिनम् १३ नीलाम्बुदसमप्रख्यं मत्तमातङ्गगामिनम् । तमृते पुण्डरीकाक्षं काम्यकं नातिभाति मे १४ यस्य वा धनुषो घोषः श्रूयते चाशनिस्वनः । न लभे शर्म वै राजन्स्मरन्ती सव्यसाचिनम् १५ तथा लालप्यमानां तां निशम्य परवीरहा । भीमसेनो महाराज द्रौपदीमिदमब्रवीत् १६ भीम उवाच ॥ मनःप्रीतिकरं भद्रे यद्ब्रवीषि सुमध्यमे । तन्मे प्रीणाति हृदयममृतप्राशनोपमम् १७ यस्य दीर्घौ समौ पीनौ भुजौ परिघसंनिभौ । मौर्वीकृतकिणौ वृत्तौ खड्गायुधधनुर्धरौ १८ निष्काङ्गदकृतापीडौ पञ्चशीर्षाविवोरगौ । तमृते पुरुषव्याघ्रं नष्टसूर्यमिवाम्बरम् १९ यमाश्रित्य महाबाहुं पञ्चालाः कुरवस्तथा । सुराणामपि यत्तानां पृतनासु न बिभ्यति २०

होते १०. विशेषतः पांचालराजकन्या द्रौपदीला आपल्या मधल्या पतीचें फारच स्मरण होत असल्यामुळें ती उद्विग्न झालेल्या पांडवश्रेष्ठ धर्मराजाला ह्मणाली ११ " हे पांडवश्रेष्ठ, सहस्रबाहु अर्जुनाची बरोबरी करणारा जो द्विभुज अर्जुन त्यावांचून हें वन मला चांगलें दिसत नाहीं आणि ही पृथ्वीही ठिकठिकाणीं मला शून्य दिसत आहे १२. प्रफुल्लित वृक्षांनीं युक्त असें हें अत्यंत आश्चर्यकारक वन तो सव्यसाची अर्जुन ह्यांत नसल्यामुळें मला तसें रमणीय दिसत नाहीं १३. कांतीनें नील मेघाप्रमाणें असून मत्त गजाप्रमाणें गमन करणाऱ्या कमलनयन अर्जुनाशिवाय काम्यक वन मला चांगलें दिसत नाहीं १४. सारांश, हे राजा, ज्याच्या धनुष्याचा ध्वनि विजेच्या गडगडाटाप्रमाणें कानावर येत असतो त्या सव्यसाची अर्जुनाची आठवण होत असल्यामुळें मला सुख प्राप्त होत नाहीं " १५. ह्याप्रमाणें ती द्रौपदी विलाप करीत असल्याचें ऐकून, हे महाराजा, शत्रुपक्षीयवीरनाशक भीमसेन द्रौपदीला ह्मणाला १६ " हे कल्याणि, तूं जें बोलत आहेस तें मनाला आनंददायक आहे; हे सुंदरि, तें तुझें बोलणें माझ्या हृदयाला अमृतप्राशनाप्रमाणें आनंद देत आहे १७. दीर्घ, एकसारिखे, पुष्ट, परिघतुल्य, प्रत्यंचेच्या आघाताच्या खुणांनीं युक्त, वर्तुल, खड्गायुध व धनुष्य धारण करणारे, निष्कपरिमित सुवर्णाच्या बाहुभूषणांनीं भूषित आणि पंचमुखी नागाप्रमाणें दिसणारे असे ज्याचे हात आहेत त्या पुरुषश्रेष्ठ अर्जुनावांचून हें वन सूर्यरहित आकाशाप्रमाणें भासत आहे १८, १९. ज्या महापराक्रमी अर्जुनाचा आश्रय धरिला असतां युद्धार्थ सज्ज झालेल्या देवांच्याही सैन्याचें पंचाल आणि कुरु भय बाळगीत नाहींत २०

यस्य बाहू समाश्रित्य वयं सर्वे महात्मनः । मन्यामहे जिताना‍जौ परान्प्राप्तां
च मेदिनीम् २१ तमृते फाल्गुनं वीरं न लभे काम्यके धृतिम् । पश्यामि
च दिशः सर्वास्तिमिरेणावृता इव २२ ततोऽब्रवीत्साश्रुकण्ठो नकुलः पाण्डु-
नन्दनः २३ नकुल उवाच ॥ यस्मिन्दिव्यानि कर्माणि कथयन्ति रणा-
जिरे । देवा अपि युधां श्रेष्ठं तमृते का रतिर्वने २४ उदीचीं यो दिशं गत्वा
जित्वा युधि महाबलान् । गन्धर्वमुख्याञ्छतशो हयाँल्लेभे महाद्युतिः २५
राज्ञे तित्तिरिकल्माषाञ्श्रीमतोऽनिलरंहसः । प्रादाद्भ्रात्रे प्रियः प्रेम्णा राज-
सूये महाक्रतौ २६ तमृते भीमधन्वानं भीमादवरजं वने । कामये काम्यके
वासं नेदानीममरोपमम् २७ सहदेव उवाच ॥ यो धनानि च कन्याश्च
युधि जित्वा महारथः । आजहार पुरा राज्ञे राजसूये महाक्रतौ २८
यः समेतान्मृधे जित्वा यादवानमितद्युतिः । सुभद्रामाजहारैको वासुदेवस्य
संमते २९ तस्य जिष्णोर्बृसीं दृष्ट्वा शून्यामिव निवेशने । हृदयं मे महा-
राज न शाम्यति कदाचन ३० वनादस्माद्विवासं तु रोचयेहमरिन्दम ।

व ज्या महात्म्याच्या बाहुबलावर अवलंबून राहून आह्मीं सर्व शत्रु पराजित होऊन पृथ्वी प्राप्त झाली असें समजत आहोंत २१ त्या वीर अर्जुनावांचून ह्या काम्यक वना- मध्यें माझ्यानें धीर धरवत नाहीं. ह्या सर्व दिशा मला अंधकारानें व्याप्त झाल्यासा- रिख्या दिसत आहेत " २२. ह्याप्रमाणें भीमसेनानें भाषण केल्यानंतर अश्रूंनीं कंठ दाटून आलेला पांडुपुत्र नकुल ह्मणाला २३ " देवसुद्धां संग्रामामध्यें ज्याच्या दिव्य कर्मांची प्रशंसा करीत असतात त्या वीरश्रेष्ठ अर्जुनाशिवाय ह्या वनामध्यें आपलें मन कोठून लागणार ? २४. उत्तर दिशेला गेल्यावर महाबलाढ्य अशा श्रेष्ठ श्रेष्ठ गंधर्वांचा युद्धामध्यें पराभव करून ज्या महातेजस्वी अर्जुनानें शेंकडों अश्व प्राप्त करून घेतले २५ आणि वायुप्रमाणें वेगवान् व भव्य असे ते तित्तिरिकल्माषसंज्ञक अश्व ज्या प्रिय अर्जुनानें राजसूय महाक्रतूमध्यें आपल्या भ्रात्या धर्मराजाला प्रेमानें अर्पण केले २६ त्या उग्रधनुर्धारी व भीमाहून कनिष्ठ अशा देवतुल्य अर्जुनावांचून ह्या काम्यकवनामध्यें वास्तव्य करण्याची माझी इच्छा नाहीं " २७. सहदेव ह्मणतो:—ज्या महारथि अर्जुनानें द्रव्य व कन्या जिंकून राजसूय महाक्रतूमध्यें पूर्वी राजाला आणून दिल्या २८ आणि एकत्र जुळून आलेल्या यादवांना संग्रामामध्यें जिंकून ज्या अत्यंत तेजस्वी एकट्या अर्जुनानें वासुदेवाच्या संमतीनें सुभद्रा हरण करून आणिली २९ त्या अर्जुनाचें आसन जागावर मोकळें पडलेलें पाहून, हे महाराजा, माझें हृदय स्वस्थ रहात नाहीं ३०. तस्मात्, हे शत्रुदमना धर्मराजा, ह्या वनांतून चालतें होणें मला बरें वाटतें. कारण, त्या

न हि नस्तमृते वीरं रमणीयमिदं वनम् ३१ [३१४१] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वण्यर्जुनानुशोचनेशीतितमोध्यायः ॥ ८० ॥

वैशम्पायन उवाच ॥ धनञ्जयोत्सुकानां तु भ्रातॄणां कृष्णया सह। श्रुत्वा वाक्यानि विमना धर्मराजोऽप्यजायत १ अथापश्यन्महात्मानं देवर्षिं तत्र नारदम्। दीप्यमानं श्रिया ब्राह्म्या हुतार्चिषमिवानलम् २ तमागतमभिप्रेक्ष्य भ्रातृभिः सह धर्मराट्। प्रत्युत्थाय यथान्यायं पूजां चक्रे महात्मने ३ स तैः परिवृतः श्रीमान्भ्रातृभिः कुरुसत्तमः। विबभावतिदीप्तौजा देवैरिव शतक्रतुः ४ यथा च वेदान्सावित्री याज्ञसेनी तथा पतीन्। न जहौ धर्मतः पार्थान्मेरुमर्कप्रभा यथा ५ प्रतिगृह्य च तां पूजां नारदो भगवानृषिः। आश्वासयद्धर्मसुतं युक्तरूपमिवानघ ६ उवाच च महात्मानं धर्मराजं युधिष्ठिरम्। ब्रूहि धर्मभृतां श्रेष्ठ केनार्थः किं ददानि ते ७ अथ धर्मसुतो राजा प्रणम्य भ्रातृभिः सह। उवाच प्राञ्जलिर्भूत्वा नारदं देवसंमितम् ८ त्वयि तुष्टे महाभाग सर्वलोकाभिपूजिते। कृतमित्येव मन्येहं प्रसा-

---

वीरावांचून हे वन आह्मांला रमणीय नाही ३१. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं अर्जुनासंबंधानें पांडवांनीं शोक केल्याविषयी ऐंशीवा अध्याय समाप्त झाला ॥ ८० ॥

वैशंपायन सांगतात:—अर्जुनाविषयी उत्सुक झालेल्या भ्रात्यांची द्रौपदीसहवर्तमान चाललेली भाषणें श्रवण करून धर्मराजाही खिन्न झाला १ तों इतक्यांत हवनयुक्त ज्वालेनें युक्त असलेल्या अग्नीप्रमाणें ब्रह्मतेजानें झळकत असलेले महात्मे देवर्षि नारद त्याच्या दृष्टीं पडले २. तेव्हां ते आलेले अवलोकन करून भ्रात्यांसहवर्तमान धर्मराजानें अभ्युत्थान घेतलें आणि त्या महात्म्यांची त्यानें यथाविधि पूजा केली ३. नंतर तो कुरुवंशजश्रेष्ठ वैभवशाली धर्मराजा त्या भ्रात्यांनीं परिवेष्टित झाला असतां देवांनीं परिवेष्टित झालेल्या इंद्राप्रमाणें तो अतिशय तेजस्वी दिसूं लागला ४. ज्याप्रमाणें सूर्यप्रभा मेरुपर्वताला अथवा गायत्री वेदांना सोडीत नाहीं त्याप्रमाणें द्रौपदीनें आपल्या कुंतीपुत्र पतींना धर्मदृष्ट्या सोडिलें नव्हतें ५. असो. धर्मराजानें केलेल्या त्या पूजेचा स्वीकार करून, हे निष्पापा जनमेजया, भगवान् नारदऋषि धर्मपुत्र आणि धर्माला अनुरूप अशा युधिष्ठिराला धीर देऊं लागले ६ आणि त्या महात्म्या धर्मराज युधिष्ठिराला ह्मणाले "हे धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ, तुला काय पाहिजे आहे व मी तुला काय देऊं तें सांग" ७. ह्याप्रमाणें नारदमुनींनीं विचारिलें असतां धर्मराजानें भ्रात्यांसहवर्तमान देवतुल्य नारदमुनींना प्रणाम केला आणि तो हात जोडून त्यांना ह्मणाला ८ "हे महाभाग्यवान् व सदाचरणसंपन्न मुने, सर्व लोकांना पूज्य असे आपण संतुष्ट

दात्तव सुव्रत ९ यदि त्वहमनुग्राह्यो भ्रातृभिः सहितोनघ । संदेहं मे मुनि-
श्रेष्ठ तत्त्वतश्छेत्तुमर्हसि १० प्रदक्षिणां यः कुरुते पृथिवीं तीर्थतत्परः । किं
फलं तस्य कार्त्स्न्येन तद्भवान्वक्तुमर्हति ११ नारद उवाच ॥ शृणु राज-
न्नवहितो यथा भीष्मेण धीमता । पुलस्त्यस्य सकाशाद्वै सर्वमेतदुपश्रु-
तम् १२ पुरा भागीरथीतीरे भीष्मो धर्मभृतां वरः । पित्र्यं व्रतं समास्थाय
न्यवसन्मुनिभिः सह १३ शुभे देशे तथा राजन्पुण्ये देवर्षिसेविते । गङ्गा-
द्वारे महाभाग देवगन्धर्वसेविते १४ स पितॄंस्तर्पयामास देवांश्च परमद्युतिः ।
ऋषींश्च तर्पयामास विधिदृष्टेन कर्मणा १५ कस्यचित्त्वथकालस्य जपन्नेव
महायशाः । ददर्शाद्भुतसंकाशं पुलस्त्यमृषिसत्तमम् १६ स तं दृष्ट्वोग्रतपसं
दीप्यमानमिव श्रिया । प्रहर्षमतुलं लेभे विस्मयं परमं ययौ १७ उपस्थितं
महाभागं पूजयामास भारत । भीष्मो धर्मभृतां श्रेष्ठो विधिदृष्टेन कर्मणा १८
शिरसा चार्घमादाय शुचिः प्रयतमानसः । नाम संकीर्तयामास तस्मि-
न्ब्रह्मर्षिसत्तमे १९ भीष्मोहमस्मि भद्रं ते दासोस्मि तव सुव्रत । तव संदर्श-

---

झाल्यावर माझा उद्देश आपल्या प्रसादानें शेंवटास गेलाच असें मी समजत आहें ९. तथापि, हे निष्पाप मुनिश्रेष्ठ, भ्रात्यांसहवर्तमान मजवर अनुग्रह करण्याचीच जर आपली इच्छा असेल तर माझ्या एका संदेहाचें आपण खरें खरें निरसन करा १०. तीर्थाटनाविषयीं तत्पर राहून जो पृथ्वीप्रदाक्षिणा करितो त्याला काय फल प्राप्त होतें हें आपण संपूर्णपणें मला कथन करा " ११. नारद ह्मणतात:—हे राजा, विचारी भीष्मानें पुलस्त्यमुनींपासून हें सर्व ज्याप्रमाणें श्रवण केलें आहे त्याप्रमाणें तूं एकाग्र चित्त करून श्रवण कर १२. पूर्वी धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेले भीष्म पित्याकरितां तपश्चर्येचें अवलंबन करून भागीरथीचे तीरीं मुनींसहवर्तमान वास्तव्य करीत असे १३ व. हे महाभाग्यवान् राजा, देवर्षि, देव आणि गंधर्व ह्यांनीं सेवित अशा त्या हरिद्वारसंज्ञक पवित्र व शुभ प्रदेशावर १४ तो महातेजस्वी भीष्म शास्त्रोक्त विधीनें पितर, देव आणि ऋषि ह्यांचे तर्पण करीत असे १५. असें होतां होतां कांहीं काल लोटल्यानंतर तो महायशस्वी भीष्म जप करीत बसला असतां अद्भुत कांतीनें युक्त असे ऋषिश्रेष्ठ पुलस्त्य त्याच्या दृष्टीं पडले १६. तेव्हां तेजानें झळकत असलेल्या त्या उग्रतपस्वी पुलस्त्य मुनींना अवलोकन करून भीष्माला पराकाष्ठेचा हर्ष व विस्मय झाला १७व, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या भीष्मानें तेथें प्राप्त झालेल्या महाभाग्यवान् पुलस्त्यमुनींची शास्त्रोक्त विधीनें पूजा केली १८ आणि प्रणामपूर्वक पूजाद्रव्यें अर्पण केल्यावर शुचि आणि जितेंद्रिय अशा भीष्मानें त्या ब्रह्मर्षिश्रेष्ठाला आपलें नांव

नादेव मुक्तोहं सर्वकिल्बिषैः २० एवमुक्त्वा महाराज भीष्मो धर्मभृतां वरः । वाग्यतः प्राञ्जलिर्भूत्वा तूष्णीमासीद्युधिष्ठिर २१ तं दृष्ट्वा नियमेनाथ स्वाध्यायाम्नायकर्शितम् । भीष्मं कुरुकुलश्रेष्ठं मुनिः प्रीतमनाभवत् २२ [३१६३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां० वैयासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि पार्थनारदसंवाद एकाशीतितमोध्यायः ॥ ८१ ॥

पुलस्त्य उवाच ॥ अनेन तव धर्मज्ञ प्रश्रयेण दमेन च । सत्येन च महाभाग तुष्टोस्मि तव सुव्रत १ यस्येदृशस्ते धर्मोयं पितृभक्त्याश्रितोनघ । तेन पश्यसि मां पुत्र प्रीतिश्च परमा त्वयि २ अमोघदर्शी भीष्माहं ब्रूहि किं करवाणि ते । यद्वक्ष्यसि कुरुश्रेष्ठ तस्य दातास्मि तेनघ ३ भीष्म उवाच ॥ प्रीते त्वयि महाभाग सर्वलोकाभिपूजिते । कृतमेतावता मन्ये यदहं दृष्टवान्प्रभुम् ४ यदि त्वहमनुग्राह्यस्तव धर्मभृतां वर । संदेहं ते प्रवक्ष्यामि तन्मे त्वं वक्तुमर्हसि ५ अस्ति मे हृदये कश्चित्तीर्थेभ्यो धर्म-

---

सांगितलें कीं १९, " हे सदाचरणसंपन्न मुने, आपलें देव बरें करो. मी भीष्म आहें, आपला दास आहें आणि आपल्या दर्शनानेच मी सर्व पातकापासून मुक्त झालों आहें " २०. हे महाराज युधिष्ठिरा, धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेला तो भीष्म ह्याप्रमाणें बोलल्यावर वाक्संयमन करून आणि हात जोडून स्वस्थ बसला २१. तेव्हां तपश्चर्येनें आणि वेदाध्ययनानें कृश झालेल्या त्या कुरुवंशजश्रेष्ठ भीष्माला अवलोकन करून पुलस्त्यमुनि मनामध्यें प्रसन्न झाले २२. ह्याप्रमाणे० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं धर्मराज आणि नारद ह्यांच्या संवादाविषयीं एक्यांयशीवा अध्याय समाप्त झाला ॥ ८१ ॥

पुलस्त्य ह्मणतातः—हे सदाचरणसंपन्न धर्मज्ञ महाभाग्यवान् भीष्मा, ह्या तुझ्या विनयानें, इंद्रियदमनानें आणि सत्यानें मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहे १. हे निष्पापा, पितृभक्तीनें तूं ह्या अशा प्रकारच्या धर्माचें अवलंबन केलें आहेस ह्मणून तुला माझें दर्शन झालें आहे आणि, हे पुत्रा, तुझे ठिकाणीं माझी पराकाष्ठेची प्रीति जडली आहे २. हे भीष्मा, माझे दर्शन व्यर्थ होणारें नाहीं. करितां, मीं तुझ्याकरितां काय करावें तें सांग. हे निष्पापा कुरुवंशजश्रेष्ठा, तूं जें ह्मणशील तें तुला मी देईन ३. भीष्म ह्मणतातः—हे महाभाग्यवान् मुने, सर्व लोकांना पूज्य असे आपण प्रसन्न होऊन मला आपणा समर्थांचें दर्शन झालें ह्यानेंच मी आपल्याला कृतकृत्य समजत आहें ४. तथापि हे धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ, माझ्यावर जर आपणांला अनुग्रह करणेंच असेल तर मी आपणांला एक संदेह विचारितों त्याचें आपण निरसन करावें ५. माझ्या मनामध्यें तीर्थासंबंधानें एक धर्मविषयक संशय आहे व तो निरसन केलेला ऐकण्याची मला इच्छा

संशयः । तमहं श्रोतुमिच्छामि तद्भवान्वक्तुमर्हति ६ प्रदक्षिणां यः पृथिवीं
करोत्यमरसंनिभ । किं फलं तस्य विप्रर्षे तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ७
पुलस्त्य उवाच । हन्त ते कथयिष्यामि यदृषीणां परायणम् । तदेकाग्र-
मनाः पुत्र शृणु तीर्थेषु यत्फलम् ८ यस्य हस्तौ च पादौ च मनश्चैव
सुसंयतम् । विद्या तपश्च कीर्तिश्च स तीर्थफलमश्नुते ९ प्रतिग्रहादपावृत्तः
संतुष्टो येनकेनचित् । अहंकारनिवृत्तश्च स तीर्थफलमश्नुते १० अकल्कको
निरारम्भो लघ्वाहारो जितेन्द्रियः । विमुक्तः सर्वपापेभ्यः स तीर्थफल-
मश्नुते ११ अक्रोधनश्च राजेन्द्र सत्यशीलो दृढव्रतः । आत्मोपमश्च भूतेषु
स तीर्थफलमश्नुते १२ ऋषिभिः क्रतवः प्रोक्ता देवेष्विह यथाक्रमम् ।
फलं चैव यथातथ्यं प्रेत्य चेह च सर्वशः १३ न ते शक्या दरिद्रेण यज्ञाः
प्राप्तुं महीपते । बहूपकरणा यज्ञा नानासंभारविस्तराः १४ प्राप्यन्ते
पार्थिवैरेतैः समृद्धैर्वा नरैः क्वचित् । नार्थन्यूनैर्नावगणैरेकात्मभिरसा-

आहे. ह्यास्तव, आपण त्याचें निरसन करावें ६. हे देवतुल्य ब्रह्मर्षे, जो पृथ्वीप्रदक्षिणा करितो त्याला काय फल प्राप्त होतें तें आपण मला निश्चयपूर्वक कथन करा ७. पुलस्त्य सांगतातः—हे पुत्रा, ऋषींचा मुख्य आधार असें जें तीर्थांचें फल तें मी तुला कथन करितों. तूं एकाग्रचित्त होऊन श्रवण कर ८. ज्याचे हात, पाय, मन, विद्या, तप आणि कीर्ति ह्यांचें संयमन झालेलें असतें त्याला तीर्थाचें फल प्राप्त होतें९. प्रतिग्रहापासून परावृत्त; जें मिळेल त्याच्यावर संतुष्ट आणि अहंकारापासून निवृत्त झालेल्या पुरुषाला तीर्थफल प्राप्त होतें १०. निष्कपट, कसलाही उपद्व्याप न करणारा, मिताहारी, जितेंद्रिय आणि सर्व पापकर्मांपासून अलिप्त असा जो असेल त्याला तीर्थ-फल प्राप्त होतें ११. हे राजेंद्रा, क्रोधरहित, सत्यनिष्ठ, स्वीकारिलेलें व्रत नियमानें चालविणारा आणि प्राणिमात्रांवर दया करणारा जो असेल त्याला तीर्थफल प्राप्त होतं १२. ऋषींनीं देवांना उद्देशून ह्या ठिकाणीं क्रतु व त्यांचें इहलोकीं व परलोकीं येणारें फल हें अगदीं सर्व इत्थंभूत सांगून ठेविलें आहे १३. परंतु, हे भूपते, ते यज्ञ दरिद्री पुरुषाच्या हातून होणें शक्य नाहीं. कारण, यज्ञांना साधनें पुष्कळ लागत असून नानाप्रकारची सामग्रीही विपुल लागत असते १४. ह्या राजांच्या अथवा फार

१ दुष्ट प्रतिग्रह आणि परपीडा ह्यांपासून अलिप्त राहाणें हा हस्तसंयम होय; पुढें पाहून पाऊल टाकणें हा पादसंयम होय; दुसऱ्याचें वाईट न चिंतणें हा मनःसंयम होय; जारणमारणादि कर्मांपासून परावृत्त असणें हा विद्यासंयम होय; दंभाचा अभाव असणें हा तपःसंयम होय आणि अप-कीर्ति नसणें हा कीर्तिसंयम होय.

धनैः १५ यो दरिद्रैरपि विधिः शक्यः प्राप्तुं नरेश्वर । तुल्यो यज्ञफलैः पुण्यैस्तं निबोध युधां वर १६ ऋषीणां परमं गुह्यमिदं भरतसत्तम । तीर्थाभिगमनं पुण्यं यज्ञैरपि विशिष्यते १७ अनुपोष्य त्रिरात्राणि तीर्थान्यनभिगम्य च । अदत्त्वा काञ्चनं गाश्च दरिद्रो नाम जायते १८ अग्निष्टोमादिभिर्यज्ञैरिष्ट्वा विपुलदक्षिणैः । न तत्फलमवाप्नोति तीर्थाभिगमनेन यत् १९ नृलोके देवदेवस्य तीर्थं त्रैलोक्यविश्रुतम् । पुष्करं नाम विख्यातं महाभागः समाविशेत् २० दशकोटिसहस्राणि तीर्थानां वै महामते । सांनिध्यं पुष्करे येषां त्रिसन्ध्यं कुरुनन्दन २१ आदित्या वसवो रुद्राः साध्याश्च समरुद्गणाः । गन्धर्वाप्सरसश्चैव नित्यं संनिहता विभो २२ यत्र देवास्तपस्तप्त्वा दैत्या ब्रह्मर्षयस्तथा । दिव्ययोगा महाराज पुण्येन महतान्विताः २३ मनसाप्यभिकामस्य पुष्कराणि मनस्विनः । पूयन्ते सर्वपापानि नाकपृष्ठे च पूज्यते २४ तस्मिंस्तीर्थे महाराज नित्यमेव पिता-

---

झालें तर कदाचित् संपन्न पुरुषांच्या हातूनच हे यज्ञ होणें शक्य आहे. ज्यांच्यापाशीं द्रव्याची कमतरता आहे, ज्यांना साहाय्यकर्ते चांगलेसे नाहींत, जे एकटेच आहेत अथवा ज्यांच्यापाशीं कांहीं साधन नाहीं अशांच्या हातून ते होणें अशक्य आहे १५. तस्मात्, हे वीरश्रेष्ठ भूपते, दरिद्री पुरुषांच्याही हातून जो विधि होणें शक्य आहे आणि ज्याचें फल पुण्यकारक अशा यज्ञफलांच्या बरोबरीचें आहे तो तूं श्रवण कर १६. हे भरतवंशजश्रेष्ठा भीष्मा, हे पुण्यकारक तीर्थाटन यज्ञांपेक्षांही श्रेष्ठ असल्यामुळें ऋषींचें हें पराकाष्ठेचें गुह्य आहे १७. त्रिरात्र उपोषण केल्यावांचून, तीर्थाटन केल्यावांचून आणि गोप्रदान व सुवर्णदान केल्यावांचून राहणारा पुरुष दरिद्री होतो १८. विपुल दक्षिणांनीं युक्त अशा अग्निष्टोमप्रभृति यज्ञांनींही तीर्थाटनानें संपादन होणारें फल प्राप्त होत नाहीं १९. देवाधिदेव ब्रह्मदेवाचें त्रैलोक्यामध्यें प्रसिद्ध असें एक पुष्कर म्हणून जें विख्यात तीर्थ भूलोकीं आहे त्या तीर्थाचें महाभाग्यवान् पुरुषालाच स्नान घडतें २०. हे महामते कुरुनंदना, प्रत्यहीं तिन्ही वेळां त्या पुष्कर तीर्थाचे संनिध दहा हजार कोट तीर्थें असतात २१. हे समर्थ भीष्मा, आदित्य, वसु, रुद्र, साध्य, मरुद्गण, अप्सरा व गंधर्व हे नित्य त्या पुष्कर तीर्थाचे संनिधच असतात २२. हे महाराज, त्या ठिकाणीं तपश्चर्या करून देव, दैत्य आणि ब्रह्मर्षि दिव्य योगी होऊन महापुण्यानें युक्त झालेले आहेत २३. पुष्कर तीर्थाला जाण्याचें मनांत आणणाऱ्या विचारी पुरुषाच्या सर्व पापांचें क्षालन होऊन स्वर्गामध्यें त्याला मान मिळतो २४. हे महाराज, त्या तीर्थाचे

महः । उवास परमप्रीतो भगवान्कमलासनः २५ पुष्करेषु महाभाग
देवाः सर्षिगणाः पुरा । सिद्धिं समभिसंप्राप्ताः पुण्येन महतान्विताः २६
तत्राभिषेकं यः कुर्यात्पितृदेवार्चने रतः । अश्वमेधाद्दशगुणं फलं प्राहु-
र्मनीषिणः २७ अप्येकं भोजयेद्विप्रं पुष्करारण्यमाश्रितः । तेनासौ कर्मणा
भीष्म प्रेत्य चेह च मोदते २८ शाकैर्मूलैः फलैर्वापि येन वर्तयते स्वयम् ।
तद्वै दद्याद्ब्राह्मणाय श्रद्धावाननसूयकः । तेनैव प्राप्नुयात्प्राज्ञो हयमेधफलं
नरः २९ ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्रा वा राजसत्तम । न वै योनौ
प्रजायन्ते स्नातास्तीर्थे महात्मनः ३० कार्तिकीं तु विशेषेण योभिगच्छति
पुष्करम् । प्राप्नुयात्स नरो लोकान्ब्रह्मणः सदनेक्षयात् ३१ सायंप्रातः
स्मरेद्यस्तु पुष्कराणि कृताञ्जलिः । उपस्पृष्टं भवेत्तेन सर्वतीर्थेषु भारत ३२
जन्मप्रभृति यत्पापं स्त्रिया वा पुरुषेण वा । पुष्करे स्नातमात्रस्य सर्वमेव
प्रणश्यति ३३ यथा सुराणां सर्वेषामादिस्तु मधुसूदनः । तथैव पुष्करं
राजंस्तीर्थानामादिरुच्यते ३४ उष्ट्वा द्वादश वर्षाणि पुष्करे नियतः शुचिः ।

ठिकाणीं पितामह भगवान् ब्रह्मदेव अत्यंत प्रसन्न होऊन नित्य रहात असतो २५. हे महाभाग्यवान् भीष्मा, देव आणि ऋषिगण ह्यांना पूर्वी पुष्कर तीर्थाचे ठिकाणीं सिद्धि प्राप्त झालेली असून ते महापुण्यवान् झालेले आहेत २६. त्या तीर्थाचे ठिकाणीं स्नान करून जो पितर आणि देव ह्यांच्या पूजनाविषयीं तत्पर होतो त्याला अश्वमेधाहून दशगुणित फल प्राप्त होतें असें ज्ञानी लोक ह्मणतात २७. हे भीष्मा, पुष्करारण्यांत जाऊन जो एका तरी ब्राह्मणाला भोजन घालितो तो त्या पुण्यकर्माच्या योगानें इहलोकीं व परलोकीं आनंदांत राहातो २८. शाक, मुळें अथवा फळें ह्यांपैकीं ज्याच्यावर स्वतःची उपजीविका चाललेली असते तें श्रद्धालु आणि निर्मत्सर पुरुषानें ब्राह्मणाला अर्पण केलें असतां त्या पुण्यकृत्यामुळें त्या ज्ञानी पुरुषाला अश्वमेधाचें फल प्राप्त होतें २९. हे नृपश्रेष्ठा भीष्मा, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा शूद्र ह्यांनीं त्या तीर्थामध्यें स्नान केलें असतां फिरून त्या महात्म्यांना जन्म प्राप्त होत नाहीं ३०. विशेषेंकरून कार्तिकीपौर्णिमेला जो पुष्कराला जातो त्या पुरुषाला ब्रह्मदेवाचें स्थान प्राप्त होऊन अक्षय लोक प्राप्त होतात ३१. हे भरतकुलोत्पन्न भीष्मा, हात जोडून सकाळ संध्याकाळ जो पुष्कराचें स्मरण करितो त्याला सर्व तीर्थांचे ठिकाणीं स्नान केल्याचें फल प्राप्त होतें ३२. स्त्रीचें अथवा पुरुषाचें जन्मापासून जें कांहीं पातक झालें असेल तें पुष्कर तीर्थावर स्नान करितांक्षणीं सर्व नाहींसें होतें ३३. हे राजा, ज्याप्रमाणें मधुसूदन सर्व देवांमध्यें मुख्य होय त्याचप्रमाणें पुष्कर सर्व तीर्थांमध्यें मुख्य

ऋतून्सर्वानवाप्नोति ब्रह्मलोकं स गच्छति ३५ यस्तु वर्षशतं पूर्णमग्नि-
होत्रमुपासते । कार्तिकीं वा वसेदेकां पुष्करे सममेव तत् ३६ त्रीणि
शृङ्गाणि शुभ्राणि त्रीणि प्रस्रवणानि च । पुष्कराण्यादिसिद्धानि न विद्म-
स्तत्र कारणम् ३७ दुष्करं पुष्करे गन्तुं दुष्करं पुष्करे तपः । दुष्करं
पुष्करे दानं वस्तुं चैव सुदुष्करम् ३८ उष्य द्वादशरात्रं तु नियतो नियताशनः । प्रदक्षिणमुपावृत्य जम्बूमार्गं समाविशेत् ३९ जम्बूमार्गं समाविश्य देवर्षिपितृसेवितम् । अश्वमेधमवाप्नोति सर्वकामसमन्वितः ४०
तत्रोष्य रजनीः पञ्च पूतात्मा जायते नरः । न दुर्गतिमवाप्नोति सिद्धिं
प्राप्नोति चोत्तमाम् ४१ जम्बूमार्गादुपावृत्य गच्छेत्तन्दुलिकाश्रमम् । न
दुर्गतिमवाप्नोति ब्रह्मलोकं च गच्छति ४२ आगस्त्यं सर आसाद्य पितृ-
देवार्चनेरतः । त्रिरात्रोपोषितो राजन्नग्निष्टोमफलं लभेत् ४३ शाकवृत्तिः
फलैर्वापि कौमारं विन्दते परम् । कण्वाश्रमं ततो गच्छेच्छ्रीजुष्टं लोक-
पूजितम् ४४ धर्मारण्यं हि तत्पुण्यमाद्यं च भरतर्षभ । यत्र प्रविष्टमात्रो

आहे ३४. पुष्करतीर्थाचे ठिकाणीं जितेंद्रिय आणि शुचि राहून जो बारा वर्षे वास्तव्य करितो त्याला सर्व ऋतु प्राप्त होतात व तो ब्रह्मलोकास जातो ३५. जो पूर्ण शभर वर्षेपर्यंत अग्निहोत्र चालवितो आणि जो एका कार्तिकीला पुष्कर तीर्थाचे ठिकाणीं जातो त्या उभयतांचे पुण्य सारखेंच होय ३६. तीन शुभ्र शृंगें, तीन प्रवाह आणि तीन पुष्करे हीं अनादिसिद्ध आहेत आणि ह्मणूनच त्यांना तीर्थत्व केव्हां प्राप्त झालें ह्याचे कारण आह्मांला माहीत नाहीं ३७. पुष्कर तीर्थाचे ठिकाणी गमन, तप, दान आणि वास्तव्य होणें दुर्घट आहे ३८. तेथें जितेंद्रिय व मिताहारी राहून बारा दिवस वास्तव्य करावें आणि उजव्या अंगाला वळून जंबू मार्गाला लागावें ३९. कारण, देव, ऋषि आणि पितर ह्यांनी सेवित अशा जंबूमार्गामध्यें गेले असतां सर्व मनोरथ परिपूर्ण होऊन अश्वमेधाचें फल प्राप्त होतें ४०. त्या ठिकाणीं पांच रात्रीं वास्तव्य केलें ह्मणजे पुरुषाचें अंतःकरण शुद्ध होतें आणि दुर्गति प्राप्त न होतां उत्कृष्ट प्रकारची सिद्धि प्राप्त होते ४१. जंबूमार्गापासून वळून तंदुलिकाश्रमाला जो जातो त्याला दुर्गति प्राप्त न होतां ब्रह्मलोक प्राप्त होतो ४२. हे राजा, आगस्त्यसरोवराचे ठिकाणीं जाऊन व त्रिरात्र उपोषण करून जो पितर आणि देव ह्यांच्या पूजनाविषयीं तत्पर राहातो त्याला अग्निष्टोम क्रतूचें फल प्राप्त होतें ४३ आणि शाकांवर अथवा फलावर तीन दिवस उपजीविका करून त्या ठिकाणीं राहणाऱ्यालाही स्कंदाचें स्थान प्राप्त होतें. तेथून लक्ष्मीनें वास्तव्य केलेल्या लोकमान्य कण्वाश्रमाला जावें ४४. कारण, हे

वै सर्वपापैः प्रमुच्यते ४५ अर्चयित्वा पितॄन्देवान्नियतो नियताशनः ।
सर्वकामसमृद्धस्य यज्ञस्य फलमश्नुते ४६ प्रदक्षिणं ततः कृत्वा ययाति-
पतनं व्रजेत् । हयमेधस्य यज्ञस्य फलं प्राप्नोति तत्र वै ४७ महाकालं
ततो गच्छेन्नियतो नियताशनः। कोटितीर्थमुपस्पृश्य हयमेधफलं लभेत् ४८
ततो गच्छेत धर्मज्ञः स्थाणोस्तीर्थमुमापतेः । नाम्ना भद्रवटं नाम त्रिषु
लोकेषु विश्रुतम् ४९ तत्राभिगम्य चेशानं गोसहस्रफलं लभेत् । महा-
देवप्रसादाच्च गाणपत्यं च विन्दति ५० समृद्धमसपत्नं च श्रिया युक्तं
नरोत्तमः ५१ नर्मदां स समासाद्य नदीं त्रैलोक्यविश्रुताम् । तर्पयित्वा पितॄ-
न्देवानग्निष्टोमफलं लभेत् ५२ दक्षिणं सिन्धुमासाद्य ब्रह्मचारी जितेन्द्रियः ।
अग्निष्टोममवाप्नोति विमानं चाधिरोहति ५३ चर्मण्वतीं समासाद्य
नियतो नियताशनः । रन्तिदेवाभ्यनुज्ञातमग्निष्टोमफलं लभेत् ५४ ततो
गच्छेत धर्मज्ञ हिमवत्सुतमर्बुदम् । पृथिव्यां यत्र वै छिद्रं पूर्वमासीद्यु-
धिष्ठिर ५५ तत्राश्रमो वसिष्ठस्य त्रिषु लोकेषु विश्रुतः । तत्रोष्य रज-

---

भरतवंशजश्रेष्ठा भीष्मा, तें पुण्यप्रापक व मुख्य असें धर्मारण्य असून त्यामध्यें प्रविष्ट होतां-क्षणीं पुरुष सर्व पातकापासून मुक्त होतो ४५ आणि जितेंद्रिय व मिताहारी राहून पितर आणि देव ह्यांचें पूजन केलें असतां पुरुषाचे सर्व मनोरथ परिपूर्ण होऊन यज्ञाचें फल प्राप्त होतें ४६. नंतर त्याला प्रदक्षिणा करून ययातिपतन तीर्थाला जावें ह्मणजे त्या ठिकाणीं अश्वमेध यज्ञाचें फल प्राप्त होतें ४७. तदनंतर जितेंद्रिय व मिताहारी राहून महाकालाला गेलें असतां कोटितीर्थामध्यें स्नान केल्याचें फल प्राप्त होऊन अश्व-मेध यागाचें फल प्राप्त होतें ४८. तदनंतर भद्रवट ह्मणून त्रैलोक्यामध्यें प्रख्यात अस-लेल्या उमापति शिवाच्या तीर्थाला धर्मवेत्त्या पुरुषानें जावें ४९. त्या ठिकाणीं जाऊन शिवदर्शन केलें असतां सहस्र गोप्रदानें केल्याचें फल प्राप्त होऊन महादेवाच्या प्रसा-दानें समृद्ध, शत्रुरहित आणि श्रीयुत असें गाणपत्य प्राप्त होतें ५०, ५१. तेथून त्रैलोक्यविख्यात नर्मदा नदीला जाऊन पितर आणि देव ह्यांचें तर्पण केलें असतां अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें ५२. दक्षिण सिंधूला जाऊन ब्रह्मचारी व जितें-द्रिय राहणाऱ्या पुरुषाला अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें व तो विमानामध्यें आरो-हण करून स्वर्गाला जातो ५३. चर्मण्वती नदीला जाऊन जितेंद्रिय व मिताहारी राहाणाऱ्या पुरुषाला रंतिदेवानें सांगितलेलें अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें ५४. तदनंतर, युद्धामध्यें अचल राहणाऱ्या धर्मवेत्त्या भीष्मा, हिमालयाचा पुत्र जो अर्बुद तिकडे जावें. त्या ठिकाणीं पूर्वी पृथ्वीला छिद्र होतें ५५ व सांप्रत त्रैलोक्यविख्यात

नीमेकां गोसहस्रफलं लभेत् ५६ पिङ्गतीर्थमुपस्पृश्य ब्रह्मचारी जितेन्द्रियः । कपिलानां नरश्रेष्ठ शतस्य फलमश्नुत ५७ ततो गच्छेत राजेन्द्र प्रभासं तीर्थमुत्तमम् । तत्र संनिहितो नित्यं स्वयमेव हुताशनः ५८ देवतानां मुखं वीर ज्वलनोनिलसारथिः । तस्मिंस्तीर्थे नरः स्नात्वा शुचिः प्रयतमानसः ५९ अग्निष्टोमातिरात्राभ्यां फलं प्राप्नोति मानवः । ततो गत्वा सरस्वत्याः सागरस्य च संगमे ६० गोसहस्रफलं तस्य स्वर्गलोकं च विन्दति । प्रभया दीप्यते नित्यमग्निवद्भरतर्षभ ६१ तीर्थे सलिलराजस्य स्नात्वा प्रयतमानसः । त्रिरात्रमुषितः स्नातस्तर्पयेत्पितृदेवताः ६२ प्रभासते यथा सोमः सोऽश्वमेधं च विन्दति । वरदानं ततो गच्छेत्तीर्थं भरतसत्तम ६३ विष्णोर्दुर्वाससा यत्र वरो दत्तो युधिष्ठिर । वरदाने नरः स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् ६४ ततो द्वारवतीं गच्छेन्नियतो नियताशनः । पिण्डारके नरः स्नात्वा लभेद्बहुसुवर्णकम् ६५ तस्मिंस्तीर्थे महाभाग

असा वसिष्ठाश्रम त्या ठिकाणीं आहे. तेथें एक रात्र वास्तव्य केलें असतां सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ५६. पिंगतीर्थामध्यें स्नान करून ब्रह्मचारी व जितेंद्रिय राहणाऱ्या पुरुषाला, हे पुरुषश्रेष्ठा भीष्मा, शंभर कपिला दिल्याचें फल प्राप्त होतें ५७. हे राजेंद्रा, तेथून पुढें उत्कृष्ट अशा प्रभास तीर्थाला जावें; त्या तीर्थाचे संनिध स्वतः देवांचें मुख आणि वायुरूप सारथ्यानें युक्त असा हुतभक्षक अग्नि, हे वीरा, नित्य वास्तव्य करीत असतो. त्या तीर्थामध्यें स्नान करून शुचि व शुद्ध मनानें पुरुषानें रहावें ५८, ५९; ह्मणजे अग्निष्टोम आणि अतिरात्र ह्या क्रतूंनीं प्राप्त होणारें फल त्याला प्राप्त होतें. तदनतर सरस्वती आणि सागर ह्यांच्या संगमावर गेलें असतां ६० सहस्र गोप्रदानें केल्याचें फल प्राप्त होऊन स्वर्गलोकाची प्राप्ति होते. हे भरतवंशजश्रेष्ठा भीष्मा, वरुण तीर्थामध्यें स्नान करून शुद्ध मनानें राहिलें असतां पुरुष अग्नीप्रमाणें नित्य देदीप्यमान रहातो आणि त्या ठिकाणीं त्रिरात्र राहून व नित्य स्नान करून पितर आणि देव ह्यांचें जो पुरुष तर्पण करितो ६१, ६२ तो चंद्राप्रमाणें देदीप्यमान होऊन अश्वमेध यागाचें फल त्याला प्राप्त होतें. तेथून, हे भरतवंशजश्रेष्ठा भीष्मा, वरदाननामक तीर्थाला जावें ६३. हे युधिष्ठिरा, दुर्वास मुनींनीं विष्णूला त्या ठिकाणीं वर दिलेला आहे. त्या वरदानतीर्थामध्यें स्नान केलें असतां पुरुषाला सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ६४. तदनंतर जितेंद्रिय आणि मिताहारी राहून द्वारवतीला जावें आणि पिंडारक तीर्थावर स्नान करावें ह्मणजे पुरुषाला विपुल सुवर्ण प्राप्त होतें ६५. हे महाभाग्यवान्

पद्मलक्षणलक्षिताः । अद्यापि मुद्रा दृश्यन्ते तदद्भुतमरिन्दम ६६ त्रिशूलाङ्कानि पद्मानि दृश्यन्ते कुरुनन्दन । महादेवस्य सांनिध्यं तत्र वै पुरुषर्षभ ६७ सागरस्य च सिन्धोश्च संगमं प्राप्य भारत । तीर्थे सलिलराजस्य स्नात्वा प्रयतमानसः ६८ तर्पयित्वा पितृन्देवानृषींश्च भरतर्षभ । प्राप्नोति वारुणं लोकं दीप्यमानं स्वतेजसा ६९ शङ्कुकर्णेश्वरं देवमर्चयित्वा युधिष्ठिर । अश्वमेधाद्दशगुणं प्रवदन्ति मनीषिणः ७० प्रदक्षिणमुपावृत्य गच्छेत भरतर्षभ । तीर्थं कुरुवरश्रेष्ठ त्रिषु लोकेषु विश्रुतम् ७१ दमीति नाम्ना विख्यातं सर्वपापप्रणाशनम् । तत्र ब्रह्मादयो देवा उपासन्ते महेश्वरम् ७२ तत्र स्नात्वार्चयित्वा च रुद्रं देवगणैर्वृतम् । जन्मप्रभृति यत्पापं तत्स्नातस्य प्रणश्यति ७३ दमी चात्र नरश्रेष्ठ सर्वदेवैरभिष्टुतः । तत्र स्नात्वा नरव्याघ्र हयमेधमवाप्नुयात् ७४ गत्वा यत्र महाप्राज्ञ विष्णुना प्रभविष्णुना। पुरा शौचं कृतं राजन्हत्वा दैतेयदानवान् ७५ ततो गच्छेत धर्मज्ञ वसोर्धारामभिष्टुताम् । गमनादेव तस्यां हि हयमेधफलं

शत्रुदमना, पद्मचिन्हांनी युक्त अशा मुद्रा त्या तीर्थावर अद्यापि दृष्टीस पडतात; हें एक आश्चर्यच आहे ६६. हे कुरुनंदना, त्रिशूल चिन्हांनीं युक्त अशीं पद्में त्या ठिकाणीं दृष्टीस पडतात. कारण, हे पुरुषश्रेष्ठा, तेथें महादेवाचें सांनिध्य आहे ६७. हे भरतकुलोत्पन्ना, सागर आणि नदी ह्यांच्या संगमावर जाऊन त्या वरुणतिर्थामध्यें स्नान करून शुद्ध मनानें असावें ६८ आणि पितर, देव आणि ऋषि ह्यांचें तर्पण करावें, ह्मणजे, हे भरतवंशजश्रेष्ठा, स्वतःच्या तेजानेंच देदीप्यमान असा वरुणलोक प्राप्त होतो ६९. हे युधिष्ठिरा, शंकुकर्णेश्वर देवाचें पूजन केलें असतां अश्वमेधाहून दशगुणित फल प्राप्त होतें असें ज्ञानी पुरुष ह्मणतात ७०. नंतर, हे भरतोत्तमा कुरुवरश्रेष्ठा, प्रदक्षिणेक वळून दमि या नावानें विख्यात असलेल्या सर्वपापनाशक त्रैलोक्यप्रसिद्ध तीर्थाला जावें. त्या ठिकाणीं ब्रह्मादि देव महेश्वराची उपासना करीत असतात ७१, ७२. त्या ठिकाणीं स्नान करून देवगणांनीं युक्त असलेल्या रुद्राचें पूजन करावें. कारण, तेथें स्नान करून रुद्राचें पूजन केलें असतां जन्मापासून जें कांहीं पातक झालें असेल तें नाहींसें होतें ७३. हे पुरुषश्रेष्ठा, ह्या ठिकाणीं सर्व देवांनीं दमीची स्तुति केलेली आहे व, हे पुरुषश्रेष्ठा, येथें स्नान केलें ह्मणजे अश्वमेधाचें फल प्राप्त होतें ७४. हे महाज्ञानवान् राजा, दैत्यदानवांचा वध केल्यावर सर्वव्यापी विष्णूंनीं ह्या ठिकाणीं येऊन पूर्वी पातकक्षालन केलेलें आहे ७५. असो. तदनंतर, हे धर्मज्ञ, पुष्कळांनीं प्रशंसा केलेल्या वसोर्धारेला

लभेत् ७६ स्नात्वा कुरुवरश्रेष्ठ प्रयतात्मा समाहितः । तर्प्य देवान्पितॄंश्चैव विष्णुलोके महीयते ७७ तीर्थे चात्र सरः पुण्यं वसूनां भरतर्षभ । तत्र स्नात्वा च पीत्वा च वसूनां संमतो भवेत् ७८ सिन्धूत्तममिति ख्यातं सर्वपापप्रणाशनम् । तत्र स्नात्वा नरश्रेष्ठ लभेद्बहुसुवर्णकम् ७९ भद्रतुङ्गं समासाद्य शुचिः शीलसमन्वितः । ब्रह्मलोकमवाप्नोति गतिं च परमां व्रजेत् ८० कुमारिकाणां शक्रस्य तीर्थं सिद्धनिषेवितम् । तत्र स्नात्वा नरः क्षिप्रं स्वर्गलोकमवाप्नुयात् ८१ रेणुकायाश्च तत्रैव तीर्थं सिद्धनिषेवितम् । तत्र स्नात्वा भवेद्विप्रो निर्मलश्चन्द्रमा यथा ८२ अथ पञ्चनदं गत्वा नियतो नियताशनः । पञ्च यज्ञानवाप्नोति क्रमशो येनुकीर्तिताः ८३ ततो गच्छेत राजेन्द्र भीमायाः स्थानमुत्तमम् । तत्र स्नात्वा तु योन्यां वै नरो भरतसत्तम ८४ देव्याः पुत्रो भवेद्राजंस्तप्तकुण्डलविग्रहः । गवां शतसहस्रस्य फलं प्राप्नोति मानवः ८५ श्रीकुण्डं तु समासाद्य त्रिषु लोकेषु विश्रुतम् । पितामहं नमस्कृत्य गोसहस्रफलं लभेत् ८६ ततो

जावें. कारण, तेथें गेल्यानेंच अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें ७६ व, हे कुरुवंशजश्रेष्ठा, त्या ठिकाणीं स्नान करून शुद्ध व स्वस्थ मनानें राहावें आणि देवांचें व पितरांचें तर्पण करावें म्हणजे विष्णुलोकीं मान मिळतो ७७. ह्या तीर्थाचे ठिकाणीं, हे भरतोत्तमा, अष्टवसूंचें पुण्य सरोवर आहे व त्या ठिकाणीं स्नान करून तेथील उदकाचें पान केलें असतां पुरुष अष्टवसूंना संमत होतो ७८. सिंधूत्तम म्हणून एक सर्वपापनाशक तीर्थ आहे त्या ठिकाणीं स्नान केलें असतां, हे पुरुषश्रेष्ठा भीष्मा, विपुल सुवर्ण प्राप्त होतें ७९ आणि भद्रतुंग तीर्थाला जाऊन शुचि व सुशील राहणाऱ्या पुरुषाला ब्रह्मलोक व उत्कृष्ट गति प्राप्त होते ८०. कुमारिका आणि इंद्र ह्यांचें एक तीर्थ आहे. त्या ठिकाणीं सिद्धि वास्तव्य करीत असतात व तेथें स्नान केलें असतां पुरुषाला सत्वर स्वर्गलोकाची प्राप्ती होते ८१. त्याच ठिकाणीं सिद्धांनीं सेवित असें रेणुका तीर्थ आहे. तेथें स्नान केलें असतां ब्राह्मण चंद्राप्रमाणें निर्मळ होतो ८२. नंतर पंचनदाला जाऊन जितेंद्रिय व मिताहारी रहावें; म्हणजे क्रमानें कथन केलेल्या पंचमहायज्ञांचें फल प्राप्त होतें ८३. तदनंतर, हे राजेंद्रा, भीमेच्या उत्कृष्ट स्थानाप्रत जावें. कारण, हे भरतवंशजश्रेष्ठा राजा, त्या ठिकाणीं योनीमध्यें स्नान केलेला पुरुष *शरीराचे ठिकाणीं उज्ज्वल कुंडलें व देह ह्यांनीं युक्त असलेला असा एकाद्या राणीचा* पुत्र होतो आणि लक्ष गोप्रदानांचें फल त्याला प्राप्त होतें ८४,८५ व त्रैलोक्यविख्यात अशा श्रीकुंडावर जाऊन ब्रह्मदेवाला प्रणाम केला असतां सहस्र गोप्रदानांचें

गच्छेत धर्मज्ञ विमलं तीर्थमुत्तमम् । अद्यापि यत्र दृश्यन्ते मत्स्याः सौव-
र्णराजताः ८७ तत्र स्नात्वा नरः क्षिप्रं वासवं लोकमाप्नुयात् । सर्वपाप-
विशुद्धात्मा गच्छेत परमां गतिम् ८८ वितस्तां च समासाद्य संतर्प्य
पितृदेवताः । नरः फलमवाप्नोति वाजपेयस्य भारत ८९ काश्मीरेष्वेव
नागस्य भवनं तक्षकस्य च । वितस्ताख्यमिति ख्यातं सर्वपापप्रमोचनम् ९०
तत्र स्नात्वा नरो नूनं वाजपेयमवाप्नुयात् । सर्वपापविशुद्धात्मा गच्छेच्च
परमां गतिम् ९१ ततो गच्छेत वडवां त्रिषु लोकेषु विश्रुताम् । पश्चि-
मायां तु सन्ध्यायामुपस्पृश्य यथाविधि ९२ चरुं सप्तार्चिषे राजन्यथा-
शक्ति निवेदयेत् । पितॄणामक्षयं दानं प्रवदन्ति मनीषिणः ९३ ऋषयः
पितरो देवा गन्धर्वाप्सरसां गणाः । गुह्यकाः किंनरा यक्षाः सिद्धा
विद्याधरा नराः ९४ राक्षसा दितिजा रुद्रा ब्रह्मा च मनुजाधिप । नियतः
परमां दीक्षामास्थायाब्दसहस्रिकीम् ९५ विष्णोः प्रसादनं कुर्वश्चरुं च
श्रपयंस्तथा । सप्तभिः सप्तभिश्चैव ऋग्भिस्तुष्टाव केशवम् ९६ ददावष्टगु-
णैश्वर्यं तेषां तुष्टस्तु केशवः । यथाभिलषितानन्यान्कामान्दत्त्वा महीपते ९७

फल प्राप्त होतें ८६. तदनंतर, हे धर्मज्ञ, उत्कृष्ट अशा विमल तीर्थाला जावें. त्या ठिकाणीं सोन्या रुप्याचे मत्स्य अद्यापि दृष्टीस पडत असतात ८७; त्या ठिकाणीं स्नान केलें असतां पुरुषाला वसूंचें स्थान प्राप्त होतें आणि पापाचें क्षालन होऊन मन शुद्ध झाल्यानें उत्कृष्ट गतिही त्याला प्राप्त होते ८८. हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, वितस्तानदीला जाऊन देवपितरांचें संतर्पण केलें असतां पुरुषाला वाजपेय क्रतूचें फल प्राप्त होतें ८९. काश्मीर देशामध्यें तक्षक नागाचें वसतिस्थान असें एक सर्व पापनाशक वितस्ता ह्मणून तीर्थ आहे ९०. त्या ठिकाणीं स्नान केल्यानें पुरुषाला खरोखर वाजपेय क्रतूचें फल प्राप्त होतें आणि सर्व पाप नाहींसें होऊन चित्त शुद्धि झाल्यानें शेवटीं त्याला मोक्षही प्राप्त होतो ९१. तदनंतर त्रैलोक्यविख्यात वडवातीर्थाला जावें आणि सायंकाळीं संध्यासमयीं यथाशक्ति स्नान करून ९२, हे राजा, अग्नीला यथाशक्ति चरु अर्पण करावा. त्या ठिकाणीं पितरांच्या उद्देशानें दान केलें असतां तें अक्षय होतें असें ज्ञानी ह्मणतात ९३. ऋषि, पितर, देव, गंधर्व आणि अप्सरा ह्यांचे समुदाय, गुह्यक, किन्नर, यक्ष, सिद्ध, विद्याधर, मानव ९४, राक्षस, दैत्य, रुद्र आणि, हे राजा, ब्रह्मा ह्यांनीं जितेंद्रिय राहून सहस्रवर्षेपर्यंत उत्कृष्ट प्रकारची दीक्षा घेतली ९५ आणि विष्णूला प्रसन्न करून घेण्याकरितां चरु सिद्ध करून सात सात ऋचांनीं त्यांनीं केशवाचें स्तवन केलें ९६. तेव्हां, हे भूपते, केशव संतुष्ट झाला आणि आठ

तत्रैवान्तर्दधे देवो विद्युदभ्रेषु वै यथा।नाम्ना सप्तचरुं तेन ख्यातं लोकेषु भारत ९८ गवां शतसहस्रेण राजसूयशतेन च। अश्वमेधसहस्रेण श्रेयान्सप्तार्चिषे चरुः ९९ ततो निवृत्तो राजेन्द्र रुद्रं पदमथाविशेत्। अर्चयित्वा महादेवमश्वमेधफलं लभेत् १०० मणिमन्तं समासाद्य ब्रह्मचारी समाहितः। एकरात्रोषितो राजन्नग्निष्टोमफलं लभेत् १ अथ गच्छेत राजेन्द्र देविकां लोकविश्रुताम्। प्रसूतिर्यत्र विप्राणां श्रूयते भरतर्षभ २ त्रिशूलपाणेः स्थानं च त्रिषु लोकेषु विश्रुतम्। देविकायां नरः स्नात्वा समभ्यर्च्य महेश्वरम् ३ यथाशक्ति चरुं तत्र निवेद्य भरतर्षभ। सर्वकामसमृद्धस्य यज्ञस्य लभते फलम् ४ कामाख्यं तत्र रुद्रस्य तीर्थं देवनिषेवितम्। तत्र स्नात्वा नरः क्षिप्रं सिद्धिं प्राप्नोति भारत ५ यजनं याजनं चैव तथैव ब्रह्मवालुकम्। पुष्पाम्भश्च उपस्पृश्य न शोचेन्मरणं गतः ६ अर्धयोजनविस्तारा पञ्चयोजनमायता। एतावती देविका तु पुण्या देवर्षिसेविता ७ ततो गच्छेत धर्मज्ञ दीर्घसत्रं यथाक्रमम्।

प्रकारचें ऐश्वर्य त्यांना देऊन त्यांचे मनोरथ परिपूर्ण करून ९७ मेघांमध्यें गुप्त होणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें त्या ठिकाणींच तो देव गुप्त झाला. हे भरतवंशज, त्याच्या योगानें त्रैलोक्यामध्यें तें स्थान सप्तचरु ह्मणून प्रसिद्ध झालें ९८. लक्षगोप्रदानें, शंभर राजसूय आणि हजार अश्वमेध करण्यापेक्षां त्या ठिकाणीं अग्नीला चरु देणें अधिक पुण्यकारक होय ९९. असो. नंतर, हे राजेंद्रा, तेथून परतून रुद्रपदाला जावें आणि महादेवाचें अर्चन करावें ह्मणजे अश्वमेधयागाचें फल प्राप्त होतें १००. मणिमानतीर्थाला जाऊन ब्रह्मचारी व स्वस्थ चित्त राहून एक रात्र वास्तव्य केलें असतां, हे राजा, अग्निष्टोमाचें फल प्राप्त होतें १. हे भरतवंशजश्रेष्ठ राजाधिराज, विप्रांची उत्पत्ति ज्या ठिकाणीं श्रुत आहे त्या देविका तीर्थाला नंतर जावें २. शूलपाणि शंकराचें तें त्रैलोक्यप्रसिद्ध स्थान होय. देविकेमध्यें स्नान करून व महेश्वराचें पूजन करून ३, हे भरतवंशजश्रेष्ठा, त्या ठिकाणीं यथा शक्ति चरु अर्पण केला असतां सर्व कामप्रद अशा यज्ञाचें फल प्राप्त होतें ४. त्या ठिकाणीं देवांनीं सेवित असें रुद्राचें कामनामक तीर्थ आहे. त्या तीर्थामध्यें स्नान केलें असतां, हे भरतवंशज भीष्मा, पुरुषाला सत्वर सिद्धि प्राप्त होते ५. यजन, याजन, ब्रह्मवालुक आणि पुष्पाभ ह्या तीर्थांचे ठिकाणीं स्नान केलें असतां पुरुष कृतकृत्य होत असल्यामुळें मरणानंतर त्याच्या शोकाचें कारण राहत नाहीं ६. अर्धयोजन रुंद असून पांच योजनें लांब इतकी देविका पुण्यप्रद आहे आणि देवर्षींचें येथपर्यंत वास्तव्य आहे ७. तदनंतर, हे धर्मज्ञ, अनुक्रमानें दीर्घसत्र तीर्थाला

तत्र ब्रह्मादयो देवाः सिद्धाश्च परमर्षयः ॥ दीर्घसत्रमुपासन्ते दीक्षिता
नियतव्रताः ८ गमनादेव राजेन्द्र दीर्घसत्रमरिन्दम । राजसूयाश्वमेधाभ्यां
फलं प्राप्नोति भारत ९ ततो विनशनं गच्छेन्नियतो नियताशनः ।
गच्छत्यन्तर्हिता यत्र मेरुपृष्ठे सरस्वती ११० चमसेथ शिवोद्भेदे नागोद्भेदे
च दृश्यते । स्नात्वा तु चमसोद्भेदे अग्निष्टोमफलं लभेत् ११ शिवोद्भेदे
नरः स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् । नागोद्भेदे नरः स्नात्वा नागलोकम-
वाप्नुयात् १२ शशयानं च राजेन्द्र तीर्थमासाद्य दुर्लभम् । शशरूपप्रति-
च्छन्नाः पुष्करा यत्र भारत १३ सरस्वत्यां महाराज अनुसंवत्सरं च ते ।
दृश्यन्ते भरतश्रेष्ठ वृत्तां वै कार्तिकीं सदा १४ तत्र स्नात्वा नरव्याघ्र
द्योतते शशिवत्सदा । गोसहस्रफलं चैव प्राप्नुयाद्भरतर्षभ १५ कुमारको-
टीमासाद्य नियतः कुरुनन्दन । तत्राभिषेकं कुर्वीत पितृदेवार्चने रतः १६
गवामयुतमाप्नोति कुलं चैव समुद्धरेत् । ततो गच्छेत धर्मज्ञ रुद्रकोटिं
समाहितः १७ पुरा यत्र महाराज मुनिकोटिः समागता । हर्षेण महता-

जावें. त्या ठिकाणीं ब्रह्मादि देव, सिद्ध आणि महर्षि दीक्षा घेऊन व स्वीकारिलेलें व्रत
नियमितपणें चालवून दीर्घसत्र करीत असतात ८. ह्यास्तव, हे भरतवंशज राजाधिराज शत्रु-
दमना, दीर्घसत्राला जाण्यानेंच राजसूय आणि अश्वमेध ह्या क्रतूंनीं मिळणारें फल
पुरुषाला प्राप्त होतें ९. तदनंतर नियमित आहार करून विनशन तीर्थाला जावें. त्या
ठिकाणीं ह्मणजे मेरु पर्वताच्या पृष्ठभागीं सरस्वती नदी गुप्त जात असते ११० आणि
चमस, शिवोद्भेद व नागोद्भेद ह्या तीर्थांचे ठिकाणीं ती दृश्य असते. चमसोद्भेदामध्यें
स्नान केलें असतां अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें ११. शिवोद्भेदामध्यें स्नान केल्यानें
सहस्र गोप्रदानांचें फल येतें व नागोद्भेदामध्यें स्नान करून पुरुषाला नागलोकाची
प्राप्ति होते १२. हे राजाधिराज भरतवंशज भीष्मा, तदनंतर शशयानसंज्ञक दुर्लभ
तीर्थाला जावें. त्या ठिकाणीं कमलें सशांच्या रूपानें गुप्त झालेलीं असतात १३
आणि, हे भरतवंशजश्रेष्ठ महाराजा, कार्तिकी पौर्णिमा आली ह्मणजे प्रतिवर्षीं नेहमीं
तीं कमलें सरस्वती नदीमध्यें दृष्टोत्पत्तीस येतात १४. हे भरतवंशजश्रेष्ठ नरोत्तमा,
त्या ठिकाणीं स्नान केलें असतां पुरुष चंद्राप्रमाणें नेहमीं झळकूं लागतो आणि सहस्र
गोप्रदानांचें फल त्याला प्राप्त होतें १५. हे कुरुनंदना, कुमारकोटि तीर्थाला
जाऊन व जितेंद्रिय राहून त्या ठिकाणीं स्नान करावें आणि पितर व देव
ह्यांच्या पूजनाविषयीं तत्पर असावें १६; ह्मणजे दहाहजार गोप्रदानांचें फल
प्राप्त होऊन कुलाचा उद्धार होतो. तदनंतर, हे धर्मवेत्त्या, स्वस्थांतःकरणपूर्वक

विष्टा रुद्रदर्शनकाङ्क्षया १८ अहं पूर्वमहं पूर्वं द्रक्ष्यामि वृषभध्वजम् । एवं संप्रस्थिता राजन्नृषयः किल भारत १९ ततो योगीश्वरेणापि योगमास्थाय भूपते । तेषां मन्युप्रणाशार्थमृषीणां भावितात्मनाम् १२० सृष्टा कोटीति रुद्राणामृषीणामग्रतः स्थिता । मया पूर्वतरं दृष्ट इति ते मेनिरे पृथक् २१ तेषां तुष्टो महादेवो मुनीनां भावितात्मनाम् । भक्त्या परमया राजन्वरं तेषां प्रदिष्टवान् २२ अद्यप्रभृति युष्माकं धर्मवृद्धिर्भविष्यति २३ तत्र स्नात्वा नरव्याघ्र रुद्रकोट्यां नरः शुचिः । अश्वमेधमवाप्नोति कुलं चैव समुद्धरेत् २४ ततो गच्छेत राजेन्द्र संगमं लोकविश्रुतम् । सरस्वत्या महापुण्यं केशवं समुपासते २५ यत्र ब्रह्मादयो देवा ऋषयश्च तपोधनाः । अभिगच्छन्ति राजेन्द्र चैत्रशुक्लचतुर्दशीम् २६ तत्र स्नात्वा नरव्याघ्र विन्देद्बहु सुवर्णकम् । सर्वपापविशुद्धात्मा ब्रह्मलोकं च गच्छति २७ ऋषीणां यत्र सत्राणि समाप्तानि नराधिप । तत्रावसानमासाद्य गोसहस्रफलं लभेत् १२८ [३२९१] इति श्रीमहाभारते० वैयासिक्या मारण्यके पर्वणि

रुद्रकोटि तीर्थाला जावें १७. त्या ठिकाणीं, हे महाराज, रुद्रदर्शन घेण्याच्या उद्देशानें एक कोटि मुनि पूर्वी मोठ्या आनंदानें आले होते १८. हे भरतवंशज राजा, " मी पूर्वी वृषभध्वजाचें दर्शन घेणार ", " मी पूर्वी वृषभध्वजाचें दर्शन घेणार " अशा चढाओढीनें ऋषि त्या तीर्थाकडे निघाले असें इतिहासप्रसिद्ध आहे १९. तेव्हां, हे भूपते, त्या जितेंद्रिय ऋषींची चुरस नाहींशी व्हावी एतदर्थ योगीश्वर शंकरांनेंही योगाचें अवलंबन करून १२० ऋषींचे समोर एक कोटि रुद्र उत्पन्न केले व असें झालें तेव्हां " मला सर्वांच्या आधीं रुद्रदर्शन झालें " असें त्या कोटि मुनींपैकीं प्रत्येकजणानें मानिलें २१. तेव्हां त्या जितेंद्रिय मुनींवर महादेव संतुष्ट झाले आणि, हे राजा, " आजपासून तुमच्या पुण्याची अभिवृद्धि होईल " ह्मणून मोठ्या भक्तीनें त्यांनीं त्यांना वर दिला २२.२३. हे पुरुषश्रेष्ठा, त्या ठिकाणीं स्नान केलें असतां पुरुष शुद्ध होतो आणि अश्वमेधयागाचें फल त्याला प्राप्त होऊन त्याच्या कुलाचाही उद्धार होतो २४. तदनंतर, हे राजाधिराज, जगत्प्रसिद्ध संगमतीर्थाला जावें. त्या सरस्वती नदीच्या महापुण्यप्रद तीर्थाचे ठिकाणीं केशवाचें पूजन करीत असतात २५. हे राजाधिराज, ब्रह्मादिदेव आणि तपोधन ऋषि हे चैत्रशुक्लचतुर्दशीला तेथें जात असतात २६. हे पुरुषश्रेष्ठा, त्या ठिकाणीं स्नान केलें असतां विपुल सुवर्ण प्राप्त होतें आणि सर्व पातकांपासून चित्त शुद्ध होऊन ब्रह्मलोकाची प्राप्ति होते २७. हे राजा, त्या ठिकाणीं ऋषींनीं सत्रें समाप्त केलेलीं आहेत. ह्यामुळें त्या ठिकाणीं अनुष्ठानाची समाप्ति केली असतां

तीर्थयात्रापर्वणि पुलस्त्यतीर्थयात्रायां द्व्यशीतितमोध्यायः ॥ ८२ ॥

पुलस्त्य उवाच ॥ ततो गच्छेत राजेन्द्र कुरुक्षेत्रमभिष्टुतम् । पापेभ्यो
यत्र मुच्यन्ते दर्शनात्सर्वजन्तवः १ कुरुक्षेत्रं गमिष्यामि कुरुक्षेत्रे वसा-
म्यहम् । य एवं सततं ब्रूयात्सर्वपापैः प्रमुच्यते २ पांसवोपि कुरुक्षेत्रे
वायुना समुदीरिताः । अपि दुष्कृतकर्माणं नयन्ति परमां गतिम् ३ दक्षि-
णेन सरस्वत्या दृषद्वत्युत्तरेण च । ये वसन्ति कुरुक्षेत्रे ते वसन्ति त्रिवि-
ष्टपे ४ तत्र मासं वसेद्धीरः सरस्वत्यां युधिष्ठिर । यत्र ब्रह्मादयो देवा
ऋषयः सिद्धचारणाः ५ गन्धर्वाप्सरसो यक्षाः पन्नगाश्च महीपते । ब्रह्मक्षेत्रं
महापुण्यमभिगच्छन्ति भारत ६ मनसाप्यभिकामस्य कुरुक्षेत्रं युधिष्ठिर ।
पापानि विप्रणश्यन्ति ब्रह्मलोकं च गच्छति ७ गत्वा हि श्रद्धया युक्तः
कुरुक्षेत्रं कुरूद्वह । फलं प्राप्नोति च तदा राजसूयाश्वमेधयोः ८ ततो मच-
क्रुकं नाम द्वारपालं महाबलम् । यक्षं समभिवाद्यैव गोसहस्रफलं लभेत् ९
ततो गच्छेत धर्मज्ञ विष्णोः स्थानमनुत्तमम् । सततं नाम राजेन्द्र यत्र

सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें १२८. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं पुलस्त्यतीर्थयात्रेविषयीं ब्यांयशीवा अध्याय समाप्त झाला ॥ ८२ ॥

पुलस्त्य ह्मणतातः—नंतर, हे राजेंद्रा, लोक ज्याची प्रशंसा करीत असतात अशा कुरुक्षेत्राला जावें. कारण, त्या क्षेत्राचें दर्शन झालें असतां कोणताही प्राणी पापांपासून मुक्त होतो १. " कुरुक्षेत्राला जाईन आणि कुरुक्षेत्रामध्यें वास्तव्य करीन" असें जो पुरुष नेहमीं ह्मणत असतो तो सर्व पातकांपासून मुक्त होतो २. वायूनें उडालेले कुरुक्षेत्रांतील रजःकण देखील दुष्कर्म करणाऱ्या पुरुषाला मोक्षाला नेतात ३. सरस्वतीच्या दक्षिणेस आणि दृषद्वतीच्या उत्तरेस जे कुरुक्षेत्रामध्यें वास्तव्य करितात ते स्वर्गामध्यें रहातात (असें समजावें) ४. हे युधिष्ठिरा (ह्मणजे युद्धामध्यें अचल रहाणाऱ्या) भीष्मा, ज्ञानी पुरुषानें सरस्वतीचे तीरीं त्या ठिकाणीं एक महिनाभर तरी वास्तव्य करावें. हे भरतकुलोत्पन्न भूपते, ब्रह्मादिदेव, ऋषि, सिद्ध व चारण, गंधर्व आणि अप्सरा व यक्ष आणि पन्नग त्या महापुण्यदायक ब्रह्मक्षेत्राला जात असतात ५,६. हे युधिष्ठिरा, कुरुक्षेत्राला जाण्याचें मनांत आणणाऱ्याचींही सर्व पातकें नाहींशीं होतात व तो ब्रह्मलोकीं गमन करितो ७. हे कुरुवंशजश्रेष्ठ, श्रद्धावान् पुरुष कुरुक्षेत्रामध्यें गेला असतां राजसूय आणि अश्वमेध ह्या क्रतूंचें फल त्याला प्राप्त होतें ८. कुरुक्षेत्राला जाऊन मचक्रुकनामक जो महाबलाढ्य द्वारपाल यक्ष त्याला अभिवंदन केलें असतां सहस्रगोप्रदानांचें फल प्राप्त होतें ९. तदनंतर, हे धर्मज्ञ राजेंद्रा, विष्णूचें

संनिहितो हरिः १० तत्र स्नात्वा च नत्वा च त्रिलोकप्रभवं हरिम् ।
अश्वमेधमवाप्नोति विष्णुलोकं च गच्छति ११ ततः पारिप्लवं गच्छेत्तीर्थं
त्रैलोक्यविश्रुतम् । अग्निष्टोमातिरात्राभ्यां फलं प्राप्नोति भारत १२ पृथि-
वीतीर्थमासाद्य गोसहस्रफलं लभेत् । ततः शालूकिनीं गत्वा तीर्थसेवी
नराधिप १३ दशाश्वमेधे स्नात्वा च तदेव फलमाप्नुयात् । सर्पदेवीं समा-
साद्य नागानां तीर्थमुत्तमम् १४ अग्निष्टोममवाप्नोति नागलोकं च विन्दति ।
ततो गच्छेत धर्मज्ञ द्वारपालं तरन्तुकम् १५ तत्रोष्य रजनीमेकां गोस-
हस्रफलं लभेत् । ततः पञ्चनदं गत्वा नियतो नियताशनः १६ कोटितीर्थ-
र्थमुपस्पृश्य हयमेधफलं लभेत् । आश्विनोस्तीर्थमासाद्य रूपवानभिजा-
यते १७ ततो गच्छेत धर्मज्ञ वाराहं तीर्थमुत्तमम् । विष्णुर्वाराहरूपेण
पूर्वं यत्र स्थिताभवत् १८ तत्र स्नात्वा नरश्रेष्ठ अग्निष्टोमफलं लभेत् ।
ततो जयन्त्यां राजेन्द्र सोमतीर्थं समाविशेत् १९ स्नात्वा फलमवाप्नोति
राजसूयस्य मानवः । एकहंसे नरः स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् २० कृत-

---

ें उत्कृष्ट स्थान त्याची यात्रा करावी. त्या ठिकाणीं श्रीहरीचें वास्तव्य सतत असतें १० व तेथें स्नान करून त्रैलोक्योत्पादक श्रीहरीला प्रणाम केला असतां पुरुषाला अश्वमेध यागाचें फल मिळून विष्णुलोकाची प्राप्ति होते ११. तदनंतर त्रैलोक्यामध्यें विख्यात असलेल्या पारिप्लव तीर्थाला जावें; ह्मणजे, हे भरतकुलोत्पन्ना, अग्निष्टोम आणि अतिरात्र ह्या क्रतूंनीं मिळणारें फल प्राप्त होतें १२ व पृथ्वीतीर्थाची यात्रा केली असतां सहस्रगोप्रदानांचें फल प्राप्त होतें. तदनंतर तीर्थाटण करणाऱ्या पुरुषानें शालूकिनीला जाऊन १३ दशाश्वमेधीं स्नान केलें असतां तेंच फल प्राप्त होतें. सर्पदेवीनामक नागांच्या उत्तम तीर्थाला गेल्यानें १४ अग्निष्टोम यागाचें फल आणि नागलोक ह्यांची प्राप्ति होते. तदनंतर, हे धर्मज्ञ, तरंतुक नामक द्वारपालाला जावें १५ आणि तेथें एक रात्र तरी वास्तव्य करावें; ह्मणजे सहस्रगोप्रदानांचें फल प्राप्त होतें. तदनंतर जितेंद्रिय व मिताहारी पुरुषानें पंचनदाला जाऊन १६ कोटितीर्थामध्यें स्नान करावें; ह्मणजे अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें आणि अश्विनीकुमार तीर्थाची यात्रा केली असतां पुरुष रूपवान् होतो १७. तदनंतर, हे धर्मज्ञ, वाराहनामक उत्कृष्ट तीर्थाला जावें . त्या ठिकाणीं पूर्वीं वराहरूपानें श्रीविष्णूचें वास्तव्य होतें १८. त्या ठिकाणीं स्नान केलें असतां, हे पुरुषश्रेष्ठ भीष्मा, अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें. तदनंतर, हे राजाधिराज, जयंतीला जाऊन सोमतीर्थामध्यें शिरावें १९; ह्मणजे तेथें स्नान केलें असतां पुरुषाला राजसूय यागाचें फल प्राप्त होतें व एकहंस तीर्थावर स्नान केल्यानें

शौचं समासाद्य तीर्थसेवी नराधिप। पुण्डरीकमवाप्नोति कृतशौचो भवेच्च
सः २१ ततो मुञ्जवटं नाम स्थाणोः स्थानं महात्मनः । उपोष्य रजनी-
मेकां गाणपत्यमवाप्नुयात् २२ तत्रैव च महाराज यक्षिणीं लोकविश्रुताम् ।
स्नात्वाभिगम्य राजेन्द्र सर्वान्कामानवाप्नुयात् २३ कुरुक्षेत्रस्य तद्द्वारं विश्रुतं
भरतर्षभ । प्रदक्षिणमुपावृत्य तीर्थसेवी समाहितः २४ संमितं पुष्कराणां
च स्नात्वार्च्य पितृदेवताः । जामदग्न्येन रामेण कृतं तत्सुमहात्मना २५
कृतकृत्यो भवेद्राजन्नश्वमेधं च विन्दति । ततो रामह्रदान्गच्छेत्तीर्थसेवी
समाहितः २६ तत्र रामेण राजेन्द्र तरसा दीप्ततेजसा । क्षत्रमुत्साद्य वीरेण
ह्रदाः पञ्च निवेशिताः २७ पूरयित्वा नरव्याघ्र रुधिरेणेति विश्रुतम् । पित-
रस्तर्पिताः सर्वे तथैव प्रपितामहाः २८ ततस्ते पितरः प्रीता राममूचुर्नराधिप ।
पितर ऊचुः ॥ राम राम महाभाग प्रीताः स्म तव भार्गव २९ अनया
पितृभक्त्या च विक्रमेण च ते विभो । वरं वृणीष्व भद्रं ते किमिच्छसि
महाद्युते ३० एवमुक्तः स राजेन्द्र रामः प्रहरतां वरः । अब्रवीत्प्राञ्जलि-

---

पुरुषाला सहस्रगोप्रदानांचें फल प्राप्त होतें २०. हे राजा, तीर्थाटण करीत हिंडणारा पुरुष कृतशौचनामक तीर्थाला गेला असतां पुंडरीकयागाचें फल त्याला प्राप्त होऊन तो शुद्ध होतो २१. तदनंतर मुंजवटनामक महात्म्या शंकराच्या स्थानाप्रत जाऊन एक रात्र वास्तव्य केलें असतां गाणपत्य प्राप्त होतें २२. हे महाराजा नृपश्रेष्ठा, त्या ठिकाणीं स्नान करून तेथेंच असलेल्या जगत्प्रसिद्ध यक्षिणीचें दर्शन घेतलें असतां सर्व मनोरथ परिपूर्ण होतात २३. हे भरतवंशजश्रेष्ठा, तें कुरुक्षेत्राचें द्वार ह्मणून प्रसिद्ध आहे. तेथून प्रदाक्षिणिक वळावें आणि स्वस्थांतःकरणपूर्वक तीर्थयात्रा करावी २४. महात्म्या जमदग्निपुत्र परशुरामानें पुष्करतुल्य केलेल्या त्या तीर्थामध्यें स्नान करून पितर आणि देव ह्यांचें पूजन केलें असतां २५, हे राजा, पुरुषाला अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें. तदनंतर तीर्थाटण करणाऱ्या पुरुषानें अंतःकरण स्वस्थ करून परशुराम-सरोवराप्रत जावें २६. हे राजेंद्रा, उज्ज्वल तेजानें युक्त असलेल्या वीर परशुरामानें आपल्या बलानें क्षत्रियजाति उच्छिन्न करून पांच सरोवरें त्यांच्या रक्तानें भरून ठेविलीं आणि, हे पुरुषश्रेष्ठ, आपल्या सर्व पितरांचें व प्रपितामहांचेंही त्यानें तर्पण केलें असें प्रसिद्ध आहे २७, २८. असें झाल्यावर, हे राजा, ते पितर प्रसन्न होऊन रामाला ह्मणाले "हे रामा, हे महाभाग्यवान् भार्गवरामा, ह्या तुझ्या पितृभक्तीनें आणि पराक्रमानें, हे प्रभो, आह्मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहों. हे महातेजस्वी रामा, तुझें कल्याण असो. तुला काय इच्छा असेल तो वर माग" २९, ३०. हे राजेंद्रा, ह्याप्रमाणें पितरांनीं सांगितलें असतां

वाक्यं पितॄन्स गगने स्थितान् ३१ भवन्तो यदि मे प्रीता यद्यनुग्राह्यता मयि । पितृप्रसादमिच्छेयं तपआप्यायनं पुनः ३२ यच्च रोषाभिभूतेन क्षत्रमुत्सादितं मया । ततश्च पापान्मुच्येयं युष्माकं तेजसाप्यहम् ३३ ह्रदाश्च तीर्थभूता मे भवेयुर्भुवि विश्रुताः । एतच्छ्रुत्वा शुभं वाक्यं रामस्य पितरस्तदा ३४ प्रत्यूचुः परमप्रीता रामं हर्षसमन्विताः । तपस्ते वर्धतां भूयः पितृभक्त्या विशेषतः ३५ यच्च रोषाभिभूतेन क्षत्रमुत्सादितं त्वया । ततश्च पापान्मुक्तस्त्वं पतितास्ते स्वकर्मभिः ३६ ह्रदाश्च तव तीर्थत्वं गमिष्यन्ति न संशयः । ह्रदेषु तेषु यः स्नात्वा पितॄन्संतर्पयिष्यति ३७ पितरस्तस्य वै प्रीता दास्यन्ति भुवि दुर्लभम् । ईप्सितं च मनः कामं सर्वलोकं च शाश्वतम् ३८ एवं दत्त्वा वरान्राजन्रामस्य पितरस्तदा । आमन्त्र्य भार्गवं प्रीत्या तत्रैवान्तर्हितास्ततः ३९ एवं रामह्रदाः पुण्या भार्गवस्य महात्मनः । स्नात्वा ह्रदेषु रामस्य ब्रह्मचारी शुभव्रतः ४० राममभ्यर्च्य राजेन्द्र लभेद्बहु सुवर्णकम् । वंशमूलकमासाद्य तीर्थसेवी कुरु-

---

योद्ध्यांमध्यें श्रेष्ठ अशा त्या परशुरामानें हात जोडून त्या आकाशस्थ पितरांना ह्मटलें ३१ "आपण जर माझ्यावर प्रसन्न झाला असाल आणि माझ्यावर अनुग्रह करण्याची जर आपली इच्छा असेल तर क्षत्रियांच्या वधानें कमी झालेलें तप भरून यावें हाच पितरांचा प्रसाद मी इच्छीत आहें ३२. क्रोधाच्या तावडींत सांपडल्यामुळे माझ्या हातून जी क्षत्रियजाति उच्छिन्न झाली त्या पातकापासून मी तुमच्या तेजानें मुक्त व्हावें ३३ आणि माझीं हीं सरोवरें पृथ्वीमध्यें विख्यात अशीं तीर्थें व्हावींत". हें परशुरामाचें शुभ भाषण श्रवण केल्यावर पितर ३४ अतिशय प्रसन्न झाले आणि हर्षयुक्त होऊन त्याला ह्मणाले " विशेषेंकरून पितृभक्तीच्या योगानें तुझ्या तपाची पुनरपि अभिवृद्धि होवो ३५. क्रोधाच्या तावडीत सांपडून तूं जी क्षत्रियजाति उच्छिन्न केलीस त्या पातकापासून तूं मुक्त झाला आहेस. कारण, ते क्षत्रिय आपल्या कर्मांनींच नाश पावले आहेत ३६. तुझीं सरोवरें निःसंशय तीर्थें होतील. त्या सरोवरांमध्यें स्नान करून जो पितरांचें तर्पण करील ३७ त्याला पितर प्रसन्न होऊन भूलोकीं दुर्लभ असलेलाही त्याचा इष्ट मनोरथ परिपूर्ण करितील आणि अक्षय स्वर्गलोक त्याला प्राप्त करून देतील " ३८. हे राजा, ह्याप्रमाणें वर देऊन आणि त्या भार्गवरामाला प्रेमपूर्वक विचारून परशुरामाचे पितर तेथेंच अंतर्धान पावले ३९. ह्याप्रमाणें महात्म्या भार्गवरामाचीं सरोवरें पुण्यदायक झालीं. त्या परशुराम सरोवराचे ठिकाणीं ब्रह्मचारी व सदाचरणसंपन्न पुरुषानें स्नान करून ४० परशुरामाचें पूजन केलें असतां, हे नृपश्रेष्ठ भीष्मा, त्याला विपुल सुवर्ण प्राप्त होतें. हे कुरुवंशजश्रेष्ठ राजा, तीर्थवासी पुरुषानें वंशमूलक तीर्थाला जाऊन त्यामध्यें

द्वह ४१ स्ववंशमुद्धरेद्राजन्स्नात्वा वै वंशमूलके। कायशोधनमासाद्य तीर्थं भरतसत्तम ४२ शरीरशुद्धिः स्नानस्य तस्मिंस्तीर्थे न संशयः। शुद्धदेहश्च संयाति शुभाँल्लोकाननुत्तमान् ४३ ततो गच्छेत धर्मज्ञ तीर्थं त्रैलोक्यविश्रुतम्। लोका यत्रोद्धृताः पूर्वं विष्णुना प्रभविष्णुना ४४ लोकोद्धारं समासाद्य तीर्थं त्रैलोक्यपूजितम्। स्नात्वा तीर्थवरे राजँल्लोकानुद्धरते स्वकान् ४५ श्रीतीर्थं च समासाद्य स्नात्वा नियतमानसः। अर्चयित्वा पितॄन्देवान्विन्दते श्रियमुत्तमाम् ४६ कपिलातीर्थमासाद्य ब्रह्मचारी समाहितः। तत्र स्नात्वार्चयित्वा च पितॄन्स्वान्दैवतान्यपि ४७ कपिलानां सहस्रस्य फलं विन्दति मानवः। सूर्यतीर्थं समासाद्य स्नात्वा नियतमानसः ४८ अर्चयित्वा पितॄन्देवानुपवासपरायणः। अग्निष्टोममवाप्नोति सूर्यलोकं च गच्छति ४९ गवां भवनमासाद्य तीर्थसेवी यथाक्रमम्। तत्राभिषेकं कुर्वाणो गोसहस्रफलं लभेत् ५० शङ्खिनीतीर्थमासाद्य तीर्थसेवी कुरूद्वह। देव्यास्तीर्थे नरः स्नात्वा लभते रूपमुत्तमम् ५१ ततो गच्छेत राजेन्द्र द्वारपालमरन्तुकम्। यच्च तीर्थं सरस्वत्यां यक्षेन्द्रस्य महात्मनः ५२

स्नान केलें असतां त्याच्या वंशाचा उद्धार होतो. हे भरतवंशजश्रेष्ठ, कायशोधननामक तीर्थाला जाऊन ४१,४२ त्या तीर्थामध्यें स्नान केलें असतां निःसंशयशरीर शुद्धि होते आणि ह्याप्रमाणें देहशुद्धि झाल्यावर पुरुषाला अनुपम असे शुभ लोक प्राप्त होतात ४३. हे धर्मज्ञ भीष्मा, तदनंतर त्रैलोक्यप्रसिद्ध लोकोद्धारनामक तीर्थाला जावें. त्या ठिकाणीं सर्वव्यापी विष्णूनें पूर्वी लोकांचा उद्धार केलेला आहे ४४. हे राजा, त्या त्रैलोक्यमान्य लोकोद्धार तीर्थाला जाऊन त्या श्रेष्ठ तीर्थामध्यें स्नान केलें असतां स्वतःच्या पूर्वजांचा उद्धार होतो ४५. श्रीतीर्थाला जाऊन स्नान केल्यावर निर्मल अंतःकरणानें पितरांचें व देवांचें पूजन केलें असतां उत्कृष्ट श्री प्राप्त होते ४६. कपिलातीर्थाला जाऊन ब्रह्मचारी व स्वस्थ चित्त असावें आणि तेथें स्नान करून पितरांचें व आपल्या देवांचें पूजन करावें ४७; ह्मणजे पुरुषाला सहस्र कपिला दिल्याचें फल प्राप्त होतें. सूर्यतीर्थाला जाऊन स्नान करावें ४८आणि उपवास करून शुद्ध मनानें पितरांचें व देवांचें पूजन करावें; ह्मणजे अग्निष्टोमयागाचें फल प्राप्त होऊन पुरुष सूर्यलोकीं जातो ४९. तीर्थवासी पुरुषानें अनुक्रमें गोभवनतीर्थाला जाऊन स्नान केले असतां सहस्र गोप्रदानांचें फल त्याला प्राप्त होतें ५०. हे कुरुवंशजश्रेष्ठ, शंखिनी तीर्थाला जाऊन त्या देवीच्या तीर्थामध्यें स्नान केलें असतां पुरुषाला उत्कृष्ट रूप प्राप्त होतें ५१. तदनंतर, हे राजाधिराज, महात्म्या कुबेराचें, सरस्वतीचे

तत्र स्नात्वा नरो राजन्नग्निष्टोमफलं लभेत्। ततो गच्छेत राजेन्द्र ब्रह्मावर्तं नरोत्तमः ५३ ब्रह्मावर्ते नरः स्नात्वा ब्रह्मलोकमवाप्नुयात्। ततो गच्छेत राजेन्द्र सुतीर्थकमनुत्तमम् ५४ तत्र संनिहिता नित्यं पितरो दैवतैः सह। तत्राभिषेकं कुर्वीत पितृदेवार्चने रतः ५५ अश्वमेधमवाप्नोति पितृलोकं च गच्छति। ततोम्बुमत्यां धर्मज्ञ सुतीर्थकमनुत्तमम् ५६ काशीश्वरस्य तीर्थे च स्नात्वा भरतसत्तम। सर्वव्याधिविनिर्मुक्तो ब्रह्मलोके महीयते ५७ मातृतीर्थं च तत्रैव यत्र स्नातस्य भारत। प्रजा विवर्धते राजन्ननन्तां श्रियमश्नुते ५८ ततः सीतवनं गच्छेन्नियतो नियताशनः। तीर्थं तत्र महाराज महदन्यत्र दुर्लभम् ५९ पुनाति दर्शनादेकं स्नानादेकं नराधिप। केशानभ्युक्ष्य वै तस्मिन्पूतो भवति भारत ६० तीर्थं तत्र महाराज श्वाविल्लोमापहं स्मृतम्। यत्र विप्रा नरव्याघ्र विद्वांसस्तीर्थतत्पराः ६१ प्रीतिं गच्छन्ति परमां स्नात्वा भरतसत्तम। श्वाविल्लोमापनयने तीर्थे भरतसत्तम ६२ प्राणायामैर्निर्हरन्ति स्वलोमानि द्विजोत्तमाः।

तीरीं, अरंतुक ह्मणून जें द्वारपाल तीर्थ आहे तेथें जाऊन ५२ स्नान केलें असतां, हे राजा, पुरुषाला अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें. तदनंतर, हे राजाधिराज, उत्तम पुरुषानें ब्रह्मावर्ताला जावें ५३. कारण, ब्रह्मावर्तामध्यें स्नान केलें असतां पुरुषाला ब्रह्मलोकप्राप्ति होते. तदनंतर, हे राजाधिराज, अनुपम अशा सुतीर्थकनामक तीर्थाला जावें ५४. त्या ठिकाणीं देवांसहवर्तमान पितरांचें नेहमीं वास्तव्य असतें. तेथें स्नान करून देव आणि पितर ह्यांच्या पूजनामध्यें तत्पर राहिलें असतां ५५ अश्वमेधयागाचें फल व पितृलोक ह्यांची प्राप्ति होते. तदनंतर, हे धर्मज्ञ भीष्मा, अंबुमती नदीचे तीरीं अनुपम अशा सुतीर्थकाला जावें ५६ आणि, हे भरतवंशजश्रेष्ठ त्या काशीश्वराच्या तीर्थामध्यें स्नान करावें, ह्मणजे पुरुष सर्व प्रकारच्या व्याधींपासून मुक्त होतो आणि ब्रह्मलोकीं त्याची मानमान्यता होते ५७. हे भरतवंशजा राजा, त्याच ठिकाणीं मातृतीर्थ आहे तेथें स्नान केलें असतां संतानाची वृद्धि होऊन पुरुषाला मोठी संपत्ति प्राप्त होते ५८. तदनंतर जितेंद्रिय आणि मिताहारी पुरुषानें सीतवनाला जावें. कारण, हे महाराज, दुसरीकडे दुर्लभ असें मोठें तीर्थ त्या ठिकाणीं आहे ५९. हे भरतवंशज भूपते, त्या सीतवनांतील एक तीर्थ दर्शनानें पवित्र करितें व एक तर स्नानानें पवित्र करितें, इतकेंच नव्हे परंतु, त्या तीर्थामध्यें केश बुचकळून काढिले असतांही पुरुष पवित्र होतो ६०. हे महाराज, त्याच वनामध्यें श्वाविल्लोमापह ह्मणून एक तीर्थ आहे. हे पुरुषश्रेष्ठा, तीर्थयात्रा करीत हिंडणाऱ्या विद्वान् ब्राह्मणांना ६१ त्या श्वाविल्लोमापह

पूतात्मानश्च राजेन्द्र प्रयान्ति परमां गतिम् ६३ दशाश्वमेधिकं चैव
तस्मिंस्तीर्थे महीपते । तत्र स्नात्वा नरव्याघ्र गच्छेत परमां गतिम् ६४
ततो गच्छेत राजेन्द्र मानुषं लोकविश्रुतम् । यत्र कृष्णमृगा राज-
न्व्याधेन शरपीडिताः ६५ विगाह्य तस्मिन्सरसि मानुषत्वमुपागताः ।
तस्मिंस्तीर्थे नरः स्नात्वा ब्रह्मचारी समाहितः ६६ सर्वपापविशुद्धात्मा
स्वर्गलोके महीयते । मानुषस्य तु पूर्वेण क्रोशमात्रे महीपते ६७ आपगा
नाम विख्याता नदी सिद्धनिषेविता । श्यामाकं भोजने तत्र यः प्रयच्छति
मानवः ६८ देवान्पितॄन्समुद्दिश्य तस्य धर्मफलं महत् । एकस्मिन्भोजिते
विप्रे कोटिर्भवति भोजिता ६९ तत्र स्नात्वार्चयित्वा च पितॄन्वै दैवतानि
च । उषित्वा रजनीमेकामग्निष्टोमफलं लभेत् ७० ततो गच्छेत राजेन्द्र
ब्रह्मणः स्थानमुत्तमम् । ब्रह्मोदुम्बरमित्येव प्रकाशं भुवि भारत ७१ तत्र
सप्तर्षिकुण्डेषु स्नातस्य नरपुङ्गव । केदारे चैव राजेन्द्र कपिलस्य महा-

---

तीर्थामध्यें स्नान केल्यानें पराकाष्ठेचा आनंद होतो आणि, हे भरतवंशजश्रेष्ठ भरतोत्तमा, ६२ द्विजश्रेष्ठ प्राणायामांच्या योगानें आपल्या क्लेशांचा त्या ठिकाणीं त्याग करितात आणि चित्तशुद्धि होऊन, हे राजाधिराज, मोक्षाला जातात ६३. हे भूपत, दशाश्वमेधिक ह्मणून एक त्या तीर्थामध्येंच तीर्थ आहे. तेथें स्नान केलें असतां, हे पुरुषश्रेष्ठा, मोक्ष प्राप्त होतो ६४. तदनंतर, हे राजाधिराज, जगत्प्रसिद्ध मानुषतीर्थाला जावें. हे राजा, त्या ठिकाणीं पूर्वी कृष्णवर्ण मृगांना व्याधानें आपल्या बाणांनीं जर्जर केलें असतां ६५ त्या सरोवरामध्यें गेल्यानें त्या मृगांना मानुषत्व प्राप्त झालें. त्या तीर्थामध्यें स्नान करून ब्रह्मचारी व स्वस्थचित्त असणारा पुरुष ६६ सर्व पापांपासून अंतःकरण शुद्ध झाल्यामळें स्वर्गलोकामध्यें मानमान्यता पावतो. हे भूपते, मानुषतीर्थाच्या पूर्व बाजूला एका कोसावर ६७ आपगा ह्मणून विख्यात नदी आहे. तेथें सिद्ध रहात असतात. त्या ठिकाणीं देव आणि पितर ह्यांच्या उद्देशानें जो पुरुष ब्राह्मणांना साव्याचें भोजन घालितो त्याला मोठें पुण्य लागतें. एका ब्राह्मणाला त्या ठिकाणीं भोजन दिलें असतां कोटि ब्राह्मणांना भोजन दिल्याचें फल प्राप्त होतें ६८, ६९. त्या ठिकाणीं स्नान करून आणि पितरांचें व देवतांचें पूजन करून एक रात्र वास्तव्य केलें असतां अग्निष्टोमयागाचें फल प्राप्त होतें ७०. तदनंतर, हे राजाधिराज भरतवंशजा, ब्रह्मोदुंबर ह्मणून पृथ्वीमध्यें प्रसिद्ध असलेलें जें अनुपम ब्रह्मदेवाचें स्थान आहे तेथें जावें ७१. हे पुरुषश्रेष्ठा राजेंद्रा, त्या ठिकाणीं सप्तर्षिकुंडामध्यें स्नान करून महात्म्या कपिलाच्या क्षेत्रामध्यें ७२ ब्रह्मदेवाचें दर्शन घेतलें असतां शुचिर्भूत आणि मनःसंयमी पुरुषाचें चित्त सर्व पापांपासून शुद्ध होतें

त्मनः ७२ ब्रह्माणमधिगत्वा च शुचिः प्रयतमानसः । सर्वपापविशुद्धात्मा ब्रह्मलोकं प्रपद्यते ७३ कपिष्ठलस्य केदारं समासाद्य सुदुर्लभम् । अन्तर्धानमवाप्नोति तपसा दग्धकिल्बिषः ७४ ततो गच्छेत राजेन्द्र सरकं लोकविश्रुतम् । कृष्णपक्षे चतुर्दश्यामभिगम्य वृषध्वजम् ७५ लभते सर्वकामान्हि स्वर्गलोकं च गच्छति । तिस्रः कोट्यस्तु तीर्थानां सरके कुरुनन्दन ७६ रुद्रकोट्यां तथा कूपे ह्रदेषु च महीपते । इलास्पदं च तत्रैव तीर्थं भरतसत्तम ७७ तत्र स्नात्वार्चयित्वा च दैवतानि पितॄनथ । न दुर्गतिमवाप्नोति वाजपेयं च विन्दति ७८ किंदाने च नरः स्नात्वा किंजप्ये च महीपते । अप्रमेयमवाप्नोति दानं जप्यं च भारत ७९ कलश्यां वार्युपस्पृश्य श्रद्दधानो जितेन्द्रियः । अग्निष्टोमस्य यज्ञस्य फलं प्राप्नोति मानवः ८० सरकस्य तु पूर्वेण नारदस्य महात्मनः । तीर्थं कुरुकुलश्रेष्ठ अम्बाजन्मेति विश्रुतम् ८१ तत्र तीर्थे नरः स्नात्वा प्राणानुत्सृज्य भारत । नारदेनाभ्यनुज्ञातो लोकान्प्राप्नोत्यनुत्तमान् ८२ शुक्लपक्षे दशम्यां च पुण्डरीकं समाविशेत् । तत्र स्नात्वा नरो राजन्पुण्डरीकफलं लभेत् ८३ ततस्त्रि-

---

व त्याला ब्रह्मलोकाची प्राप्ति होते ७३. कपिष्ठलाच्या क्षेत्राला जाऊन तपश्चर्येच्या योगानें किल्बिष दग्ध झाले असतां पुरुषाला अत्यंत दुर्लभ अशी अंतर्धानविद्या प्राप्त होते ७४. तदनंतर, हे नृपश्रेष्ठा, जगद्विख्यात सरकतीर्थाला जावें आणि कृष्णचतुर्दशीला तेथें शंकराचें दर्शन घ्यावें ७५ म्हणजे सर्व मनोरथ परिपूर्ण होऊन स्वर्गलोक प्राप्त होतो. हे कुरुनंदना, त्या सरकाचे तीरीं रुद्रकोटि कूप आणि सरोवरें ह्यांचे ठिकाणीं मिळून तीन कोट तीर्थें आहेत व, हे भरतवंशजश्रेष्ठ भूपते, तेथेंच इलास्पद तीर्थ आहे ७६, ७७. त्या ठिकाणी स्नान करून देव आणि पितर ह्यांचे पूजन केलें असतां पुरुषाला दुर्गति प्राप्त न होतां वाजपेय यागाचें फल प्राप्त होतें ७८. हे भरतकुलोत्पन्न भूपते, किंदान आणि किंजप्य ह्या तीर्थांमध्यें स्नान केलें असतां पुरुषाला अनुक्रमें अपरिमित दानाचें व जपाचें फल प्राप्त होतें ७९. कलशी नदीमध्यें स्नान केलें असतां श्रद्धावान् आणि जितेंद्रिय पुरुषाला अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें ८०. हे कुरुकुलश्रेष्ठ भीष्मा, सरकाच्या पूर्व बाजूला महात्म्या नारदमुनींचें अंबाजन्म म्हणून प्रख्यात असलेलें एक तीर्थ आहे ८१. त्या तीर्थामध्यें स्नान करून प्राणत्याग केला असतां, हे भरतवंशज भीष्मा, नारदाच्या अनुज्ञेनें पुरुषाला अनुपम लोक प्राप्त होतात ८२. हे राजा, शुक्लपक्षांतील दशमीला पुंडरीक तीर्थाला जाऊन तेथें स्नान केलें असतां पुरुषाला पुंडरीक यागाचें फल प्राप्त होतें ८३. तदनंतर त्रैलोक्यामध्यें विख्यात असलेल्या

विष्टपं गच्छेत्त्रिषु लोकेषु विश्रुतम् । तत्र वैतरणी पुण्या नदी पापप्रणाशिनी ८४ तत्र स्नात्वार्चयित्वा च शूलपाणिं वृषध्वजम् । सर्वपापविशुद्धात्मा गच्छेत परमां गतिम् ८५ ततो गच्छेत राजेन्द्र फलकीवनमुत्तमम् । तत्र देवाः सदा राजन्फलकीवनमाश्रिताः ८६ तपश्चरन्ति विपुलं बहुवर्षसहस्रकम् । दृषद्वत्यां नरः स्नात्वा तर्पयित्वा च देवताः ८७ अग्निष्टोमातिरात्राभ्यां फलं विन्दति भारत । तीर्थे च सर्वदेवानां स्नात्वा भरतसत्तम ८८ गोसहस्रस्य राजेन्द्र फलं विन्दति मानवः । पाणिखाते नरः स्नात्वा तर्पयित्वा च देवताः ८९ अग्निष्टोमातिरात्राभ्यां फलं विन्दति भारत । राजसूयमवाप्नोति ऋषिलोकं च विन्दति ९० ततो गच्छेत राजेन्द्र मिश्रकं तीर्थमुत्तमम् । तत्र तीर्थानि राजेन्द्र मिश्रितानि महात्मना ९१ व्यासेन नृपशार्दूल द्विजार्थमिति नः श्रुतम् । सर्वतीर्थेषु स स्नाति मिश्रके स्नाति यो नरः ९२ ततो व्यासवनं गच्छेन्नियतो नियताशनः । मनोजवे नरः स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् ९३ गत्वा मधुवटीं चैव देव्यास्तीर्थे नरः शुचिः । तत्र स्नात्वार्चयित्वा च पितॄन्देवांश्च

त्रिविष्टप तीर्थाला जावें. तेथें पापनाशक व पुण्यप्रद अशी वैतरणी नदी आहे ८४. त्या ठिकाणीं स्नान करून शूलपाणि शंकराचें पूजन केलें असतां पुरुषाचें चित्त सर्व पातकांपासून शुद्ध होतें व त्याला मोक्ष प्राप्त होतो ८५. नंतर, हे राजेंद्रा, उत्कृष्ट अशा फलकी वनाला जावें. कारण, हे राजा, देव सुद्धां फलकी वनाचा आश्रय करून ८६ अनेक सहस्र वर्षें मोठी तपश्चर्या करीत असतात दृषद्वतीमध्यें स्नान करून देवतांचें पूजन केलें असतां, हे भरतवंशजा, पुरुषाला अग्निष्टोम आणि अतिरात्र ह्या क्रतूंनीं मिळणारें फल प्राप्त होतें. हे भरतवंशजश्रेष्ठ राजाधिराज, सर्व देवांच्या तीर्थामध्यें स्नान केलें असतां पुरुषाला सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें. पाणिखात तीर्थाचे ठिकाणीं स्नान करून देवतांचें संतर्पण केलें असतां ८७, ८८, ८९, हे भरतकुलोत्पन्न भीष्मा, अग्निष्टोम आणि अतिरात्र ह्या क्रतूंनीं मिळणारें फल प्राप्त होतें व राजसूय यागाचें फल मिळून ऋषिलोकाचीही प्राप्ति होते ९०. तदनंतर, हे राजेंद्रा, उत्कृष्ट अशा मिश्रक तीर्थाला जावें आणि, हे राजाधिराज नृपश्रेष्ठा, त्या ठिकाणीं महात्म्या व्यासांनीं द्विजांकरितां तीर्थें मिश्र केलीं आहेत असें आमच्या ऐकण्यांत आहे. ह्यास्तव, मिश्रक तीर्थामध्यें स्नान करणाऱ्या पुरुषाला सर्व तीर्थांमध्यें स्नान केल्याचें फल प्राप्त होतें ९१, ९२. तदनंतर जितेंद्रिय व मिताहारी पुरुषानें व्यासवनाला जावें आणि मनोजव तीर्थामध्यें स्नान करावें म्हणजे सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ९३. मधुवटीला जाऊन व त्या

पुरुषः ९४ स देव्या समनुज्ञातो गोसहस्रफलं लभेत् । कौशिक्याः संगमे यस्तु दृषद्वत्याश्च भारत ९५ स्नाति वै नियताहारः सर्वपापैः प्रमुच्यते । ततो व्यासस्थली नाम यत्र व्यासेन धीमता ९६ पुत्रशोकाभितप्तेन देहत्यागे कृता मतिः । ततो देवैस्तु राजेन्द्र पुनरुत्थापितस्तदा ९७ अभिगत्वा स्थलीं तस्य गोसहस्रफलं लभेत् । किंदत्तं कूपमासाद्य तिलप्रस्थं प्रदाय च ९८ गच्छेत परमां सिद्धिमृणैर्मुक्तः कुरूद्वह । वेदीतीर्थे नरः स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् ९९ अहश्च सुदिनं चैव द्वे तीर्थे लोकविश्रुते। तयोः स्नात्वा नरव्याघ्र सूर्यलोकमवाप्नुयात् १०० मृगधूमं ततो गच्छेत्त्रिषु लोकेषु विश्रुतम् । तत्राभिषेकं कुर्वीत गङ्गायां नृपसत्तम १ अर्चयित्वा महादेवमश्वमेधफलं लभेत् । देव्यास्तीर्थे नरः स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् २ ततो वामनकं गच्छेत्त्रिषु लोकेषु विश्रुतम् । तत्र विष्णुपदे स्नात्वा अर्चयित्वा च वामनम् ३ सर्वपापविशुद्धात्मा विष्णुलोकं स गच्छति । कुलंपुने नरः स्नात्वा पुनाति स्वकुलं ततः ४ पवनस्य ह्रदे

ठिकाणीं देवीतीर्थामध्यें स्नान करून शुचिर्भूत पुरुषानें देवांचें व पितरांचें पूजन केलें असतां ९४ देवीच्या अनुज्ञेनें त्याला सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें. हे भरतवंशजा भीष्मा, कौशिकी आणि दृषद्वती ह्यांच्या संगमामध्यें ९५ जो नियमित आहार करणारा पुरुष स्नान करितो तो सर्व पापांपासून मुक्त होतो. त्याच्यापुढें व्यासस्थलि ह्मणून तीर्थ आहे त्या ठिकाणीं बुद्धिमान् व्यासांनीं ९६ पुत्रशोक झाल्यामुळे देहत्याग करण्याचा निश्चय केला होता; परंतु, हे राजाधिराज, देवांनी पुनरपि व्यासांना त्या निश्चयापासून परावृत्त केलें ९७. त्या व्यासस्थलीला गेलें असतां सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें. किंदत्त कूपाला जाऊन एक शेरभर तीळ दिले असतां ९८, हे कुरुवंशजश्रेष्ठ, पुरुष ऋणमुक्त होतो व त्याला उत्कृष्ट सिद्धि प्राप्त होते आणि वेदी तीर्थामध्यें स्नान केल्यानें पुरुषाला सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ९९. अह आणि सुदिन हीं दोन तीर्थें जगत्प्रसिद्ध आहेत. त्यांमध्यें स्नान केलें असतां, हे पुरुषश्रेष्ठ भीष्मा, सूर्यलोक प्राप्त होतो १००. तदनंतर, हे नृपश्रेष्ठा, त्रैलोक्यविख्यात अशा मृगधूम तीर्थाला जाऊन तेथें गंगास्नान करावें १ आणि महादेवाचें अर्चन करावें; ह्मणजे अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें व देवी तीर्थामध्यें स्नान केलें असतां पुरुषाला सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें २. तदनंतर त्रैलोक्यविख्यात वामनकतीर्थाला जावें आणि तेथें विष्णुपदामध्यें स्नान करून वामनाचें पूजन करावें ३; ह्मणजे पुरुष सर्व पातकांपासून मुक्त होऊन विष्णुलोकी जातो. कुलंपुन तीर्थामध्यें स्नान केलें असतां

स्नात्वा मरुतां तीर्थमुत्तमम् । तत्र स्नात्वा नरव्याघ्र विष्णुलोके महीयते ५
अमराणां ह्रदे स्नात्वा समभ्यर्च्यामराधिपम् । अमराणां प्रभावेन स्वर्ग-
लोके महीयते ६ शालिहोत्रस्य तीर्थे च शालिसूर्ये यथाविधि । स्नात्वा
नरवरश्रेष्ठ गोसहस्रफलं लभेत् ७ श्रीकुञ्जं च सरस्वत्यास्तीर्थं भरतस-
त्तम । तत्र स्नात्वा नरश्रेष्ठ अग्निष्टोमफलं लभेत् ८ ततो नैमिषकुञ्जं च
समासाद्य कुरूद्वह । ऋषयः किल राजेन्द्र नैमिषेयास्तपस्विनः ९ तीर्थ-
यात्रां पुरस्कृत्य कुरुक्षेत्रं गताः पुरा । ततः कुञ्जः सरस्वत्याः कृतो
भरतसत्तम ११० ऋषीणामवकाशः स्याद्यथा तुष्टिकरो महान् । तस्मि-
न्कुञ्जे नरः स्नात्वा अग्निष्टोमफलं लभेत् ११ ततो गच्छेत धर्मज्ञ कन्या-
तीर्थमनुत्तमम् । कन्यातीर्थे नरः स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् १२ ततो
गच्छेत राजेन्द्र ब्रह्मणस्तीर्थमुत्तमम् । तत्र वर्णावरः स्नात्वा ब्राह्मण्यं
लभते नरः १३ ब्राह्मणश्च विशुद्धात्मा गच्छेत परमां गतिम् । ततो
गच्छेन्नरश्रेष्ठ सोमतीर्थमनुत्तमम् १४ तत्र स्नात्वा नरो राजन्सोमलोक-

---

पुरुष आपलें कुल पवित्र करितो ४. पवन सरोवरामध्यें आणि उत्कृष्ट अशा मरुत्ती-र्थामध्यें स्नान केलें असतां, हे पुरुषश्रेष्ठ, पुरुषाची विष्णुलोकीं मानमान्यता होते ५. अमरसरोवरामध्यें स्नान करून अमराधिपतीचें पूजन केलें असतां देवांच्या प्रभावानें पुरुषाची स्वर्गलोकीं मानमान्यता रहाते ६. हे श्रेष्ठ पुरुषोत्तमा, शालिहोत्र तीर्था-मध्यें आणि शालिसूर्यतीर्थामध्यें यथाविधि स्नान केलें असतां सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ७. हे भरतवंशज श्रेष्ठ पुरुषोत्तमा भीष्मा, श्रीकुंज ह्मणून जें सरस्वतीनदीचे तीरीं तीर्थ आहे तेथें स्नान केलें असतां अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें ८. तदनं-तर, हे कुरुवंशजश्रेष्ठ, नैमिषकुंजाला जावें. हे राजाधिराज, असें सांगतात कीं, नैमि-षारण्यांत रहाणारे तपस्वी ऋषि ९ तीर्थयात्रेच्या उद्देशानें कुरुक्षेत्राला गेले असतां, हे भरतवंशजश्रेष्ठ, ऋषींना वास्तव्य करण्याला त्यांच्या मनाप्रमाणें मोठी जागा होईल अशा रीतीनें सरस्वतीनें कुंजवन तयार केलें. त्या कुंजतीर्थामध्यें स्नान केलें असतां अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें ११०, ११. तदनंतर, हे धर्मज्ञ भीष्मा, अनुपम अशा कन्यातीर्थाला जावें. कारण, कन्यातीर्थामध्यें स्नान केलें असतां सहस्र गोप्रदा-नांचें फल प्राप्त होतें १२. तदनंतर, हे राजाधिराज, उत्कृष्ट अशा ब्रह्मतीर्थाला जावें; त्या ठिकाणीं ब्राह्मणेतर पुरुषानें स्नान केलें असतां त्याला ब्राह्मण्य प्राप्त होतें १३ आणि ब्राह्मणानें स्नान केलें असतां चित्तशुद्धि होऊन तो मोक्षाला जातो. तदनंतर, हे पुरुषश्रेष्ठा, अनुपम अशा सोमतीर्थाला जावें १४. कारण, हे राजा, तेथें स्नान केलें

मवाप्नुयात् । सप्तसारस्वतं तीर्थं ततो गच्छेन्नराधिप १५ यत्र मङ्कणकः
सिद्धो महर्षिर्लोकविश्रुतः। पुरा मङ्कणको राजन्कुशाग्रेणेति नः श्रुतम् १६
क्षतः किल करे राजंस्तस्य शाकरसोऽस्रवत् । स वै शाकरसं दृष्ट्वा हर्षा-
विष्टः प्रनृत्तवान् १७ ततस्तस्मिन्प्रनृत्ते तु स्थावरं जङ्गमं च यत् । प्रनृ-
त्तमुभयं वीर तेजसा तस्य मोहितम् १८ ब्रह्मादिभिः सुरैः राजन्नृषिभिश्च
तपोधनैः। विज्ञप्तो वै महादेव ऋषेरर्थे नराधिप ॥ नायं नृत्येद्यथा देव
तथा त्वं कर्तुमर्हसि १९ तं प्रनृत्तं समासाद्य हर्षाविष्टेन चेतसा। सुराणां
हितकामार्थमृषिं देवोऽभ्यभाषत १२० भो भो महर्षे धर्मज्ञ किमर्थं नृत्यते
भवान् । हर्षस्थानं किमर्थं वा तवाद्य मुनिपुङ्गव २१ ऋषिरुवाच॥ तप-
स्विनो धर्मपथे स्थितस्य द्विजसत्तम । किं न पश्यसि मे ब्रह्मन्कराच्छा-
करसं स्रुतम् २२ यं दृष्ट्वा संप्रनृत्तोऽहं हर्षेण महतान्वितः । तं प्रहस्याब्रवी-
द्देव ऋषिं रागेण मोहितम् २३ अहं तु विस्मयं विप्र न गच्छामीति

असतां पुरुषाला सोमलोक प्राप्त होतो. नंतर, हे प्रजाधिपते, सप्तसारस्वततीर्थाला जावें १५. त्या ठिकाणी जगद्विख्यात मंकणक ह्मणून सिद्ध महर्षि वास्तव्य करीत असतात. हे राजा, आमचे असे ऐकण्यांत आहे की, पूर्वी त्या मंकणक मुनीच्या हाताला दर्भाच्या अग्रानें एक क्षत पडलें व, हे राजा, त्या क्षतापासून शाकरस गळूं लागला तेव्हां शाकरस अवलोकन करून हर्षानें उचंबळूं लागणारे ते मुनि नृत्य करूं लागले १६, १७ व ते मुनि नृत्य करूं लागले असतां त्यांच्या तेजानें मोहित झालेले स्थावर आणि जंगम असे दोन्ही प्रकारचे प्राणी, हे वीरा, नृत्य करूं लागले १८. तेव्हां, हे प्रजाधिपते राजा, त्या ऋषीकरितां ब्रह्मादि देवांनी आणि तपोधन ऋषींनी "हे देव, हा नृत्य न करील अशी आपण तजवीज करा" ह्मणून महादेवाची प्रार्थना केली असतां १९ अंतःकरण हर्षानें उचंबळूं लागल्यामुळें नृत्य करीत असलेल्या त्या ऋषीकडे जाऊन देवांचें हित करण्याकरितां महादेव त्याला ह्मणाले १२० "हे महर्षे, हे धर्मज्ञ, तूं कशाकरितां नृत्य करीत आहेस? हे मुनिश्रेष्ठ, आज तुला हर्ष होण्याचें कारण काय?" २१ मंकणक ऋषि ह्मणतातः—हे द्विजश्रेष्ठ, हे ब्रह्मन्, मी तपस्वी धर्ममार्गानें वागत असल्यामुळें माझ्या हातांतून शाकरस स्रवत आहे हें तूं पहात नाहीस काय ? २२. तो शाकरस अवलोकन करून मला मोठा हर्ष झाल्यामुळें मी नाचूं लागलों आहे" ह्याप्रमाणें मंकणक ऋषींनी सांगितलें असतां प्रेमानें मोहित झालेल्या त्या ऋषींना हसून महादेव ह्मणाले २३ "हे विप्रा, ह्यामध्यें मला तर विस्मय वाटत नाही; हे तूं पहा" ह्याप्रमाणें त्या मुनींना सांगून, हे पुरुषश्रेष्ठ निष्पाप राजाधिराजा, बुद्धिमान् महादे-

पश्य माम् । एवमुक्त्वा नरश्रेष्ठ महादेवेन धीमता २४ अङ्गुल्यग्रेण राजेन्द्र स्वाङ्गुष्ठस्ताडितोऽनघ । ततो भस्म क्षताद्राजन्निर्गतं हिमसन्निभम् २५ तद्दृष्ट्वा व्रीडितो राजन्स मुनिः पादयोर्गतः । नान्यं देवात्परं मेने रुद्रात्परतरं महत् २६ सुरासुरस्य जगतो गतिस्त्वमसि शूलधृक् । त्वया सर्वमिदं सृष्टं त्रैलोक्यं सचराचरम् २७ त्वमेव सर्वान्ग्रससि पुनरेव युगक्षये । देवैरपि न शक्यस्त्वं परिज्ञातुं कुतो मया २८ त्वयि सर्वे प्रदृश्यन्ते सुरा ब्रह्मादयोऽनघ । सर्वस्त्वमसि लोकानां कर्ता कारयिता च ह २९ त्वत्प्रसादात्सुराः सर्वे मोदन्तीहाकुतोभयाः । एवं स्तुत्वा महादेवमृषिर्वचनमब्रवीत् १३० त्वत्प्रसादान्महादेव तपो मे न क्षरेत वै । ततो देवः प्रहृष्टात्मा ब्रह्मर्षिमिदमब्रवीत् ३१ तपस्ते वर्धतां विप्र मत्प्रसादात्सहस्रधा । आश्रमे चेह वत्स्यामि त्वया सह महामुने ३२ सप्तसारस्वते स्नात्वा अर्चयिष्यन्ति ये तु माम् । न तेषां दुर्लभं किंचिदिह लोके परत्र च ३३ सारस्वतं च ते लोकं गमिष्यन्ति न संशयः । एवमुक्त्वा महादेवस्तत्रैवा-

---

वानी एका बोटाच्या अग्रानें आपल्या अंगुष्ठाला ताडन केलें असतां, हे राजा, भस्मानें क्षत पडलेल्या त्या अंगुष्ठापासून बर्फाप्रमाणें शुभ्र वस्तु (अर्थात् खडीसाखर) निघाली २४, २५. हें अवलोकन केल्यावर, हे राजा, तो मंकणक मुनि लज्जित होऊन महादेवांच्या पायां पडला आणि रुद्रापेक्षा श्रेष्ठ असें कोणतेंही दैवत नाहीं असें वाटून तो ह्मणाला २६ " हे शूलपाणे, त्रैलोक्यांतील देवदैत्यांचा आधार तूंच आहेस; हें सर्व स्थावरजंगमात्मक त्रैलोक्य तूंच उत्पन्न केलें आहेस २७ आणि युगांतकालीं तूंच सर्वांना पुनरपि ग्रासून टाकित असतोस. देवांनाही तुझें ज्ञान होणें शक्य नाहीं मग माझी तर गोष्ट कशाला पाहिजे ? २८. हे निष्पाप, तुझे ठिकाणीं सर्व ब्रह्मादिदेव असल्याचें दृष्टी पडत आहे. सर्व कांहीं तूंच आहेस; लोकांचा कर्ता करविताही तूंच आहेस २९ आणि तुझ्याच प्रसादामुळें निर्भय झालेले सर्व देव ह्या ठिकाणीं आनंदानें रहात असतात." ह्याप्रमाणें स्तुति करून तो मंकणक ऋषि महादेवांना ह्मणाला १३० " हे महादेवा, तुझ्या प्रसादानें माझ्या तपाचा ऱ्हास होऊं नये." अशी प्रार्थना केल्यावर महादेव मनामध्यें प्रसन्न होऊन त्या ब्रह्मर्षीला ह्मणाले ३१ " हे विप्रा, माझ्या प्रसादानें तुझ्या तपाची हजारों प्रकारांनीं अभिवृद्धि होवो. हे महामुने, मी तुझ्यासहवर्तमान ह्या आश्रमामध्यें वास्तव्य करीन ३२. सप्तसारस्वत तीर्थामध्यें स्नान करून जे माझें पूजन करितील त्यांना इहलोकीं अथवा परलोकीं कांहींही दुर्लभ रहाणार नाहीं ३३ आणि ते सारस्वत लोकाला जातील ह्यांत संशय नाहीं."

न्तरधीयत ३४ ततस्त्वौशनसं गच्छेत्त्रिषु लोकेषु विश्रुतम् । यत्र ब्रह्मा-
दयो देवा ऋषयश्च तपोधनाः ३५ कार्तिकेयश्च भगवांस्त्रिसन्ध्यं किल
भारत । सांनिध्यमकरोन्नित्यं भार्गवप्रियकाम्यया ३६ कपालमोचनं
तीर्थं सर्वपापप्रमोचनम् । तत्र स्नात्वा नरव्याघ्र सर्वपापैः प्रमुच्यते ३७
अग्नितीर्थं ततो गच्छेत्तत्र स्नात्वा नरर्षभ । अग्निलोकमवाप्नोति कुलं
चैव समुद्धरेत् ३८ विश्वामित्रस्य तत्रैव तीर्थं भरतसत्तम । तत्र स्नात्वा
नरश्रेष्ठ ब्राह्मण्यमधिगच्छति ३९ ब्रह्मयोनिं समासाद्य शुचिः प्रयतमा-
नसः । तत्र स्नात्वा नरव्याघ्र ब्रह्मलोकं प्रपद्यते १४० पुनात्यासप्तमं चैव
कुलं नास्त्यत्र संशयः । ततो गच्छेत राजेन्द्र तीर्थं त्रैलोक्यविश्रुतम् ४१
पृथूदकमिति ख्यातं कार्तिकेयस्य वै नृप । तत्राभिषेकं कुर्वीत पितृदेवा-
र्चने रतः ४२ अज्ञानाज्ज्ञानतो वापि स्त्रिया वा पुरुषेण वा । यत्किंचि-
दशुभं कर्म कृतं मानुषबुद्धिना ४३ तत्सर्वं नश्यते तत्र स्नातमात्रस्य भारत ।
अश्वमेधफलं चास्य स्वर्गलोकं च गच्छति ४४ पुण्यमाहुः कुरुक्षेत्रं

ह्याप्रमाणें सांगून महादेव तेथेच अंतर्धान पावले ३४. तदनंतर त्रैलोक्यविख्यात औशनस तीर्थाला जावें. त्या ठिकाणीं ब्रह्मादिदेव, तपोधन ऋषि ३५ आणि भगवान् षडानन हे नेहमीं, हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, भार्गवाचें प्रिय करण्याकरितां त्रिकाळ संनिध असतात असें ऐकण्यांत आहे ३६. कपालमोचन नामक तीर्थ सर्वपापनाशक आहे. ह्यास्तव, हे पुरुषश्रेष्ठा, त्या ठिकाणीं स्नान केलें असतां पुरुष सर्व पापांपासून मुक्त होतो ३७. तदनंतर अग्नितीर्थाला जावें. कारण, त्या ठिकाणीं स्नान केल्यानें अग्नि-लोकाची प्राप्ति होऊन कुलाचा उद्धार होतो ३८. हे भरतवंशजश्रेष्ठ भीष्मा, त्याच ठिकाणीं विश्वामित्र तीर्थ आहे. तेथें स्नान केलें असतां, हे पुरुषश्रेष्ठ, ब्राह्मण्य प्राप्त होतें ३९; शुचिर्भूत आणि जितेंद्रिय पुरुषानें ब्रह्मयोनि तीर्थाला जाऊन स्नान केलें असतां, हे पुरुषश्रेष्ठा, त्याला ब्रह्मलोक प्राप्त होतो १४० आणि सात पुरुषांपर्यंत त्याच्या कुलाचा उद्धार होतो ह्यांत संशय नाहीं. तदनंतर, हे राजाधिराज भीष्मा, पृथूदक ह्मणून षडाननाचें त्रैलोक्यविख्यात तीर्थ आहे तेथें जावें आणि तेथें स्नान करून पितर आणि देव, ह्यांच्या पूजनामध्यें तत्पर रहावें ४१,४२. कारण, समजून अथवा न समजून स्त्रीच्या अथवा पुरुषाच्या हातून मनुष्यबुद्धीमुळें जें कांहीं अशुभ कर्म झालें असेल ४३ तें सर्व त्या ठिकाणीं स्नान करितांक्षणींच नाहींसें होतें. हे भरतवंशज भीष्मा, ह्या ठिकाणीं स्नान केलें असतां अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें आणि स्नान करणारा पुरुष स्वर्गलोकीं गमन करितो ४४. कुरुक्षेत्र पुण्यकारक ह्मणून ह्मणतात.

कुरुक्षेत्रात्सरस्वती । सरस्वत्याश्च तीर्थानि तीर्थेभ्यश्च पृथूदकम् ४५
उत्तमं सर्वतीर्थानां यस्त्यजेदात्मनस्तनुम् । पृथूदके जप्यपरो नैव श्वो
मरणं तपेत् ४६ गीतं सनत्कुमारेण व्यासेन च महात्मना । एवं संनियतं
राजन्नभिगच्छेत्पृथूदकम् ४७ पृथूदकात्तीर्थतमं नान्यत्तीर्थं कुरूद्वह ।
तन्मेध्यं तत्पवित्रं च पावनं च न संशयः ४८ तत्र स्नात्वा दिवं यान्ति
येपि पापकृतो नराः । पृथूदके नरश्रेष्ठ एवमाहुर्मनीषिणः ४९ मधुस्रवं च
तत्रैव तीर्थं भरतसत्तम । तत्र स्नात्वा नरो राजन्गोसहस्रफलं लभेत् १५०
ततो गच्छेत राजेन्द्र तीर्थं मेध्यं यथाक्रमम् । सरस्वत्यारुणायाश्च संगमं
लोकविश्रुतम् ५१ त्रिरात्रोपोषितः स्नात्वा मुच्यते ब्रह्महत्यया । अग्नि-
ष्टोमातिरात्राभ्यां फलं विन्दति मानवः ५२ आसप्तमं कुलं चैव पुनाति
भरतर्षभ । अर्धकीलं च तत्रैव तीर्थं कुरुकुलोद्वह ५३ विप्राणामनुकं-
म्पार्थं दर्भिणा निर्मितं पुरा । व्रतोपनयनाभ्यां चाप्युपवासेन वाप्युत ५४
क्रियामन्त्रैश्च संयुक्तो ब्राह्मणः स्यान्न संशयः ५५ क्रियामन्त्रविहीनोपि

कुरुक्षेत्रापेक्षाही सरस्वती अधिक पुण्यकारक आहे. सरस्वतीपेक्षांही तिच्या तीरीं असलेलीं तीर्थें अधिक पुण्यकारक आहेत आणि त्या तीर्थांपेक्षांही पृथूदक तीर्थ अधिक पुण्यकारक आहे ४५. तस्मात्, सर्व तीर्थांत उत्कृष्ट अशा पृथूदक तीर्थामध्यें जो जपपरायण पुरुष आपल्या देहाचा त्याग करितो त्याला पुनरपि जन्म मरणाची भीति नाही ४६. असें महात्म्या व्यासांनीं व सनत्कुमारमुनींनीं सांगितलें आहे. तस्मात्, हे राजा, अशाप्रकारानें पृथूदक तीर्थाला जावें ४७. हे कुरुवंशजश्रेष्ठ, पृथूदकाहून दुसरें श्रेष्ठ तीर्थ नाहीं. तेंच मेध्य, तेंच पवित्र आणि तेंच पावन आहे ह्यांत संशय नाहीं ४८. हे पुरुषश्रेष्ठ भीष्मा, पापाचरणी पुरुषही त्या पृथूदकामध्यें स्नान करून स्वर्गाला जातात असें ज्ञानवान् लोकांचें ह्मणणें आहे ४९. हे भरतवंशजश्रेष्ठ भीष्मा, त्याच ठिकाणीं मधुस्रव ह्मणून तीर्थ आहे. तेथें स्नान केलें असता, हे राजा, सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें १५०. तदनंतर, हे राजाधिराज भीष्मा, अनुक्रमाने सरस्वती आणि अरुणा ह्यांचा संगम हें जें जगद्विख्यात पवित्र तीर्थ आहे तेथें जावें ५१ आणि तेथें त्रिरात्र उपोषण करून स्नान करावें ह्मणजे पुरुष ब्रह्महत्येच्या पातकापासून मुक्त होतो; अग्निष्टोम व अतिरात्र ह्या क्रतूंनीं मिळणारें फल त्याला प्राप्त होतें ५२ आणि, हे भरतवंशजश्रेष्ठ, सात पुरुषांपर्यंत त्याचें कुल पवित्र होतें. हे कुरुकुलश्रेष्ठ भीष्मा, त्याच ठिकाणी अर्धकील तीर्थ ५३, विप्रावर दया करण्याकरितां, पूर्वी दर्भीनें निर्माण केलें आहे. त्या ठिकाणीं स्नान केलें असतां व्रत, उपनयन,

तत्र स्नात्वा नरर्षभ। चीर्णव्रतो भवेद्विद्वान्दृष्टमेतत्पुरातनैः ५६ समुद्राश्चापि चत्वारः समानीताश्च दर्भिणा। तेषु स्नातो नरश्रेष्ठ न दुर्गतिमवाप्नुयात् ५७ फलानि गोसहस्राणां चतुर्णां विन्दते च सः। ततो गच्छेत धर्मज्ञ तीर्थं शतसहस्रकम् ५८ साहस्रकं च तत्रैव द्वे तीर्थे लोकविश्रुते। उभयोर्हि नरः स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् ५९ दानं वाप्युपवासो वा सहस्रगुणितं भवेत्। ततो गच्छेत राजेन्द्र रेणुकातीर्थमुत्तमम् १६० तीर्थाभिषेकं कुर्वीत पितृदेवार्चने रतः। सर्वपापविशुद्धात्मा अग्निष्टोमफलं लभेत् ६१ विमोचनमुपस्पृश्य जितमन्युर्जितेन्द्रियः। प्रतिग्रहकृतैर्दोषैः सर्वैः स परिमुच्यते ६२ ततः पञ्चवटीं गत्वा ब्रह्मचारी जितेन्द्रियः। पुण्येन महता युक्तः सतां लोके महीयते ६३ यत्र योगेश्वरः स्थाणुः स्वयमेव वृषध्वजः। तमर्चयित्वा देवेशं गमनादेव सिध्यति ६४ तैजसं वारुणं तीर्थं दीप्यमानं स्वतेजसा। यत्र ब्रह्मादिभिर्देवैर्ऋषिभिश्च तपोधनैः ६५ सैनापत्येन

उपवास ५४, संस्कार आणि वेद ह्यांनीं संपन्न असें ब्राह्मण्य प्राप्त होतें ह्यांत संशय नाहीं ५५ आणि, हे पुरुषश्रेष्ठ भीष्मा, संस्कारहीन व मंत्रहीन असलेल्याही पुरुषानें तेथें स्नान केलें असतां तो व्रताचरण केलेला विद्वान् होतो हें पुरातन लोकांच्या अनुभवास आलेलें आहे ५६. त्या ठिकाणीं दर्भीनें चारी समुद्र आणिलेले आहेत त्यांमध्यें स्नान केलें असतां, हे पुरुषश्रेष्ठा, पुरुषाला दुर्गति प्राप्त होत नाहीं ५७ आणि चार हजार गोप्रदानांचें फल प्राप्त होतें. तदनंतर, हे धर्मज्ञ, शतसहस्रक तीर्थ आणि साहस्रक तीर्थ अशीं दोन जगद्विख्यात तीर्थें आहेत. तेथें जाऊन त्या दोन्ही तीर्थांमध्यें स्नान करावें ह्मणजे सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ५८, ५९ आणि त्या ठिकाणीं दान अथवा उपोषण केलें असतां त्याचें फल सहस्रपट होतें. तदनंतर, हे राजाधिराज, उत्कृष्ट अशा रेणुकातीर्थाला जावें आणि त्या तीर्थामध्यें स्नान करून पितर आणि देव ह्यांचें भक्तीनें पूजन करावें ह्मणजे सर्व पाप नाहींसें होऊन अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें ६०,६१. क्रोधसंयमन आणि इंद्रियसंयमन केलेल्या पुरुषानें विमोचन तीर्थामध्यें स्नान केलें असतां सर्व प्रकारच्या प्रतिग्रहजन्य दोषांपासून तो मुक्त होतो ६२. तदनंतर ब्रह्मचारी व जितेंद्रिय राहून पंचवटी तीर्थाला जावें ह्मणजे मोठें पुण्य संपादन होऊन सज्जनांना प्राप्त होणाऱ्या लोकांमध्यें मानमान्यता होते ६३. त्या ठिकाणीं वृषभध्वज योगेश्वर शंकर स्वतः वास्तव्य करीत असतात. त्या देवाधिदेवाचें पूजन केलें असतां इतकेंच नव्हें परंतु, फक्त देवाधिदेवाकडे गेलें असतांही पुरुषाला सिद्धि प्राप्त होते ६४. तदनंतर आपल्या तेजानें देदीप्यमान् असें एक तैजस ह्मणून

देवानामभिषिक्तो गुहस्तदा । तैजसस्य तु पूर्वेण कुरुतीर्थं कुरूद्वह ६६
कुरुतीर्थे नरः स्नात्वा ब्रह्मचारी जितेन्द्रियः । सर्वपापविशुद्धात्मा ब्रह्म-
लोकं प्रपद्यते ६७ स्वर्गद्वारं ततो गच्छेन्नियतो नियताशनः । स्वर्गलो-
कमवाप्नोति ब्रह्मलोकं च गच्छति ६८ ततो गच्छेदनरकं तीर्थसेवी नरा-
धिप । तत्र स्नात्वा नरो राजन्न दुर्गतिमवाप्नुयात् ६९ तत्र ब्रह्मा स्वयं
नित्यं देवैः सह महीपते । अन्वास्ते पुरुषव्याघ्र नारायणपुरोगमैः १७०
सान्निध्यं तत्र राजेन्द्र रुद्रपत्न्याः कुरूद्वह । अभिगम्य च तां देवीं न
दुर्गतिमवाप्नुयात् ७१ तत्रैव च महाराज विश्वेश्वरमुमापतिम् । अभिगम्य
महादेवं मुच्यते सर्वकिल्बिषैः ७२ नारायणं चाभिगम्य पद्मनाभमरि-
न्दम । राजमानो महाराज विष्णुलोकं च गच्छति ७३ तीर्थेषु सर्वदे-
वानां स्नातः स पुरुषर्षभ । सर्वदुःखैः परित्यक्तो द्योतते शशिवन्नरः ७४
ततः स्वस्तिपुरं गच्छेत्तीर्थसेवी नराधिप । प्रदक्षिणमुपावृत्य गोसहस्र-
फलं लभेत् ७५ पावनं तीर्थमासाद्य तर्पयेत्पितृदेवताः । अग्निष्टोमस्य यज्ञस्य

जलमय तीर्थ आहे. त्या ठिकाणीं ब्रह्मादिदेव आणि तपोधन ऋषि ह्यांनीं ६५ षडान-
नाला देवसेनापतीचा अभिषेक केला आहे. हे कुरुवंशजश्रेष्ठ भीष्मा, तैजसतीर्थाच्या
पूर्वेस कुरुतीर्थ आहे ६६. त्या कुरुतीर्थामध्यें ब्रह्मचारी व जितेंद्रिय पुरुषानें स्नान केलें
असतां सर्व पापांपासून चित्तशुद्ध होऊन त्याला ब्रह्मलोक प्राप्त होतो ६७. तदनंतर
जितेंद्रिय आणि मिताहारी पुरुषानें स्वर्गद्वार तीर्थाला जावें ह्मणजे स्वर्गलोक संपादन
होऊन ब्रह्मलोकाची प्राप्ति होते ६८. तदनंतर, हे प्रजाधिपते राजा, तीर्थवासी पुरु-
षानें अनरक तीर्थाला जावें आणि तेथें स्नान करावें ह्मणजे पुरुषाला नर-
कप्राप्ति होत नाहीं ६९. हे भूपते पुरुषश्रेष्ठा भीष्मा, नारायणप्रभृति देवांस-
हवर्तमान ब्रह्मदेव त्या ठिकाणीं स्वतः असतो १७० आणि, हे राजाधिराज
कुरुवंशजश्रेष्ठा भीष्मा, रुद्रपत्नीही तेथें जवळच असते. त्या देवीचें दर्शन घेतलें
असतां दुर्गति प्राप्त होत नाहीं ७१. हे महाराज, त्याच ठिकाणीं विश्वेश्वर उमापति
महादेवाचें दर्शन घेतलें असतां पुरुष सर्व पातकांपासून मुक्त होतो ७२. हे शत्रुदमना
महाराजा, पद्मनाभ नारायणाचें दर्शन घेतलें असतां पुरुषाला विष्णुलोकाची प्राप्ति
होते ७३, सर्व देवांच्या तीर्थामध्यें स्नान केल्याचें फल मिळतें आणि, हे पुरुषश्रेष्ठा,
सर्व दुःखांपासून मुक्त होऊन तो पुरुष चंद्राप्रमाणें झळकत रहातो ७४. तदनंतर, हे
प्रजाधिपते, तीर्थवासी पुरुषानें प्रदक्षणिक वळून स्वस्तिपुर तीर्थाला जावें ह्मणजे सहस्र
गोप्रदानांचें फळ प्राप्त होतें ७५. हे भरतकुलोत्पन्न भीष्मा, पावन तीर्थाला जाऊन

फलं प्राप्नोति भारत ७६ गङ्गाहृदश्च तत्रैव कूपश्च भरतर्षभ। तिस्रः कोट्यस्तु तीर्थानां तस्मिन्कूपे महीपते ॥ तत्र स्नात्वा नरो राजन्स्वर्गलोकं प्रपद्यते ७७ आपगायां नरः स्नात्वा अर्चयित्वा महेश्वरम्। गाणपत्यमवाप्नोति कुलं चैव समुद्धरेत् ७८ ततः स्थाणुवटं गच्छेत्त्रिषु लोकेषु विश्रुतम्। तत्र स्नात्वा स्थितो रात्रिं रुद्रलोकमवाप्नुयात् ७९ बदरीपाचनं गच्छेद्वसिष्ठस्याश्रमं गतः। बदरीन्भक्षयेत्तत्र त्रिरात्रोपोषितो नरः १८० सम्यग्द्वादश वर्षाणि बदरीन्भक्षयेत्तु यः। त्रिरात्रोपोषितस्तेन भवेत्तुल्यो नराधिप ८१ रुद्रमार्गं समासाद्य तीर्थसेवी नराधिप। अहोरात्रोपवासेन शक्रलोके महीयते ८२ एकरात्रं समासाद्य एकरात्रोषितो नरः। नियतः सत्यवादी च ब्रह्मलोके महीयते ८३ ततो गच्छेत राजेन्द्र तीर्थं त्रैलोक्यविश्रुतम्। आदित्यस्याश्रमो यत्र तेजोराशेर्महात्मनः ८४ तस्मिंस्तीर्थे नरः स्नात्वा पूजयित्वा विभावसुम्। आदित्यलोकं व्रजति कुलं चैव समुद्धरेत् ८५ सोमतीर्थे नरः स्नात्वा तीर्थसेवी नराधिप। सोमलोकमवाप्नोति नरो नास्त्यत्र संशयः ८६ ततो गच्छेत धर्मज्ञ दधीचस्य महा-

---

देवपितरांचें तर्पण करावें ह्मणजे अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें ७६. हे भरतवंशजश्रेष्ठा, गंगाव्हद ह्मणून त्याच ठिकाणीं एक कूप आहे व, हे भूपते, त्या कूपामध्यें तीन कोटि तीर्थें आहेत. त्या ठिकाणीं स्नान केलें असतां, हे राजा, पुरुषाला स्वर्गलोक प्राप्त होतो ७७. आपगा नदीमध्यें स्नान करून महेश्वराचें पूजन केलें असतां गाणपत्य प्राप्त होऊन कुलाचा उद्धार होतो ७८. तदनंतर त्रैलोक्यविख्यात अशा स्थाणुवटाला जावें आणि तेथें स्नान करून एक रात्र वास्तव्य करावें ह्मणजे रुद्रलोकाची प्राप्ति होते ७९. नंतर वसिष्ठमुनींच्या आश्रमाला जाऊन बदरीपाचनाला जावें आणि त्रिरात्र उपोषण करून बदरींफलें भक्षण करावीं १८०. कारण, हे प्रजाधिपते, त्रिरात्र उपोषण करून जो त्या ठिकाणीं बदरीफलें भक्षण करितो त्याला बारा वर्षें बदरीफलें भक्षण करून राहिल्याचें फल प्राप्त होतें ८१. हे प्रजाधिपते, तीर्थवासी पुरुषानें रुद्रमार्गाला जाऊन अहोरात्र उपोषण केलें असतां इंद्रलोकीं त्याची मानमान्यता होते ८२ एकरात्रतीर्थाला जाऊन एक रात्र तेथें वास्तव्य केलें असतां जितेंद्रिय व सत्यवादी पुरुषाचा ब्रह्मलोकीं मान होतो ८३. तदनंतर, हे राजाधिराज, त्रैलोक्यविख्यात तीर्थाला जावें. त्याठिकाणीं महात्म्या तेजोराशि सूर्याचा आश्रम आहे ८४. त्या तीर्थामध्यें स्नान करून सूर्याचें पूजन केलें असतां पुरुष सूर्यलोकीं जातो व त्याचा उद्धार होतो ८५. हे प्रजाधिपते, तीर्थवासी पुरुषानें सोमतीर्थामध्यें स्नान केलें असतां त्याला

त्मनः । तीर्थं पुण्यतमं राजन्पावनं लोकविश्रुतम् ८७ यत्र सारस्वतो यातः सोऽङ्गिरास्तपसो निधिः । तस्मिंस्तीर्थे नरः स्नात्वा वाजिमेधफलं लभेत् ८८ सारस्वतीं गतिं चैव लभते नात्र संशयः । ततः कन्याश्रमं गच्छेन्नियतो ब्रह्मचर्यवान् ८९ त्रिरात्रोपोषितो राजन्नियतो नियताशनः। लभेत्कन्याशतं दिव्यं स्वर्गलोकं च गच्छति १९० ततो गच्छेत धर्मज्ञ तीर्थं संनिहतीमपि । तत्र ब्रह्मादयो देवा ऋषयश्च तपोधनाः ९१ मासि मासि समायान्ति पुण्येन महतान्विताः । सन्निहत्यामुपस्पृश्य राहुग्रस्ते दिवाकरे ९२ अश्वमेधशतं तेन तत्रेष्टं शाश्वतं भवेत् । पृथिव्यां यानि तीर्थानि अन्तरिक्षचराणि च ९३ नद्यो ह्रदास्तडागाश्च सर्वप्रस्रवणानि च । उदपानानि वाप्यश्च पुण्यान्यायतनानि च ९४ निःसंशयममावास्यां समेष्यन्ति नराधिप । मासि मासि नरव्याघ्र सन्निहत्यां न संशयः ९५ तीर्थं सन्निहनादेव सन्निहत्येति विश्रुता । तत्र स्नात्वा च पीत्वा च स्वर्गलोके महीयते ९६ अमावास्यां तु तत्रैव राहुग्रस्ते दिवाकरे । यः श्राद्धं कुरुते मर्त्यस्तस्य पुण्यफलं शृणु ९७ अश्वमेधसहस्रस्य सम्यगिष्टस्य यत्फलम् ।

निःसंशय सोमलोकाची प्राप्ति होते ८६. तदनंतर, हे धर्मज्ञ राजा, जगद्विख्यात, अत्यंत पुण्यप्रद आणि शोधक अशा महात्म्या दधीच मुनींच्या तीर्थाला जावें ८७. त्या ठिकाणीं तपोनिधि सारस्वत अंगिरामुनि असतात व त्या तीर्थामध्यें स्नान केलें असतां पुरुषाला अश्वमेध यागाचें फल व सारस्वती गति हीं निःसंशय प्राप्त होतात. तदनंतर, जितेंद्रिय व ब्रह्मचारी पुरुषानें कन्याश्रमाला जावें ८८,८९ आणि त्या ठिकाणीं जितेंद्रिय व मिताहारी राहून तीन दिवस उपोषण करावें ह्मणजे, हे राजा, शंभर दिव्य; कन्या मिळून स्वर्गलोकाची प्राप्ति होते १९०. तदनंतर, हे धर्मज्ञ, संनिहती तीर्थाला जावें. त्या ठिकाणीं महापुण्यवान् ब्रह्मादिदेव आणि तपोधन ऋषि दर महिन्यास जात असतात; त्या संनिहतीमध्यें सूर्यग्रहणसमयीं जो स्नान करील ९१, ९२ त्याला त्या ठिकाणीं शंभर अश्वमेध याग केल्याचें अक्षय्य फल प्राप्त होतें. पृथ्वीमध्यें आणि अंतरिक्षामध्यें असलेलीं सर्व तीर्थे ९३, नद्या, सरोवरें, तडाग, सर्वप्रकारचें प्रवाह, जलाशय, वापी आणि पुण्यस्थानें ९४, हीं सर्व, हे प्रजाधिपते, अमावास्येला निःसंशय त्या ठिकाणीं येत असतात. हे पुरुषश्रेष्ठा, दरमहिन्याच्या अमावास्येस ज्याअर्थी निःसंशय सर्व तीर्थे त्या तीर्थाला येत असतात ९५ त्याअर्थी तें तीर्थ संनिहती ह्मणून प्रसिद्ध आहे. त्या ठिकाणीं स्नान करून तेथील उदकाचें पान केलें असतां पुरुषाची स्वर्गलोकीं मानमान्यता रहाते ९६. त्याच ठिकाणीं अमावास्येला सूर्यग्रहणसमयीं

स्नात एव समाप्नोति कृत्वा श्राद्धं च मानवः ९८ यत्किंचिद्दुष्कृतं कर्म स्त्रिया वा पुरुषेण वा । स्नातमात्रस्य तत्सर्वं नश्यते नात्र संशयः ९९ पद्म-वर्णेन यानेन ब्रह्मलोकं प्रपद्यते । अभिवाद्य ततो यक्षं द्वारपालं मचक्रु-कम् २०० कोटितीर्थमुपस्पृश्य लभेद्बहुसुवर्णकम् । गङ्गाह्रदश्च तत्रैव तीर्थं भरतसत्तम १ तत्र स्नायीत धर्मज्ञ ब्रह्मचारी समाहितः । राजसूयाश्व-मेधाभ्यां फलं विन्दति मानवः २ पृथिव्यां नैमिषं तीर्थमन्तरिक्षे च पुष्क-रम् । त्रयाणामपि लोकानां कुरुक्षेत्रं विशिष्यते ३ पांसवोपि कुरुक्षेत्रा-द्वायुना समुदीरिताः । अपि दुष्कृतकर्माणं नयन्ति परमां गतिम् ४ दक्षि-णेन सरस्वत्या उत्तरेण दृषद्वतीम् । ये वसन्ति कुरुक्षेत्रे ते वसन्ति त्रिवि-ष्टपे ५ कुरुक्षेत्रे गमिष्यामि कुरुक्षेत्रे वसाम्यहम् । अप्येकां वाचमुत्सृज्य सर्वपापैः प्रमुच्यते ६ ब्रह्मवेदी कुरुक्षेत्रं पुण्यं ब्रह्मर्षिसेवितम् । तस्मिन्व-सन्ति ये मर्त्या न ते शोच्याः कथंचन ७ तरन्तुकारन्तुकयोर्यदन्तरं राम-

---

जो पुरुष श्राद्ध करितो त्याचें पुण्यफल ऐक ९७. सहस्र अश्वमेध याग उत्तम-प्रकारानें केलें असतां जें फल प्राप्त होतें तें त्या ठिकाणीं केवल स्नान करून श्राद्ध केल्यानेंच पुरुषाला प्राप्त होतें ९८. स्त्रीच्या हातून अथवा पुरुषाच्या हातून जें कांहीं दुष्कर्म घडलें असेल तें तेथें स्नान केल्याबरोबर सर्व निःसशय नाहीसें होतें ९९ आणि पद्मवर्ण यानानें ब्रह्मलोकीं गमन होतें. तदनंतर मचक्रुकनामक द्वारपाल यक्षाला अभि-वंदन करून २०० कोटितीर्थामध्यें स्नान केले असतां पुरुषाला विपुल सुवर्ण प्राप्त होतें. हे भरतवंशजश्रेष्ठा, त्याच ठिकाणी गंगाह्रद ह्मणून तीर्थ आहे १. तेथें ब्रह्मचारी व स्वस्थांतःकरण पुरुषानें स्नान केलें असतां, हे धर्मज्ञ भीष्मा, राजसूय आणि अश्वमेध ह्या यागांनीं मिळणारें फल प्राप्त होतें २. नैमिषारण्यामध्यें पुण्य केले असतां पुरुषाला पृथ्वीवरील सर्व संपत्ति प्राप्त होते. पुष्कर तीर्थाचे ठिकाणी पुण्य केलें असतां पुरुषाला अंतरिक्षांतील सूर्यचंद्रादि मार्गांची आणि ज्योतिश्चक्राची प्राप्ति होते आणि कुरुक्षे-त्रामध्यें वास्तव्य करणाऱ्या पुरुषाला त्रैलोक्यांतील वैभवाची प्राप्ति होऊन तो ब्रह्म-लोकीं जातो ३. कुरुक्षेत्रापासून वायूने उडालेले रजःकण सुद्धां दुष्कर्मी पुरुषालाही मुक्तीला नेतात ४. सरस्वतीच्या दक्षिणेस आणि दृषद्वतीच्या उत्तरेस कुरुक्षेत्रामध्येंच जे वास्तव्य करितात ते स्वर्गामध्येंच राहतात असें समजावें ५. कुरुक्षेत्राला जाईन आणि कुरुक्षेत्रामध्यें वास्तव्य करीन अशा प्रकारचा एकदां उच्चार केला असतांही पुरुष सर्वपातकांपासून मुक्त होतो ६. ब्रह्मर्षींनीं सेवित आणि पुण्यप्रद असें कुरुक्षेत्र ही ब्रह्मवेदि होय. ह्यास्तव, त्या ठिकाणीं जे वास्तव्य करितात ते कधींही शोचनीय होत

ह्रदानां च मचक्रुकस्य च । एतत्कुरुक्षेत्रसमन्तपञ्चकं पितामहस्योत्तरवेदिरुच्यते २०८[३४९९]इति श्रीमहाभारते शतसाह० वैयासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि पुलस्त्यतीर्थयात्रायां त्र्यशीतितमोध्यायः॥ ८३ ॥

पुलस्त्य उवाच ॥ ततो गच्छेन्महाराज धर्मतीर्थमनुत्तमम् । यत्र धर्मो महाभागस्तप्तवानुत्तमं तपः १ तेन तीर्थं कृतं पुण्यं स्वेन नाम्ना च विश्रुतम्। तत्र स्नात्वा नरो राजन्धर्मशीलः समाहितः २ आसप्तमं कुलं चैव पुनीते नात्र संशयः । ततो गच्छेत राजेन्द्र ज्ञानपावनमुत्तमम् ३ अग्निष्टोममवाप्नोति मुनिलोकं च गच्छति । सौगन्धिकवनं राजंस्ततो गच्छेत मानवः४ तत्र ब्रह्मादयो देवा ऋषयश्च तपोधनाः । सिद्धचारणगन्धर्वाः किन्नराश्च महोरगाः ५ तद्वनं प्रविशन्नेव सर्वपापैः प्रमुच्यते । ततश्चापि सरिच्छ्रेष्ठा नदीनामुत्तमा नदी ६ प्लक्षादेवी स्मृता राजन्पुण्यादेवी सरस्वती । तत्राभिषेकं कुर्वीत वल्मीकान्निःसृते जले ७ अर्चयित्वा पितॄन्देवानश्वमेधफलं लभेत् । ईशानाध्युषितं नाम तत्र तीर्थं सुदुर्लभम् ८ षट्सु शम्यानिपातेषु वल्मीकादिति निश्चयः । कपिलानां सहस्रं च वाजिमेधं च विन्दति ९ तत्र

नाहींत ७. तरंतुक, अरंतुक, परशुराम सरोवरें आणि मचक्रुक ह्यांच्या मधला जो कुरुक्षेत्रसमंतपंचक प्रदेश त्याला ब्रह्मदेवाची उत्तर वेदि ह्मणतात २०८. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं पुलस्त्यतीर्थयात्रेविषयीं त्र्यांयशीवा अध्याय समाप्त झाला ॥८३॥

पुलस्त्य ह्मणतात:— तदनंतर, हे महाराजा, अनुपम अशा धर्मतीर्थाला जावें. त्या ठिकाणीं महाभाग्यवान् यमधर्मानें अत्युत्कृष्ट तपश्चर्या केली आहे १ आणि आपल्या नांवानें प्रसिद्ध असें तें स्थान त्यानें पुण्यतीर्थ करून सोडिलें आहे. त्या ठिकाणीं धर्मशील आणि स्वस्थांतःकरणानें युक्त अशा पुरुषानें स्नान केलें असतां, हे राजा २, सात पिढ्यांपर्यंत त्याचें कुल संपन्न होतें ह्यांत संशय नाहीं. तदनंतर, हे राजाधिराज, उत्कृष्ट अशा ज्ञानपावन तीर्थाला जावें; ह्मणजे अग्निष्टोमयागाचें फल मिळून मुनिलोकाची प्राप्ति होते ३. तदनंतर, हे राजा, पुरुषानें सौगंधिक वनाला जावें ४. त्या ठिकाणीं ब्रह्मादिदेव, तपोधन, ऋषि, सिद्ध, चारण, गंधर्व, किन्नर आणि महोरग वास्तव्य करीत असतात ५. ह्यास्तव, त्या वनामध्यें प्रवेश करितां करितांच पुरुष सर्व पातकांपासून मुक्त होतो. तेथें प्लक्षा देवी आणि पुण्या देवी ह्मणून प्रसिद्ध असलेली व नेहमीं उदकानें युक्त असलेली अशी श्रेष्ठ नदी आहे आणि ती सर्व नद्यांमध्यें उत्तम आहे. त्या ठिकाणीं वारुळापासून निघालेल्या उदकामध्यें स्नान करून ६,७ पितरांचें आणि देवांचें पूजन केलें असतां पुरुषाला अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें. त्या

स्नात्वा नरव्याघ्र दृष्टमेतत्पुरातने। सुगन्धां शतकुम्भां च पञ्चयक्षां च भारत १०
अभिगम्य नरश्रेष्ठ स्वर्गलोके महीयते । त्रिशूलखातं तत्रैव तीर्थमासाद्य
भारत ११ तत्राभिषेकं कुर्वीत पितृदेवार्चने रतः। गाणपत्यं च लभते देहं
त्यक्त्वा न संशयः १२ ततो गच्छेत राजेन्द्र देव्याः स्थानं सुदुर्लभम् ।
शाकम्भरीति विख्याता त्रिषु लोकेषु विश्रुता १३ दिव्यं वर्षसहस्रं हि
शाकेन किल सुव्रता । आहारं सा कृतवती मासि मासि नराधिप १४
ऋषयोऽभ्यागतास्तत्र देव्या भक्त्या तपोधनाः। आतिथ्यं च कृतं तेषां शाकेन
किल भारत १५ ततः शाकम्भरीत्येव नाम तस्याः प्रतिष्ठितम् । शाक-
म्भरीं समासाद्य ब्रह्मचारी समाहितः १६ त्रिरात्रमुषितः शाकं भक्षयित्वा
नरः शुचिः । शाकाहारस्य यत्किंचिद्वर्षैर्द्वादशभिः कृतम् १७ तत्फलं
तस्य भवति देव्याश्छन्देन भारत । ततो गच्छेत्सुवर्णाख्यं त्रिषु लोकेषु

वारुळापासून अगदीं बरोबर सहा शम्यानिपातावर अत्यंत दुर्लभ असें ईशानाध्युषितनामक तीर्थ आहे. त्या ठिकाणीं स्नान केलें असतां, हे पुरुषश्रेष्ठ भीष्मा, सहस्र कपिला दिल्याचें फल मिळून अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें असें पुरातन ग्रंथांत लिहिलेलें आहे. हे भरतकुलोत्पन्ना, सुगंधा, शतकुंभा आणि पंचयक्षा ह्यांना ८,९,१० जावें; ह्मणजे, हे पुरुषश्रेष्ठा, स्वर्गलोकामध्यें मानमान्यता होते. हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, त्याच ठिकाणीं असलेल्या त्रिशूलखातनामक तीर्थाला जावें ११ आणि स्नान करून पितर व देव ह्यांच्या पूजनाविषयीं तत्पर रहावें; ह्मणजे देहत्यागानंतर निःसंशय गाणपत्य प्राप्त होतें १२. तदनंतर, हे राजाधिराज, त्रैलोक्यविख्यात आणि शाकंभरी ह्मणून प्रसिद्ध अशी जी देवी तिच्या अत्यंत दुर्लभस्थानाला जावें १३. हे प्रजाधिपते, देवांचीं हजार वर्षें त्या सदाचरणसंपन्न देवीनें दरमहिन्यास एकदा शाकाहार करून तपश्चर्या केली १४ आणि तपोधन ऋषि तेथें आले असतां, हे भरतकुलोत्पन्ना, त्या देवीनें शाकांच्या योगानें भक्तिपूर्वक त्यांचें आदरातिथ्य केलें १५ ह्मणून शाकंभरी हेंच तिचें नांव पडलें. ब्रह्मचारी आणि स्वस्थचित्त पुरुषानें शाकंभरीला जाऊन १६ त्रिरात्र वास्तव्य करावें आणि शाक भक्षण करून शुचि असावें, ह्मणजे बारा वर्षें शाक भक्षण करून राहिल्यानें जें कांहीं फल प्राप्त होत असतें १७ तें फल, हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, देवीच्या इच्छेनें त्याला प्राप्त होतें. तदनंतर त्रैलोक्यविख्यात अशा सुवर्णाख्य तीर्थाला

---

१ भ्रामयित्वा शतगुणं यष्टिः क्षिप्ता समाप्नुयात् । भुवः प्रदेशं यावन्तं शम्यापातः स उच्यते ॥ अर्थः—शंभरवेळ काठी फिरवून फेकून दिली असतां ती जितक्या अंतरावर जाऊन पडेल तितक्या अंतराला शम्यापात असें ह्मणतात.

विश्रुतम् १८ तत्र विष्णुः प्रसादार्थं रुद्रमाराधयत्पुरा । वरांश्च सुबहूँल्लेभे दैव-
तेषु सुदुर्लभान् १९ उक्तश्च त्रिपुरघ्नेन परितुष्टेन भारत । अपि च त्वं प्रिय-
तरो लोके कृष्ण भविष्यसि २० त्वन्मुखं च जगत्सर्वं भविष्यति न संशयः ।
तत्राभिगम्य राजेन्द्र पूजयित्वा वृषध्वजम् २१ अश्वमेधमवाप्नोति गाण-
पत्यं च विन्दति । धूमावतीं ततो गच्छेत्त्रिरात्रोपोषितो नरः २२ मनसा
प्रार्थितान्कामाल्लँभते नात्र संशयः । देव्यास्तु दक्षिणार्धेन रथावर्तो नरा-
धिप २३ तत्रारोहेत धर्मज्ञ श्रद्दधानो जितेन्द्रियः । महादेवप्रसादाद्धि
गच्छेत परमां गतिम् २४ प्रदक्षिणमुपावृत्य गच्छेत भरतर्षभ । धारां नाम
महाप्राज्ञः सर्वपापप्रमोचनीम् २५ तत्र स्नात्वा नरव्याघ्र न शोचति नरा-
धिप । ततो गच्छेत धर्मज्ञ नमस्कृत्य महागिरिम् २६ स्वर्गद्वारेण यत्तुल्यं
गङ्गाद्वारं न संशयः । तत्राभिषेकं कुर्वीत कोटितीर्थे समाहितः २७ पुण्ड-
रीकमवाप्नोति कुलं चैव समुद्धरेत् । उष्यैकां रजनीं तत्र गोसहस्रफलं
लभेत् २८ सप्तगङ्गे त्रिगङ्गे च शक्रावर्ते च तर्पयन् । देवान्पितॄंश्च विधिव-

---

जावें १८. त्या ठिकाणीं रुद्राची कृपा व्हावी एतदर्थ विष्णूनें पूर्वी त्याचें आराधन केलें आणि इतर देवतांना अत्यंत दुर्लभ असें पुष्कळ वर त्यानें प्राप्त करून घेतले १९. इतकेंच नव्हें परंतु हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, त्रिपुरनाशक रुद्र संतुष्ट होऊन त्याला ह्मणाला " हे कृष्णा, तूं इतरापेक्षां लोकांना अधिक प्रिय होशील २० आणि सर्व जगतामध्यें तूंच मुख्य होशील ह्यांत संशय नाहीं. हे राजाधिराज, त्या ठिकाणीं जाऊन शिवपूजन केलें असतां २१ अश्वमेध यागाचें फल मिळून रुद्रगणांचें आधिपत्य प्राप्त होतें. तदनंतर धूमावतीला जाऊन पुरुषानें त्रिरात्र उपोषण करावें २२ ह्मणजे मनांत इच्छिलेले हेतु निःसंशय सिद्धीस जातात. हे प्रजाधिपते, देवीच्या दक्षिण बाजूला रथावर्त आहे २३. त्यावर, हे धर्मज्ञ भीष्मा, श्रद्धालु व जितेंद्रिय पुरुषानें आरोहण करावें ह्मणजे महादेवाच्या कृपेनें त्याला उत्कृष्ट गति प्राप्त होते २४. तदनंतर हे भरत-वंशजश्रेष्ठा महाबुद्धिमान् भीष्मा, सर्व पापनाशक धारा नदीला जावें २५ आणि, हे पुरुषश्रेष्ठा राजा, तेथें स्नान करावें ह्मणजे पुरुषाला शोक कर याचें कारण रहात नाहीं. तदनंतर, हे धर्मवेत्त्या, महापर्वताला नमस्कार करून स्वर्गद्वाराशीं समान असलेल्या गंगाद्वाराला जावें आणि तेथें स्वस्थांतःकरणपूर्वक कोटितीर्थामध्यें स्नान करावें २६,२७; ह्मणजे पुंडरीक यागाचें फल प्राप्त होऊन कुलाचा उद्धार होतो व त्या ठिकाणीं एक रात्र वास्तव्य केलें असतां सहस्र गोप्रदानें केल्याचें फल प्राप्त होतें २८. सप्तगंगा, त्रिगंगा आणि शक्रावर्त ह्या तीर्थांचे ठिकाणीं देवपितरांचें यथाविधि तर्पण केल्यानें

त्पुण्ये लोके महीयते २९ ततः कनखले स्नात्वा त्रिरात्रोपोषितो नरः।
अश्वमेधमवाप्नोति स्वर्गलोकं च गच्छति ३० कपिलावटं ततो गच्छेत्ती-
र्थसेवी नराधिप। उपोष्य रजनीं तत्र गोसहस्रफलं लभेत् ३१ नागरा-
जस्य राजेन्द्र कपिलस्य महात्मनः। तीर्थं कुरुवरश्रेष्ठ सर्वलोकेषु विश्रु-
तम् ३२ तत्राभिषेकं कुर्वीत नागतीर्थे नराधिप। कपिलानां सहस्रस्य
फलं विन्दति मानवः ३३ ततो ललितकं गच्छेच्छान्तनोस्तीर्थमुत्तमम्।
तत्र स्नात्वा नरो राजन्न दुर्गतिमवाप्नुयात् ३४ गङ्गायमुनयोर्मध्ये स्नाति यः
संगमे नरः। दशाश्वमेधानाप्नोति कुलं चैव समुद्धरेत् ३५ ततो गच्छेत
राजेन्द्र सुगन्धं लोकविश्रुतम्। सर्वपापविशुद्धात्मा ब्रह्मलोके महीयते ३६
रुद्रावर्तं ततो गच्छेत्तीर्थसेवी नराधिप। तत्र स्नात्वा नरो राजन्स्वर्गलोके
च गच्छति ३७ गङ्गायाश्च नरश्रेष्ठ सरस्वत्याश्च संगमे। स्नात्वाश्वमेधं
प्राप्नोति स्वर्गलोकं च गच्छति ३८ भद्रकर्णेश्वरं गत्वा देवमर्च्य यथा-
विधि। न दुर्गतिमवाप्नोति नाकपृष्ठे च पूज्यते ३९ ततः कुब्जाम्रके गच्छे-

---

पुरुषाची पुण्यलोकामध्यें मानमान्यता होते २९. तदनंतर कनखल तीर्थामध्यें स्नान करून त्रिरात्र उपोषण करावें ह्मणजे पुरुषाला अश्वमेधयागाचें फल प्राप्त होऊन स्वर्गलोक प्राप्त होतो ३०. तदनंतर, हे प्रजाधिपते, तीर्थवासी पुरुषानें कपिलावटाला जाऊन त्या ठिकाणी एक रात्र वास्तव्य करावें; ह्मणजे सहस्र गोप्रदानांचे फल प्राप्त होतें ३१. हे राजाधिराज कुरुवंशजश्रेष्ठ भीष्मा, नागराज महात्म्या कपिलाचें सर्व लोकांमध्यें विख्यात असें जे तीर्थ आहे ३२ त्या नागतीर्थामध्यें स्नान करावें ह्मणजे, हे प्रजाधिपते, सहस्र कपिला दान केल्याचें फल पुरुषाला प्राप्त होतें ३३. तदनंतर शांतनूच्या ललितनामक उत्कृष्ट तीर्थाला जावें आणि तेथें स्नान करावें; ह्मणजे, हे राजा, पुरुषाला दुर्गति प्राप्त होत नाही ३४. गंगायमुनांच्या संगमामध्यें जो पुरुष स्नान करितो त्याला दहा अश्वमेधयागाचें फल प्राप्त होऊन त्याच्या कुलाचा उद्धार होतो ३५. तदनंतर, हे राजाधिराज, जगत्प्रसिद्ध अशा सुगंधक तीर्थाला जा (ऊन तेथें स्नान करा) वें ह्मणजे सर्व दोषापासून अंतःकरण शुद्ध होऊन पुरुषाला ब्रह्मलोकाची प्राप्ति होते ३६. तदनंतर, हे प्रजाधिपते राजा, तीर्थवासी पुरुषानें रुद्रावर्ततीर्थाला जाऊन तेथें स्नान करावें ह्मणजे त्याला स्वर्गलोकाची प्राप्ति होते ३७. हे पुरुषश्रेष्ठ भीष्मा, गंगा आणि सरस्वती यांच्या संगमामध्यें स्नान केलें असतां पुरुषाला अश्वमेधयागाचें फल प्राप्त होऊन स्वर्गलोकाची प्राप्ति होते ३८. भद्रकर्णेश्वर देवाला जाऊन त्याचें पूजन केलें असतां दुर्गति प्राप्त न होतां स्वर्गलोकामध्यें प्रशंसा होते ३९. तदनंतर, हे प्रजाधिपते, तीर्थवासी पुरुषानें कुब्जाम्रक-

त्तीर्थसेवी नराधिप। गोसहस्रमवाप्नोति स्वर्गलोकं च गच्छति ४०
अरुन्धतीवटं गच्छेत्तीर्थसेवी नराधिप। सामुद्रकमुपस्पृश्य ब्रह्मचारी
समाहितः ४१ अश्वमेधमवाप्नोति त्रिरात्रोपोषितो नरः। गोसहस्रफलं
विद्यात्कुलं चैव समुद्धरेत् ४२ ब्रह्मावर्तं ततो गच्छेद्ब्रह्मचारी समाहितः।
अश्वमेधमवाप्नोति सोमलोकं च गच्छति ४३ यमुनाप्रभवं गत्वा समु-
पस्पृश्य यामुनम्। अश्वमेधफलं लब्ध्वा स्वर्गलोके महीयते ४४ दर्वी-
संक्रमणं प्राप्य तीर्थं त्रैलोक्यपूजितम्। अश्वमेधमवाप्नोति स्वर्गलोकं च
गच्छति ४५ सिन्धोश्च प्रभवं गत्वा सिद्धगन्धर्वसेवितम्। तत्रोष्य रजनीः
पञ्च विन्देद्बहुसुवर्णकम् ४६ अथ वेदीं समासाद्य नरः परमदुर्गमाम्।
अश्वमेधमवाप्नोति स्वर्गलोकं च गच्छति ४७ ऋषिकुल्यां समासाद्य
वासिष्ठं चैव भारत। वासिष्ठीं समतिक्रम्य सर्वे वर्णा द्विजातयः ४८
ऋषिकुल्यां समासाद्य नरः स्नात्वा विकल्मषः। देवान्पितॄंश्चार्चयित्वा
ऋषिलोकं प्रपद्यते ४९ यदि तत्र वसेन्मासं शाकाहारो नराधिप।

नामक तीर्थाला जा (ऊन तेथें स्नान करा) वें ह्मणजे सहस्र गोप्रदानांचें फल मिळून स्वर्ग-
लोक प्राप्त होतो ४०. तदनतर, हे प्रजाधिपते भीष्मा, तीर्थवासी पुरुषानें अरुंधती-
वटाला जावें आणि ब्रह्मचारी व स्वस्थ मनानें राहून समुद्रस्नान करावें ४१; ह्मणजे
अश्वमेधयागाचें फल प्राप्त होतें आणि त्रिरात्र उपोषण केलें असतां सहस्र गोप्रदानांचें
फल प्राप्त होऊन कुलाचा उद्धार होतो ४२. तदनंतर ब्रह्मावर्ततीर्थाला जाऊन
ब्रह्मचर्यानें व स्वस्थ मनानें रहावें ह्मणजे अश्वमेधयागाचें फल मिळून सोम-
लोकाची प्राप्ति होते ४३. यमुनाप्रभव तीर्थाला जाऊन यमुनेच्या उदकामध्यें
स्नान केलें असतां अश्वमेध यागाचें फल प्राप्त होऊन स्वर्गलोकामध्यें मान
मिळतो ४४. तदनंतर त्रैलोक्यमान्य दर्वीसंक्रमण तीर्थाला जा (ऊन स्नान करा) वें
ह्मणजे अश्वमेध यागाचें फल मिळून स्वर्गलोकाची प्राप्ति होते ४५. सिद्ध व गंधर्व
ह्यांनीं सेवित अशा सिंधुप्रभव तीर्थाला जाऊन त्या ठिकाणीं पांच रात्री वास्तव्य करावें;
ह्मणजे विपुल सुवर्ण प्राप्त होतें ४६. तदनतर जाण्याला अतिशय कठीण अशा वेदीच्या
यात्रेला जावें ह्मणजे अश्वमेधयागाचें फल मिळून स्वर्गलोकाची प्राप्ति होते ४७. हे
भरतकुलोत्पन्ना भीष्मा, ऋषिकुल्या, वसिष्ठ आणि वासिष्ठी ह्या तीर्थांना गेलें असतां
कोणत्याही वर्णांतील पुरुषाला ब्राह्मणजन्म प्राप्त होतो ४८. ऋषिकुल्येला जाऊन स्नान
केलें असतां पुरुष निष्पाप होतो आणि, हे प्रजाधिपते, शाकाहार करून एक महिना-
भर जर तेथें वास्तव्य केलें आणि देव पितरांचें पूजन केलें तर ऋषिलोकाची प्राप्ति

भृगुतुङ्गं समासाद्य वाजिमेधफलं लभेत् ५० गत्वा वीरप्रमोक्षं च सर्व-पापैः प्रमुच्यते। कृत्तिकामघयोश्चैव तीर्थमासाद्य भारत ५१ अग्निष्टो-मातिरात्राभ्यां फलमाप्नोति मानवः। तत्र सन्ध्यां समासाद्य विद्यातीर्थ-मनुत्तमम् ५२ उपस्पृश्य च वै विद्यां यत्र तत्रोपपद्यते। महाश्रमे वसे-द्रात्रिं सर्वपापप्रमोचने ५३ एककालं निराहारो लोकानावसते शुभान्। षष्ठकालोपवासेन मासमुष्य महालये ५४ सर्वपापविशुद्धात्मा विन्देद्बहु-सुवर्णकम्। दशापरान्दश पूर्वान्नरानुद्धरते कुलम् ५५ अथ वेतसिकां गत्वा पितामहनिषेविताम्। अश्वमेधमवाप्नोति गच्छेदौशनसीं गतिम् ५६ अथ सुन्दरिकातीर्थं प्राप्य सिद्धनिषेवितम्। रूपस्य भागी भवति दृष्टमेतत्पुरा-तनैः ५७ ततो वै ब्राह्मणीं गत्वा ब्रह्मचारी जितेन्द्रियः। पद्मवर्णेन यानेन ब्रह्मलोकं प्रपद्यते ५८ ततस्तु नैमिषं गच्छेत्पुण्यं सिद्धनिषेवितम्। तत्र नित्यं निवसति ब्रह्मा देवगणैः सह ५९ नैमिषं मृगयाणस्य पापस्यार्धं प्रणश्यति। प्रविष्टमात्रस्तु नरः सर्वपापैः प्रमुच्यते ६० तत्रमासं वसे-

---

होते. हे प्रजाधिपते, भृगुतुंगाची यात्रा केली असतां अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें ४९, ५०. वीरप्रमोक्षाला गेल्यानें सर्व पातकांपासून पुरुष मुक्त होतो आणि, हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, कृत्तिका व मघा ह्यांच्या तीर्थाला गेल्यानें ५१ पुरुषाला अग्नि-ष्टोम आणि अतिरात्र ह्या यागांनीं मिळणारें फल प्राप्त होतें. त्या ठिकाणीं संध्यासमयीं उत्कृष्ट अशा विद्यातीर्थाला जावें ५२ आणि विद्यातीर्थामध्यें स्नान करावें, ह्मणजे पुरुषाला हवी तेथील उपपत्ति माहिती होते. सर्व पापनाशक अशा महाश्रमामध्यें एक रात्र वास्तव्य करून ५३ एक वेळ निराहार केला असतां शुभ लोक प्राप्त होतात. तीन दिवसांनीं उपोषण करून एक महिनाभर महालय तीर्थाचे ठिकाणीं वास्तव्य केलें असतां ५४ पुरुषाचें मन सर्व दोषापासून मुक्त होतें; त्याला विपुल सुवर्ण प्राप्त होतें आणि कुलांतील मागल्या पुढल्या दहा दहा पिढ्या उद्धरून जातात ५५. तदनंतर ब्रह्मदे-वांनीं सेवित अशा वेतसिकेला जावें; ह्मणजे अश्वमेध यागाचें फल मिळून उशनस् मुनींना मिळालेली गति प्राप्त होते ५६. तदनंतर सिद्धांनीं सेवित अशा सुंदरिका तीर्थाला गेलें असतां पुरुष रूपवान् होतो असें पुरातन लोकांचें ह्मणणें आहे ५७. तदनंतर ब्राह्मणी तीर्थाला जाऊन ब्रह्मचारी व जितेंद्रिय रहावें; ह्मणजे पद्मवर्ण यानानें पुरुष ब्रह्मलोकाला जातो ५८. तदनंतर सिद्धांनीं सेवित व पवित्र अशा नैमिषार-ण्याला जावें. त्या ठिकाणीं देवगणांसहवर्तमान ब्रह्मदेव वास्तव्य करीत असतात ५९. नैमिषारण्यांत जाण्याला निघाल्यानें अर्धें पाप नाहींसें होतें व त्यांत प्रविष्ट होतांक्षणीं

द्धीरो नैमिषे तीर्थतत्परः। पृथिव्यां यानि तीर्थानि तानि तीर्थानि नैमिषे ६१
कृताभिषेकस्तत्रैव नियतो नियताशनः। गवां मेधस्य यज्ञस्य फलं प्राप्नोति
भारत ६२ पुनात्यासप्तमं चैव कुलं भरतसत्तम । यस्त्यजेन्नैमिषे प्राणा-
नुपवासपरायणः ६३ स मोदेत्सर्वलोकेषु एवमाहुर्मनीषिणः।नित्यं मेध्यं च
पुण्यं च नैमिषं नृपसत्तम ६४ गङ्गोद्भेदं समासाद्य त्रिरात्रोपोषितो नरः।
वाजपेयमवाप्नोति ब्रह्मभूतो भवेत्सदा ६५ सरस्वतीं समासाद्य तर्पयेत्पि-
तृदेवताः। सारस्वतेषु लोकेषु मोदते नात्र संशयः ६६ ततश्च बाहुदां गच्छे-
द्ब्रह्मचारी समाहितः । तत्रोष्य रजनीमेकां स्वर्गलोके महीयते ६७ देव-
सत्रस्य यज्ञस्य फलं प्राप्नोति कौरव । ततः क्षीरवतीं गच्छेत्पुण्यां पुण्य-
तरैर्वृताम् ६८ पितृदेवार्चनपरो वाजपेयमवाप्नुयात् । विमलाशोकमासाद्य
ब्रह्मचारी समाहितः ६९ तत्रोष्य रजनीमेकां स्वर्गलोके महीयते। गोप्र-
तारं ततो गच्छेत्सरय्वास्तीर्थमुत्तमम् ७० यत्र रामो गतः स्वर्गं सभृत्यब-

---

पुरुष सर्व पापांपासून मुक्त होतो ६०. तीर्थयात्रेविषयीं तत्पर असलेल्या ज्ञानी पुरुषानें त्या नैमिषारण्यामध्यें एक महिनाभर वास्तव्य करावें. पृथ्वीमध्यें जितकीं तीर्थें आहेत तितकीं नैमिषारण्यामध्यें आहेत ६१. ह्यास्तव, जितेंद्रिय पुरुषानें मिताहारी राहून त्या ठिकाणीं स्नान करावें; ह्मणजे, हें भरतकुलोत्पन्ना भीष्मा, गोमेध यागाचें फल त्याला प्राप्त होतें ६२ आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा, कुलांतील सात पुरुषांचा उद्धार होतो. एकसारिखे उपवास करून जो नैमिषारण्यामध्यें प्राणत्याग करितो ६३ तो सर्व लोकांमध्यें आनंदानें रा.तो असें ज्ञानी पुरुष ह्मणतात. हे नृपश्रेष्ठा, नैमिषारण्य हें नेहमींच पवित्र व पुण्यप्रद आहे ६४. गंगोद्भेद तीर्थाला जाऊन त्रिरात्र उपोषण करावें; ह्मणजे वाजपेय यागाचें फल प्राप्त होऊन पुरुष ब्रह्मस्वरूप होतो ६५. सरस्वती नदीला जाऊन देव-पितरांचें तर्पण करावें ह्मणजे पुरुष सारस्वत लोकामध्यें आनंदानें राहतो ह्यांत संशय नाहीं ६६. तदनंतर ब्रह्मचारी व स्वस्थांतःकरणानें युक्त अशा पुरुषानें बाहुला नदीला जाऊन तेथें एक रात्र वास्तव्य करावें; ह्मणजे स्वर्गलोकामध्यें त्याची मानमान्यता हाते ६७ आणि, हे कुरुवंशजा, देवसत्र यज्ञाचें फल त्याला प्राप्त होतें. तदनंतर अतिशय पुण्यवान् पुरुषांनीं व्याप्त असलेल्या पुण्यकारक क्षीरवती नदीला जावें ६८ आणि देवपितरांच्या पूजनामध्यें तत्पर असावें ह्मणजे वाजपेय यागाचें फल प्राप्त होतें. ब्रह्मचारी व स्वस्थ मनानें युक्त अशा पुरुषानें विमला-शोक तिर्थाला जाऊन ६९ तेथें एक रात्र वास्तव्य करावें ह्मणजे स्वर्गलोकामध्यें त्याची मानमान्यता होते. तदनंतर सरयूनदीचे तीरीं असलेल्या गोप्रतारनामक उत्कृष्ट

लवाहनः । देहं त्यक्त्वा महाराज तस्य तीर्थस्य तेजसा ७१ रामस्य च प्रसादेन व्यवसायाच्च भारत । तस्मिंस्तीर्थे नरः स्नात्वा गोप्रतारे नराधिप ७२ सर्वपापविशुद्धात्मा स्वर्गलोके महीयते । रामतीर्थे नरः स्नात्वा गोमत्यां कुरुनन्दन ७३ अश्वमेधमवाप्नोति पुनाति च कुलं नरः । शतसाहस्रकं तीर्थं तत्रैव भरतर्षभ ७४ तत्रोपस्पर्शनं कृत्वा नियतो नियताशनः । गोसहस्रफलं पुण्यं प्राप्नोति भरतर्षभ ७५ ततो गच्छेत राजेन्द्र भर्तृस्थानमनुत्तमम् । अश्वमेधस्य यज्ञस्य फलं प्राप्नोति मानवः ७६ कोटितीर्थे नरः स्नात्वा अर्चयित्वा गुहं नृप । गोसहस्रफलं विद्यात्तेजस्वी च भवेन्नरः ७७ ततो वाराणसीं गत्वा अर्चयित्वा वृषध्वजम् । कपिलाह्रदे नरः स्नात्वा राजसूयमवाप्नुयात् ७८ अविमुक्तं समासाद्य तीर्थसेवी कुरूद्वह । दर्शनाद्देवदेवस्य मुच्यते ब्रह्महत्यया ७९ प्राणानुत्सृज्य तत्रैव मोक्षं प्राप्नोति मानवः । मार्कण्डेयस्य राजेन्द्र तीर्थमासाद्य दुर्लभम् ८० गोमतीगङ्गयो-

---

तीर्थाला जावें ७०. त्याठिकाणीं, हे महाराजा, सेवक, सैन्य आणि वाहने ह्यांसहवर्तमान राम देहत्याग करून त्या तीर्थाच्या तेजानें स्वर्गाला गेला ७१. हे भरतकुलोत्पन्ना राजा, त्या गोप्रतारतीर्थामध्ये स्नान केलें असतां रामाच्या प्रसादानें आणि व्यवसायाने पुरुष ७२ अंतःकरणांतील सर्व दोष नाहींसे होऊन स्वर्गलोकामध्यें मानमान्यता पावतो. हे कुरुनदना, गोमती नदीचे तीरी रामतीर्थामध्ये स्नान केलें असतां ७३ अश्वमेधयागाचें फल प्राप्त होऊन कुल पवित्र होतें. हे भरतवंशजश्रेष्ठ, तेथेंच शतसाहस्रक तीर्थ आहे ७४. त्या तीर्थामध्ये स्नान करून जितेंद्रिय व मिताहारी रहावें; ह्मणजे, हे भरतोत्तमा, सहस्र गोप्रदानाचें फल प्राप्त होतें ७५. तदनंतर, हे राजाधिराज, अत्युत्कृष्ट भर्तृस्थाननामक तीर्थाला जावें; ह्मणजे पुरुषाला अश्वमेधयागाचें फल प्राप्त होतें ७६. हे राजा, कोटितीर्थामध्ये स्नान करून कार्तिकस्वामीचें पूजन करावें; ह्मणजे सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होऊन पुरुष तेजस्वी होतो ७७. तदनंतर वाराणशीला जाऊन शिवार्चन करावें आणि कपिला सरोवरामध्ये स्नान करावें; ह्मणजे पुरुषाला राजसूय यागाचें फल प्राप्त होतें ७८. हे कुरुवंशजश्रेष्ठ भीष्मा, अविमुक्त तीर्थाला जाऊन देवाधिदेव महादेवाचें दर्शन घेतलें असतां तीर्थवासी पुरुष ब्रह्महत्येच्या पातकापासून मुक्त होतो ७९ आणि त्याच ठिकाणी प्राणत्याग केला असतां पुरुषाला मोक्षप्राप्ति होते. हे राजाधिराज, मार्कंडेयांच्या दुर्लभ तीर्थाला जावें ८० आणि गोमती व गंगा यांच्या जगत्प्रसिद्ध संगमामध्यें स्नान करावें; ह्मणजे अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होऊन कुलाचा उद्धार होतो ८१. तदनंतर गयेस जाऊन ब्रह्मचारी व

श्चैव संगमे लोकविश्रुते। अग्निष्टोममवाप्नोति कुलं चैव समुद्धरेत् ८१
ततो गयां समासाद्य ब्रह्मचारी समाहितः। अश्वमेधमवाप्नोति गमनादेव
भारत ८२ तत्राक्षयवटो नाम त्रिषु लोकेषु विश्रुतः। तत्र दत्तं पितृभ्यस्तु
भवत्यक्षयमुच्यते ८३ महानद्यामुपस्पृश्य तर्पयेत्पितृदेवताः। अक्षयान्प्राप्नु-
याल्लोकान्कुलं चैव समुद्धरेत् ८४ ततो ब्रह्मसरो गत्वा धर्मारण्योपशो-
भितम्। ब्रह्मलोकमवाप्नोति प्रभातामेव शर्वरीम् ८५ ब्रह्मणा तत्र सरसि
यूपश्रेष्ठः समुच्छ्रितः। यूपं प्रदक्षिणीकृत्वा वाजपेयफलं लभेत् ८६ ततो
गच्छेत राजेन्द्र धेनुकं लोकविश्रुतम्। एकरात्रोषितो राजन्प्रयच्छेत्ति-
लधेनुकाम् ८७ सर्वपापविशुद्धात्मा सोमलोकं व्रजेद्ध्रुवम्। तत्रचिह्नं
महद्राजन्नद्यापि सुमहद्भृशम् ८८ कपिलायाः सवत्सायाश्चरन्त्याः पर्वते
कृतम्। सवत्सायाः पदानि स्म दृश्यन्तेऽद्यापि भारत ८९ तेषूपस्पृश्य
राजेन्द्र पदेषु नृपसत्तम। यत्किंचिदशुभं कर्म तत्प्रणश्यति भारत ९०
ततो गृध्रवटं गच्छेत्स्थानं देवस्य धीमतः। स्नायीत भस्मना तत्र अभिगम्य
वृषध्वजम् ९१ ब्राह्मणेन भवेच्चीर्णं व्रतं द्वादशवार्षिकम्। इतरेषां तु वर्णानां

स्वस्थचित्त असावें; ह्मणजे, हे भरतकुलोत्पन्ना, तुमच्या जाण्यानेंच अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें ८२. त्रैलोक्यविख्यात अक्षय वट आहे. त्या ठिकाणीं पितरांच्या उद्देशानें दान दिलें असतां तें अक्षय होतें असें ह्मणतात ८३. महानदीमध्यें स्नान करून देवपितरांचें तर्पण केलें असतां अक्षय लोक प्राप्त होऊन कुलाचा उद्धार होतो ८४. तदनंतर धर्मारण्यानीं शोभित अशा ब्रह्मसरोवराला जाऊन रात्र उजाडतां-क्षणीं स्नान करावें; ह्मणजे ब्रह्मलोक प्राप्त होतो ८५. त्या सरोवराचे ठिकाणीं ब्रह्मदेवानें एक श्रेष्ठ यज्ञस्तंभ उभारिलेला आहे. त्या यज्ञस्तंभाला प्रदक्षिणा केली असतां वाजपेय यागाचें फल प्राप्त होतें ८६. तदनंतर, हे राजाधिराज, लोकविख्यात धेनुक तीर्थाला जावें आणि, हे राजा, एक रात्र राहून तिलधेनूचें दान द्यावें ८७; ह्मणजे चित्ताचे सर्व दोष नाहींसे होऊन पुरुष सत्वर सोमलोकाप्रत जातो. हे राजा, वत्सासहवर्तमान कपिला चरत आहे अशी एक मोठी खूण अद्यापि त्या पर्वतावर वारंवार दृष्टोत्पत्तीस येत असते. हे भरतकुलोत्पन्ना, वत्सासहवर्तमान कपिलेचीं पाउलें तेथें अद्यापि दिसतात ८८, ८९. हे नृपश्रेष्ठ राजाधिराज भरतवंशज भीष्मा, त्या पाउलां-मध्यें स्नान केलें असतां जें जें ह्मणून कांहीं अशुभ कर्म हातून झालें असेल तें सर्व नाहींसें होतें ९०. तदनंतर ज्ञानवान् महादेवाचें स्थान जो गृध्रवट तेथें जावें आणि भस्मस्नान करून शंकराचें दर्शन घ्यावें ९१ ह्मणजे ब्राह्मणाला बारा वर्षेपर्यंत व्रतस्थ

सर्वपापं प्रणश्यति ९२ उद्यन्तं च ततो गच्छेत्पर्वतं गीतनादितम्। सावि-
त्र्यास्तु पदं तत्र दृश्यते भरतर्षभ ९३ तत्र सन्ध्यामुपासीत ब्राह्मणः संशि-
तव्रतः। तेन ह्युपास्ता भवति सन्ध्या द्वादशवार्षिकी ९४ योनिद्वारं च
तत्रैव विश्रुतं भरतर्षभ। तत्राभिगम्य मुच्येत पुरुषो योनिसंकटात् ९५
कृष्णशुक्लावुभौ पक्षौ गयायां यो वसेन्नरः। पुनात्यासप्तमं राजन्कुलं नास्त्यत्र
संशयः ९६ एष्टव्या बहवः पुत्रा यद्येकोपि गयां व्रजेत्। यजेत वाश्वमेधेन
नीलं वा वृषमुत्सृजेत् ९७ ततः फल्गुं व्रजेद्राजंस्तीर्थसेवी नराधिप। अश्वमे-
धमवाप्नोति सिद्धिं च महतीं व्रजेत् ९८ ततो गच्छेत राजेन्द्र धर्मप्रस्थं समा-
हितः। तत्र धर्मो महाराज नित्यमास्ते युधिष्ठिर ९९ तत्र कूपोदकं कृत्वा
तेन स्नातः शुचिस्तथा। पितॄन्देवांस्तु संतर्प्य मुक्तपापो दिवं व्रजेत् १००
मतङ्गस्याश्रमस्तत्र महर्षेर्भावितात्मनः। तं प्रविश्याश्रमं श्रीमच्छ्रमशोकवि-
नाशनम् १ गवामयनयज्ञस्य फलं प्राप्नोति मानवः। धर्मं तत्राभिसंस्पृश्य
वाजिमेधमवाप्नुयात् २ ततो गच्छेत राजेन्द्र ब्रह्मस्थानमनुत्तमम्। तत्राभिगम्य

राहिल्याचें फल प्राप्त होतें आणि इतर वर्णांतील पुरुषांचें सर्व पातक नाहींसें होतें ९२. हे भरतवंशजश्रेष्ठा, गीतानें नादित अशा उद्यंत पर्वताला जावें. त्या ठिकाणीं सावित्रीचें पद दिसत असतें ९३. निर्मल व्रतानें चालणाऱ्या ब्राह्मणांनीं त्या ठिकाणीं एक वेळ संध्या केली असतां बारा वर्षेपर्यंत संध्या केल्याचें फल त्याला प्राप्त होतें ९४. हे भरतवंशजश्रेष्ठा, तेथेंच योनिद्वार ह्मणून प्रख्यात तीर्थ आहे. तेथें गेल्यानें पुरुषाला पुनर्जन्म प्राप्त होत नाहीं ९५. हे राजा, कृष्ण व शुक्ल असे दोन्ही पक्ष जो गयेमध्यें वास्तव्य करितो तो सात पुरुषांपर्यंत आपलें कुल पवित्र करितो ह्यांत संशय नाहीं ९६. पुष्कळ पुत्र प्राप्त होण्याची इच्छा धरावी; ह्मणजे त्यांपैकीं एकादा तरी गयेला जाईल, कोणी तरी अश्वमेध करील अथवा एकादा तरी नीलवृषाचा उत्सर्ग करील ९७. तदनंतर, हे प्रजाधिपते राजा तीर्थवासी पुरुषानें फल्गूला जावें ह्मणजे अश्वमेध यागाचें फल मिळून मोठी सिद्धि प्राप्त होते ९८. तदनंतर, हे राजाधिराज, स्वस्थचित्त पुरुषानें धर्मप्रस्थाला जावें. कारण, हे युद्धामध्यें अचल राहणाऱ्या भीष्म महाराजा, त्या ठिकाणीं धर्माचें नित्य वास्तव्य असतें ९९. त्या ठिकाणीं कूपोदक काढून त्यानें स्नान करावें आणि शुचि राहून देवपितरांचें तर्पण करावें; ह्मणजे पुरुष पापांपासून मुक्त होऊन स्वर्गाला जातो १००. त्या ठिकाणीं जितेंद्रिय मतंग महर्षींचा आश्रम आहे. त्या शोभायुक्त आणि श्रम व शोक दूर करणाऱ्या आश्रमामध्यें प्रवेश केला असतां १ पुरुषाला गवामयन यज्ञाचें फल प्राप्त होतें आणि त्या ठिकाणीं धर्म केला असतां अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें २.

राजेन्द्र ब्रह्माणं पुरुषर्षभ ३ राजसूयाश्वमेधाभ्यां फलं विन्दति मानवः।
ततो राजगृहं गच्छेत्तीर्थसेवी नराधिप ४ उपस्पृश्य ततस्तत्र कक्षीवानि
मोदते । यक्षिण्या नैत्यकं तत्र प्राश्नीत पुरुषः शुचिः ५ यक्षिण्यास्तु प्रसा-
देन मुच्यते ब्रह्महत्यया । मणिनागं ततो गत्वा गोसहस्रफलं लभेत् ६
तैर्थिकं भुञ्जते यस्तु मणिनागस्य भारत । दष्टस्याशीविषेणापि न तस्
क्रमते विषम् ७ तत्रोष्य रजनीमेकां गोसहस्रफलं लभेत् । ततो गच्छे
ब्रह्मर्षेर्गौतमस्य वनं प्रियम् ८ अहल्याया ह्रदे स्नात्वा व्रजेत परमां गतिम्
अभिगत्वाश्रमं राजन्विन्दते श्रियमात्मनः ९ तत्रोदपानं धर्मज्ञ त्रिषु लोके
विश्रुतम् । तत्राभिषेकं कृत्वा तु वाजिमेधमवाप्नुयात् ११० जनकस्य
राजर्षेः कूपस्त्रिदशपूजितः । तत्राभिषेकं कृत्वा तु विष्णुलोकमवाप्नुयात् १
ततो विनशनं गच्छेत्सर्वपापप्रमोचनम् । वाजपेयमवाप्नोति सोमलोकं
गच्छति १२ गण्डकीं तु समासाद्य सर्वतीर्थजलोद्भवाम् । वाजपेयमव
प्नोति सूर्यलोकं च गच्छति १३ ततो विशल्यामासाद्य नदीं त्रैलोक्य

तदनंतर, हे राजेंद्रा, उत्कृष्ट अशा ब्रह्मस्थानाला जावें आणि, हे पुरुषश्रेष्ठ राजा
राज, त्या ठिकाणीं ब्रह्मदेवाचें दर्शन घ्यावें; ह्मणजे ३ राजसूय आणि अश्वमेध
यागांनीं मिळणारें फल पुरुषाला प्राप्त होतें. तदनंतर, हे प्रजाधिपते, तीर्थवासी पु
षानें राजगृहनामक तीर्थाला जावें ४ आणि तेथें स्नान करावें; ह्मणजे कक्षीवान् रा
प्रमाणे पुरुष आनंदांत राहतो. शुचिर्भूत पुरुषानें त्या ठिकाणीं यक्षिणीचा नैवेद्य भ
करावा ५ ह्मणजे यक्षिणीच्या प्रसादानें तो ब्रह्महत्येपासून मुक्त होतो. तदनंतर म
नागाला जावें; ह्मणजे सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ६. हे भरतवंशजा भीष्मा, म
नागाचें तीर्थ घेणाऱ्या पुरुषाला सर्पदंश झाला असतांही विषबाधा होत नाहीं
त्या ठिकाणीं एक रात्र वास्तव्य केल्यानें सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें. तदनंतर,
ब्रह्मर्षि गौतम मुनीच्या प्रिय वनाला जावें ८ आणि अहल्या सरोवरामध्यें स्नान करावे
ह्मणजे मोक्षप्राप्ति होते आणि, हे राजा, फक्त त्या आश्रमांत जाण्यानें आपलें वैभ
पुरुषाला प्राप्त होतें ९. हे धर्मवेत्त्या भीष्मा, त्या ठिकाणीं एक त्रैलोक्यविख्यात कू
आहे; तेथें स्नान केलें असतां अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें ११०. देवांनाही मान
असा राजर्षि जनकाचा एक कूप आहे; त्या ठिकाणीं स्नान केलें असतां विष्णुलो
प्राप्त होतो ११. तदनंतर सर्वपापनाशक अशा विनशन तीर्थाला जावें; ह्मणजे वाज
यागाचें फल मिळून सूर्यलोक प्राप्त होतो १२. सर्व तीर्थांचें जल जिचे ठिकाणीं आ
अशा गंडकी नदीला गेलें असतां वाजपेय यागाचें फल मिळून सूर्यलोक प्राप्त होतो १

श्रुताम्। अग्निष्टोममवाप्नोति स्वर्गलोकं च गच्छति १४ ततोधिवङ्गं धर्मज्ञ समाविश्य तपोवनम्। गुह्यकेषु महाराज मोदते नात्र संशयः १५ कम्पनां तु समासाद्य नदीं सिद्धनिषेविताम्। पुण्डरीकमवाप्नोति स्वर्गलोकं च गच्छति १६ अथ माहेश्वरीं धारां समासाद्य धराधिप। अश्वमेधमवाप्नोति कुलं चैव समुद्धरेत् १७ दिवौकसां पुष्करिणीं समासाद्य नराधिप। न दुर्गतिमवाप्नोति वाजिमेधं च विन्दति १८ अथ सोमपदं गच्छेद्ब्रह्मचारी समाहितः। माहेश्वरपदे स्नात्वा वाजिमेधफलं लभेत् १९ तत्र कोटी तु तीर्थानां विश्रुता भरतर्षभ। कूर्मरूपेण राजेन्द्र ह्यसुरेण दुरात्मना १२० ह्रियमाणा हृता राजन्विष्णुना प्रभविष्णुना। तत्राभिषेकं कुर्वीत तीर्थकोट्यां युधिष्ठिर २१ पुण्डरीकमवाप्नोति विष्णुलोकं च गच्छति। ततो गच्छेत राजेन्द्र स्थानं नारायणस्य च २२ सदा संनिहितो यत्र विष्णुर्वसति भारत। यत्र ब्रह्मादयो देवा ऋषयश्च तपोधनाः २३ आदित्या वसवो रुद्रा जनार्दनमुपासते। शालग्राम इति ख्यातो विष्णुरद्भुतकर्मकः २४

तदनंतर त्रैलोक्यविख्यात विशल्या नदीला जावें; ह्मणजे अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होऊन स्वर्गलोकीं गमन होतें १४. नंतर, हे धर्मवेत्त्या महाराजा, अधिवङ्गनामक तपोवनामध्यें प्रविष्ट व्हावें; ह्मणजे गुह्यकांमध्यें पुरुष आनंदांत रहातो ह्यांत संशय नाही १५. सिद्धांनीं आश्रय केलेल्या कंपनानदीला गेलें असतां पुंडरीक यागाचें फल मिळून स्वर्गलोकीं गमन होतें १६. नंतर, हे भूपते, माहेश्वरी धारेला जावें ह्मणजे अश्वमेध यागाचें फल प्राप्त होऊन कुलाचा उद्धार होतो १७. नंतर, हे प्रजाधिपते, देवांच्या पुष्करणीला जावें; ह्मणजे नरकप्राप्ति न होतां अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें १८. तदनंतर ब्रह्मचारी व स्वस्थचित्त पुरुषानें सोमपदाला जाऊन माहेश्वरपदामध्यें स्नान करावें; ह्मणजे अश्वमेधयागाचें फल प्राप्त होतें १९. हे भरतवंशजश्रेष्ठ राजाधिराज, त्या ठिकाणीं एक कोटि तीर्थें प्रसिद्ध आहेत. कारण, एक दुष्ट असुर कूर्माचें रूप धारण करून १२० एक कोटि तीर्थें घेऊन चालला असतां महा प्रभावी विष्णूनें, हे राजा, त्याच्या पासून तीं हिसकावून घेतली. असो. हे युद्धामध्यें अचल राहणाऱ्या भीष्मा, त्या तीर्थकोटीमध्यें स्नान करावें २१; ह्मणजे पुंडरीक यागाचें फल प्राप्त होऊन विष्णुलोकीं गमन होतें. तदनंतर, हे राजाधिराज, नारायणाच्या स्थानाला जावें २२. त्या ठिकाणीं, हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, विष्णु नेहमीं जवळच राहत असतात. ब्रह्मादिदेव, तपोधन ऋषि २३, आदित्य, वसु आणि रुद्र त्या जनार्दनाची उपासना करीत असतात व तो अद्भुत कर्म करणारा विष्णु त्या ठिकाणीं शालग्राम ह्मणून प्रसिद्ध

अभिगम्य त्रिलोकेशं वरदं विष्णुमव्ययम्। अश्वमेधमवाप्नोति विष्णुलोकं च गच्छति २५ तत्रोपदानं धर्मज्ञ सर्वपापप्रमोचनम्। समुद्रास्तत्र चत्वारः कूपे संनिहिताः सदा २६ तत्रोपस्पृश्य राजेन्द्र न दुर्गतिमवाप्नुयात्। अभिगम्य महादेवं वरदं रुद्रमव्ययम् २७ विराजति यथा सोमो मेघैर्मुक्तो नराधिप। जातिस्मरमुपस्पृश्य शुचि: प्रयतमानसः २८ जातिस्मरत्वमाप्नोति स्नात्वा तत्र न संशयः। माहेश्वरपुरं गत्वा अर्चयित्वा वृषध्वजम् २९ ईप्सितांल्लभते कामानुपवासान्न संशयः। ततस्तु वामनं गत्वा सर्वपापप्रमोचनम् १३० अभिगम्य हरिं देवं न दुर्गतिमवाप्नुयात्। कुशिकस्याश्रमं गच्छेत्सर्वपापप्रमोचनम् ३१ कौशिकीं तत्र गच्छेत महापापप्रणाशिनीम्। राजसूयस्य यज्ञस्य फलं प्राप्नोति मानवः ३२ ततो गच्छेत राजेन्द्र चम्पकारण्यमुत्तमम्। तत्रोष्य रजनीमेकां गोसहस्रफलं लभेत् ३३ अथ ज्येष्ठीलमासाद्य तीर्थं परमदुर्लभम्। तत्रोष्य रजनीमेकां गोसहस्रफलं लभेत् ३४ तत्र विश्वेश्वरं दृष्ट्वा देव्या सह महाद्युतिम्। मित्रावरुणयोर्लोकानाप्नोति पुरु-

---

आहे २४. त्रैलोक्याधिपति आणि अक्षय अशा वरप्रद विष्णूचें दर्शन घेतलें असतां अश्वमेध यागाचें फल प्राप्त होऊन विष्णुलोकीं गमन होतें २५. हे धर्मवेत्त्या, त्या ठिकाणीं यत्किंचित् दान केलें असतांही तें सर्वपापनाशक होतें. तेथें कूपाजवळ चारी समुद्र नेहमीं असतात २६. त्यांत स्नान केलें असतां, हे राजाधिराज, नरक प्राप्त होत नाहीं. वरप्रद आणि देवाधिदेव अशा अक्षय रुद्राचें दर्शन घेतलें असतां २७, हे प्रजाधिपते, मेघनिर्मुक्त अशा (शरदृतूंतील) चंद्राप्रमाणें पुरुष शोभूं लागतो. शुचि व निर्मल मनानें युक्त असलेल्या पुरुषानें जातिस्मर तीर्थामध्यें स्नान करावें २८; ह्मणजे तेथें स्नान केल्यानें त्याला निःसंशय पूर्वजन्माचें स्मरण होतें. माहेश्वर पुराला जाऊन शंकराचें आराधन करावें २९ आणि उपवास करावा; ह्मणजे पुरुषाचे सर्व मनोरथ निःसंशय सिद्धीस जातात. तदनंतर सर्वपापनाशक वामनतीर्थाला जाऊन १३० देव श्रीहरीचें दर्शन घ्यावें; ह्मणजे नरक प्राप्त होत नाहीं. सर्वपापनाशक अशा कुशिकाश्रमाला जाऊन ३१ तेथें महापापनाशक कौशिकी नदीमध्यें स्नान करावें; ह्मणजे पुरुषाला राजसूय यागाचें फल प्राप्त होतें ३२. तदनंतर, हे राजाधिराज, उत्कृष्ट चंपकारण्याला जावें आणि तेथें एक रात्र वास्तव्य करावें; ह्मणजे सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ३३. अत्यंत दुर्लभ अशा ज्येष्ठीलतीर्थाला जाऊन तेथें एक रात्र वास्तव्य करावें; ह्मणजे सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ३४. त्या ठिकाणीं देवीसहवर्तमान महातेजस्वी विश्वेश्वराचें दर्शन करावें; ह्मणजे, हे पुरुषश्रेष्ठा, मित्रावरुणांचें

षर्षभ ३५ त्रिरात्रोपोषितस्तत्र अग्निष्टोमफलं लभेत् । कन्यासंवेद्यमासाद्य नियतो नियताशनः ३६ मनोः प्रजापतेर्लोकानाप्नोति पुरुषर्षभ । कन्यायां ये प्रयच्छन्ति दानमण्वपि भारत ३७ तदक्षयमिति प्राहुर्ऋषयः संशितव्रताः । ततो निर्वीरमासाद्य त्रिषु लोकेषु विश्रुतम् ३८ अश्वमेधमवाप्नोति विष्णुलोकं च गच्छति । ये तु दानं प्रयच्छन्ति निर्वीरासंगमे नराः ३९ ते यान्ति नरशार्दूल शक्रलोकमनामयम् । तत्राश्रमो वसिष्ठस्य त्रिषु लोकेषु विश्रुतः १४० तत्राभिषेकं कुर्वाणो वाजपेयमवाप्नुयात् । देवकूटं समासाद्य ब्रह्मर्षिगणसेवितम् ४१ अश्वमेधमवाप्नोति कुलं चैव समुद्धरेत् । ततो गच्छेत राजेन्द्र कौशिकस्य मुनेर्ह्रदम् ४२ यत्र सिद्धिं परां प्राप्तो विश्वामित्रोऽथ कौशिकः । तत्र मासं वसेद्वीर कौशिक्यां भरतर्षभ ४३ अश्वमेधस्य यत्पुण्यं तन्मासेनाधिगच्छति । सर्वतीर्थवरे चैव यो वसेत महाह्रदे ४४ न दुर्गतिमवाप्नोति विन्द्याद्बहु सुवर्णकम् । कुमारमभिगम्याथ वीराश्रमनिवासिनम् ४५ अश्वमेधमवाप्नोति नरो नास्त्यत्र संशयः । अग्नि-

---

लोक प्राप्त होतात ३५ व त्या ठिकाणीं त्रिरात्र उपोषण केले असता अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें. जितेंद्रिय व मिताहारी पुरुषानें कन्यासंवेद्य तीर्थाला जावें ३६; ह्मणजे, हे पुरुषश्रेष्ठा. प्रजाधिपति मनूचे लोक त्याला प्राप्त होतात. हे भरतकुलोत्पन्ना, त्या ठिकाणीं कन्येला सूक्ष्म कां होईना जे कोणी कांही दान करितात ३७ तें अक्षय्य होतें ह्मणून निर्मल व्रतानें रहाणारे ऋषि सांगतात. तदनंतर त्रैलोक्यविख्यात निर्वीर तीर्थाला जावें ३८; ह्मणजे अश्वमेध यागाचे फल प्राप्त होऊन विष्णुलोकी गमन होतें. जे पुरुष निर्वीरसंगमावर दान देतात ३९ ते, हे पुरुषश्रेष्ठा, आरोग्यसंपन्न अशा इंद्रलोकाप्रत जातात. त्या ठिकाणी वसिष्ठमुनींचा त्रैलोक्यविख्यात आश्रम आहे १४०. त्या ठिकाणीं स्नान करणाऱ्या पुरुषाला वाजपेय यागाचें फल प्राप्त होतें. ब्रह्मर्षिसमुदायांचें जेथें वास्तव्य आहे अशा देवकूट तीर्थाला गेले असतां ४१ अश्वमेधयागाचें फल प्राप्त होऊन कुलाचा उद्धार होतो. तदनंतर, हे राजाधिराज, कौशिक मनीच्या सरोवराला जावें ४२. त्या ठिकाणीं कौशिक विश्वामित्राना उत्कृष्ट सिद्धि प्राप्त झाली आहे. त्या ठिकाणीं, हे भरतवंशजश्रेष्ठ वीरा, कौशिकी नदीचें तीरीं एक महिनाभर वास्तव्य करावें ४३ ह्मणजे अश्वमेधयागाचें जें पुण्य तें त्या महिन्यामध्ये पुरुषाला प्राप्त होतें. सर्व तीर्थांमध्यें श्रेष्ठ अशा महासरोवराचें तीरीं जो वास्तव्य करितो ४४ त्याला नरकप्राप्ति न होतां विपुल सुवर्ण प्राप्त होतें. वीराश्रमामध्यें वास्तव्य करणाऱ्या कुमाराचें दर्शन घ्यावें ४५; ह्मणजे पुरुषाला अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें ह्यांत संशय नाहीं. त्रैलोक्यविख्यात

धारां समासाद्य त्रिषु लोकेषु विश्रुताम् ४६ तत्राभिषेकं कुर्वाणो ह्यग्नि-
ष्टोममवाप्नुयात् । अभिगम्य महादेवं वरदं विष्णुमव्ययम् ४७ पितामहसरो
गत्वा शैलराजसमीपतः । तत्राभिषेकं कुर्वाणो ह्यग्निष्टोममवाप्नुयात् ४८
पितामहस्य सरसः प्रस्रुता लोकपावनी। कुमारधारा तत्रैव त्रिषु लोकेषु
विश्रुता ४९ यत्र स्नात्वा कृतार्थोस्मीत्यात्मानमवगच्छति । षष्ठकालो-
पवासेन मुच्यते ब्रह्महत्यया १५० ततो गच्छेत धर्मज्ञ तीर्थसेवनतत्परः ।
शिखरं वै महादेव्या गौर्यास्त्रैलोक्यविश्रुतम् ५१ समारुह्य नरश्रेष्ठ स्तन-
कुण्डेषु संविशेत् । स्तनकुण्डमुपस्पृश्य वाजपेयफलं लभेत् ५२ तत्रा-
भिषेकं कुर्वाणः पितृदेवार्चने रतः । हयमेधमवाप्नोति शक्रलोकं च
गच्छति ५३ ताम्रारुणं समासाद्य ब्रह्मचारी समाहितः । अश्वमेधमवा-
प्नोति ब्रह्मलोकं च गच्छति ५४ नन्दिन्यां च समासाद्य कूपं देवनिषेवि-
तम् । नरमेधस्य यत्पुण्यं तदाप्नोति नराधिप १५५ कालिकासंगमे स्नात्वा
कौशिक्यरुणयोर्गतः । त्रिरात्रोपोषितो राजन्सर्वपापैः प्रमुच्यते ५६
उर्वशीतीर्थमासाद्य ततः सोमाश्रमं बुधः । कुम्भकर्णाश्रमं गत्वा पूज्यते

अग्निधारेला जाऊन ४६ तेथें स्नान करणाऱ्या पुरुषाला देवाधिदेव व वरप्रद अशा सनातन विष्णूच्या दर्शनानें अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें ४७. हिमालयपर्वतासमीप ब्रह्म-सरोवराला जाऊन तेथें स्नान करणाऱ्या पुरुषाला अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें ४८. त्याच ठिकाणीं ब्रह्मसरोवरापासून जगताला पवित्र करणारी अशी एक विख्यात कुमा-रधारा नदी निघालेली आहे ४९. त्या ठिकाणीं स्नान केलें असतां पुरुषाला " मी कृतकृत्य झालों " असें वाटतें आणि तीन दिवसांनीं एक उपोषण अशा रीतीनें तेथें वास्तव्य केलें असतां पुरुष ब्रह्महत्येपासून मुक्त होतो १५०. तदनंतर, हे धर्मवेत्त्या, तीर्थसेवनाविषयीं तत्पर असलेल्या पुरुषानें महादेवी गौरीच्या त्रैलोक्यविख्यात शिख-राला जावें ५१ आणि, हे पुरुषश्रेष्ठा, त्या शिखरावर आरूढ होऊन स्तनकुंडामध्यें प्रविष्ट व्हावें. कारण, स्तनकुंडामध्यें स्नान केलें असतां वाजपेय यागाचें फल प्राप्त होतें ५२ आणि देवपितरांच्या पूजनाविषयीं तत्पर होऊन तेथें स्नान करणारा पुरुष अश्वमेधयागाचें फल प्राप्त करून घेऊन इंद्रलोकीं गमन करितो ५३. ब्रह्मचारी व स्वस्थचित्त पुरुषानें ताम्रारुण तीर्थाला जावें; ह्मणजे अश्वमेध यागाचें फल मिळून ब्रह्मलोकीं गमन होतें ५४. हे प्रजाधिपते, नंदिनीचे तीरीं देवांनीं आश्रित अशा कूपाला जावें; ह्मणजे नरमेधाचें जें पुण्य तें प्राप्त होतें ५५. कालिकासंगमामध्यें स्नान करून कौशिकी आणि अरुणा ह्या नद्यांचें स्नान करावें आणि त्रिरात्र उपोषण करावें; ह्मणजे, हे

भुवि मानवः ५७ कोकामुखमुपस्पृश्य ब्रह्मचारी यतव्रतः। जातिस्मरत्वमाप्नोति दृष्टमेतत्पुरातनैः ५८ प्राङ्नदीं च समासाद्य कृतात्मा भवति द्विजः । सर्वपापविशुद्धात्मा शक्रलोकं च गच्छति ५९ ऋषभद्वीपमासाद्य देवकुञ्जनिषेवितम् । सरस्वत्यामुपस्पृश्य विमानस्थो विराजते १६० औद्दालकं महाराज तीर्थं मुनिनिषेवितम्। तत्राभिषेकं कृत्वा वै सर्वपापैः प्रमुच्यते ६१ धर्मतीर्थं समासाद्य पुण्यं ब्रह्मर्षिसेवितम् । वाजपेयमवाप्नोति विमानस्थश्च पूज्यते ६२ अथ चम्पां समासाद्य भागीरथ्यां कृतोदकः । दण्डार्तमभिगत्वा तु गोसहस्रफलं लभेत् १६३ [३६६२]

इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि पुलस्त्यतीर्थयात्रायां चतुरशीतितमोऽध्यायः ॥ ८४ ॥

पुलस्त्य उवाच ॥ अथ सन्ध्यां समासाद्य संवेद्यं तीर्थमुत्तमम् । उपस्पृश्य नरो विद्यां लभते नात्र संशयः १ रामस्य च प्रभावेण तीर्थं राजन्कृतं पुरा । तल्लौहित्यं समासाद्य विन्द्याद्बहु सुवर्णकम् २ करतोयां

राजा, पुरुष सर्व पातकांपासून मुक्त होतो ५६. तदनतर ज्ञानी पुरुषानें उर्वशीतीर्थ, सोमाश्रम आणि कुंभकर्णाश्रम यांच्या यात्रा कराव्या; ह्मणजे पृथ्वीमध्यें त्या पुरुषाची मानमान्यता होते ५७. ब्रह्मचारी आणि नियमपूर्वक व्रतानें चालणाऱ्या पुरुषानें कोकामुखतीर्थामध्यें स्नान केलें असतां त्याला जातिस्मरत्व (ह्मणजे पूर्व जन्माचें स्मरण) प्राप्त होतें हें प्राचीनांच्या अनुभवास आलेलें आहे ५८. प्राङ्नदीला गेल्यानें द्विज कृतकृत्य होतो आणि अंतःकरण सर्व पापांपासून मुक्त होऊन इंद्रलोकीं त्याचें गमन होतें ५९. देवसमुदायांनीं सेवित अशा ऋषभद्वीपाला जाऊन सरस्वती नदीमध्यें स्नान केलें असतां पुरुष विमानात बसून झळकूं लागतो ६०. हे महाराजा, मुनींनीं सेवित असें एक औद्दालक ह्मणून तीर्थ आहे. त्या ठिकाणीं स्नान केलें असतां पुरुष सर्व पापांपासून मुक्त होतो ६१. ब्रह्मर्षींनीं सेवित आणि पुण्यप्रद अशा धर्म तीर्थाला गेलें असतां पुरुषाला वाजपेय यागाचें फल प्राप्त होतें आणि विमानामध्यें बसलेल्या त्या पुरुषाची मानमान्यता होते ६२. तदनंतर चंपानदीला जाऊन भागीरथीमध्यें तर्पण करावें आणि दंडार्ताला जावें; ह्मणजे सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें १६३. ह्याप्रमाणें ०वनपर्वातील तीर्थयात्रापर्वापैकीं पुलस्त्यतीर्थयात्राविषयीं चौऱ्यांयशीवा अध्याय समाप्त झाला ॥८४॥

पुलस्त्य सांगतात:—संध्यासमय साधून उत्कृष्ट अशा संवेद्य तीर्थाला जावें आणि तेथें स्नान करावें ह्मणजे पुरुषाला विद्या प्राप्त होते ह्यांत संशय नाहीं १. हे राजा, रामाच्या प्रभावानें पूर्वी एक लौहित्य ह्मणून तीर्थ झालें आहे, तेथें गेलें असतां विपुल सुवर्ण

समासाद्य त्रिरात्रोपोषितो नरः । अश्वमेधमवाप्नोति प्रजापतिकृतो विधिः ३ गङ्गायास्तत्र राजेन्द्र सागरस्य च संगमे। अश्वमेधं दशगुणं प्रवदन्ति मनीषिणः ४ गङ्गायास्त्वपरं पारं प्राप्य यः स्नाति मानवः । त्रिरात्रमुषितो राजन्सर्वपापैः प्रमुच्यते ५ ततो वैतरणीं गच्छेत्सर्वपापप्रमोचनीम् । विरजं तीर्थमासाद्य विराजति यथा शशी ६ प्रतरेच्च कुलं पुण्यं सर्वपापं व्यपोहति। गोसहस्रफलं लब्ध्वा पुनाति स्वकुलं नरः ७ शोणस्य ज्योतिरथ्यायाः संगमे नियतः शुचिः । तर्पयित्वा पितॄन्देवानग्निष्टोमफलं लभेत् ८ शोणस्य नर्मदायाश्च प्रभेदे कुरुनन्दन । वंशगुल्म उपस्पृश्य वाजिमेधफलं लभेत् ९ ऋषभं तीर्थमासाद्य कोशलायां नराधिप। वाजपेयमवाप्नोति त्रिरात्रोपोषितो नरः १० गोसहस्रफलं विन्द्यात्कुलं चैव समुद्धरेत् ११ कोशलां तु समासाद्य कालतीर्थमुपस्पृशेत् । वृषभैकादशफलं लभते नात्रसंशयः १२ पुष्पवत्यामुपस्पृश्य त्रिरात्रोपोषितो नरः। गोसहस्रफलं लब्ध्वा पुनाति सकलं नृप १३ ततो बदरिकातीर्थे स्नात्वा भरत-

---

प्राप्त होतें २. करतोया नदीला जाऊन त्रिरात्र उपोषण केले असतां पुरुषाला अश्वमेध यागाचे फल प्राप्त होते असा ब्रह्मदेवाने नियम केला आहे ३. हे राजाधिराज, गंगा आणि सागर ह्यांच्या संगमामध्ये स्नान केले असतां दहा अश्वमेध यागाचें फल प्राप्त होते असे ज्ञानी लोक ह्मणतात ४. गंगेच्या पलीकडल्या तीराला जाऊन जो पुरुष स्नान करितो आणि त्रिरात्र उपोषित रहातो तो, हे राजा, सर्व पातकांपासून मुक्त होतो ५. तदनंतर सर्वपापनाशिनी वैतरणी नदीला जावें व नंतर विरज तीर्थामध्ये जाऊन स्नान करावे; ह्मणजे चंद्राप्रमाणे पुरुष झळकूं लागतो ६, पुण्यकुलाचा उद्धार होतो आणि सर्व पातक नाहीसे होते. इतकेच नव्हे परंतु, त्या पुरुषाला सहस्र गोप्रदानांचे फल प्राप्त होऊन तो आपले कुल पवित्र करितो ७. शोण आणि ज्योतिरथ्या ह्यांच्या संगमामध्यें स्नान करून जितेंद्रिय व शुचिर्भूत पुरुषाने पितरांचे व देवांचे पूजन केले असतां अग्निष्टोमयागाचे फल त्याला प्राप्त होतें ८. शोण आणि नर्मदा ह्यांच्या उगमांचे ठिकाणी आणि वंशगुल्मतीर्थामध्ये स्नान केले असतां, हे कुरुनंदना भीष्मा, अश्वमेध यागाचें फल प्राप्त होते ९. हे प्रजाधिपते, कोशला नदीचे तीरीं ऋषभ तीर्थाला जाऊन त्रिरात्र उपोषित रहावें; ह्मणजे पुरुषाला वाजपेय यागाचे फल प्राप्त होतें १०, सहस्र गोप्रदानाचे फल मिळते आणि कुलाचा उद्धार होतो ११. कोशला नदीला जाऊन कालतीर्थामध्ये स्नान करावें; ह्मणजे अकरा वृषभ दान केल्याचे फल प्राप्त होतें ह्यांत संशय नाहीं १२. पुष्पवती नदीमध्यें स्नान करून त्रिरात्र उपोषित रहावें; ह्मणजे, हे राजा, सहस्र गोप्रदानांचें फल मिळून

सत्तम। दीर्घमायुरवाप्नोति स्वर्गलोकं च गच्छति १४ तथा चम्पां समासाद्य भागीरथ्यां कृतोदकः। दण्डाख्यमभिगम्यैव गोसहस्रफलं लभेत् १५ लपेटिकां ततो गच्छेत्पुण्यां पुण्योपशोभिताम् । वाजपेयमवाप्नोति देवैः सर्वैश्च पूज्यते १६ ततो महेन्द्रमासाद्य जामदग्न्यनिषेवितम्। रामतीर्थे नरः स्नात्वा अश्वमेधफलं लभेत् १७ मतङ्गस्य तु केदारस्तत्रैव कुरुनन्दन । तत्र स्नात्वा कुरुश्रेष्ठ गोसहस्रफलं लभेत् १८ श्रीपर्वतं समासाद्य नदीतीरमुपस्पृशेत्। अश्वमेधमवाप्नोति पूजयित्वा वृषध्वजम् १९ श्रीपर्वते महादेवो देव्या सह महाद्युतिः। न्यवसत्परमप्रीतो ब्रह्मा च त्रिदशैः सह २० तत्र देवह्रदे स्नात्वा शुचिः प्रयतमानसः । अश्वमेधमवाप्नोति परां सिद्धिं च गच्छति २१ ऋषभं पर्वतं गत्वा पाण्ड्ये दैवतपूजितम् । वाजपेयमवाप्नोति नाकपृष्ठे च मोदते २२ ततो गच्छेत कावेरीं वृतामप्सरसां गणैः। तत्र स्नात्वा नरो राजन्गोसहस्रफलं लभेत् २३ ततस्तीरे समुद्रस्य कन्यातीर्थमुपस्पृशेत् ।

पुरुष आपलें कुल पवित्र करितो १३. तदनंतर, हे भरतवंशजश्रेष्ठ भीष्मा, बदरिका तीर्थामध्यें स्नान केलें असतां दीर्घ आयुष्य प्राप्त होऊन पुरुष स्वर्गलोकीं जातो १४. त्याचप्रमाणें चंपानदीला जाऊन भागीरथीमध्यें तर्पण केल्यावर दंडतीर्थाला जातांक्षणीं सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें १५. तदनंतर पुण्यस्थलांनीं सुशोभित अशा पुण्यप्रद लपेटिका नदीला जावें; ह्मणजे पुरुषाला वाजपेय यागानें फल प्राप्त होऊन सर्व देव मान देऊं लागतात १६. तदनंतर जमदग्निपुत्र परशुराम जेथें असतात त्या महेंद्र पर्वतावर जाऊन रामतीर्थामध्यें स्नान केलें असतां पुरुषाला अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें १७. हे कुरुनंदना, त्याच ठिकाणीं मतंगमुनींचें क्षेत्र आहे. तेथें स्नान केलें असतां, हे पुरुषश्रेष्ठा, सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें १८. श्रीपर्वतावर जाऊन नदीचे तीरीं स्नान करावें आणि शंकराचें पूजन करावें; ह्मणजे अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें १९. श्रीपर्वतावर देवीसहवर्तमान महातेजस्वी महादेव आणि देवांसहवर्तमान ब्रह्मदेव अत्यंत प्रसन्न होऊन वास्तव्य करीत असतात २०. त्या ठिकाणीं शुचि व शुद्धचित्त पुरुषानें देवसरोवरांमध्यें स्नान केलें असतां त्याला अश्वमेधयागाचें फल मिळून उत्कृष्ट सिद्धि प्राप्त होते २१. तदनंतर पांड्यनामक प्रदेशामध्यें असलेल्या देवमान्य ऋषभपर्वतावर गेलें असतां वाजपेय यज्ञाचें फल मिळून स्वर्गामध्यें आनंदानें वास्तव्य होतें २२. तदनंतर अप्सरांच्या समुदायांनीं व्याप्त असलेल्या कावेरी नदीला जावें आणि तेथें स्नान करावें; ह्मणजे, हे राजा, पुरुषाला सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें २३. तदनंतर समुद्राचे तीरीं जाऊन कन्यातीर्थामध्यें स्नान करावें; कारण, हे राजाधिराज, त्या तीर्थोदकाचा स्पर्श

तत्तोयं स्पृश्य राजेन्द्र सर्वपापैः प्रमुच्यते २४ अथ गोकर्णमासाद्य त्रिषु लोकेषु विश्रुतम् । समुद्रमध्ये राजेन्द्र सर्वलोकनमस्कृतम् २५ यत्र ब्रह्मादयो देवा ऋषयश्च तपोधनाः । भूतयक्षपिशाचाश्च किंनराः समहोरगाः २६ सिद्धचारणगन्धर्वमानुषाः पन्नगास्तथा । सरितः सागराः शैला उपासन्त उमापतिम् २७ तत्रेशानं समभ्यर्च्य त्रिरात्रोपोषितो नरः । अश्वमेधमवाप्नोति गाणपत्यं च विन्दति २८ उष्य द्वादशरात्रं तु पूतात्मा च भवेन्नरः । तत एव च गायत्र्याः स्थानं त्रैलोक्यपूजितम् २९ त्रिरात्रमुषितस्तत्र गोसहस्रफलं लभेत् । निदर्शनं च प्रत्यक्षं ब्राह्मणानां नराधिप ३० गायत्रीं पठते यस्तु योनिसंकरजस्तथा । गाथा च गाथिका चापि तस्य संपद्यते नृप ३१ अब्राह्मणस्य सावित्रीं पठतस्तु प्रणश्यति । संवर्तस्य तु विप्रर्षेर्वापीमासाद्य दुर्लभाम् ३२ रूपस्य भागी भवति सुभगश्च प्रजायते । ततो वेणां समासाद्य त्रिरात्रोपोषितो नरः ३३ मयूरहंससंयुक्तं विमानं लभते नरः । ततो गोदावरीं प्राप्य नित्यं सिद्धनिषेविताम् ३४ गवां मेधमवाप्नोति वासुकेर्लोकमुत्तमम् । वेणायाः संगमे

होतांक्षणीं पुरुष सर्व पातकांपासून मुक्त होतो २४. हे राजाधिराज, तदनंतर सर्वलोकमान्य व त्रैलोक्यविख्यात असें जें समुद्रामध्यें गोकर्णस्थान आहे तेथें जावें २५. त्या ठिकाणीं ब्रह्मादिदेव, तपोधन ऋषि, भूत, यक्ष, पिशाच, किन्नर, महोरग २६, सिद्ध, चारण, गंधर्व, मानव, पन्नग, नद्या, सागर आणि पर्वत उमापति शंकराची उपासना करीत असतात २७. त्या ठिकाणीं त्रिरात्र उपोषण करून शंकराचें पूजन केलें असतां अश्वमेध यागाचें फल मिळून रुद्रगणांचें आधिपत्य प्राप्त होतें २८ आणि बारा दिवस वास्तव्य केलें असतां पुरुषाचें चित्त शुद्ध होतें. त्याच ठिकाणीं त्रैलोक्यवंद्य असें एक गायत्रीचें स्थान आहे २९. तेथें त्रिरात्र वास्तव्य केलें असतां सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें. हे प्रजाधिपते, ब्राह्मणांची प्रत्यक्ष परीक्षा त्या ठिकाणीं होत असते ३०. हे राजा, संकरजातीय पुरुष जर तेथें गायत्री ह्मणूं लागला तर स्वरादिरहित अशीं ग्राम्यगीताप्रमाणें गायत्रीचीं अक्षरें त्याच्या मुखांतून बाहेर पडतात ३१ आणि अब्राह्मण जर गायत्री ह्मणूं लागला तर त्याला तेथें आठवत नाहीं. ब्रह्मर्षि संवर्त मुनींच्या दुर्लभ वापीला गेलें असतां ३२ पुरुष भाग्यवान् व रूपवान् होतो. तदनंतर कृष्णवेणीला जाऊन पुरुषानें त्रिरात्र उपोषण करावें ३३; ह्मणजे मयूर आणि हंस जोडिलेलें विमान प्राप्त होतें. तदनंतर सिद्ध लोक जिचा नेहमीं आश्रय करितात अशा गोदावरीला जावें ३४; ह्मणजे गोमेध यज्ञाचें फल मिळून वासुकीचें उत्कृष्ट स्थान प्राप्त होतें.

स्नात्वा वाजिमेधफलं लभेत् ३५ वरदासंगमे स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् । ब्रह्मस्थानं समासाद्य त्रिरात्रोपोषितो नरः ३६ गोसहस्रफलं विन्द्यात्स्वर्गलोकं च गच्छति । कुशप्लवनमासाद्य ब्रह्मचारी समाहितः ३७ त्रिरात्रमुषितः स्नात्वा अश्वमेधफलं लभेत् । ततो देवह्रदेरण्ये कृष्णवेणाजलोद्भवे ३८ जातिस्मरह्रदे स्नात्वा भवेज्जातिस्मरो नरः । यत्र क्रतुशतैरिष्ट्वा देवराजो दिवं गतः ३९ अग्निष्टोमफलं विन्द्याद्गमनादेव भारत । ततः सर्वह्रदे स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् ४० ततो वापीं महापुण्यां पयोष्णीं सरितां वराम् । पितृदेवार्चनरतो गोसहस्रफलं लभेत् ४१ दण्डकारण्यमासाद्य पुण्यं राजन्नुपस्पृशेत् । गोसहस्रफलं तस्य स्नातमात्रस्य भारत ४२ शरभङ्गाश्रमं गत्वा शुकस्य च महात्मनः । न दुर्गतिमवाप्नोति पुनाति च कुलं नरः ४३ ततः शूर्पारकं गच्छेज्जामदग्न्यनिषेवितम् । रामतीर्थे नरः स्नात्वा विन्द्याद्बहु सुवर्णकम् ४४ सप्तगोदावरे स्नात्वा नियतो

कृष्णवेणीच्या संगमामध्यें स्नान केलें असतां अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें ३५. वरदासंगमामध्यें स्नान केलें असतां सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें. ब्रह्मस्थानाला जाऊन त्रिरात्र उपोषित राहिलें असतां पुरुषाला ३६ सहस्र गोप्रदानांचें फल मिळून स्वर्गलोकाची प्राप्ति होते. ब्रह्मचारी व स्वस्थचित्त पुरुषानें कुशप्लवन तीर्थाला जावें ३७ आणि तेथें त्रिरात्र राहून स्नान करावें; ह्मणजे अश्वमेधयागाचें फल प्राप्त होतें. तदनंतर अरण्यामध्यें कृष्णवेणीच्या उदकापासून उत्पन्न झालेल्या देवसरोवरांत ३८ आणि जातिस्मरनामक सरोवरांत स्नान केलें असतां पुरुषाला पूर्वजन्मांचें स्मरण होतें. त्या ठिकाणीं शंभर क्रतु करून देवराज इंद्र स्वर्गाला गेला आहे ३९. हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, त्या ठिकाणीं नुसत्या जाण्यानेंच अग्निष्टोम यागाचें फल प्राप्त होतें. तदनंतर सर्वह्रदनामक सरोवरामध्यें स्नान करावें; ह्मणजे सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ४०. तदनंतर महापुण्यप्रद वापी आणि नद्यांमध्यें श्रेष्ठ अशी पयोष्णी यांमध्यें स्नान करावें व देवपितरांच्या पूजनाविषयीं तत्पर असावें; ह्मणजे सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ४१. हे भरतकुलोत्पन्ना राजा, पुण्यप्रद अशा दंडकारण्यामध्यें जाऊन स्नान करावें; ह्मणजे तेथें स्नान करितांक्षणीं सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ४२. तदनंतर महात्मे शुक आणि शरभंग मुनि यांच्या आश्रमाला जावें; ह्मणजे नरकप्राप्ति न होतां पुरुष आपलें कुल पवित्र करितो ४३. तदनंतर जमदग्निपुत्र परशुराम ज्याचा आश्रय करितात त्या शूर्पारकाला जाऊन रामतीर्थामध्यें स्नान करावें; ह्मणजे पुरुषाला विपुल सुवर्ण प्राप्त होतें ४४. सप्तगोदावरी तीर्थामध्यें स्नान केलें असतां जितेंद्रिय व मिताहारी पुरुषाला मोठें पुण्य लागून

नियताशनः । महत्पुण्यमवाप्नोति देवलोकं च गच्छति ४५ ततो देवपथं
गत्वा नियतो नियताशनः । देवसत्रस्य यत्पुण्यं तदवाप्नोति मानवः ४६
तुङ्गकारण्यमासाद्य ब्रह्मचारी जितेन्द्रियः । वेदानध्यापयत्तत्र ऋषिः सार-
सारस्वतः पुरा ४७ तत्र वेदेषु नष्टेषु मुनेरङ्गिरसः सुतः । ऋषीणामुत्त-
रीयेषु सूपविष्टो यथासुखम् ४८ ओङ्कारेण यथान्यायं सम्यगुच्चारितेन
ह । येन यत्पूर्वमभ्यस्तं तत्सर्वं समुपस्थितम् ४९ ऋषयस्तत्र देवाश्च वरु-
णोऽग्निः प्रजापतिः । हरिर्नारायणस्तत्र महादेवस्तथैव च ५० पितामहश्च
भगवान्देवैः सह महाद्युतिः । भृगुं नियोजयामास याजनार्थे महाद्युतिम् ५१
ततः स चक्रे भगवानृषीणां विधिवत्तदा । सर्वेषां पुनराधानं विधिदृष्टेन
कर्मणा ५२ आज्यभागेन तत्राग्निं तर्पयित्वा यथाविधि । देवाः स्वभवनं
याता ऋषयश्च यथाक्रमम् ५३ तदरण्यं प्रविष्टस्य तुङ्गकं राजसत्तम । पापं
प्रणश्यत्यखिलं स्त्रियो वा पुरुषस्य वा ५४ तत्र मासं वसेद्धीरो नियतो
नियताशनः । ब्रह्मलोकं व्रजेद्राजन्कुलं चैव समुद्धरेत् ५५ मेधा-
विकं समासाद्य पितॄन्देवांश्च तर्पयेत् । अग्निष्टोममवाप्नोति स्मृतिं मेधां च
विन्दति ५६ अत्र कालञ्जरं नाम पर्वतं लोकविश्रुतम् । तत्र देवह्रदे स्नात्वा

देवलोकाची प्राप्ति होते ४५. तदनंतर देवपथाला जाऊन जितेंद्रिय व मिताहारी रहावें म्हणजे देवसत्र केल्याचें पुण्य पुरुषाला प्राप्त होतें ४६. तुंगकारण्यामध्यें जाऊन ब्रह्मचारी व जितेंद्रिय अशा सारस्वत मुनींनीं विद्यार्थ्यांना वेदाध्ययन सांगितलें ४७. वेद नाहींसे झाल्यावर अंगिरस मुनींचा पुत्र त्या ठिकाणीं ऋषींच्या उत्तरीय वस्त्रावर जाऊन स्वस्थ सुखानें बसला ४८ आणि त्यानें यथाविधि व चांगल्या प्रकारानें ओंकाराचा उच्चार केला. तेव्हां ज्यानें जें पूर्वी पढलें होतें तें सर्व त्याला आठवूं लागले ४९. ऋषि, देव, वरुण, अग्नि, प्रजापति, हरि, नारायण, महादेव, ५० आणि देवांसहवर्तमान महातेजस्वी भगवान् ब्रह्मदेव ह्यांनीं महातेजस्वी भृगूची याजन कर्माकडे योजना केली ५१. तेव्हां त्या भगवान् भृगूनें सर्व ऋषींचें शास्त्रोक्त अनुष्ठानानें पुनराधान केलें ५२. त्या ठिकाणीं आज्यभागाच्या योगानें अग्नीला यथाविधि तृप्त करून देव आणि ऋषि आल्यामार्गानें आपआपल्या घरीं गेले ५३. तस्मात्, हे नृपश्रेष्ठा, स्त्री असो अथवा पुरुष असो त्या तुंगकारण्यामध्यें प्रविष्ट होतांक्षणीं सर्व पातक नाहींसें होतें ५४. ज्ञानी पुरुषानें जितेंद्रिय व मिताहारी राहून तेथें एक महिनाभर वास्तव्य करावें; म्हणजे, हे राजा, ब्रह्मलोकीं गमन होऊन कुलाचा उद्धार होतो ५५. मेधाविक तीर्थाला जाऊन देवपितरांचें तर्पण करावें; म्हणजे अग्निष्टोम यागाचें फल मिळून स्मरणशक्ति व धारणाशक्ति

गोसहस्रफलं लभेत् ५७ यो स्नातः स्नापयेत्तत्र गिरौ कालञ्जरे नृप ।
स्वर्गलोके महीयेत नरो नास्त्यत्र संशयः ५८ ततो गिरिवरश्रेष्ठे
चित्रकूटे विशांपते । मन्दाकिनीं समासाद्य सर्वपापप्रणाशिनीम् ५९
तत्राभिषेकं कुर्वाणः पितृदेवार्चने रतः । अश्वमेधमवाप्नोति गतिं च परमां
व्रजेत् ६० ततो गच्छेत धर्मज्ञ भर्तृस्थानमनुत्तमम् । यत्र नित्यं महासेनो
गुहः संनिहितो नृपः ६१ तत्र गत्वा नृपश्रेष्ठ गमनादेव सिध्यति । कोटि-
तीर्थे नरः स्नात्वा गोसहस्रफलं लभेत् ६२ प्रदक्षिणमुपावृत्य ज्येष्ठस्थानं
व्रजेन्नरः । अभिगम्य महादेवं विराजति यथा शशी ६३ तत्र कूपे महा-
राज विश्रुता भरतर्षभ । समुद्रास्तत्र चत्वारो निवसन्ति युधिष्ठिर ६४
तत्रोपस्पृश्य राजेन्द्र पितृदेवार्चने रतः । नियतात्मा नरः पूतो गच्छेत
परमां गतिम् ६५ ततो गच्छेत राजेन्द्र शृङ्गवेरपुरं महत् । यत्र तीर्णो
महाराज रामो दाशरथिः पुरा ६६ तस्मिंस्तीर्थे महाबाहो स्नात्वा पापैः
प्रमुच्यते । गङ्गायां तु नरः स्नात्वा ब्रह्मचारी समाहितः ६७ विधूत-

---

ह्यांची प्राप्ति होते ५६. ह्या ठिकाणीं कालंजर ह्मणून एक जगद्विख्यात पर्वत आहे. तेथें जाऊन देवसरोवरामध्यें स्नान केलें असतां सहस्र गोप्रदानांचे फल प्राप्त होतें ५७. हे राजा, जो पुरुष त्या कालंजर पर्वतावर स्नान करून इतरांना स्नान घालितो त्याची स्वर्गलोकामध्यें प्रशंसा होते ह्यांत संशय नाहीं ५८. तदनंतर, हे प्रजाधिपते, मोठमोठ्या पर्वतांमध्यें श्रेष्ठ अशा चित्रकूट पर्वतावर जाऊन सर्वपापनाशक मंदाकिनीला जावें ५९ आणि देवपितरांच्या पूजनाविषयीं तत्पर राहून तेथें स्नान करीत असावें; ह्मणजे अश्वमेध यागाचें फल मिळून उत्कृष्ट गति प्राप्त होते ६०. तदनंतर, हे धर्मवेत्त्या राजा, उत्कृष्ट अशा भर्तृस्थानाप्रत जावें. त्या ठिकाणीं प्रचंड सेनाधिपति कार्तिकेय नेहमीं संनिध असतो ६१. हे नृपश्रेष्ठा, तेथें जावें; ह्मणजे जातांक्षणीं सिद्धि प्राप्त होते. कोटितीर्थामध्यें स्नान केलें असतां पुरुषाला सहस्र गोप्रदानांचें फल प्राप्त होतें ६२. तदनंतर प्रदक्षिणा वळून ज्येष्ठ स्थानाला जावें आणि महादेवाचें दर्शन घ्यावें; ह्मणजे पुरुष चंद्राप्रमाणें शोभूं लागतो ६३. हे महाराज भरतवंशजश्रेष्ठा संग्रामांत अचल रहाणाऱ्या भीष्मा, त्या ठिकाणीं कूपामध्यें प्रसिद्ध चार समुद्र वास्तव्य करीत असतात ६४. ह्यास्तव, हे राजाधिराज, जितेंद्रिय पुरुषानें तेथें स्नान करून देव आणि पितर ह्यांच्या पूजनामध्यें गढलेले असावें; ह्मणजे चित्तशुद्धि होऊन पुरुष मोक्षाला जातो ६५. तदनंतर, हे राजाधिराज, मोठ्या शृंगवेर पुराला जावें. हे महाराज, पूर्वी दाशरथी राम तेथें नावेंतून उतरून गेला होता ६६. त्या तीर्थामध्यें स्नान केलें असतां,

पाप्मा भवति वाजपेयं च विन्दति । ततो मुञ्जवटं गच्छेत्स्थानं देवस्य धीमतः ६८ अभिगम्य महादेवमभिवाद्य च भारत । प्रदक्षिणमुपावृत्य गाणपत्यमवाप्नुयात् ६९ तस्मिंस्तीर्थे तु जाह्नव्यां स्नात्वा पापैः प्रमुच्यते । ततो गच्छेत राजेन्द्र प्रयागमृषिसंस्तुतम् ७० यत्र ब्रह्मादयो देवा दिशश्च सदिगीश्वराः । लोकपालाश्च साध्याश्च पितरो लोकसंमताः ७१ सनत्कुमारप्रमुखास्तथैव परमर्षयः । अङ्गिरःप्रमुखाश्चैव तथा ब्रह्मर्षयोमलाः ७२ तथा नागाः सुपर्णाश्च सिद्धाश्चक्रधरास्तथा । सरितः सागराश्चैव गन्धर्वाप्सरसोपि च ७३ हरिश्च भगवानास्ते प्रजापतिपुरस्कृतः । तत्र त्रीण्यग्निकुण्डानि येषां मध्येन जाह्नवी ७४ वेगेन समतिक्रान्ता सर्वतीर्थपुरस्कृता । तपनस्य सुता देवी त्रिषु लोकेषु विश्रुता ७५ यमुना गङ्गया सार्धं संगता लोकपावनी । गङ्गायमुनयोर्मध्यं पृथिव्या जघनं स्मृतम् ७६ प्रयागं जघनस्थानमुपस्थमृषयो विदुः । प्रयागं सप्रतिष्ठानं कम्बलाश्वतरौ तथा ७७ तीर्थं भोगवती चैव वेदिरेषा प्रजापतेः । तत्र वेदाश्च यज्ञाश्च मूर्तिमन्तो युधि-

---

हे महापराक्रमी भीष्मा, पुरुष सर्व पातकांपासून मुक्त होतो. ब्रह्मचारी व स्वस्थचित्त पुरुषानें गंगेमध्यें स्नान केलें असतां ६७ त्याचें पाप नाहींसें होऊन वाजपेय यागाचें फल त्याला प्राप्त होतें. तदनंतर सर्वज्ञ महादेवाच्या मुंजवटनामक स्थानाला जावें ६८ आणि समीप गेल्यानंतर महादेवाला अभिवंदन करून प्रदक्षिणा करावी; ह्मणजे, हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, रुद्रगणांचें आधिपत्य प्राप्त होतें ६९. जान्हवीचे तीरीं असलेल्या तीर्थामध्यें स्नान केलें असतां पुरुष सर्वपापांपासून मुक्त होतो. तदनंतर, हे राजाधिराज भीष्मा, ऋषींनीं ज्याची प्रशंसा केली आहे अशा प्रयाग तीर्थाला जावें ७०. त्या ठिकाणीं ब्रह्मादि देव, दिक्पालांसहवर्तमान दिशा, लोकपाल, साध्य, लोकमान्य पितर ७१, सनत्कुमारप्रभृति महर्षि, अंगिरःप्रभृति निर्मळ ब्रह्मर्षि ७२, नाग, सुपर्ण, सिद्ध, सार्वभौम राजे, नद्या, सागर, गंधर्व, अप्सरा ७३ आणि ब्रह्मदेवाला पुढें करून भगवान् श्रीहरि हे असतात. तेथें तीन अग्निकुंडें आहेत व त्यांच्यामधून सर्व तीर्थांमध्यें श्रेष्ठ, तपनाची कन्या आणि त्रैलोक्यामध्यें विख्यात अशी देवी जान्हवी वेगानें निघून गेली आहे ७४, ७५. जगत्पावनी यमुनेचा गंगेशीं संगम झालेला आहे त्या गंगायमुनांच्या मध्यभागाला ह्मणजे संगमस्थानाला पृथ्वीचा जघनप्रदेश असें ह्मणतात ७६. प्रयाग हें पृथ्वीचें जघनस्थान अर्थात् उपस्थ असें ऋषि ह्मणतात. प्रतिष्ठानासहवर्तमान प्रयाग, कंबल आणि अश्वतर ७७ व भोगवती तीर्थ ही प्रजापतीची वेदि होय. हे संग्रामामध्यें अचल रहाणाऱ्या भीष्मा, त्या ठिकाणीं मूर्तिमंत वेद, यज्ञ ७८ आणि

ष्ठिर ७८ प्रजापतिमुपासन्ते ऋषयश्च तपोधनाः । यजन्ते क्रतुभिर्देवास्तथा चक्रधरा नृपाः ७९ ततः पुण्यतमं नाम त्रिषु लोकेषु भारत । प्रयागं सर्वतीर्थेभ्यः प्रवदन्त्यधिकं विभो ८० गमनात्तस्य तीर्थस्य नामसंकीर्तनादपि । मृत्युकालभयाच्चापि नरः पापात्प्रमुच्यते ८१ तत्राभिषेकं यः कुर्यात्संगमे लोकविश्रुते । पुण्यं स फलमाप्नोति राजसूयाश्वमेधयोः ८२ एषा यजनभूमिर्हि देवानामभिसंस्कृता । तत्र दत्तं सूक्ष्ममपि महद्भवति भारत ८३ न वेदवचनात्तात न लोकवचनादपि । मतिरुत्क्रमणीया ते प्रयागमरणं प्रति ८४ दश तीर्थसहस्राणि षष्टिः कोट्यस्तथापराः । येषां सांनिध्यमत्रैव कीर्तितं कुरुनन्दन ८५ चतुर्विद्ये च यत्पुण्यं सत्यवादिषु चैव यत् । स्नात एव तदाप्नोति गङ्गायमुनसंगमे ८६ तत्र भोगवती नाम वासुकेस्तीर्थमुत्तमम् । तत्राभिषेकं यः कुर्यात्सोऽश्वमेधफलं लभेत् ८७ तत्र हंसप्रपतनं तीर्थं त्रैलोक्यविश्रुतम् । दशाश्वमेधिकं चैव गङ्गायां कुरुनन्दन ८८ कुरुक्षेत्रसमा गङ्गा यत्र तत्रावगाहिता । विशेषो वै कनखले

तपोधन ऋषि ब्रह्मदेवाची उपासना करीत असतात आणि चक्रवर्ती राजे देवांना उद्देशून याग करीत असतात ७९. हे भरतकुलोत्पन्न प्रभो, त्रैलोक्यामध्ये सर्व तीर्थांपेक्षां प्रयाग तीर्थ श्रेष्ठ असून अत्यंत पुण्यवर्धक आहे असें ह्मणतात ८०. त्या तीर्थाला गेल्यानेंच नव्हे परंतु, त्याचें नामस्मरण केल्यानेंही मृत्यु आणि काल ह्यांचें भय ज्यांच्या योगानें प्राप्त होणारें आहे अशा पातकांपासून सुद्धां पुरुष मुक्त होतो ८१. त्या ठिकाणीं जगत्प्रसिद्ध संगमावर जो स्नान करितो त्याला राजसूय आणि अश्वमेध ह्या क्रतूंचें फल प्राप्त होतें ८२. देवांची ही संस्कार केलेली यज्ञभूमि आहे. ह्यास्तव, हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, ह्या ठिकाणीं सूक्ष्म जरी दान केलें तरी महादानाचें फल प्राप्त होतें ८३. वेदवचन अथवा लोकवचन कांहींही असलें तरी, बा भीष्मा, प्रयागतीर्थाचे ठिकाणीं मरणासंबंधानें तूं आपली मति मलतीच होऊं देऊं नकोस ८४. हे कुरुनंदना, दहा हजार तीर्थें आणि दुसरींही आणखीं साठ कोटी तीर्थें ह्या सर्वांचें येथेंच सांनिध्य असतें असें ह्मटलें आहे ८५. चारी वेद पठण केलेल्या ब्राह्मणाचे ठिकाणीं जें पुण्य असतें आणि सत्यवादी पुरुषांचे ठिकाणीं जें पुण्य असतें तें सर्व गंगा आणि यमुना ह्यांच्या संगमावर फक्त स्नान केल्यानेंच पुरुषाला प्राप्त होतें ८६. त्या ठिकाणीं भोगावती ह्मणून वासुकीचें उत्कृष्ट तीर्थ आहे. तेथ जो स्नान करितो त्याला अश्वमेध यागाचें फल प्राप्त होतें ८७. त्या ठिकाणीं त्रैलोक्यविख्यात असें हंसप्रपतन ह्मणून एक तीर्थ आहे आणि, हे कुरुनंदना भीष्मा, गंगेचे तीरीं दशाश्वमेधिक ह्मणूनही एक तीर्थ

प्रयागे परमं महत् ८९ ययकार्यशतं कृत्वा कृतं गङ्गावसेचनम्। सर्वं तत्तस्य गङ्गापो दहत्यग्निरिवेन्धनम् ९० सर्वं कृतयुगे पुण्यं त्रेतायां पुष्कर स्मृतम्। द्वापरेपि कुरुक्षेत्रं गङ्गा कलियुगे स्मृता ९१ पुष्करे तु तपस्तप्येद्दानं दद्यान्महालये। मलये त्वग्निमारोहेद्भृगुतुङ्गे त्वनाशनम् ९२ पुष्करे तु कुरुक्षेत्रे गङ्गायां मगधेषु च। स्नात्वा तारयते जन्तुः सप्तसप्तावरांस्तथा ९३ पुनाति कीर्तिता पापं दृष्ट्वा भद्रं प्रयच्छति। अवगाढा च पीता च पुनात्यासप्तमं कुलम् ९४ यावदस्थि मनुष्यस्य गङ्गायाः स्पृशते जलम्। तावत्स पुरुषो राजन्स्वर्गलोके महीयते ९५ यथा पुण्यानि तीर्थानि पुण्यान्यायतनानि च। उपास्य पुण्यं लब्ध्वा च भवत्यमरलोकभाक् ९६ न गङ्गासदृशं तीर्थं न देवः केशवात्परः। ब्राह्मणेभ्यः परं नास्ति एवमाह पितामहः ९७ यत्र गङ्गा महाराज स देशस्तत्तपोवनम्। सिद्धिक्षेत्रं च तज्ज्ञेयं गङ्गातीरसमाश्रितम् ९८ इदं सत्यं द्विजातीनां साधूनामात्म-

---

आहे ८८. गंगेमध्यें कोठेंही स्नान केलें तरी कुरुक्षेत्रांतील तीर्थामध्यें स्नान केल्याचें फल प्राप्त होतें. कनखल तीर्थामध्यें स्नान केलें असतां अधिक फल प्राप्त होतें आणि प्रयागामध्यें स्नान केलें असतां अधिक मोठें फल प्राप्त होतें ८९. शेंकडों दुष्कृत्यें केलेल्या पुरुषानें गंगास्नान केलें असतां अग्नि ज्या प्रमाणें इंधन दग्ध करून टाकितो त्याप्रमाणें गंगाजल त्याचें तें सर्व पातक दग्ध करून टाकितें ९०. कृतयुगामध्यें प्रत्येक तीर्थ पुण्यवर्धक असतें. त्रेतायुगामध्यें पुष्कर तीर्थच पुण्यप्रद रहातें. द्वापरयुगांत कुरुक्षेत्र पुण्यावह असतें आणि कलियुगामध्यें गंगा पुण्यदायक आहे ह्मणून ह्मटलें आहे ९१. पुष्कर तीर्थावर तपश्चर्या करावी, महालयामध्यें दान द्यावें, मलयपर्वतावर अग्निप्रवेश करावा आणि भृगुतुंग पर्वतावर प्रायोपवेशन करावें ९२. पुष्कर, कुरुक्षेत्र, गंगा आणि मगधदेश ह्या ठिकाणीं स्नान केलें असतां प्राणी आपल्या कुलांतील पुढल्या व मागल्या सात सात पुरुषांचा उद्धार करितो ९३. गंगेचें स्मरण केलें असतां पातक नाहींसें होतें, दर्शन झालें असतां पुण्य प्राप्त होतें आणि स्नान व पान झालें असतां सात पुरुषांपर्यंत कुलाचा उद्धार होतो ९४. हे राजा, अस्थीला गंगोदकाचा स्पर्श होतांक्षणीं तो पुरुष स्वर्गलोकामध्यें मानमान्यतेनें वास्तव्य करूं लागतो ९५. ज्याप्रमाणें पुण्यतीर्थांची व पुण्य स्थानांची सेवा करून पुण्य प्राप्त झाल्यावर पुरुष स्वर्ग लोकीं जातो त्याप्रमाणें गंगेची गोष्ट नाहीं ९६. गंगेसमान तीर्थ नाहीं, केशवाहून श्रेष्ठ देव नाहीं आणि ब्राह्मणांहून कांहीं श्रेष्ठ नाहीं असें ब्रह्मदेवांनीं ह्मटलें आहे ९७. हे महाराजा, जेथें गंगा असेल तो प्रदेश पुण्यकारक, तेंच तपोवन आणि ज्या स्थानाला गंगातीराचा आश्रय असेल

अस्य च । सुहृदां च जपेत्कर्णे शिष्यस्यानुगतस्य च ९९ इदं धन्यमिदं मेध्यमिदं स्वर्ग्यमनुत्तमम् । इदं पुण्यमिदं रम्यं पावनं धर्म्यमुत्तमम् १०० महर्षीणामिदं गुह्यं सर्वपापप्रमोचनम् । अधीत्य द्विजमध्ये च निर्मलः स्वर्गमाप्नुयात् १ श्रीमत्स्वर्ग्यं तथा पुण्यं सपत्नशमनं शिवम् । मेधाजननमग्र्यं वै तीर्थवंशानुकीर्तनम् २ अपुत्रो लभते पुत्रमधनो धनमाप्नुयात् । महीं विजयते राजा वैश्यो धनमवाप्नुयात् ॥ शूद्रो यथेप्सितान्कामान्ब्राह्मणः पारगः पठन् ३ यश्चेदं शृणुयान्नित्यं तीर्थपुण्यं नरः शुचिः । जातीः स स्मरते बह्वीर्नाकपृष्ठे च मोदते ४ गम्यान्यपि च तीर्थानि कीर्तितान्यगमानि च । मनसा तानि गच्छेत सर्वतीर्थसमीक्षया ५ एतानि वसुभिः साध्यैरादित्यैर्मरुद्भिश्विभिः । ऋषिभिर्देवकल्पैश्च स्नातानि सुकृतैषिभिः ६ एवं त्वमपि कौरव्य विधिनानेन सुव्रत । व्रज तीर्थानि नियतः पुण्यं पुण्येन वर्धयन् ७ भावितैः करणैः पूर्वमास्तिक्याच्छ्रुतिदर्शनात् । प्राप्यन्ते तानि तीर्थानि सद्भिः शास्त्रानुदर्शिभिः ८

तेंच सिद्धि प्राप्त होण्याचें स्थान असे समजावें ९८. सज्जन द्विज, आपला पुत्र, सुहृद् आणि आपल्या अनुरोधानें वागणारा शिष्य ह्यांच्याच मात्र कानामध्यें ह्या सत्याचा उपदेश करावा ९९. हें माहात्म्य, धनप्रद, पवित्र, स्वर्गप्रद, अनुपम, पुण्यकारक, रमणीय, पावन आणि धर्माला धरून असें उत्कृष्ट आहे १००. हें सर्वपापनाशक माहात्म्य महर्षींचें गुह्य आहे. ह्याचें अध्ययन द्विजांमध्यें केलें असतां पुरुष चित्तशुद्धि होऊन स्वर्गाला जातो १. हें तीर्थवंशाख्यान वैभवप्रद, स्वर्गप्रापक, पुण्यकारक, शत्रुनाशक, कल्याणदायक आणि सर्वोत्कृष्ट बुद्ध्युत्पादक आहे २. हें आख्यान पठण केल्यानें निपुत्रिकाला पुत्र होतो, दरिद्र्याला धनलाभ होतो, राजा पृथ्वी जिंकितो, वैश्याला धनप्राप्ति होते, शूद्राचे इच्छिलेले मनोरथ परिपूर्ण होतात आणि ब्राह्मण विद्यापारंगत होतो ३. हें तीर्थपुण्य जो पुरुष शुचिर्भूत राहून नित्य श्रवण करितो त्याला पूर्वींच्या पुष्कळ जन्मांचें स्मरण होतें आणि स्वर्गामध्यें तो सुखानें राहतो ४. ह्या ठिकाणीं गम्य आणि अगम्य अशीं दोन्हीं प्रकारचीं तीर्थें कथन केलीं आहेत. करितां, सर्व तीर्थांची अपेक्षा असल्यास त्या अगम्य तीर्थांची यात्रा मनानें करावी ५. वसु, साध्य, आदित्य, मरुद्गण, अश्विनीकुमार आणि देवतुल्य ऋषि यांनीं पुण्यसंपादनाची इच्छा धरून ह्या तीर्थांमध्यें स्नानें केलेलीं आहेत ६. तस्मात्, हे कुरुवंशजश्रेष्ठ सुव्रता, तूंही ह्याप्रकारें जितेंद्रिय राहून पुण्यानें पुण्यवृद्धि करण्याकरितां तीर्थयात्रा कर ७. पूर्वींपासून निग्रह केलेलीं इंद्रियें, आस्तिक्य बुद्धि आणि वेदवेत्तृत्व यथाशास्त्राला वागणाऱ्या सज्जनांना तीर्थयात्रा घडतात ८.

नाव्रती नाकृतात्मा च नाशुचिर्न च तस्करः । स्नाति तीर्थेषु कौरव्य न
च वक्रमतिर्नरः ९ त्वया तु सम्यग्वृत्तेन नित्यं धर्मार्थदर्शिना । पिता
पितामहश्चैव सर्वे च प्रपितामहाः ११० पितामहपुरोगाश्च देवाः सर्षि-
गणा नृप । तव धर्मेण धर्मज्ञ नित्यमेवाभितोषिताः ११ अवाप्स्यसि त्वं
लोकान्वै वसूनां वासवोपम । कीर्तिं च महतीं भीष्म प्राप्स्यसे भुवि
शाश्वतीम् १२ नारद उवाच॥एवमुक्त्वाभ्यनुज्ञाय पुलस्त्यो भगवानृषिः ।
प्रीतः प्रीतेन मनसा तत्रैवान्तरधीयत १३ भीष्मश्च कुरुशार्दूल शास्त्र-
तत्त्वार्थदर्शिवान् । पुलस्त्यवचनाच्चैव पृथिवीं परिचक्रमे १४ एवमेषा
महाभागा प्रतिष्ठाने प्रतिष्ठिता । तीर्थयात्रा महापुण्या सर्वपापप्रमोचनी १५
अनेन विधिना यस्तु पृथिवीं संचरिष्यति । अश्वमेधशतं साग्रं फलं प्रेत्य
स भोक्ष्यति १६ ततश्चाष्टगुणं पार्थ प्राप्स्यसे धर्ममुत्तमम् १७ भीष्मः
कुरूणां प्रवरो यथापूर्वमवाप्तवान् । नेता च त्वमृषीन्यस्मात्तेन तेऽष्टगुणं
फलम् १८ रक्षोगणविकीर्णानि तीर्थान्येतानि भारत । न गतानि मनुष्ये-
न्द्रैस्त्वामृते कुरुनन्दन १९ इदं देवर्षिचरितं सर्वतीर्थाभिसंवृतम् । यः

ज्यानें व्रत आचरिलेलें नाहीं, ज्यानें चित्तसंयमन केलेलें नाहीं, जो पवित्र नाहीं, जो चोर आहे आणि ज्याची मति सरळ नाही अशा पुरुषाला, हे कुरुवंशज-श्रेष्ठ भीष्मा, तीर्थांचें स्नान घडत नाही ९; परंतु, तूं नेहमीं सदाचरणीं राहून आणि धर्म व अर्थ ह्यांच्याकडे सतत लक्ष्य देऊन आपल्या धर्माचरणानें, हे धर्मवेत्त्या राजा, पिता, पितामह, पूर्वींचे सर्व पूर्वज, ब्रह्मदेवप्रभृति देव आणि ऋषिगण यांना नित्य संतुष्ट ठेविले आहेस ११०, ११. तस्मात्, हे वसुतुल्य भीष्मा, वसूंचे लोक तुला प्राप्त होतील आणि ह्या भूलोकावर तुझी मोठी अक्षय्य कीर्ति होईल १२. नारद सांगतातः—ह्याप्रमाणें, प्रसन्न झालेले भगवान् पुलस्त्य ऋषि प्रसन्न मनानें भीष्माला सांगून तेथेंच अंतर्धान पावले १३ आणि, हे कुरुवंशजश्रेष्ठ धर्मराजा, शास्त्रतत्त्वांचें मर्म जाणणाऱ्या भीष्मानेंही पुलस्त्य मुनींच्या सांगण्यावरून पृथ्वीपर्यटण केलें १४. ह्याप्र-माणें ही महाभाग्यप्रद, महापुण्यदायक आणि सर्वपापनाशक तीर्थयात्रा प्रयागाचे ठिकाणीं समाप्त होतें १५. ह्याप्रमाणें जो पृथ्वीपर्यटण करील तो ह्या जन्मानंतर शंभर अश्वमेध यागांचें संपूर्ण फल भोगील १६. परंतु, हे कुंतीपुत्रा धर्मराजा, कुरुवंशजश्रेष्ठ भीष्माला पूर्वीं प्राप्त झाल्याप्रमाणें तुला ह्यापेक्षां आठपट उत्कृष्ट पुण्य प्राप्त होईल. कारण, तूं ऋषींना तीर्थांचे ठिकाणीं नेणारा आहेस आणि त्यामुळें तुला आठपट फल मिळणार आहे १७, १८. हे भरतकुलोत्पन्ना कुरुनंदना धर्मराजा, राक्षसांचे समुदाय ह्या तीर्थांचे

पठेत्कल्यमुत्थाय सर्वपापैः प्रमुच्यते १२० ऋषिमुख्याः सदा यत्र वाल्मीकिस्त्वथ कश्यपः । आत्रेयः कुण्डजठरो विश्वामित्रोथ गौतमः २१ असितो देवलश्चैव मार्कण्डेयोथ गालवः । भरद्वाजो वसिष्ठश्च मुनिरुद्दालकस्तथा २२ शौनकः सह पुत्रेण व्यासश्च तपतां वरः । दुर्वासाश्च मुनिश्रेष्ठो जाबालिश्च महातपाः २३ एते ऋषिवराः सर्वे त्वत्प्रतीक्षास्तपोधनाः । एभिः सह महाराज तीर्थान्येतान्यनुव्रज २४ एष ते लोमशो नाम महर्षिरमितद्युतिः । समेष्यति महाराज तेन सार्धमनुव्रज २५ मयापि सह धर्मज्ञ तीर्थान्येतान्यनुक्रमात् । प्राप्स्यसे महतीं कीर्तिं यथा राजा महाभिषः २६ यथा ययातिर्धर्मात्मा यथा राजा पुरूरवाः । तथा त्वं राजशार्दूल स्वेन धर्मेण शोभसे २७ यथा भगीरथो राजा यथा रामश्च विश्रुतः । तथा त्वं सर्वराजभ्यो भ्राजसे रश्मिवानिव २८ यथा मनुर्यथेक्ष्वाकुर्यथा पूरुर्महायशाः । यथा वैन्यो महाराज तथा त्वमपि विश्रुतः २९ यथा च वृत्रहा सर्वान्सपत्नान्निर्दहन्पुरा । त्रैलोक्यं पालयामास देवराड्विगतज्वरः ३० तथा शत्रुक्षयं कृत्वा त्वं प्रजाः पालयिष्यसि । स्वधर्म-

---

ठिकाणी असतात. ह्यामुळ तुझ्यावाचून कोणीही राज ह्या तीर्थांना गेलेले नाहींत१९. सर्व तीर्थमय असें हें देवर्षिचरित पहाटस उठून जो पठण करितो तो सर्व पातकांपासून मुक्त होतो १२०. सर्वदा श्रेष्ठ श्रेष्ठ ऋषि ह्मणजे वाल्मीकि, कश्यप, आत्रेय, कुंडजठर, विश्वामित्र, गौतम २१ असित, देवल, मार्कंडेय, गालव, भरद्वाज, वसिष्ठ, उद्दालकमुनि २२, पुत्रासहवर्तमान शौनक, तपस्व्यांमध्यें श्रेष्ठ व्यास, मुनिश्रेष्ठ दुर्वास आणि महातपस्वी जाबालि २३हे सर्व तपोधनश्रेष्ठ ऋषि तुझ्यावर अवलंबून असतात. तस्मात्, हे महाराजा, ह्यांच्या सहवर्तमान तू ह्या तीर्थांना जा २४. हे महाराजा, हा अत्यंत तेजस्वी लोमश महर्षि तुझी गांठ घेईल. तेव्हां त्याच्यासहवर्तमान तू तीर्थाटण कर२५. हे धर्मवेत्त्या, माझ्याबरोबर ह्या तीर्थांसंबधानें तुझें भाषण झालें असल्यामुळें महाभिषराजाप्रमाणें तुझी मोठी कीर्ति होईल २६. हे नृपश्रेष्ठा धर्मराजा, धर्मात्म्या ययातीप्रमाणें अथवा राजा पुरूरव्याप्रमाणें तूं आपल्याच पुण्यानें शोभशील२७. भगीरथ राजाप्रमाणें अथवा प्रख्यात राम राजाप्रमाणें तूं सर्व राजांपेक्षां सूर्यासारिखा चमकत रहाशील २८. हे महाराजा, मनु, इक्ष्वाकु, महाकीर्तिमान् पूरु आणि वेनपुत्र पृथु ह्यांप्रमाणें तूंही प्रख्यात आहेस २९. ज्याप्रमाणें सर्व शत्रूंचें निर्दलन करणाऱ्या वृत्रनाशक देवराज इंद्रानें पूर्वी निश्चिंत होऊन त्रैलोक्याचें परिपालन केलें १३०. त्याचप्रमाणें, हे कमलनयना युधिष्ठिरा, शत्रूंचा क्षय करून स्वधर्मानें जिंकिलेली पृथ्वी प्राप्त झाल्यावर तूं

विजितामुर्वी प्राप्य राजीवलोचन । ख्यातिं यास्यसि धर्मेण कार्तवीर्या-
र्जुनो यथा ३१ वैशम्पायन उवाच ॥ एवमाश्वास्य राजानं नारदो भग-
वानृषिः । अनुज्ञाप्य महाराज तत्रैवान्तरधीयत ३२ युधिष्ठिरोपि धर्मात्मा
तमेवार्थं विचिन्तयन् । तीर्थयात्राश्रितं पुण्यमृषीणां प्रत्यवेदयत् १३३
[३७९५] इति श्रीमहाभारते ०वैयासिक्या मारण्यके पर्वणि तीर्थयात्रा
पर्वणि पुलस्त्यतीर्थयात्रायां नारदवाक्ये पञ्चाशीतितमोध्यायः ॥ ८५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ भ्रातॄणां मतमाज्ञाय नारदस्य च धीमतः ।
पितामहसमं धौम्यं प्राह राजा युधिष्ठिरः १ मया स पुरुषव्याघ्रो जिष्णुः
सत्यपराक्रमः । अस्त्रहेतोर्महाबाहुरमितात्मा विवासितः २ स हि वीरो-
नुरक्तश्च समर्थश्च तपोधनः । कृती च भृशमप्यस्त्रे वासुदेव इव प्रभुः ३
अहं ह्येतावुभौ ब्रह्मन्कृष्णावरिविघातिनौ । अभिजानामि विक्रान्तौ तथा
व्यासः प्रतापवान् ४ त्रियुगौ पुण्डरीकाक्षौ वासुदेवधनञ्जयौ । नारदोपि
तथा वेद योप्यशंसत्सदा मम ५ तथाहमपि जानामि नरनारायणावृषी ।
शक्तोयमित्यतो मत्वा मया स प्रेषितोर्जुनः ६ इन्द्रादनवरः शक्रं सुरसूनुः

प्रजापालन करिशील व धर्माच्या योगानें कार्तवीर्य अर्जुनासारिखी तुझी ख्याति होईल ३१. वैशंपायन सांगतातः—हे महाराज जनमेजया, ह्याप्रमाणें धर्मराजाला आश्वासन देऊन आणि त्याचा निरोप घेऊन भगवान् नारदऋषि तेथेच अंतर्धान पावले ३२. तेव्हां नारदानें सांगितलेल्याच गोष्टीचा विचार करीत असलेल्या धर्मात्म्या युधिष्ठिरानेंही तीर्थयात्रेसंबंधीं पुण्य ऋषींना कथन केलें १३३. ह्याप्रमाणे० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं नारदमुनींनीं कथन केलेल्या पुलस्त्यतीर्थयात्रेविषयीं पंच्यांयशीवा अध्याय समाप्त झाला ॥८५॥

वैशंपायन सांगतातः —भ्राते आणि विचारी नारद ह्यांचें मत जाणून युधिष्ठिर-राजा ब्रह्मदेवाप्रमाणे असलेल्या धौम्य मुनींना ह्मणाला १ " विजयशील, अमोघपराक्रमी, महाबाहु आणि अत्यंत धैर्यवान् अशा त्या पुरुषश्रेष्ठ अर्जुनाला अस्त्रप्राप्तीकरितां मीं येथून दूर पाठविलें २. तो वीर अनुरक्त, समर्थ व तपोधन असून अस्त्रांमध्येंही प्रभु वासुदेवाप्रमाणें अतिशय निपुण झाला आहे ३. हे ब्रह्मन्, हे उभयतां कृष्ण महापराक्रमी असून शत्रुनाशक आहेत असें मी समजतों. प्रतापी व्यासही तसें समजत आहेत ४. हे कमलनयन कृष्णार्जन तीन युगांमध्ये आहेतच; हें नारदांनीं जाणिलें असून मला ते सर्वदां सांगत असतात ५. सरांश, हे कृष्णार्जुन नरनारायण ऋषि आहेत हे मी जाणीत आहें आणि ह्मणूनच अर्जुन (कोठेंही एकटा जाण्यास) समर्थ आहे असें समजून मीं त्याला पाठविलें आहे ६. पराक्रमामध्यें इंद्रापेक्षां कमी नसणाऱ्या ह्या

सुराधिपम्। द्रष्टुमस्त्राणि चादातुमिन्द्रादिति विवासितः ७ भीष्मद्रोणावतिरथौ कृपो द्रौणिश्च दुर्जयः। धृतराष्ट्रस्य पुत्रेण वृता युधि महारथाः ८ सर्वे वेदविदः शूराः सर्वास्त्रविदुषस्तथा। योद्धुकामाश्च पार्थेन सततं ये महाबलाः ९ स च दिव्यास्त्रवित्कर्णः सूतपुत्रो महारथः १० यांस्त्रवेगानिलबलः शरार्चिस्तलनिःस्वनः। रजोधूमोस्त्रसंपातो धार्तराष्ट्रानिलोद्धतः ११ निसृष्ट इव कालेन युगान्ते ज्वलनो महान्। मम सैन्यमयं कक्षं प्रधक्ष्यति न संशयः १२ तं स कृष्णानिलोद्धूतो दिव्यास्त्रज्वलनो महान्। श्वेतवाजिबलाकाभृद्गाण्डीवेन्द्रायुधोल्बणः १३ संरब्धः शरधाराभिः सुदीप्तं कर्णपावकम्। अर्जुनोदीरितो मेघः शमयिष्यति संयुगे १४ स साक्षादेव सर्वाणि शक्रात्परपुरंजयः। दिव्यान्यस्त्राणि बीभत्सुस्तत्तश्च प्रतिपत्स्यते १५ अलं स तेषां सर्वेषामिति मे धीयते मतिः। नास्ति त्वतिकृतार्थानां रणेरीणां प्रतिक्रिया १६ ते वयं पाण्डवं सर्वे गृहीतास्त्रमरिन्दमम्। द्रष्टारो न हि बीभत्सुर्भारमुद्यम्य सीदति १७ वयं तु तमृते वीरं वनेस्मिन्द्विपदां वर।

देवपुत्र अर्जुनाला देवराज इंद्राचें दर्शन होऊन त्याच्यापासून अस्त्रें प्राप्त व्हावींत एतदर्थ मीं पाठविलें आहे ७. कारण, धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनानें भीष्म व द्रोण हे अतिरथि आणि कृप, अश्वत्थामा व दुर्जय हे महारथि, युद्धाकरितां मागून घेतलेले आहेत ८. हे सर्व वेदवेत्ते, शूर, सर्व अस्त्रें जाणणारे आणि महाबलाढ्य असून अर्जुनाशीं नेहमीं युद्ध करण्याची इच्छा करीत असतात ९. त्या महारथि सूतपुत्र कर्णाला तर दिव्य अस्त्रें अवगत आहेत १०. तस्मात्, अस्त्रवेगरूप वायूचें ज्याला बल आहे, बाण ह्या ज्याच्या ज्वाला आहेत, टाळ्या हाच ज्याचा ध्वनि आहे, अस्त्रपात हाच ज्याचा रजोमिश्रित धूम आहे ११ आणि धृतराष्ट्रपुत्रांनीं ज्याला प्रदीप्त केलें आहे असा जो युगांतसमयीं कालानें उत्पन्न केलेलाच कीं काय प्रचंड अग्नि माझ्या सैन्यमय कुरणाचा निःसंशय नाश करील १२ त्या अत्यंत प्रज्वलित कर्णरूप अग्नीला—कृष्णरूप वायूमुळें उत्पन्न झालेला, दिव्यास्त्ररूप विद्युल्लतेनें युक्त असलेला, श्वेताश्वरूप बगळ्यांनीं सपन्न असलेला, गांडीवरूप इंद्रधनुष्यानें युक्त असलेला व बाणांच्या धारांनीं क्षुब्ध झालेला—अर्जुननामक मेघ संग्रामामध्यें विजवून टाकील १३,१४. तो शत्रुसेनानाशक अर्जुन साक्षात् इंद्रापासून सर्व दिव्य अस्त्रें प्राप्त करून घेईल १५. तो अर्जुन सर्वांना पुरेसा आहे असें मला वाटतें. त्याच्यावांचून अतिशय कृतार्थ झालेल्या आपल्या शत्रूंचा प्रतीकार होणें अशक्य आहे १६. तस्मात्, अस्त्रप्राप्ति करून घेऊन आलेल्या शत्रुनाशक पांडुपुत्र अर्जुनाला आपण सर्व पाहूं. कारण, एकादी जोखीम अंगावर घेतल्यानंतर अर्जुन कधीं खचून

अवधानं न गच्छामः काम्यके सह कृष्णया १८ भवानन्यद्वनं साधु
बह्वन्नं फलवच्छुचि । आख्यातु रमणीयं च सेवितं पुण्यकर्मभिः १९ यत्र
कंचिद्वयं कालं वसन्तः सत्यविक्रमम् । प्रतीक्षामोर्जुनं वीरं वृष्टिकामा
इवाम्बुदम् २० विविधानाश्रमान्कांश्चिद्द्विजातिभ्यः प्रतिश्रुतान् । सरांसि
सरितश्चैव रमणीयांश्च पर्वतान् २१ आचक्ष्व न हि मे ब्रह्मन्रोचते तमृ-
तेर्जुनम् । वनेस्मिन्काम्यके वासो गच्छामोन्यां दिशं प्रति २२ [३८१७]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि
तीर्थयात्रापर्वणि धौम्यतीर्थयात्रायां षडशीतितमोध्यायः ॥ ८६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ तान्सर्वानुत्सुकान्दृष्ट्वा पाण्डवान्दीनचेतसः ।
आश्वासयंस्तथा धौम्यो बृहस्पतिसमोब्रवीत् १ ब्राह्मणानुमतान्पुण्यानाश्रमान्भरतर्षभ । दिशस्तीर्थानि शैलांश्च शृणु मे वदतोनघ २ याञ्छ्रुत्वा
गदतो राजन्विशोको भवितासि ह । द्रौपद्या चानया सार्धं भ्रातृभिश्च
नरेश्वर ३ श्रवणाच्चैव तेषां त्वं पुण्यमाप्स्यसि पाण्डव । गत्वा शतगुणं

जावयाचा नाहीं १७. तथापि, हे पुरुषश्रेष्ठ धौम्यमुने, त्याच्यावांचून ह्या काम्यक वनामध्यें द्रौपदीसहवर्तमान असलेल्या आह्मांला स्वस्थता नाहीं १८. तस्मात्, ज्याच्यांत अन्न पुष्कळ असून फळें आहेत आणि रमणीय असून पुण्यवान् लोकांनीं ज्याचा आश्रय केलेला आहे असें दुसरें एखादें चांगलें वन आपण आह्मांला सांगावें १९. ह्मणजे पर्जन्येच्छु लोक ज्याप्रमाणें मेघाची वाट पहात असतात त्याप्रमाणें अमोघपराक्रमी वीर अर्जुनाची वाट पहात पहात आह्मीं कांहीं कालपर्यंत तेथें राहूं २०. ह्यास्तव, आपण ब्राह्मणांपासून कांहीं नानाप्रकारचे आश्रम, सरोवरें, नद्या आणि रमणीय पर्वत ऐकिले असल्यास २१ मला सांगा. कारण, हे ब्रह्मन्, त्या अर्जुनावांचून ह्या काम्यक वनामध्यें वास्तव्य करणें मला रुचत नाहीं; आपण कोठें तरी दुसऱ्या दिशेकडे जाऊं २२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं धौम्यतीर्थयात्रेसंबंधीं श्यायशीवा अध्याय समाप्त झाला ॥८६॥

वैशंपायन सांगतात:—दुसरीकडे जाण्यास उद्युक्त व मनामध्यें खिन्न झालेल्या त्या पांडवांना बृहस्पतितुल्य धौम्य मुनि धीर देण्याकरितां ह्मणाले १ " हे भरतवंशजश्रेष्ठा निष्पापा युधिष्ठिरा, ब्राह्मणांना अभिमत असे पुण्यप्रद आश्रम, प्रदेश, तीर्थे आणि पर्वत मी सांगतों तें श्रवण कर २. हे प्रजाधिपते धर्मराजा, मी सांगत असतांना तें तूं श्रवण केलेस ह्मणजे ही द्रौपदी आणि भ्राते ह्यांसहवर्तमान तूं शोकरहित होशील ३ आणि, हे पांडुपुत्रा पुरुषश्रेष्ठ धर्मराजा, त्यांच्या श्रवणानें तुला पुण्यप्राप्ति होईल व

चैव तेभ्य एव नरोत्तम ४ पूर्वं प्राचीं दिशं राजन्राजर्षिगणसेविताम् । रम्यां
ते कथयिष्यामि युधिष्ठिर यथास्मृति ५ तस्यां देवर्षिजुष्टायां नैमिषं नाम
भारत । यत्र तीर्थानि देवानां पुण्यानि च पृथक्पृथक् ६ यत्र सा गोमती
पुण्या रम्या देवर्षिसेविता । यज्ञभूमिश्च देवानां शामित्रं च विवस्वतः ७
तस्यां गिरिवरः पुण्यो गयो राजर्षिसत्कृतः । शिवं ब्रह्मसरो यत्र सेवितं
त्रिदशर्षिभिः ८ यदर्थे पुरुषव्याघ्र कीर्तयन्ति पुरातनाः । एष्टव्या बहवः
पुत्रा यद्येकोपि गयां व्रजेत् ९ यजेत वाश्वमेधेन नीलं वा वृषमुत्सृजेत् ।
उत्तारयति संतत्या दशपूर्वान्दशावरान् १० महानदी च तत्रैव तथा गय-
शिरो नृप । यत्रासौ कीर्त्यते विप्रैरक्षय्यकरणो वटः ११ यत्र दत्तं पितृ-
भ्योन्नमक्षय्यं भवति प्रभो । सा च पुण्यजला तत्र फल्गुनामा महानदी १२
बहुमूलफला चापि कौशिकी भरतर्षभ । विश्वामित्रोध्यगाद्यत्र ब्राह्मणत्वं
तपोधनः १३ गङ्गा यत्र नदी पुण्या यस्यास्तीरे भगीरथः । अयजत्तत्र बहुभिः

त्यांची यात्रा करण्यानें तर शतपट पुण्य लागेल ४. हे राजा युधिष्ठिरा, राजर्षींचे समुदाय जिच्या आश्रयाला आहेत अशी पूर्वदिशा प्रथमतः मी तुला जशी आठवेल तशी सांगतों ५. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, देवर्षींचें जेथें वास्तव्य आहे अशा त्या पूर्व दिशेस नैमिष ह्मणून एक अरण्य आहे व त्यांत भिन्न भिन्न अशीं पुण्यप्रद देव-तीर्थें आहेत ६. त्या ठिकाणीं देवर्षींनीं सेवित अशी पुण्य व रम्य गोमती नदी असून देवांची यज्ञभूमि आहे आणि सूर्यपुत्र यमानें यज्ञांतील पशुहनन कर्म तेथें केलेलें आहे ७. त्या पूर्व दिशेस राजर्षींनीं सत्कार केलेला असा एक गय ह्मणून पुण्यप्रद श्रेष्ठ पर्वत आहे व त्या पर्वतावर देवर्षींनीं सेवित असें एक कल्याणकारक ब्रह्मसरोवर आहे ८. हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, त्या गयालाच उद्देशून पूर्वीचे लोक " पुष्कळ पुत्र प्राप्त होण्याची इच्छा धरावी ह्मणजे एकादा तरी गयेला जाईल, कोणी तरी अश्वमेध याग करील अथवा कोणी तरी नीलवृषोत्सर्ग करील अथवा संततीनें आपल्या कुलांतील पुढल्या मागल्या दहा दहा पुरुषांचा उद्धार करील " असें ह्मणत असतात ९, १०. हे राजा, महानदी आणि गयशिरस् हीं त्याच ठिकाणीं आहेत आणि अक्षय्य वटही तेथेंच असल्याचें विप्र सांगत आहेत ११. हे प्रभो, पितरांना उद्देशून त्या ठिकाणीं अन्न दिलें असतां तें अक्षय्य होतें. त्या ठिकाणीं पवित्र जलांनीं युक्त अशी फल्गुनामक महानदी आहे १२, विपुल फलमूलांनीं युक्त अशी कौशिकी नदीही, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, तेथें आहे आणि तपोधन विश्वामित्रालाही तेथेंच ब्राह्मणत्व प्राप्त झालेलें आहे १३. त्याच प्रदेशामध्यें पुण्यप्रद गंगानदी आहे व तिच्याच तीरीं भगीरथानें विपुल

क्रतुभिर्भूरिदक्षिणैः १४ पञ्चालेषु च कौरव्य कथयन्त्युत्पलावनम् । विश्वामित्रोऽयजद्यत्र पुत्रेण सह कौशिकः १५ यत्रानुवंशं भगवाञ्जामदग्न्यस्तथा जगौ । विश्वामित्रस्य तां दृष्ट्वा विभूतिमतिमानुषीम् १६ कान्यकुब्जेऽपिबत्सोममिन्द्रेण सह कौशिकः । ततः क्षत्रादपाक्रामद्ब्राह्मणोऽस्मीति चाब्रवीत् १७ पवित्रमृषिभिर्जुष्टं पुण्यं पावनमुत्तमम् । गङ्गायमुनयोर्वीर संगमं लोकविश्रुतम् १८ यत्रायजत भूतात्मा पूर्वमेव पितामहः । प्रयागमिति विख्यातं तस्माद्भरतसत्तम १९ अगस्त्यस्य तु राजेन्द्र तत्राश्रमवरो नृप । तत्तथा तापसारण्यं तापसैरुपशोभितम् २० हिरण्यबिन्दुः कथितो गिरौ कालञ्जरे महान् । अगस्त्यपर्वताद्रम्यः पुण्यो गिरिवरः शिवः २१ महेन्द्रो नाम कौरव्य भार्गवस्य महात्मनः । अयजत्तत्र कौन्तेय पूर्वमेव पितामहः २२ यत्र भागीरथी पुण्या सदस्यासीद्युधिष्ठिर । यत्र सा ब्रह्मशालेति पुण्या ख्याता विशाम्पते । धूतपाप्मभिराकीर्णा पुण्यं तस्याश्च दर्शनम् २३

दक्षिणांनीं युक्त असे पुष्कळ क्रतु केले आहेत १४. हे कुरुवंशजश्रेष्ठ युधिष्ठिरा, पञ्चाल देशामध्यें एक उत्पला वन आहे ह्मणून सांगत असतात. तेथें कौशिक विश्वामित्रानें पुत्रांसहवर्तमान यज्ञ केला आहे १५ व विश्वामित्रांची ती अमानुष विभूति अवलोकन करून त्या ठिकाणीं भगवान् जमदग्निपुत्र परशुरामांनीं विश्वामित्राच्या वंशाची स्तुति केली आहे १६. कान्यकुब्ज देशामध्यें इंद्रासहवर्तमान विश्वामित्रमुनींनीं सोमपान केलें आणि नंतर क्षत्रिय जातींतून निघून " मी ब्राह्मण आहें " असें ते ह्मणूं लागले १७. हे वीरा, गंगायमुनांचा उत्कृष्ट जगद्विख्यात संगम पवित्र, ऋषिसेवित पुण्य आणि इतरांना पवित्र करणारा आहे १८. त्या ठिकाणीं भूतात्म्या ब्रह्मदेवानें पूर्वी याग केलेला आहे आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, त्या प्रदेशाचें प्रयाग असें नांव विख्यात आहे १९. हे राजाधिराज धर्मराजा, अगस्त्य मुनींचा श्रेष्ठ आश्रमही तिकडेच आहे आणि तपस्वी लोकांनीं सुशोभित असें एक तपोवनही तेथें आहे २०. अगस्त्य पर्वताहूनही रम्य, पुण्यप्रद आणि कल्याणकारक असा एक हिरण्यबिंदु ह्मणून श्रेष्ठ पर्वत कालजर पर्वतावर आहे २१. हे कुरुवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, महात्म्या भृगुकुलोत्पन्न परशुरामाचा महेंद्रपर्वत तिकडेच आहे व त्याच ठिकाणीं, हे कुंतीपुत्रा, पूर्वी ब्रह्मदेवांनी यज्ञकर्म केलेलें आहे २२. हे युधिष्ठिरा, त्या ठिकाणीं मणिकर्णिकानामक सरोवरामध्यें पुण्यप्रद भागीरथी प्रविष्ट झाली आहे आणि, हे प्रजाधिपते, त्या ठिकाणीं ती पुण्यप्रद भागीरथी ब्रह्मशाला (ह्मणजे ब्रह्मप्राप्तीचें स्थान) ह्मणून प्रसिद्ध झाली आहे. ज्यांचें पाप क्षालन झालेलें आहे अशा लोकांनीं ती गजबजलेली असून तिचें

पवित्रो मङ्गलीयश्च ख्यातो लोके महात्मनः। केदारश्च मतङ्गस्य महाश्रम उत्तमः २४ कुण्डोदः पर्वतो रम्यो बहुमूलफलोदकः। नैषधस्तृषितो यत्र जलं शर्म च लब्धवान् २५ यत्र देववनं पुण्यं तापसैरुपशोभितम्। बाहुदा च नदी यत्र नन्दा च गिरिमूर्धनि २६ तीर्थानि सरितः शैलाः पुण्यान्यायतनानि च। प्राच्यां दिशि महाराज कीर्तितानि मया तव २७ तिसृष्वन्यानि पुण्यानि दिक्षु तीर्थानि मे शृणु। सरितः पर्वताश्चैव पुण्यान्यायतनानि च २८ [३८४५] इति श्रीमहाभारते॰मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि धौम्यतीर्थयात्रायां सप्ताशीतितमोऽध्यायः ॥८७॥

धौम्य उवाच ॥ दक्षिणस्यां तु पुण्यानि शृणु तीर्थानि भारत। विस्तरेण यथाबुद्धि कीर्त्यमानानि तानि वै १ यस्यामाख्यायते पुण्या दिशि गोदावरी नदी। बह्वारामा बहुजला तापसाचरिता शिवा २ वेणा भीमरथी चैव नद्यौ पापभयापहे। मृगद्विजसमाकीर्णे तापसालयभूषिते ३ राजर्षेस्तस्य च सरिन्नृगस्य भरतर्षभ। रम्यतीर्था बहुजला पयोष्णी द्विजसेविता ४ अपि चात्र महायोगी मार्कण्डेयो महायशाः। अनुवंश्यां

दर्शनही पवित्र आहे २३. महात्म्या मातंगमुनींचा पवित्र व मंगलावह असा मोठा उत्कृष्ट जगद्विख्यात केदाराश्रम तिकडेच आहे २४. फळें, मुळें आणि उदक ह्यांची जेथें समृद्धि आहे असा रमणीय कुंडोदपर्वत तेथें असून तृषाक्रांत झालेल्या निषधराज नलाला तेथेंच उदक व सुख प्राप्त झालेलें आहे २५. तपस्वी लोकांनीं सुशोभित असें पुण्य देववन, पर्वताच्या माथ्यावर असलेली नंदा आणि बाहुदा नदी हीं तिकडेच आहेत २६. हे महाराजा, पूर्व दिशेंतील तीर्थें, नद्या, पर्वत आणि पुण्य स्थानें मीं तुला कथन केलीं. २७ आतां इतर तीन दिशांतील पुण्य तीर्थें, नद्या, पर्वत आणि पुण्य स्थानें माझ्यापासून श्रवण कर २८. ह्याप्रमाणे॰ श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं धौम्यतीर्थयात्रेसंबधीं सत्यांयशींवा अध्याय समाप्त झाला ॥ ८७ ॥

धौम्य सांगतात:—हे भरतवंशजा युधिष्ठिरा, मी दक्षिण दिशेंतील पुण्य तीर्थें यथामति सविस्तर कथन करितों तीं तू श्रवण कर १. त्या दिशेला पुण्यप्रद गोदावरी नदी आहे. तिचे तीरीं पुष्कळ उपवनें आहेत, तपस्वी लोक तिचे तीरीं संचार करीत असतात आणि ती स्वतः कल्याणकारक असून विपुल जलानें युक्त आहे २. कृष्णवेणी आणि भीमरथी ह्या दोन नद्या पापभयनाशक, पशुपक्ष्यांनीं गजबजलेल्या आणि आश्रमांनीं भूषित आहेत ३. हे भरतवंशजश्रेष्ठा, द्विजांनीं सेवित, रम्य तीर्थांनीं युक्त आणि बहुजलसंपन्न अशी पयोष्णी ह्मणून त्या नृगराजर्षीची नदी आहे ४. ह्या ठिकाणीं

जगौ गाथां नृगस्य धरणीपतेः ५ नृगस्य यजमानस्य प्रत्यक्षमिति नः
श्रुतम् । अमाद्यदिन्द्रः सोमेन दक्षिणाभिर्द्विजातयः ६ पयोष्ण्यां यजमा-
नस्य वाराहे तीर्थ उत्तमे ७ उद्धृतं भूतलस्थं वा वायुना समुदीरितम् ।
पयोष्ण्या हरते तोयं पापमामरणान्तिकम् ८ स्वर्गादुत्तुङ्गममलं विषाणं
यत्र शूलिनः । स्वमात्मविहितं दृष्ट्वा मर्त्यः शिवपुरं व्रजेत् ९ एकतः
सरितः सर्वा गङ्गाद्याः सलिलोच्चयाः । पयोष्णी चैकतः पुण्या तीर्थेभ्यो
हि मता मम १० माठरस्य वनं पुण्यं बहुमूलफलं शिवम् । यूपश्च भर-
तश्रेष्ठ वरुणस्रोतसे गिरौ ११ प्रवेण्युत्तरमार्गे तु पुण्ये कण्वाश्रमे तथा ।
तापसानामरण्यानि कीर्तितानि यथाश्रुति १२ वेदी शूर्पारके तात जम-
दग्नेर्महात्मनः । रम्या पाषाणतीर्था च पुनश्चन्द्रा च भारत १३ अशो-
कतीर्थं तत्रैव कौन्तेय बहुलाश्रमम् । अगस्त्यतीर्थं पाण्ड्येषु वारुणं च
युधिष्ठिर १४ कुमार्यः कथिताः पुण्याः पाण्ड्येष्वेव नरर्षभ । ताम्रपर्णीं
तु कौन्तेय कीर्तयिष्यामि तां शृणु १५ यत्र देवैस्तपस्तप्तं महदिच्छद्भिरा-

महाकीर्तिमान् व महायागी मार्कंडेय मुनींनीं भूपति नृगाची त्याच्या वशाला अनुरूप अशी स्तुति केली आहे ५. पयोष्णीचे तीरीं उत्कृष्ट वाराहतीर्थावर नृगराजा यज्ञ करीत असतांना सर्वांच्या समक्ष सोमपानाच्या योगानें इंद्र व दक्षिणांच्या योगानें ब्राह्मण तृप्त झाल्याचें आमच्या ऐकण्यांत आहे ६, ७. वर काढिलेलें अथवा पात्रांत असलेलें पयोष्णीचें जल वायूनें उडून अंगावर आलें असतां आमरणांत पाप नाहींसें होतें ८. स्वर्गापेक्षांही उंच आणि निर्मल असें शिवशृंग त्या ठिकाणीं आहे. त्याचें दर्शन झालें असतां अथवा तेथें स्वतः आपण केलेल्या शिवशृंगानें दर्शन केलें असतां पुरुष शिवपुराला जातो ९. जलराशींनीं युक्त अशा सर्व गंगादि नद्या एकीकडे आणि पयोष्णी एकीकडे. कारण, ती सर्व तीर्थांपेक्षां अधिक पुण्यप्रद आहे असें मला वाटतें १०. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, वरुणस्रोतस् पर्वतावर फलमूलांनीं समृद्ध, कल्याणकारक आणि पुण्यप्रद असें माठर मुनींचें वन व यूप हीं आहेत ११. प्रवेणीच्या उत्तरेस पुण्यवर्धक अशा कण्वाश्रमामध्यें असलेलीं तपस्व्यांचीं अरण्यें लोकांनीं यथाश्रुत सांगून ठेविलीं आहेत १२. बा भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, शूर्पारकामध्यें महात्म्या जमदग्नीची वेदि आहे आणि पाषाणतीर्था व पुनश्चंद्रा अशा दोन रम्य नद्या आहेत १३. हे कुंतीपुत्रा, अनेक आश्रमांनीं युक्त असें अशोकतीर्थ त्याच ठिकाणीं आहे आणि, हे युधिष्ठिरा, पांड्यतीर्थ व वारुण तीर्थ हीं पांड्यदेशामध्यें आहेत १४. हे पुरुषश्रेष्ठा, पांड्यदेशामध्येंच पुण्यवान् कुमारी आहेत असें सांगतात. हे कुंतीपुत्रा धर्मराजा, ताम्रपर्णी नदीचा वृत्तांत तुला

श्रमे । गोकर्ण इति विख्यातस्त्रिषु लोकेषु भारत १६ शीततोयो बहु-
जलः पुण्यस्तात शिवः शुभः । ह्रदः परमदुष्प्रापो मानुषैरकृतात्मभिः १७
तत्र वृक्षतृणाद्यैश्च संपन्नः फलमूलवान् । आश्रमोऽगस्त्यशिष्यस्य पुण्यो
देवसमो गिरिः १८ वैदूर्यपर्वतस्तत्र श्रीमान्मणिमयः शिवः । अगस्त्य-
स्याश्रमश्चैव बहुमूलफलोदकः १९ सुराष्ट्रेष्वपि वक्ष्यामि पुण्यान्यायत-
नानि च । आश्रमान्सरितश्चैव सरांसि च नराधिप २० चमसोद्भेदनं
विप्रास्तत्रापि कथयन्त्युत । प्रभासं चोदधौ तीर्थं त्रिदशानां युधिष्ठिर २१
तत्र पिण्डारकं नाम तापसाचरितं शिवम् । उज्जयन्तश्च शिखरी क्षिप्रं
सिद्धिकरो महान् २२ तत्र देवर्षिवर्येण नारदेनानुकीर्तितः । पुराणः
श्रूयते श्लोकस्तं निबोध युधिष्ठिर २३ पुण्ये गिरौ सुराष्ट्रेषु मृगपक्षि-
निषेविते । उज्जयन्ते स्म तप्ताङ्गो नाकपृष्ठे महीयते २४ पुण्या द्वारवती
तत्र यत्रासौ मधुसूदनः । साक्षाद्देवः पुराणोऽसौ स हि धर्मः सनातनः २५

कथन करितों तो तू श्रवण कर १५. त्या ठिकाणीं मोक्षफलाची इच्छा करणाऱ्या देवांनीं आश्रमामध्यें तप केलेलें आहे. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, त्रैलोक्यामध्यें विख्यात असें एक गोकर्ण म्हणून सरोवर आहे १६. त्यांत विपुल उदक असून तें गार असतें. बा युधिष्ठिरा, पुण्यदायक आणि कल्याणकारक असें तें शुभ सरोवर मनःसंयमन न केलेल्या पुरुषांना प्राप्त होणें दुर्घट आहे १७. वृक्ष, तृण इत्यादिकांनीं संपन्न आणि फलमूलांनीं युक्त असा एक अगस्तिशिष्याचा आश्रम असून देवसम पुण्य पर्वत तेथेंच आहे १८. रत्नमय आणि सौंदर्यसंपन्न असा शुभ वैदूर्य पर्वत तेथें असून विपुल मुळें, फळें आणि उदक ह्यांनीं युक्त असलेला अगस्ति मुनींचा आश्रमही तेथेंच आहे १९. हे प्रजाधिपते, आतां सुराष्ट्रदेशांतील पुण्य स्थळें, आश्रम, नद्या आणि सरोवरें मी तुला सांगतों २०. हे युधिष्ठिरा, त्या ठिकाणीं चमसोद्भेदन, प्रभास आणि समुद्रामध्यें एक देवांचें तीर्थ तिकडे असल्याचें ब्राह्मण सांगत असतात २१. त्या ठिकाणीं तपस्वी लोकांनीं वास्तव्य केलेलें असें एक कल्याणकारक पिंडारक वन असून सत्वर मनोरथ परिपूर्ण करणारा असा उज्जयंत म्हणून एक मोठा पर्वत आहे २२. त्या ठिकाणीं, हे युधिष्ठिरा, देवर्षिश्रेष्ठ नारदांनीं कथन केलेला एक पुरातन श्लोक लोकांच्या ऐकण्यांत आहे तो तूं ऐकून ठेव २३. सुराष्ट्रदेशामध्यें पशुपक्षी ज्याच्या आश्रयानें रहातात अशा उज्जयंतनामक पुण्य पर्वतावर तप केलेला पुरुष स्वर्गामध्यें मानमान्यतेनें रहातो २४. पुण्यप्रद द्वारवती नगरी तिकडेच आहे. त्या ठिकाणीं तो साक्षात् मधुसूदन आहे. तोच पुरातन देव असून सनातन धर्मही तोच आहे २५.

ये च वेदविदो विप्रा ये चाध्यात्मविदो जनाः । ते वदन्ति महात्मानं कृष्णं धर्मं सनातनम् २६ पवित्राणां हि गोविन्दः पवित्रं परमुच्यते । पुण्यानामपि पुण्योऽसौ मङ्गलानां च मङ्गलम् । त्रैलोक्ये पुण्डरीकाक्षो देवदेवः सनातनः २७ अव्ययात्मा व्ययात्मा च क्षेत्रज्ञः परमेश्वरः । आस्ते हरिरचिन्त्यात्मा तत्रैव मधुसूदनः २८[३८७३]इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि धौम्यतीर्थयात्रायामष्टाशीतितमोऽध्यायः॥ ८८ ॥

धौम्य उवाच॥ आनर्तेषु प्रतीच्यां वै कीर्तयिष्यामि ते दिशि । यानि तत्र पवित्राणि पुण्यान्यायतनानि च १ प्रियङ्ग्वाम्रवणोपेता वानीरफलमालिनी । प्रत्यक्स्रोता नदी पुण्या नर्मदा तत्र भारत २ त्रैलोक्ये यानि तीर्थानि पुण्यान्यायतनानि च । सरिद्वनानि शैलेन्द्रा देवाश्च सपितामहाः ३ नर्मदायां कुरुश्रेष्ठ सह सिद्धर्षिचारणैः । स्नातुमायान्ति पुण्यौघैः सदा वारिषु भारत ४ निकेतः श्रूयते पुण्यो यत्र विश्रवसो मुनेः । जज्ञे धनपतिर्यत्र कुबेरो नरवाहनः ५ वैदूर्यशिखरो नाम पुण्यो गिरिवरः शिवः । नित्यपुष्पफलास्तत्र पादपा हरितच्छदाः ६ तस्य शैलस्य शिखरे

वेदवेत्ते ब्राह्मण आणि ब्रह्मवेत्ते लोक महात्म्या कृष्णाला सनातन धर्म असें ह्मणतात २६. त्रैलोक्यामध्यें ज्या ह्मणून कांहीं पवित्र वस्तु आहेत त्यांच्यामध्येंही गोविंद अतिशय पवित्र आहे. पुण्याचेंही पुण्य हाच कमलनयन देवाधिदेव असून मंगलांचेंही मंगल हाच सनातन देव आहे २७. अक्षरस्वरूप, क्षरस्वरूप, जीव आणि परमेश्वर असा अचिंत्यरूप मधुसूदन श्रीहरि त्याच ठिकाणी असतो २८. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रेपैकीं धौम्यतीर्थयात्रासंबंधीं अठ्यायंशीवा अध्याय समाप्त झाला ॥ ८८ ॥

धौम्य ह्मणतातः—पश्चिम दिशेस आनर्त देशामध्यें पवित्र आणि पुण्य अशी जीं स्थानें आहेत तीं मी तुला सांगतों १. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, तेथें नर्मदा ह्मणून पश्चिमवाहिनी पुण्य नदी आहे. तिच्या तीरीं वाघंट्या आणि आम्रवृक्ष ह्यांचीं वनें आहेत आणि वेतसफलांनीं ती नदी युक्त आहे २. त्रैलोक्यामध्यें जीं कांहीं तीर्थें, पुण्यस्थलें, मोठमोठें पर्वत, नद्या व वनें आहेत तीं सर्व नर्मदेचे तीरीं आहेत आणि ह्मणूनच ब्रह्मदेवासहवर्तमान देव ३, सिद्ध, ऋषि आणि चारण व इतरही पुण्यजनांचे समुदाय ह्यांच्या बरोबर, हे भरतकुलोत्पन्न कुरुश्रेष्ठ, नेहमीं नर्मदेचे तीर्थामध्यें स्नानाला येत असतात ४. विश्रवस् मुनींचें पवित्र स्थान तेथेंच असल्याचें ऐकण्यांत आहे आणि धनाधिपति नरवाहन कुबेराचा तेथेंच जन्म झालेला आहे ५. वैदूर्य शिखर ह्मणून एक पवित्र व श्रेष्ठ पर्वत आहे, तेथें वृक्षांचीं पानें नेहमीं

सरः पुण्यं महीपते । फुल्लपद्मं महाराज देवगन्धर्वसेवितम् ७ बह्वाश्चर्यं महाराज दृश्यते तत्र पर्वते । पुण्ये स्वर्गोपमे चैव देवर्षिगणसेविते ८ ह्लादिनी पुण्यतीर्था च राजर्षेस्तत्र वै सरित् । विश्वामित्रनदी राजन्पुण्या परपुरञ्जय ९ यस्यास्तीरे सतां मध्ये ययातिर्नहुषात्मजः । पपात स पुनर्लोकाँल्लेभे धर्मान्सनातनान् १० तत्र पुण्यो ह्रदः ख्यातो मैनाकश्चैव पर्वतः । बहुमूलफलोपेतस्त्वसितो नाम पर्वतः ११ आश्रमः कक्षसेनस्य पुण्यस्तत्र युधिष्ठिर । च्यवनस्याश्रमश्चैव विख्यातस्तत्र पाण्डव १२ तत्राल्पेनैव सिध्यन्ति मानवास्तपसा विभो । जम्बूमार्गो महाराज ऋषीणां भावितात्मनाम् १३ आश्रमः शाम्यतां श्रेष्ठ मृगद्विजनिषेवितः । ततः पुण्यतमा राजन्सततं तापसैर्युता १४ केतुमाला च मेध्या च गङ्गाद्वारं च भूमिप । ख्यातं च सैन्धवारण्यं पुण्यं द्विजनिषेवितम् १५ पितामहसरः पुण्यं पुष्करं नाम नामतः । वैखानसानां सिद्धानामृषीणामाश्रमः प्रियः १६ अप्यत्र संश्रयार्थाय प्रजापतिरथो जगौ । पुष्करेषु कुरुश्रेष्ठ गाथां सुकृ-

---

हिरवीं असून ते सर्वदां पुष्पांनीं व फलांनीं युक्त असतात ६. हे भूपते, त्या पर्वताच्या शिखरावर फुल्लपद्म ह्मणून एक पुण्य सरोवर आहे व, हे महाराजा, देव आणि गंधर्व त्याच्या आश्रयाला राहिलेले आहेत ७. हे महाराजा, देवर्षींच्या समुदायांनीं सेवित अशा त्या स्वर्गतुल्य पुण्यपर्वतावर कधीं कधीं (वेदघोष श्रवण वगैरे) मोठें आश्चर्य दृष्टोत्पत्तीस येत असतें ८. हे शत्रुसैन्यविजयी राजा, पुण्यजलानें युक्त, गरजणारी आणि पवित्र अशी एक विश्वामित्र राजर्षींची तेथें नदी आहे तिला विश्वामित्री नदी असें ह्मणतात ९. तिच्याच तीरीं सज्जनांमध्यें नहुषपुत्र ययाति पडला आणि त्याला पुनरपि धर्मार्जित सनातन लोक प्राप्त झाले १०. त्या ठिकाणीं एक पुण्य सरोवर आणि प्रसिद्ध मैनाक पर्वत आहे आणि विपुल फलमूलांनीं युक्त असा असित पर्वत आहे ११. हे युधिष्ठिरा, कक्षसेन मुनींचा पुण्य आश्रम तेथेंच असून, हे पांडुपुत्रा, च्यवन मुनींचाही प्रख्यात आश्रम तेथेंच आहे १२. हे प्रभो, त्या ठिकाणीं अल्प तपश्चर्येनें मनुष्यांना सिद्धि होते. हे महाराजा, जंबुमार्ग ह्मणून जितेंद्रिय ऋषींचा एक तेथें १३ आश्रम आहे व, हे क्षमाशीलांमध्यें श्रेष्ठ युधिष्ठिरा, तो आश्रम पशुपक्ष्यांनी सेवित आहे. पुढें, हे राजा, नेहमीं तपस्वी लोकांनीं युक्त आणि अत्यंत पुण्यकारक अशा १४ केतुमाला व मेध्या ह्मणून दोन नद्या आहेत व, हे भूपते, गंगाद्वार आणि पुण्यकारक व द्विजांनीं आश्रय केलेलें असें प्रख्यात सैंधव अरण्य हीं तिकडेच आहेत १५. पुष्कर ह्मणून ब्रह्मदेवाचें पुण्य सरोवर तेथेंच असून सिद्धि पावलेल्या वैखानस् ऋषींचा प्रिय आश्रमही तेथेंच

तिनां वर १७ मनसाप्यभिकामस्य पुष्कराणि मनस्विनः । विप्रणश्यन्ति पापानि नाकपृष्ठे च मोदते १८ [३८९१] इति श्रीमहाभारते०आरण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि धौम्यतीर्थयात्रायामूननवतितमोऽध्यायः ॥ ८९ ॥

धौम्य उवाच ॥ उदीच्यां राजशार्दूल दिशि पुण्यानि यानि वै । तानि ते कीर्तयिष्यामि पुण्यान्यायतनानि च १ शृणुष्वावहितो भूत्वा मम मन्त्रयतः प्रभो । कथाप्रतिग्रहो वीर श्रद्धां जनयते शुभाम् २ सरस्वती महापुण्या ह्लादिनी तीर्थमालिनी । समुद्रगा महावेगा यमुना यत्र पाण्डव ३ यत्र पुण्यतरं तीर्थं प्लक्षावतरणं शुभम् । यत्र सारस्वतैरिष्ट्वा गच्छन्त्यवभृथैर्द्विजाः ४ पुण्यं चाख्यायते दिव्यं शिवमग्निशिरोऽनघ । सहदेवोऽयजद्यत्र शम्याक्षेपेण भारत ५ एतस्मिन्नेव चार्थेऽसाविन्द्रगीता युधिष्ठिर । गाथा चरति लोकेऽस्मिन्गीयमाना द्विजातिभिः ६ अग्नयः सह देवेन ये चिता यमुनामनु । ते तस्य कुरुशार्दूल सहस्रशतदक्षिणाः ७

आहे १६ आणि, हे पुण्यवानांमध्यें श्रेष्ठ कुरुवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, ह्या पुष्कर तीर्थाविषयीं लोकांचा विश्वास बसावा एतदर्थ " पुष्कराला जाण्याचें मनांत आणणाऱ्याही विचारी पुरुषांचीं पातकें नाहींशीं होतात व तो स्वर्गामध्यें आनंदांत रहातो " अशी स्तुति ब्रह्मदेवानीं केलेली आहे १७, १८. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं धौम्यतीर्थयात्रासंबंधीं एकुणनव्वदावा अध्याय समाप्त झाला ॥ ८९ ॥

धौम्य सांगतातः—हे नृपश्रेष्ठा, उत्तर दिशेस जीं पुण्य तीर्थें आणि पवित्र स्थलें आहेत तीं मी तुला कथन करितों १. हे प्रभो, मी सांगत असतांना तूं लक्ष्य लावून ऐकत जा. कारण, हे वीरा, सांगितलेल्या गोष्टीचा विचार होऊं लागला ह्मणजे ऐकणाऱ्याचे ठिकाणीं तिच्याविषयीं चांगली श्रद्धा उत्पन्न होते २. हे पांडुपुत्रा धर्मराजा, तीर्थसमुदायांनीं युक्त व गर्जना करणारी अशी महापुण्यवती सरस्वती नदी तेथेंच आहे व समुद्रगामिनी महावेगवती यमुनाही तेथेंच आहे ३. त्या ठिकाणीं प्लक्षावतरण ह्मणून एक अतिशय पुण्यकारक शुभ तीर्थ आहे, त्या ठिकाणीं द्विज सारस्वत याग करून अवभृत स्नानाला जात असतात ४. हे निष्पापा, अग्निशिर ह्मणून तेथें एक शुभ व दिव्य तीर्थ आहे व तेथें, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, सृंजयपुत्र सहदेवानें शम्याक्षेप-परिमित प्रदेशावर मंडप घालून यज्ञ केलेला आहे ५. हे युधिष्ठिरा, ह्याच्याच संबंधानें इंद्रानें गाइलेली एक गाथा ह्या लोकांमध्यें प्रचारांत आहे आणि,

---

१ बलाढ्य पुरुषानें फेंकिलेलें लांकडाचें दांडकें जितकें लांब जाऊन पडतें तितक्या लांबीपर्यंतच्या प्रदेशाला शम्याक्षेप असें ह्मणतात.

तत्रैव भरतो राजा चक्रवर्ती महायशाः । विंशतिः सप्त चाष्टौ च हयमे-
धानुपाहरत् ८ कामकृधो द्विजातीनां श्रुतस्तात यथा पुरा । अत्यन्त-
माश्रमः पुण्यः शरभङ्गस्य विश्रुतः ९ सरस्वती नदी सद्भिः सततं पार्थ
पूजिता । वालखिल्यैर्महाराज यत्रेष्टमृषिभिः पुरा १० दृषद्वती महापुण्या
यत्र ख्याता युधिष्ठिर । न्यग्रोधाख्यस्तु पुण्याख्यः पाञ्चाल्यो द्विपदां
वरः ११ दाल्भ्यघोषश्च दाल्भ्यश्च धरणीस्थो महात्मनाः । कौन्तेयान-
न्तयशसः सुव्रतस्यामितौजसः १२ आश्रमः ख्यायते पुण्यस्त्रिषु लोकेषु
विश्रुतः । एतावर्णाववर्णौ च विश्रुतौ मनुजाधिप १३ वेदज्ञौ वेदविद्वांसौ
वेदविद्याविदावुभौ । ईजाते क्रतुभिर्मुख्यैः पुण्यैर्भरतसत्तम १४ समेत्य
बहुशो देवाः सेन्द्राः सवरुणाः पुरा । विशाखयूपेतप्यन्त तेन पुण्यतमश्च
सः १५ ऋषिर्महान्महाभागो जमदग्निर्महायशाः । पलाशकेषु पुण्येषु
रम्येष्वयजत प्रभुः १६ यत्र सर्वाः सरिच्छ्रेष्ठाः साक्षात्तमृषिसत्तमम् ।
स्वं स्वं तोयमुपादाय परिवार्योपतस्थिरे १७ अपि चात्र महाराज स्वयं

द्विज ती गांत असतात ६. सहदेवानें यमुनेचे तीरीं जें अग्निस्थापन केलें तें लाखों गणति दक्षिणा देऊन केलें ७. त्याच ठिकाणीं महाकीर्तिमान् चक्रवर्ती भरतराजानें पसतीस अश्वमेध केले ८. बा युधिष्ठिरा, द्विजांचे मनोरथ परिपूर्ण करणारा म्हणून ज्याची पूर्वी प्रख्याति असे तो शरभंग मुनींचा अत्यंत पुण्यकारक विख्यात आश्रमही तिकडेच आहे ९. हे कुंतीपुत्रा, साधु लोक सरस्वती नदीला नेहमीं मान देत असतात व, हे महाराजा, वालखिल्य मुनींनींही पूर्वी तिचेच तीरीं यज्ञयाग केलेलें आहेत १०. हे युधिष्ठिरा, महापुण्यप्रद व विख्यात अशी दशद्वती नदी तेथें आहे आणि तिचे तीरीं न्यग्रोध, पुरुषश्रेष्ठ पांचाल्य ११, दाल्भ्य, घोष आणि महाशय धरणीस्थ हे मुनि असून अनंत कीर्तिमान व अपरिमित तेजस्वी सुव्रत मुनींचा आश्रम, हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, तिकडेच आहे आणि तो पुण्यकारक आश्रम त्रैलोक्यामध्यें प्रख्यात आहे. हे भरतवंशजश्रेष्ठ राजा, कृष्णवर्ण आणि गुणत्रयरहित असे जे प्रख्यात वेदज्ञ, वेदवेत्ते आणि वेदविद्यावेत्ते उभयतां नरनारायण त्यांनीं, हे भरतवंशजश्रेष्ठा, ह्या ठिकाणीं पुण्यप्रद असे श्रेष्ठ श्रेष्ठ क्रतु केलेले आहेत १२, १३, १४. इंद्र आणि वरुण ह्यांसहवर्तमान देवांनीं पूर्वी एकत्र जुळून पुष्कळ वेळां विशाखयूपाचे ठिकाणीं तपश्चर्या केलेली आहे आणि त्यामुळें तो आश्रम अत्यंत पुण्यकारक आहे १५. महाभाग्यवान्, महायशस्वी व समर्थ जमदग्नि महर्षींनीं पवित्र व रमणीय अशा पलाश वृक्षांमध्यें यज्ञ केला १६. तेव्हां सर्व श्रेष्ठ श्रेष्ठ नद्या प्रत्यक्ष आपआपलें उदक घेऊन

विश्वावसुर्जगौ । इमं श्लोकं तदा वीर प्रेक्ष्य दीक्षां महात्मनः १८ यज-
मानस्य वै देवाञ्जमदग्नेर्महात्मनः । आगम्य सरितो विप्रान् मधुना सम-
तर्पयन् १९ गन्धर्वयक्षरक्षोभिरप्सरोभिश्च सेवितम् । किरातकिंनरावासं
शैलं शिखरिणां वरम् २० बिभेद तरसा गङ्गा गङ्गाद्वारं युधिष्ठिर ।
पुण्यं तत्ख्यायते राजन्ब्रह्मर्षिगणसेवितम् २१ सनत्कुमारः कौरव्य पुण्यं
कनखलं तथा । पर्वतश्च पुरुर्नाम यत्र यातः पुरूरवाः २२ भृगुर्यत्र तप-
स्तेपे महर्षिगणसेविते । राजन्स आश्रमः ख्यातो भृगुतुङ्गो महागिरिः २३
यः स भूतं भविष्यच्च भवच्च भरतर्षभ । नारायणः प्रभुर्विष्णुः शाश्वतः
पुरुषोत्तमः २४ तस्यातियशसः पुण्यां विशालां बदरीमनु । आश्रमः
ख्यायते पुण्यस्त्रिषु लोकेषु विश्रुतः २५ उष्णतोयवहा गङ्गा शीततोयवहा
परा । सुवर्णसिकता राजन्विशालां बदरीमनु २६ ऋषयो यत्र देवाश्च
महाभागा महौजसः । प्राप्य नित्यं नमस्यन्ति देवं नारायणं प्रभुम् २७
यत्र नारायणो देवः परमात्मा सनातनः । तत्र कृत्स्नं जगत्सर्वं तीर्था-

---

त्या मुनींच्या भोंवतीं उभ्या राहिल्या १७. हे महाराजा वीरा, त्या महात्म्याची दीक्षा अवलोकन करून विश्वावसूनें स्वतः " महात्मा जमदग्नि देवांना उद्देशून याग करूं लागला असतां नद्यांनीं प्रत्यक्ष येऊन उत्कृष्ट अन्नानें ब्राह्मणांचें संतर्पण केलें " अशा अर्थाचा-यजमानस्य०समतर्पयन्-हा श्लोक ह्मणून ठविलेला आहे १८,१९. गंधर्व, यक्ष, राक्षस, आणि आप्सरा जेथें जात असतात आणि किरात व किन्नर हे जेथें वास्तव्य करीत असतात अशा श्रेष्ठ हिमालय पर्वताला २० वेगानें फोडून गंगा गेली आहे त्या स्थानाला, हे राजा युधिष्ठिरा, गंगाद्वार असें ह्मणतात. तें पुण्यप्रद असून ब्रह्मर्षींचे समुदाय तेथें जात असतात २१. हे कुरुवंशज श्रेष्ठा, सनत्कुमार, पुण्य कन-खल आणि पुरुनांवाचा पर्वत हीं तेथेंच असून तेथेंच पुरुरवा गेलेला होता २२. हे राजा, महर्षिसमुदायांनीं सेवित अशा ज्या पर्वतावर भृगु महर्षींनीं तपश्चर्या केली त्या महापर्वताला भृगुतुंग असें नांव आहे व तें स्थान भृगु मुनींचा आश्रम ह्मणून प्रसिद्ध आहे २३. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, भूत, भविष्य आणि वर्तमान असा जो पुरुषश्रेष्ठ अक्षय्य जगत्प्रभु व सर्व व्यापी नारायण २४ त्या अत्यंत कीर्तिमान् नारायणाचा विशालानामक बदरीसमीप त्रैलोक्यविख्यात् पुण्य आश्रम आहे २५. हे राजा, त्या बदरिकाश्रमामध्यें पूर्वी उष्ण व शीत अशा दोन्ही उदकप्रवाहांनीं गंगा वहात होती व तिच्यांतील वाळू सुवर्णमय होती २६. त्या ठिकाणीं महाभाग्यवान् व महातेजस्वी ऋषी आणि देव नित्य जाऊन देवाधिदेव प्रभु

न्यायतनानि च २८ तत्पुण्यं परमं ब्रह्म तत्तीर्थं तत्तपोवनम् । तत्परं परमं देवं भूतानां परमेश्वरम् २९ शाश्वतं परमं चैव धातारं परमं पदम् । यं विदित्वा न शोचन्ति विद्वांसः शास्त्रदृष्टयः ३० तत्र देवर्षयः सिद्धाः सर्वे चैव तपोधनाः । आदिदेवो महायोगी यत्रास्ते मधुसूदनः ३१ पुण्यानामपि तत्पुण्यमत्र ते संशयोस्तु मा ३२ एतानि राजन्पुण्यानि पृथिव्यां पृथिवीपते । कीर्तितानि नरश्रेष्ठ तीर्थान्यायतनानि च ३३ एतानि वसुभिः साध्यैरादित्यैर्मरुदश्विभिः । ऋषिभिर्देवकल्पैश्च सेवितानि महात्मभिः ३४ चरन्नेतानि कौन्तेय सहितो ब्राह्मणर्षभैः । भ्रातृभिश्च महाभागैरुत्कण्ठां विहरिष्यसि ३५ [३९०६] इति श्रीमहाभारते०मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि धौम्यतीर्थयात्रायां नवतितमोध्यायः ॥ ९० ॥

वैशम्पायन उवाच ॥ एवं संभाषमाणे तु धौम्ये कौरवनन्दन । लोमशः स महातेजा ऋषिस्तत्राजगाम ह १ तं पाण्डवाग्रजो राजा सगणो

नारायणाला प्रणाम करीत असतात २७. ज्या ठिकाणीं परमात्मा सनातन नारायण देव आहे तथें सर्व जगत् असून तीर्थें व पुण्यस्थलेंही तेथेंच आहेत २८. तें स्थान पुण्यकारक आहे; सर्वोत्कृष्ट ब्रह्मप्राप्तीचें साधन तेंच आहे; तीर्थ व तपोवन ह्या खऱ्या खऱ्या संज्ञा त्यालाच आहेत; श्रेष्ठाहूनही श्रेष्ठ असा भूताधिपति परमेश्वर तोच आहे; शाश्वत आणि उत्कृष्ट असा लोकोत्पादक तोच असून ब्रह्मपदही तोच आहे आणि त्यालाच जाणिल्यानें शास्त्रवेत्त्या विद्वान पुरुषांना शोकाचें कारण रहात नाहीं २९,३०. ज्या ठिकाणीं आदिदेव महायोगी मधुसूदन असतो तेथें देवर्षि, सिद्ध आणि सर्व तपस्वी असतात ३१. ह्यास्तव, तो आश्रम पुण्यआश्रमांमध्येंही पुण्यआश्रम आहे ह्याविषयीं तुला संशय नको ३२. हे भूपते पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, पृथ्वींतील हीं पुण्य तीर्थें व स्थलें मीं तुला कथन केलीं ३३. ह्यांची यात्रा वसु, साध्य, आदित्य, मरुद्गण, आश्विनीकुमार आणि महात्मे देवतुल्य ऋषि ह्यांनीं केलेली आहे ३४. ह्यास्तव, हे कुंतीपुत्रा धर्मराजा, मुख्य मुख्य ब्राह्मण आणि महाभाग्यवान् भ्राते ह्यांच्यासहवर्तमान तूं ह्या तीर्थांची यात्रा करूं लाग ह्मणजे तुझी चिंता दूर होईल ३५. ह्याप्रमाणें०वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं धौम्यतीर्थयात्रासंबंधीं नव्वदावा अध्याय समाप्त झाला ॥९०॥

वैशंपायन सांगतातः— हे कौरवनंदना जनमेजया, ह्याप्रमाणें धौम्यमुनि सांगत आहेत तोंच महातेजस्वी लोमष ऋषि तेथें आले १. तेव्हां पांडवांचा ज्येष्ठ भ्राता जो धर्मराजा त्यानें आपल्या अनुयायांसहवर्तमान व तेथें असलेल्या ब्राह्मणांनीं स्वर्गामध्यें देव ज्याप्रमाणें इंद्राला उत्थापन देतात त्याप्रमाणें त्या महाभाग्यवान् मुनीला

ब्राह्मणाश्च ते । उपातिष्ठन्महाभागं दिवि शक्रमिवामराः २ समभ्यर्च्य यथान्यायं धर्मपुत्रो युधिष्ठिरः । पप्रच्छागमने हेतुमटने च प्रयोजनम् ३ स पृष्टः पाण्डुपुत्रेण प्रीयमाणो महामनाः । उवाच श्लक्ष्णया वाचा हर्षयन्निव पाण्डवान् ४ संचरन्नस्मि कौन्तेय सर्वाँल्लोकान्यदृच्छया । गतः शक्रस्य भवनं तत्रापश्यं सुरेश्वरम् ५ तव च भ्रातरं वीरमपश्यं सव्यसाचिनम् । शक्रस्यार्धासनगतं तत्र मे विस्मयो महान् ६ आसीत्पुरुषशार्दूल दृष्ट्वा पार्थं तथागतम् । आह मां तत्र देवेशो गच्छ पाण्डुसुतान्प्रति ७ सोऽहमभ्यागतः क्षिप्रं दिदृक्षुस्त्वां सहानुजम् । वचनात्पुरुहूतस्य पार्थस्य च महात्मनः ८ आख्यास्ये ते प्रियं तात महत्पाण्डवनन्दन । भ्रातृभिः सहितो राजन्कृष्णया चैव तच्छृणु ९ यत्त्वयोक्तो महाबाहुरस्त्रार्थं भरतर्षभ तदस्त्रमाप्तं पार्थेन रुद्रादप्रतिमं विभो १० यत्तद्ब्रह्मशिरो नाम तपसा रुद्रमागमत् । अमृतादुत्थितं रौद्रं तल्लब्धं सव्यसाचिना ११ तत्समन्त्रं ससंहारं सप्रायश्चित्तमङ्गलम् । वज्रमस्त्राणि चान्यानि दण्डादीनि युधि-

---

उत्थापन घतलें २. तदनंतर धर्मपुत्र युधिष्ठिरानें त्याचें यथाविधि पूजन करून पृथ्वीपर्यटण करण्याचें प्रयोजन आणि येण्याचा हेतु ह्यांविषयीं त्यांना प्रश्न केला ३. तेव्हां पांडुपुत्र धर्मराजानें प्रश्न केल्यावर त्याच्यावर प्रसन्न होऊं लागलेले ते महाशय लोमशमुनि पांडवांना आनंदित करीतच कीं काय मधुर वाणीनें ह्मणाले ४, " हे कुंतीपुत्रा, मी स्वेच्छेनें सर्व लोकांमध्यें संचार करीत असतां व संचार करितां करितां (परवां) इंद्रलोकीं गेलों होतों. त्या ठिकाणीं मीं देवराज इंद्र अवलोकन केला ५ आणि इंद्राच्या अर्ध्या आसनावर बसलेला तुझा वीर भ्राता अर्जुनही अवलोकन केला. तेव्हां, हे पुरुषश्रेष्ठा युधिष्ठिरा, अर्जुन तसा बसलेला पाहून मला मोठेंच आश्चर्य वाटलें. नंतर " पांडुपुत्रांकडे जा " असें देवराज इंद्रानें मला सांगितलें ६,७. ह्यास्तव, इंद्र व महात्मा अर्जुन ह्यांच्या सांगण्यावरून कनिष्ठ भ्रात्यांसहवर्तमान तुझी भेट घेण्याकरितां मी सत्वर येथें आलों आहें ८. बा पांडुपुत्रा, मी एक तुला प्रिय गोष्ट सांगणार आहें ती, हे राजा, तूं आणि द्रौपदी असे उभयतां श्रवण करा ९. हे भरतवंशजश्रेष्ठ प्रभो, ज्याकरितां तूं महापराक्रमी अर्जुनाला जाण्याची अनुज्ञा दिलीस तें अप्रतिम अस्त्र रुद्रापासून अर्जुनाला प्राप्त झालें १०. ब्रह्मशिरस्‌नामक जें अस्त्र तपश्चर्येनें रुद्राला प्राप्त झालें होतें तें अमृतापासून निघालेलें असून तेंही अर्जुनाला मिळालें ११. तें अस्त्र समंत्रक उपसंहारासह आणि प्रायश्चित्त व मंगल यांसह त्याला प्राप्त झालेलें आहे. त्याचप्रमाणें वज्रास्त्रही त्याला मिळालेलें आहे आणि, हे युधि-

ष्ठिर १२ यमात्कुबेराद्वरुणादिन्द्राच्च कुरुनन्दन । अस्त्राण्यधीतवान्पार्थो
दिव्यान्यमितविक्रमः १३ विश्वावसोस्तु तनयाद्गीतं नृत्यं च साम च ।
वादित्रं च यथान्यायं प्रत्यविन्दद्यथाविधि १४ एवं कृतास्त्रः कौन्तेयो गान्धर्वं
वेदमाप्तवान् । सुखं वसति बीभत्सुरनुजस्यानुजस्तव १५ यदर्थं मां सुरश्रेष्ठ
इदं वचनमब्रवीत् । तच्च ते कथयिष्यामि युधिष्ठिर निबोध मे १६
भवान्मनुष्यलोकेऽपि गमिष्यति न संशयः । ब्रूयाद्युधिष्ठिरं तत्र
वचनान्मे द्विजोत्तम १७ आगमिष्यति ते भ्राता कृतास्त्रः क्षिप्रमर्जुनः ।
सुरकार्यं महत्कृत्वा यदशक्यं दिवौकसैः १८ तपसापि त्वमात्मानं
योजय भ्रातृभिः सह । तपसो हि परं नास्ति तपसा विन्दते महत् १९
अहं च कर्णं जानामि यथावद्भरतर्षभ । सत्यसन्धं महोत्साहं महावीर्यं
महाबलम् २० महाहवेष्वप्रतिमं महायुद्धविशारदम् । महाधनुर्धरं वीरं
महास्त्रं वरवर्णिनम् २१ महेश्वरसुतप्रख्यमादित्यतनयं प्रभुम् । तथार्जुनम-
तिस्कन्धं सहजोल्बणपौरुषम् ॥ न स पार्थस्य सङ्ग्रामे कलामर्हति

ष्ठिरा, इतरही दृढप्रभृति अस्त्रें त्याला प्राप्त झालेलीं आहेत १२. हे कुरुनंदना, यम, कुबेर, वरुण आणि इंद्र ह्यांच्यापासून अत्यंत पराक्रमी अर्जुनाला दिव्य अस्त्रांचा उपदेश झालेला आहे १३. विश्वावसु गंधर्वाच्या पुत्रापासून गीत, नृत्य, साम आणि वाद्य हीं त्याला यथान्याय व यथाविधि प्राप्त झालेली आहेत १४. ह्याप्रमाणें अस्त्रप्राप्ति झाल्यानंतर कुंतीपुत्र अर्जुनाला गांधर्व वेद प्राप्त झाला आहे आणि ह्यामुळे तो तुझ्या कनिष्ठ भ्रात्याचा कनिष्ठ भ्राता अर्जुन स्वर्गामध्ये सुखानें वास्तव्य करीत आहे १५. हे युधिष्ठिरा, त्याच्याकरितां सुरश्रेष्ठ इंद्रानें जे कांहीं मला सांगितले आहे ते मी तुला कथन करितो; तूं श्रवण कर १६. " आपण मनुष्यलोकांमध्येही निःसंशय जालच. करितां, तेथें गेल्यावर, हे द्विजश्रेष्ठ, युधिष्ठिराला माझा निरोप सांगा की १७, अस्त्रप्राप्ति झालेला तुझा भ्राता अर्जुन—देवांना अशक्य असें एक मोठें देवकार्य करून—लवकर परत येईल १८. तूंही भ्रात्यांसहवर्तमान तप करीत रहा. कारण, तपापेक्षा कांहीएक श्रेष्ठ नाहीं व तपानेंच महत्प्राप्ति होते १९. हे भरतवंशजश्रेष्ठा, कर्ण हा सत्यप्रतिज्ञ, मोठा उत्साही, महावीर्यवान्, महाबलाढ्य, मोठमोठ्या संग्रामांमध्यें अप्रतिम, मोठें युद्ध करण्यामध्यें निपुण, महाधनुर्धारी, वीर, मोठा अस्त्रवेत्ता, अतिशय सौंदर्यसंपन्न, शिवपुत्र कार्तिकेयाची बरोबरी करणारा, सूर्यपुत्र व समर्थ असल्याचे मी जाणीत आहे आणि त्याचप्रमाणें ज्याचा पराक्रम साहाजिकच भयंकर आहे व ज्याचे स्कंध उन्नत आहेत त्या अर्जुनालाही मी जाणून आहें. वस्तुतः संग्रामामध्ये अर्जुनाच्या सोळाव्या हिश्शालेंही

षोडशीम् २२ यच्चापि ते भयं कर्णान्मनसिस्थमरिन्दम । तच्चाप्यपहरि-
ष्यामि सव्यसाचिन्युपागते २३ यच्च ते मानसं वीर तीर्थयात्रामिमां
प्रति । समहर्षिर्लोमशस्ते कथयिष्यत्यसंशयम् २४ यच्च किंचित्तपोयुक्तं
फलं तीर्थेषु भारत । ब्रह्मर्षिरेष ब्रूयात्ते न तच्छ्रद्धेयमन्यथा २५ [३९५१]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि
तीर्थयात्रापर्वणि लोमशसंवादे एकनवतितमोऽध्यायः ॥ ९१ ॥

लोमश उवाच ॥ धनञ्जयेन चाप्युक्तं यत्तच्छृणु युधिष्ठिर । युधिष्ठिरं भ्रातरं
मे योजयेर्धर्म्यया श्रिया १ त्वं हि धर्मान्परान्वेत्थ तपांसि च तपोधन । श्रीमतां
चापि जानासि धर्मं राज्ञां सनातनम् २ स भवान्परमं वेद पावनं पुरुषं
प्रति । तेन संयोजयेथास्त्वं तीर्थपुण्येन पाण्डवान् ३ यथा तीर्थानि गच्छेत
गाश्च दद्यात्स पार्थिवः । तथा सर्वात्मना कार्यमिति मामर्जुनोऽब्रवीत् ४
भवता चानुगुप्तोऽसौ चरेत्तीर्थानि सर्वशः । रक्षोभ्यो रक्षितव्यश्च दुर्गेषु
विषमेषु च ५ दधीच इव देवेन्द्रं यथा चाप्यंगिरा रविम् । तथा रक्षस्व

कर्णाची योग्यता नाहीं २०, २१, २२. हे शत्रुदमना, तुझ्या मनामध्यें जें कर्णाचें भय आहे तेंही मी अर्जुन आल्यावर नाहींसें करून टाकीन २३. हे वीरा, ह्या तीर्थयात्रेसंबधानें जें कांही तुझ्या मनांतून आहे तें लोमशमहर्षि तुला निःसंशय कथन करितील २४ आणि, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, हा ब्रह्मर्षि तीर्थसंबंधानें जें कांहीं तला तपोयुक्त फल सांगेल त्याच्यावर तूं अविश्वास करू नको २५. ह्याप्रमाणें॰ वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं लोमशमुनींच्या संवादासंबधीं एक्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥९१॥

लोमश सांगतातः— हे युधिष्ठिरा, अर्जुनानें जें सांगितलें आहे तें तूं श्रवण कर. "माझ्या भ्रात्या युधिष्ठिराला आपण धर्मसपन्न करा १. कारण, हे तपोधना, आपण उत्कृष्ट उत्कृष्ट धर्म आणि तप जाणत आहां आणि वैभवशालि राजांचा सनातन धर्मही आपणास विदित आहे २. पुरुषाला पवित्र करणारें काय हेंही आपणांला माहीत आहे तस्मात्, पांडवांच्या हातून आपण तीर्थपुण्य संपादन करवा ३. सारांश, धर्मराजा तीर्थयात्रा करून गोप्रदानें करील अशा रीतीनें आपण अगदीं मनापासून तजवीज करा " असें मला अर्जुनानें सांगितलें आहे ४. (आणखीही तो मला ह्मणाला)" आपण संरक्षण करणारे असला ह्मणजे तो सर्व तीर्थयात्रा करील. आणि दुर्गम व गहन प्रदेशांमध्यें राक्षसांपासून त्याचें रक्षण करावें ५. सारांश, हे द्विजश्रेष्ठ, दधीच ऋषींनीं जसें देवराज इंद्राचें रक्षण केलें अथवा अंगिरामुनींनी सूर्याचें

कौन्तेयान्राक्षसेभ्यो द्विजोत्तम ६ यातुधाना हि बहवो राक्षसाः पर्वतोपमाः । त्वयाभिगुप्तं कौन्तेयं न विवर्तेयुरन्तिकम् ७ सोहमिन्द्रस्य वचनान्नियोगादर्जुनस्य च । रक्षमाणो भयेभ्यस्त्वां चरिष्यामि त्वया सह ८ द्विस्तीर्थानि मया पूर्वं दृष्टानि कुरुनन्दन । इदं तृतीयं द्रक्ष्यामि तान्येव भवता सह ९ इयं राजर्षिभिर्याता पुण्यकृद्भिर्युधिष्ठिर । मन्वादिभिर्महाराज तीर्थयात्रा भयापहा १० नानृजुर्नाकृतात्मा च नाविद्यो न च पापकृत् । स्नाति तीर्थेषु कौरव्य न च वक्रमतिर्नरः ११ त्वं तु धर्ममतिर्नित्यं धर्मज्ञः सत्यसंगरः । विमुक्तः सर्वसंगेभ्यो भूय एव भविष्यसि १२ यथा भगीरथो राजा राजानश्च गयादयः । यथा ययातिः कौन्तेय तथा त्वमपि पाण्डव १३ युधिष्ठिर उवाच ॥ न हर्षात्संप्रपश्यामि वाक्यस्यास्योत्तरं क्वचित् । स्मरेद्धि देवराजो यं कोनामाभ्यधिकस्ततः १४ भवता संगमो यस्य भ्राता चैव धनञ्जयः । वासवः स्मरते यस्य को नामाभ्यधिकस्ततः १५ यच्च मां भगवानाह तीर्थानां दर्शनं

रवीचें रक्षण केलें तसें आपण कुंतीपुत्रांचें राक्षसांपासून रक्षण करा ६. पर्वततुल्य असे असंख्य राक्षस व यातुधान–आपण संरक्षण करणार असला ह्मणजे–कुंतीपुत्रांच्या समीप येणार नाहींत " ७. तस्मात्, इंद्राच्या वचनावरून आणि अर्जुनाच्या सांगण्यावरून भयांपासून तुझें रक्षण करीत करीत मी तुझ्याबरोबर संचार करीन ८. हे कुरुनंदना, मीं पूर्वीं दोन वेळ तीर्थयात्रा केल्या आहेत. आतां तींच तीर्थें मी तुझ्याबरोबर तिसऱ्या वेळीं अवलोकन करीन ९. हे महाराज युधिष्ठिरा, पुण्यवान् मनुप्रभृति राजर्षींनीं ही भयनाशक तीर्थयात्रा केली आहे १०. हे कुरुवंशजश्रेष्ठा, सरळ रीतीनें न वागणारा, अजितेंद्रिय, अविज्ञानी, पापी अथवा दुष्टबुद्धि पुरुषाला तीर्थांचें स्नान घडत नाहीं ११. तूं तर धर्मवेत्ता असून सत्यवचनी आहेस आणि सर्व संगांपासून मुक्त आहेस. तऱ्हां (तीर्थयात्रा केल्यानें) तूं अधिकच पापमुक्त होशील १२. हे कुंतीपुत्रा पांडवा, भगीरथ राजा, गयप्रभृति राजे आणि ययाति राजा ह्याप्रमाणेच तूं आहेस" १३. (युधिष्ठिर ह्मणतो) "ह्या आपल्या ह्मणण्यावर मला तर हर्षामुळें कांहीं उत्तर सुचत नाहीं. देवराज इंद्र ज्याचें स्मरण करीत आहे त्यापेक्षां अधिक असा कोण बरें (मानव) असणार ? १४. आपल्याशीं ज्याचा समागम, अर्जुन ज्याचा भ्राता आणि इंद्र ज्याची आठवण करितो त्यापेक्षां

१ मद्रामध्यें " सत्य संगरः " असें पद आहे. त्याचें स्पष्टीकरण नीलकंठपंडितांनीं " सत्यप्रज्ञः " असें करून त्या आपल्या रीतीचें "यान्येव संग्रामनामानि प्रज्ञानामानीति यास्क वचनात् " असें समर्थन केलें आहे परंतु, पंडितांचें हें पांडित्य चिंत्य आहे.

प्रति । धौम्यस्य वचनादेषा बुद्धिः पूर्वं कृतैव मे १६ तयदा मन्यसे ब्रह्मन्गमनं तीर्थदर्शने । तदैव गन्तास्मि तीर्थान्येष मे निश्चयः परः १७ वैशम्पायन उवाच । गमने कृतबुद्धिं तु पाण्डवं लोमशोऽब्रवीत् । लघुर्भव महाराज लघुः स्वैरं गमिष्यसि १८ युधिष्ठिर उवाच । भिक्षाभुजो निवर्तन्तां ब्राह्मणा यतयश्च ये । क्षुत्तृडध्वश्रमायासशीतार्तिमसहिष्णवः १९ ते सर्वे विनिवर्तन्तां ये च मिष्टभुजो द्विजाः । पक्कान्नलेह्यपानानां मांसानां च विकल्पकाः २० तेपि सर्वे निवर्तन्तां ये च सूदानुयायिनः। मया यथोचिताजीव्यैः संविभक्ताश्च वृत्तिभिः २१ ये चाप्यनुगताः पौरा राजभक्तिपुरःसराः । धृतराष्ट्रं महराजमभिगच्छन्तु ते च वै २२ स दास्यति यथा कालमुचिता यस्य या भृतिः । स चेद्यथोचितां वृत्तिं न दद्यान्मनुजेश्वरः २३ अस्मत्प्रियहितार्थाय पांचाल्यो वः प्रदास्यति २४ वैशम्पायन उवाच ॥ ततो भूयिष्ठशः पौरा गुरुभारप्रपीडिताः ।

कोण बरें अधिक आहे ? १५. भगवानांनीं तीर्थयात्रेसंबंधानें जें मला सांगितलें त्याविषयीं धौम्य मुनींच्या सांगण्यावरून माझा हा निश्चय पूर्वीच झालेला होता १६ तस्मात्, हे ब्रह्मन्, जेव्हां तीर्थांच्या दर्शनाला जाणें आपल्या मनांत असेल तेव्हां मी तीर्थांना येईनच. हा माझा पक्का निश्चय आहे १७. वैशंपायन सांगतात:— ह्याप्रमाणें तीर्थयात्रेला जाण्याविषयीं निश्चय केलेल्या पांडुपुत्र युधिष्ठिराला लोमश ह्मणाले " हे महाराजा, तर मग आपल्याबरोबर परिवार थोडा घे. कारण, फार परिवार नसला ह्मणजे तुला यथेच्छ जातां येईल " १८. युधिष्ठिर ह्मणतो:— क्षुधा, तृषा, मार्गातील श्रम, आयास आणि शीत ह्यांचें दुःख सहन करण्यास समर्थ नसणारे भिक्षान्न भक्षण करणारे ब्राह्मण व यति आता परत जाऊं द्या १९. त्याचप्रमाणें मिष्टान्न भक्षण करणारे द्विज आणि पक्कान्नें, लेह्य, पेय व मांस ह्यांची चिकित्सा करणारे ह्याही सर्वांना परत जाऊं द्या २०. अचाऱ्यांच्या हाताखालचे जे असतील त्याही सर्वांना परत जाऊं द्या; आणि सेवकांकडून ज्यांची मीं आजपर्यंत मानमान्यता राखिली व ज्यांच्या उपजीविकेची व्यवस्था लाविली २१ असे जे राजनिष्ठ नगरवासी जन माझ्याबरोबर येथें आले आहेत त्यांना महाराज धृतराष्ट्राकडे जाऊं द्या २२. ज्याला जें वेतन माझ्याकडून मिळत होतें तें वेतन तो धृतराष्ट्र राजा वेळेवर देईल. तो राजा जर योग्य-रीतीनें त्यांच्या उपजीविकेची व्यवस्था न बघेल तर २३ आमचें प्रिय व हित करण्याकरितां पंचालराजा तुमची व्यवस्था ठेवील २४. वैशंपायन सांगतात:—(ह्याप्रमाणें धर्मराजानें सांगितल्यानंतर) मोठ्या जबाबदारीमुळें व्याकुल झालेले पुष्कळ नगरवासी जन, विप्र

विप्राश्च यतयो मुख्या जग्मुर्नागपुरं प्रति २५ तान्सर्वान्धर्मराजस्य प्रेम्णा राजांबिकासुतः । प्रतिजग्राह विधिवद्धनैश्च समतर्पयत् २६ ततः कुन्तीसुतो राजा लघुभिर्ब्राह्मणैः सह । लोमशेन च सुप्रीतस्त्रिरात्रं काम्यकेऽवसत् २७ इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां द्विनवतितमोऽध्यायः [३९७८] ॥ ९२ ॥

वैशम्पायन उवाच । ततः प्रयान्तं कौन्तेयं ब्राह्मणा वनवासिनः । अभिगम्य तदा राजन्निदं वचनमब्रुवन् १ राजंस्तीर्थानि गन्तासि पुण्यानि भ्रातृभिः सह । ऋषिणा चैव सहितो लोमशेन महात्मना २ अस्मानपि महाराज नेतुमर्हसि पाण्डव । अस्माभिर्हि न शक्यानि त्वदृते तानि कौरव ३ श्वापदैरुपसृष्टानि दुर्गाणि विषमाणि च । अगम्यानि नरैरल्पैस्तीर्थानि मनुजेश्वर ४ भवतो भ्रातरः शूरा धनुर्धरवराः सदा । भवद्भिः पालिताः शूरैर्गच्छामो वयमप्युत ५ भवत्प्रसादाद्धि वयं प्राप्नुयामः सुखं फलम् । तीर्थानां पृथिवीपाल वनानां च विशांपते ६ तव वीर्यपरित्राताः शुद्धास्तीर्थपरिप्लुताः । भवेम धूतपाप्मानस्तीर्थसं-

---

आणि मुख्य मुख्य यति हास्तिनपुराला परत गेले २५; व त्या सर्वांचा अंबिकापुत्र धृतराष्ट्र राजानें धर्मराजाच्या प्रेमामुळें स्वीकार केला आणि द्रव्य देऊन त्यांना रीतीप्रमाणें संतुष्ट केलें २६. तदनंतर थोडे ब्राह्मण आणि लोमशमुनि ह्यांसहवर्तमान कुंतीपुत्र धर्मराजा सुप्रसन्न होऊन काम्यक वनामध्यें त्रिरात्र राहिला २७. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं ब्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ ९२ ॥

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय राजा, तदनंतर कुंतीपुत्र युधिष्ठिर तेथून जाऊं लागला असतां वनवासी ब्राह्मण त्याच्या समीप येऊन ह्मणाले १ " हे राजा, भ्रात्यासहवर्तमान आणि महात्म्या लोमश ऋषीसहवर्तमान तूं पुण्यतीर्थांना जात आहेस २. तस्मात्, हे पांडुपुत्रा महाराजा, तूं आह्मांलाही बरोबर घेऊन जा. कारण, हे कुरुवंशजा, तुझ्यावांचून आह्मांला त्यांची यात्रा होणें शक्य नाहीं ३. हे प्रजाधिपते, त्या तीर्थांचे मार्ग दुर्गम व कठिण असून तीं तीर्थें श्वापदांनीं आश्रय केलेलीं असतात ह्यामुळें अशक्त लोकांना त्यांची यात्रा होणें अशक्य आहे ४. तुझे भ्राते शूर असून धनुर्धरांमध्यें नेहमीं श्रेष्ठ आहेत. तस्मात्, तुह्मी शूर आमचे संरक्षण करणार असला ह्मणजे आह्मीही तीर्थांना जाऊं ५ आणि, हे प्रजाधिपते भूपाला, तुमच्या कृपेनें तीर्थयात्रांचें आणि वनयात्रांचें सुखावह असें फल आह्मी प्राप्त करून घेऊं ६. हे राजा, तुमच्या सामर्थ्यानें आमचें सर्वस्वीं रक्षण होऊन तीर्थांमध्यें स्नान केल्यानें आह्मी शुद्ध

दर्शनान्नृप ७ भवानपि नरेन्द्रस्य कार्तवीर्यस्य भारत । अष्टकस्य च
राजर्षेर्लोमपादस्य चैव ह ८ भरतस्य च वीरस्य सार्वभौमस्य पार्थिव ।
ध्रुवं प्राप्स्यति दुष्प्रापाल्लोँकांस्तीर्थपरिप्लुतः ९ प्रभासादीनि तीर्थानि
महेन्द्रादींश्च पर्वतान् । गङ्गाद्याः सरितश्चैव प्लक्षादींश्च वनस्पतीन् १०
त्वया सह महीपाल द्रष्टुमिच्छामहे वयम् ११ यदि ते ब्राह्मणेष्वस्ति
काचित्प्रीतिर्जनाधिप । कुरु क्षिप्रं वचोस्माकं ततः श्रेयोभिपत्स्यसे १२
तीर्थानि हि महाबाहो तपोविघ्नकरैः सदा । अनुकीर्णानि रक्षोभिस्तेभ्यो
न स्त्रातुमर्हसि १३ तीर्थान्युक्तानि धौम्येन नारदेन च धीमता । यान्यु-
वाच च देवर्षिर्लोमशः सुमहातपाः १४ विधिवत्तानि सर्वाणि पर्यटस्व
नराधिप । धूतपाप्मा सहास्माभिर्लोमशेनाभिपालितः १५ स राजा पूज्य-
मानस्तैर्हर्षादश्रुपरिप्लुतः । भीमसेनादिभिर्वीरैर्भ्रातृभिः परिवारितः १६
बाढमित्यब्रवीत्सर्वांस्तानृषीन्पाण्डवर्षभः । लोमशं समनुज्ञाप्य धौम्यं चैव
पुरोहितम् १७ ततः स पाण्डवश्रेष्ठो भ्रातृभिः सहितो वशी । द्रौपद्या

होऊं आणि तीर्थांच्या दर्शनानें आमचीं पातकेंही नाहींशीं होतील ७. शिवाय, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, तुलाही तीर्थस्नान घडलें असतां कार्तवीर्य राजा, राजर्षि अष्टक व लोमपाद आणि सार्वभौम राजा वीर भरत ह्यांना प्राप्त झालेले दुष्प्राप्य लोक प्राप्त होतील ८,९. हे प्रजाधिपते भूपाला, प्रभासादि तीर्थें, महेंद्रादि पर्वत, गंगादि नद्या आणि अक्षय वटादि वृक्ष तुझ्यासहवर्तमान अवलोकन करण्याची आमची इच्छा आहे १०, ११. ब्राह्मणांचे ठिकाणीं जर तुझें कांहीं प्रेम असेल तर आमच्या ह्मणण्याला तूं सत्वर मान दे ह्मणजे तुझें कल्याण होईल १२. हे महापराक्रमी युधिष्ठिरा, तपाला विघ्न करणाऱ्या त्या राक्षसांनीं तीर्थें व्याप्त झालेलीं असतात. तेव्हां त्या राक्षसांपासून तूं आमचें रक्षण कर १३. धौम्य व विचारी नारद ह्यांनीं जीं तीर्थें कथन केलीं आणि त्याचप्रमाणें अत्यंत महातपस्वी देवर्षि लोमश मुनींनीं जीं तीर्थें सांगितलीं १४ त्या सर्वांची, हे प्रजाधिपते, तू यथाविधि यात्रा कर व लोमश महर्षि रक्षण करीत असतांना आह्मांसहवर्तमान तूं आपलें पातक क्षालन कर" १५. ह्याप्रमाणें ते ब्राह्मण त्या धर्मराजाची प्रशंसा करूं लागले असतां त्या भीमसेनप्रभृति शूर भ्रात्यांनीं परिवेष्टित असलेल्या धर्मराजाचे नेत्र आनंदानें भरून आले १६; आणि लोमश व पुरोहित धौम्य ह्यांची अनुज्ञा घेऊन त्या पांडुपुत्र श्रेष्ठ धर्मराजानें त्या सर्व ऋषींना "ठीक आहे" असें सांगितलें १७. तदनंतर त्या जितेंद्रिय व श्रेष्ठ पांडुपुत्रानें भ्राते आणि निर्दोष अवयवांनीं युक्त अशी द्रौपदी ह्यांना बरोबर घेऊन तीर्थ यात्रेला

थानवर्यांगया गमनाय मनो दधे १८ अथ व्यासो महाभागस्तथा पर्वतनारदौ । काम्यके पाण्डवं द्रष्टुं समाजग्मुर्मनीषिणः १९ तेषां युधिष्ठिरो राजा पूजां चक्रे यथाविधि । सत्कृतास्ते महाभागा युधिष्ठिरमथाब्रुवन् २० ऋषय ऊचुः ॥ युधिष्ठिर यमौ भीम मनसा कुरुतार्जवम् । मनसा कृतशौचा वै शुद्धास्तीर्थानि यास्यथ २१ शरीरनियमं प्राहुर्ब्राह्मणा मानुषं व्रतम् । मनोविशुद्धां बुद्धिं च दैवमाहुर्व्रतं द्विजाः २२ मनोऽदुष्टं शौचाय पर्याप्तं वै नराधिप । मैत्रीं बुद्धिं समास्थाय शुद्धास्तीर्थानि द्रक्ष्यथ २३ ते यूयं मानसैः शुद्धाः शरीरनियमव्रतैः । दैवं व्रतं समास्थाय यथोक्तं फलमाप्स्यथ २४ ते तथेति प्रतिज्ञाय कृष्णया सह पाण्डवाः । कृतस्वस्त्ययनाः सर्वे मुनिभिर्दिव्यमानुषैः २५ लोमशस्योपसंगृह्य पादौ द्वैपायनस्य च । नारदस्य च राजेन्द्र देवर्षेः पर्वतस्य च २६ धौम्येन सहिता वीरास्तथा तैर्वनवासिभिः । मार्गशीर्ष्यामतीतायां पुष्येण प्रययुस्ततः २७ कठिनानि समादाय चीराजिनजटाधराः । अभेद्यैः

जाण्याचा विचार केला १८ इतक्यांत महाभाग्यवान् व्यास आणि पर्वत व नारद असे ज्ञानवान् मुनि काम्यक वनामध्ये पांडुपुत्र धर्मराजाला भेटण्याकरितां आले १९. ते आल्यानंतर राजा युधिष्ठिरानें त्यांचें यथाविधि पूजन केलें आणि सत्कार झाल्यावर ते महाभगवान् मुनि युधिष्ठिराला ह्मणाले २०. "हे युधिष्ठिरा, हे नकुलसहदेवहो, हे भीमसेना, तुह्मी मनामध्यें श्रद्धा धरा; मनानें तुह्मी आपली शुद्धि केलीत ह्मणजे तुह्मी शुद्ध होऊन तीर्थांना जाल २१. ब्राह्मण शरीरनियम हें मानुषव्रत आहे असें समजून मनःशुद्धिकारक बुद्धि हें दैवव्रत आहे असेंही ते ह्मणत असतात २२. हे प्रजाधिपते, निर्दोष मन झालें ह्मणजे तें शुद्धीला योग्य होतें. ह्यास्तव, मित्रभाव मनामध्यें आणून तुह्मी शुद्ध व्हा आणि नंतर तीर्थांच्या दर्शनाला जा २३. सारांश, शरीरनियमसंबंधीं व्रतांनीं शुद्ध होऊन शुद्ध मनानीं तुह्मी दैवव्रताचें अवलंबन केलेंत ह्मणजे शास्त्रांत सांगितलेलें फल तुह्मांला प्राप्त होईल " २४. ह्याप्रमाणें मुनींनीं सांगितलें असतां " ठीक आहे " असें ते पांडव त्यांना ह्मणाले आणि स्वर्गस्थ व भूलोकनिवासी अशा मुनींसहवर्तमान त्या सर्वांनीं पुण्याहवाचन केलें २५. नंतर राजाधिराज जनमेजय, लोमश, द्वैपायन, नारद व देवर्षि पर्वत ह्यांचे पाय धरून २६ धौम्य व ते वनवासी मुनि ह्यांसहवर्तमान ते वीर मार्गशीर्षपौर्णिमा झाल्यानंतर पुष्यनक्षत्रावर तेथून चालते झाले २७. सारांश, वल्कलें, अजिनें व जटा धारण करणारे व अभेद्य कवचांनीं युक्त असलेले ते पांडव इंद्रसेनप्रभृति सेवक, पंधरा रथ आणि पाकसिद्धीकडे असलेले इतरही

कवचैर्युक्तास्तीर्थान्यन्वचरंस्ततः २८ इन्द्रसेनादिभिर्भृत्यै रथैः परिचतु
र्दशैः । महानसव्यापृतैश्च तथान्यैः परिचारिकैः २९ सायुधा बद्धनिस्त्रिं-
शास्तूणवन्तः समार्गणाः । प्राङ्मुखाः प्रययुर्वीराः पाण्डवा जनमेजय ३०
[४००८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां त्रिनवतितमोऽध्यायः ॥ ९३॥

युधिष्ठिर उवाच॥ न वै निर्गुणमात्मानं मन्ये देवर्षिसत्तम। तथास्मि दुःख-
संतप्तो यथा नान्यो महीपतिः १ परांश्च निर्गुणान्मन्ये न च धर्मगतानपि। ते
च लोमश लोकेऽस्मिन्नृध्यन्ते केन हेतुना २ लोमश उवाच। नात्र दुःखं त्वया
राजन्कार्यं पार्थ कथंचन। यदधर्मेण वर्धेयुरधर्मरुचयो जनाः ३ वर्धत्यध-
र्मेण नरस्ततो भद्राणि पश्यति। ततः सपत्नाञ्जयति समूलस्तु विनश्यति ४
मया हि दृष्टा दैतेया दानवाश्च महीपते । वर्धमाना ह्यधर्मेण क्षयं चोपगताः
पुनः ५ पुरा देवयुगे चैव दृष्टं सर्वं मया विभो । अरोचयन्सुरा धर्मं धर्मं तत्य-
जिरेऽसुराः ६ तीर्थानि देवा विविशुर्नाविशन्भारतासुराः । तानधर्मकृतो
दर्पः पूर्वमेव समाविशत् ७ दर्पान्मानः समभवन्मानात्क्रोधो व्यजायत ।

खटपटी ह्यांना बरोबर घेऊन तीर्थयात्रा करूं लागले २८,२९. हे जनमेजया, आयुधें भाते व बाण बरोबर घेऊन आणि तरवार बांधून ते वीर पांडव पूर्वेकडे तोंड करून चालते झाले ३०. ह्याप्रमाणें ० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं त्र्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ ९३ ॥

युधिष्ठिर ह्मणतोः—हे देवर्षिश्रेष्ठ, मी निर्गुण आहें असें मला वाटत नाहीं; परंतु, ज्याप्रमाणें मी दुःखानें संतप्त झालों आहें त्याप्रमाणें दुसरा कोणीही राजा दुःखसंतप्त झाला नसेल १. हे लोमश मुने, आमचे शत्रु गुणहीन असून धर्मानेंही वागणारे नाहींत. तेव्हां असें असतांना ह्या लोकांमध्यें ते समृद्ध असण्याचें कारण काय ? २. लोमश ह्मणतातः— हे कुंतीपुत्रा धर्मराजा, अधर्म रुचणाऱ्या लोकांचा अधर्माच्या योगानें अभ्युदय होतो ह्याबद्दल तूं मुळींच दुःख मानूं नकोस ३. कारण, अधर्माच्या योगानें पुरुषाचा प्रथमतः अभ्युदय होऊन त्याचें कल्याण होतें व नंतर तो शत्रूंचाही पराजय करितो; परंतु, परिणामीं त्याचा समूल नाश होतो ४. हे भूपते, अधर्मानें वृद्धिंगत होऊन पुनरपि क्षय पावलेले असे दैत्य व दानव मीं पाहिले आहेत ५. हे प्रभो, पूर्वी देवयुगामध्यें मीं सर्व कांहीं अवलोकन केलें आहे. देवांना धर्म रुचूं लागला व असुरांनीं धर्माचा त्याग केला ६. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, देव स्नानाकरितां तीर्थामध्यें प्रविष्ट झाले आणि असुरांनीं तीर्थामध्यें प्रवेश केला नाहीं. कारण, अध-

क्रोधाद्ह्रीस्ततोलज्जा वृत्तं तेषां ततोऽनशत् ८ तानलज्जान्गतह्रीकान्हीन
वृत्तान्वृथाव्रतान् । क्षमा लक्ष्मीः स्वधर्मश्च नचिरात्प्रजहुस्ततः ९
लक्ष्मीस्तु देवानगमदलक्ष्मीरसुरान्नृप । तानलक्ष्मीसमाविष्टान्दर्पोपहतचे
तसः १० दैतेयान्दानवांश्चैव कलिरप्याविशत्ततः । तानलक्ष्मीसमावि-
ष्टान्दानवान्कलिना हतान् ११ दर्पाभिभूतान्कौन्तेय क्रियाहीनानचेतसः ।
मानाभिभूतानचिराद्विनाशः समपद्यत १२ निर्यशस्कास्तथा दैत्याः
कृत्स्नशो विलयं गताः । देवास्तु सागरांश्चैव सरितश्च सरांसि च १३
अभ्यगच्छन्धर्मशीलाः पुण्यान्यायतनानि च । तपोभिः क्रतुभिर्दानैराशी-
र्वादैश्च पाण्डव १४ प्रजहुः सर्वपापानि श्रेयश्च प्रतिपेदिरे । एवमादान-
वन्तश्च निरादानाश्च सर्वशः १५ तीर्थान्यगच्छन्विबुधास्तेनापुर्भूतिमु-
त्तमाम् । तथा त्वमपि राजेन्द्र स्नात्वा तीर्थेषु सानुजः १६ पुनर्वेत्स्यसि
तां लक्ष्मीमेष पन्थाः सनातनः । यथैव हि नृगो राजा शिबिरौशीनरो
यथा १७ भगीरथो वसुमना गयः पूरुः पुरूरवाः । चरमाणास्तपो,

मनीं उत्पन्न केलेला गर्व त्या असुरांचे ठिकाणीं प्रविष्ट झाला होता ७. त्या दर्पामुळें (आम्ही पूज्य आहोंत असा) त्यांना मान वाटूं लागला; मानापासून क्रोध उत्पन्न झाला त्यामुळें अकार्य करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होऊं लागली; आणि त्या प्रवृत्तीच्या योगानें ते निर्लज्ज, अकार्याचे ठिकाणीं प्रवृत्त, सदाचारशून्य आणि व्रतहीन बनल्यामुळें क्षमा, लक्ष्मी आणि स्वधर्म ह्यांनीं त्यांचा लवकरच त्याग केला ८,९. हे राजा, लक्ष्मी देवाकडे गेली व अलक्ष्मी असुरांकडे गेली. तेव्हां गर्वानें ज्यांचें चित्त ग्रस्त झालेलें आहे व ज्यांच्यामध्यें अलक्ष्मीनें प्रवेश केला आहे अशा १० त्या दैत्यदानवांचे ठिकाणीं कलीनेंही प्रवेश केला. तदनंतर अलक्ष्मीनें झपाटलेल्या, कलीनें ग्रस्त केलेल्या, दर्पानें पछाडलेल्या व मानानें दरलेल्या त्या क्रियाहीन ह्मणूनच मूढ झालेल्या दानवांचा नाश झाला ११,१२. साराश, ह्याप्रमाणें दैत्य कीर्तिरहित होऊन संपूर्णपणें नाश पावले; परंतु, धर्मशील देव सागर, नद्या, सरोवरें आणि पुण्य स्थलें ह्यांच्या यात्रा करूं लागले आणि, हे पांडुपुत्रा, तप, क्रतु, दानें आणि आशीर्वाद ह्यांच्यायोगानें १३, १४ सर्व पातकांचें क्षालन करून त्यांनीं कल्याण करून घेतलें. ह्याचप्रमाणें नियम स्वीकारून सर्वप्रकारें अप्रतिहत झालेले देव १५ तीर्थांना गेले असतां त्यांना उत्कृष्ट ऐश्वर्य प्राप्त झालें. त्याचप्रमाणें, हे राजाधिराज, तूंही आपल्या कनिष्ठ भ्रात्यां-सहवर्तमान त्या तीर्थांचे ठिकाणीं स्नान केलेंस ह्मणजे १६ ती लक्ष्मी तुला प्राप्त होईल. (अशा रीतीनें वैभव प्राप्त करून घेणें.) ह्या मार्ग पूर्वीपासून चालत आलेला

नित्यं स्पर्शनादंबसश्च ते १८ तीर्थाभिगमनात्पूता दर्शनाच्च महात्मनाम्। अलभन्त यशः पुण्यं धनानि च विशांपते १९ तथा त्वमपि राजेन्द्र लब्धासि विपुलां श्रियम्। यथा चेक्ष्वाकुरभवत्सपुत्रजनबान्धवः २० मुचुकुन्दोथ मांधाता मरुत्तश्च महीपतिः। कीर्तिं पुण्यामविन्दत यथा देवास्तपो बलात्। देवर्षयश्च कात्स्न्येन तथा त्वमपि वेत्स्यसि २१ धार्तराष्ट्रास्त्वधर्मेण मोहेन च वशीकृताः। न चिराद्वै विनङ्क्ष्यन्ति दैत्या इव न संशयः २२ [४०३०]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां चतुर्नवतितमोऽध्यायः॥९४॥
वैशम्पायन उवाच। ते तथा सहिता वीरा वसन्तस्तत्र तत्र ह। क्रमेण पृथिवीपाल नैमिषारण्यमागताः १ ततस्तीर्थेषु पुण्येषु गोमत्याः पाण्डवा नृप। कृताभिषेकाः प्रददुर्गाश्च वित्तं च भारत २ तत्र देवान्पितॄन्विप्रांस्तर्पयित्वा पुनः पुनः। कन्यातीर्थेऽश्वतीर्थे च गवां तीर्थे च भारत ३ कालकोट्यां विषप्रस्थे गिरावुष्य च कौरवाः। बाहुदायां

आहे. नृगराजा, कुशींद्रपुत्र शिबी १७, भगीरथ, वसुमान्, गय, पूरु आणि पुरूरवा हे नित्य तपश्चर्या करणारे राजे तीर्थादिकांच्या स्पर्शानें १८, तीर्थयात्रेनें आणि महात्म्यांच्या दर्शनानें ज्याप्रमाणें पवित्र झाले आणि, हे प्रजाधिपते, ज्याप्रमाणें कीर्ति, पुण्य व धन हीं त्यांना प्राप्त झालीं त्याचप्रमाणें तुझी गोष्ट होईल १९. हे राजाधिराज, अत्यंत विपुल लक्ष्मी प्राप्त होऊन इक्ष्वाकु जसा पुत्र, जन आणि बांधव ह्यांसहवर्तमान कृतकृत्य झाला तसा तूंही होशील २० आणि मुचुकंद, मांधाता, भूपति मरुत्त, देव आणि देवर्षि ह्यांनीं तपःसामर्थ्यानें ज्याप्रमाणें पूर्णपणे पुण्यकीर्ति संपादन केली त्याप्रमाणें तूंही संपादन करशील २१. धृतराष्ट्रपुत्र अधर्मानें व मोहानें वेढून टाकिलेले आहेत ह्यामुळें ते लवकरच दैत्यांप्रमाणें नाश पावतील ह्यांत संशय नाहीं २२. ह्याप्रमाणें ०वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं चौऱ्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ ९४ ॥

वैशंपायन सांगतातः—हे भूपाला जनमेजया, ह्याप्रमाणें ते वीर पांडव एकत्र राहून ठिकठिकाणीं मुक्काम करीत करीत अनुक्रमें नैमिषारण्यामध्यें आले १. तदनंतर, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजय राजा, गोमतिनदीच्या पुण्यतीर्थांचे ठिकाणीं स्नान करून पांडवांनीं गाई व द्रव्य ह्यांचें ब्राह्मणांना दान केलें २. तेथें, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजयराजा, कन्यातीर्थ, अश्वतीर्थ आणि गोतीर्थ ह्यांचे ठिकाणीं देव, पितर आणि विप्र ह्यांचें पुन्हां पुन्हां संतर्पण करून ३ कालकोटि तीर्थ आणि विषप्रस्थपर्वत ह्या ठिकाणीं वास्तव्य

महीपाल चक्रुः सर्वेभिषेचनम् ४ प्रयागे देवयजने देवानां पृथिवीपते । ऊषुराप्लुत्य गात्राणि तपश्चातस्थुरुत्तमम् ५ गङ्गायमुनयोश्चैव संगमे सत्यसंगराः । विपाप्मानो महात्मानो विप्रेभ्यः प्रददुर्वसु ६ तपस्विजनजुष्टां च ततो वेदीं प्रजापतेः । जग्मुः पाण्डुसुता राजन्ब्राह्मणैः सह भारत ७ तत्र ते न्यवसन्वीरास्तपश्चातस्थुरुत्तमम् । संतर्पयन्तः सततं वन्येन हविषा द्विजान् ८ ततो महीधरं जग्मुर्धर्मज्ञेनाभिसत्कृतम् । राजर्षिणा पुण्यकृता गयेनानुपमद्युतिम् ९ सरो गयशिरो यत्र पुण्या चैव महानदी । वानीरमालिनी रम्या नदी पुलिनशोभिता १० दिव्यं पवित्रकूटे च पवित्रधरणीधरे । ऋषिजुष्टं सुपुण्यं तत्तीर्थं ब्रह्मसरोतुलम् ११ अगस्त्यो भगवान्यत्र गतो वैवस्वतं प्रति । उवास च स्वयं तत्र धर्मराजः सनातनः १२ सर्वासां सरितां चैव समुद्भेदो विशांपते । यत्र संनिहितो नित्यं महादेवः पिनाकधृक् १३ तत्र ते पाण्डवा वीराश्चातुर्मास्यैस्तदेजिरे । ऋषियज्ञेन महता यत्राक्षयवटो महान् १४ अक्षये देवयजने

वास्तव्य केलें आणि, हे भूपाला, बाहुदा नदीमध्यें त्या सर्व कुरुवंशजांनीं स्नानें केलीं ४. हे भूपते. देवांचें यज्ञस्थल जें प्रयाग त्या ठिकाणीं वास्तव्य करून व तेथें स्नानें करून त्यांनीं उत्कृष्ट तप केलें ५ आणि गंगा व यमुना ह्यांच्या संगमावर स्नान करून पापरहित झालेल्या त्या सत्यप्रतिज्ञ पांडवांनीं ब्राह्मणांना द्रव्य दिलें ६. तदनंतर, हे भरतकुलोत्पन्न जनमेजयराजा, तपस्वी लोकांनीं आश्रय केलेली अशी जी प्रजापतीची वेदी तिकडे पांडुपुत्र ब्राह्मणांसहवर्तमान गेले ७. व वनांतील आहारानें ब्राह्मणांचें नित्य संतर्पण करीत असलेल्या वीर पांडवांनीं त्या ठिकाणीं वास्तव्य करून उत्कृष्ट तप केलें ८. तदनंतर धर्मवेत्त्या व पुण्यवान् गयराजर्षीनीं सत्कार केलेल्या अनुपम तेजस्वी पर्वताला ते गेले ९. त्या ठिकाणीं गयशिर सरोवर आणि वेत्रसमुदायांनीं युक्त व वाळवंटांनीं शोभित अशी महानदी संज्ञक नदी रम्य व पुण्यवर्धक आहे १०. पवित्र शिखरांनीं युक्त व पवित्र अशा गृध्रकूट पर्वतावर दिव्य आणि अत्यंत पुण्यकारक असें तें ब्रह्मसरोवर नामक अनुपम तीर्थ असून त्या तीर्थाचे ठिकाणीं ऋषींनीं वास्तव्य केलेलें आहे ११. भगवान् अगस्त्यमुनि त्याच ठिकाणीं यमधर्माकडे गेले होते व तेथेंच तो अनादि धर्मराज यम स्वतः वास्तव्य करीत असतो १२. हे प्रजाधिपते, सर्व नद्यांचे सान्निध्य तेथेंच असून पिनाकपाणि महादेवही नेहमीं तेथेंच असतात १३. त्या ठिकाणीं त्या वीर पांडवांनीं मोठ्या ऋषींसहवर्तमान चातुर्मास्य याग केले. तेथें एक प्रचंड अक्षय वट आहे १४.

अक्षयं यत्र वै फलम् । ते तु तत्रोपवासांस्तु चक्रुर्निश्चितमानसाः १५
ब्राह्मणास्तत्र शतशः समाजग्मुस्तपोधनाः । चातुर्मास्येनायजन्त आर्षेण
विधिना तदा १६ तत्र विद्यातपोवृद्धा ब्राह्मणा वेदपारगाः। कथां प्रच-
क्रिरे पुण्यां सदसिस्था महात्मनाम् १७ तत्र विद्याव्रतस्नातः कौमारं
व्रतमास्थितः । शमठोकथयद्राजन्नामूर्तरयसं गयम् १८ शमठ उवाच ॥
अमूर्तरयसः पुत्रो गयो राजर्षिसत्तमः । पुण्यानि यस्य कर्माणि तानि मे
शृणु भारत १९ यस्य यज्ञो बभूवेह बह्वन्नो बहुदक्षिणः । यत्रान्नपर्वता
राजञ्छतशोथ सहस्रशः २० घृतकुल्याश्च दध्नश्च नद्यो बहुशतास्तथा ।
व्यञ्जनानां प्रवाहाश्च महार्हाणां सहस्रशः २१ अहन्यहनि चाप्येवं
याचतां संप्रदीयते । अन्ये च ब्राह्मणा राजन्भुञ्जतेन्नं सुसंस्कृतम् २२
तत्र वै दक्षिणाकाले ब्रह्मघोषो दिवं गतः । न च प्रज्ञायते किंचिद्ब्रह्मश-
ब्देन भारत २३ पुण्येन चरता राजन्भूर्दिशः खं नभस्तथा । आपूर्ण-
मासीच्छब्देन तदप्यासीन्महाद्भुतम् २४यत्र स्म गाथा गायन्ति मनुष्या

अक्षय अशी जी देवांची प्रयागसंज्ञक यज्ञभूमि तेथें पुण्य केलें असतां अक्षय फल-प्रद होत असतें व तथेंच दृढ निश्चयी पांडवांनीं उपवास केले १५. त्या ठिकाणीं शेंकडों तपस्वी ब्राह्मण आले होते व त्यांनीं त्या वेळेला ऋषिप्रोक्त विधीनें तेथें चातुर्मास्य याग केला १६. त्या ठिकाणीं ज्ञानवृद्ध व तपोवृद्ध असे वेदपारंगत ब्राह्मण यज्ञमंडपामध्यें बसून महात्म्यांच्या पुण्य कथा कथन करीत असत १७. त्याच ठिकाणीं हे राजा, वेद आणि वेदाध्ययनार्थ स्वीकारिलेलें व्रत शेंवटास नेऊन ब्रह्मचर्यव्रताचें अवलंबन केलेल्या शमठ मुनींनीं अमूर्तरय राजाचा पुत्र जो गय त्याची एक गोष्ट सांगितली १८. शमठ सांगतात:—हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, अमूर्तरय राजाचा पुत्र गय राजर्षींमध्यें श्रेष्ठ होऊन गेला. त्याचीं ती पुण्य कर्मे तू मजपासून श्रवण कर १९. ह्या ठिकाणीं त्या गयराजाचा विपुल अन्न आणि विपुल दक्षिणा ह्यांनीं युक्त असा एक यज्ञ झाला. त्या यज्ञामध्यें, हे राजा, अन्नाचे शेंकडों हजारों पर्वत पडलेले होते २०. तुपाचे पाट व दह्याच्या नद्या तेथें शेंकडों चालल्या असून उत्कृष्ट उत्कृष्ट कोशिंबि-रीचे हजारों प्रवाह चालले होते २१. हे राजा, ह्याप्रमाणें याचना करणाऱ्यांना प्रत्यहीं अन्न दिलें जात असे व इतरही ब्राह्मण उत्कृष्ट रीतीनें तयार केलेलें अन्न भक्षण करीत असत २२. दक्षिणेच्या वेळीं त्या ठिकाणचा वेदघोष आकाशांत जाऊन पोंचत असे आणि हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, त्या वेदघोषामुळें तेथें दुसरें कांहींही ऐकूं येत नसे २३. हे धर्मराजा, तो पुण्यरूप वेदघोष एकदां सुरू झाला ह्मणजे पृथ्वी, आकाश

भरतर्षभ । अन्नपानैः शुभैस्तृप्ता देशे देशे सुवर्चसः २५ गयस्य यज्ञे के
त्वद्य प्राणिनो भोक्तुमीप्सवः । तत्र भोजनशिष्टस्य पर्वताः पञ्चविंशतिः २६
न तत्पूर्वे जनाश्चक्रुर्न करिष्यन्ति चापरे । गयो यदकरोद्यज्ञे राजर्षिरमि-
तद्युतिः २७ कथं तु देवा हविषा गयेन परितर्पिताः । पुनः शक्ष्यन्त्युपादा-
तुमन्यैर्दत्तानि कानिचित् २८ सिकता वा यथा लोके यथा वा दिवि
तारकाः। यथा वा वर्षतो धारा असंख्येयाः स्म केनचित् २९ तथा गणयितुं
शक्या गययज्ञे न दक्षिणाः । एवंविधाः सुबहवस्तस्य यज्ञा महीपतेः ॥
बभूवुरस्य सरसः समीपे कुरुनन्दन ३० [४०६०] इति श्रीमहाभारते
शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यकेपर्वणि तीर्थयात्रापर्वणि
लोमशतीर्थयात्रायां गययज्ञकथने पञ्चनवतितमोऽध्यायः ॥ ९५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः संप्रस्थितो राजा कौन्तेयो भूरिदक्षिणः ।
अगस्त्याश्रममासाद्य दुर्जयायामुवास ह १ तत्रैव लोमशं राजा पप्रच्छ

व स्वर्ग हीं अगदीं भरून जात असत व तेंही एक मोठें आश्चर्यच होत असे २४. हे भरतवंशजश्रेष्ठ धर्मराजा, शुभ अशा अन्नपानांनी त्या ठिकाणी तृप्त झालेले व शरीरावर उत्कृष्ट तेज आलेले असे लोक देशोदेशी जाऊन अशी प्रशंसा करीत असतात २५. "गय राजाच्या यज्ञामध्यें कोणते प्राणी आज भोजन करण्याची इच्छा करीत आहेत ? तेथें सर्वांचें भोजन होऊन अन्नाचे पचवीस पर्वत शिलक पडलेले आहेत २६. अत्यंत तेजस्वी गयराजर्षीनें यज्ञामध्यें जे केलें तें पूर्वीं होऊन गेलेल्या लोकांनीही केलें नाहीं व पुढें होणाऱ्या लोकांच्याही हातून होणार नाहीं २७. अहो, हविर्द्रव्याच्या योगानें गयराजानें सर्वस्वी तृप्त करून टाकिलेल्या देवांना इतरांनीं दिलेल्या हवींचा स्वीकार तरी कसा कारितां येईल ? २८. जगतांतील वाळूचे कण स्वर्गांतील तारका अथवा जलवृष्टि करणाऱ्या पर्जन्याच्या धारा ह्यांची ज्याप्रमाणें कोणालाही गणति होणें शक्य नाहीं त्याचप्रमाणें गयाच्या यज्ञामध्यें दिलेल्या दक्षिणेची गणति होणें शक्य नाहीं " २९ असो. हे कुरुनंदना धर्मराजा, अशा प्रकारचे असंख्य यज्ञ ह्या सरोवरासमीप त्या गय भूपतीचे झाले ३०. ह्याप्रमाणें ० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं गययज्ञाच्या वृत्तांताविषयीं पंचाण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ ९५ ॥

वैशंपायन सांगतातः— तदनंतर विपुल दक्षिणा देणारा तो कुंतीपुत्र धर्मराजा तेथून निघाला आणि अगस्त्यमुनींच्या आश्रमाला येऊन अजिंक्य अशा मणिमती संज्ञक वातापीच्या नगरीमध्यें राहिला १. त्याच ठिकाणीं वक्त्यांमध्यें श्रेष्ठ असलेला

वदतां वरः । अगस्त्येनेह वातापिः किमर्थमुपशामितः २ आसीद्वा किं प्रभावश्च स दैत्यो मानवान्तकः । किमर्थं चोदितो मन्युरगस्त्यस्य महात्मनः ३ लोमश उवाच ॥ इल्वलो नाम दैतेय आसीत्कौरवनन्दन । मणिमत्यां पुरि पुरा वातापिस्तस्य चानुजः ४ स ब्राह्मणं तपोयुक्तमुवाच दितिनन्दनः । पुत्रं मे भगवानेकमिन्द्रतुल्यं प्रयच्छतु ५ तस्मै स ब्राह्मणो नादात्पुत्रं वासवसंमितम् । चुक्रोध सोऽसुरस्तस्य ब्राह्मणस्य ततो भृशम् ६ तदाप्रभृति राजेन्द्र इल्वलो ब्रह्महासुरः । मन्युमान्भ्रातरं छागं मायावी ह्यकरोत्ततः ७ मेषरूपी च वातापिः कामरूप्यभवत्क्षणात् । संस्कृत्य च भोजयति ततो विप्रं जिघांसति ८ स चाह्वयति यं वाचा गतं वैवस्वतक्षयम् । स पुनर्देहमास्थाय जीवन्स्म प्रत्यदृश्यत ९ ततो वातापिमसुरं छागं कृत्वा सुसंस्कृतम् । तं ब्राह्मणं भोजयित्वा पुनरेव समाह्वयत् १० तामिल्वलेन महता स्वरेण वाचमीरिताम् । श्रुत्वातिमायो बलवान्क्षिप्रं ब्राह्मणकण्टकः ११ तस्य पार्श्वं विनिर्भिद्य ब्राह्मणस्य महासुरः । वातापिः प्रसहन्राजन्निश्चक्राम विशांपते १२ एवं स ब्राह्मणान्राज-

---

तो धर्मराजा लोमशमुनींना ह्मणाला " अगस्त्य मुनींनीं ह्या ठिकाणीं कशाकरितां वातापीचा वध केला ? २; त्या मनुष्यघातक दैत्याचा प्रभाव तरी काय होता आणि महात्म्या अगस्त्यमुनींना क्रोध तरी कां आला?"३. लोमश ह्मणतातः—हे कौरवनंदना धर्मराजा, पूर्वीं मणिमती नगरीमध्यें इल्वल ह्मणून दैत्य होता व वातापी हा त्याचा कनिष्ठ भ्राता असे ४. एकदां तो दैत्य " भगवानांनीं मला एक इंद्रासारिखा पुत्र द्यावा " ह्मणून तपस्वी ब्राह्मणाला ह्मणाला असतां ५ त्याला त्या ब्राह्मणानें इंद्रासारिखा पुत्र दिला नाहीं. त्यामुळें तो त्या ब्राह्मणावर अतिशयच क्रुद्ध झाला. तेव्हांपासून, हे राजाधिराज युधिष्ठिरा, त्या ब्रह्मघातकी, क्रुद्ध आणि मायावी इल्वल दैत्यानें आपल्या भ्रात्याला बोकड बनविलें ६,७. इच्छेप्रमाणें रूप धारण करणारा तो वातापि मेषरूप धारण करीत असे व त्याचा ज्येष्ठ भ्राता इल्वल त्याला शिजवून ब्राह्मणाला घालीत असे व त्याच्या योगानें ब्राह्मणाचा वध करीत असे ८. कारण, यमसदनास गेलेल्या ज्या प्राण्याला तो इल्वल हाक मारी व तो पुनरपि देह धारण करून जिवंत दृष्टोत्पत्तीस येत असे ९. तदनंतर वातापि दैत्याला बोकड करून व त्याला उत्तम प्रकारें शिजवून इल्वल दैत्य त्याचें ब्राह्मणाला भोजन घालीत असे आणि पुनरपि त्याला हाक मारीत असे १०. इल्वल दैत्यानें उच्च स्वरानें उच्चारिलेली ती वाणी श्रवण करून तो अतिमायावी व बलाढ्य ब्राह्मणकंटक महादैत्य वातापि त्या ब्राह्मणाचें पोट फोडून, हे

न्भोजयित्वा पुनः पुनः । हिंसयामास दैतेय इल्वलो दुष्टचेतनः १३ अगस्त्यश्चापि भगवानेतस्मिन्काल एव तु । पितॄन्ददर्श गर्ते वै लम्बमानानधोमुखान् १४ सोपृच्छल्लम्बमानांस्तान्भवन्त इव कंपिताः । संतानहेतोरिति ते प्रत्युचुर्ब्रह्मवादिनः १५ ते तस्मै कथयामासुर्वयं ते पितरः स्वकाः । गर्तमेतमनुप्राप्ता लम्बामः प्रसवार्थिनः १६ यदि नो जनयेथास्त्वमगस्त्यापत्यमुत्तमम् । स्यान्नोऽस्मान्निरयान्मोक्षस्त्वं च पुत्राप्नुया गतिम् १७ स तानुवाच तेजस्वी सत्यधर्मपरायणः । करिष्ये पितरः कामं व्येतु वो मानसो ज्वरः १८ ततः प्रसवसंतानं चिन्तयन्भगवानृषिः । आत्मनः प्रसवस्यार्थे नापश्यत्सदृशीं स्त्रियम् १९ स तस्य तस्य सत्वस्य तत्तदंगमनुत्तमम् । संगृह्य तत्समैरङ्गैर्निर्ममे स्त्रियमुत्तमाम् २० स तां विदर्भराजस्य पुत्रार्थं तप्यतस्ततपः । निर्मितामात्मनोर्थाय मुनिः प्रादान्महातपाः २१ सा तत्र जज्ञे सुभगा विद्युत्सौदामनी यथा । विभ्रा-

---

प्रजाधिपते धर्मराजा, हंसत हंसत बाहेर पडत असे ११,१२. ह्याप्रमाणें तो दुष्टबुद्धि इल्वलनामक दैत्य ब्राह्मणांना वारंवार भोजन घालून त्यांचा वध करीत असे १३. त्याचवेळेला भगवान् अगस्त्यमुनींनीं आपले पितर अधोमुख होऊन एका खांचेमध्यें लोंबत असल्याचें अवलोकन केलें १४ आणि लोंबत असलेल्या त्या पितरांना अवलोकन करून त्यांना लोंबण्याचें कारण त्यानें विचारिलें असतां " तुझ्या संतानाकरितां " ह्मणून त्या ब्रह्मवेत्त्या पितरांनीं कांपत कांपत त्याला सांगितलें १५. आणि ते त्याला ह्मणाले " आह्मी तुझे प्रत्यक्ष पितर आहोंत आणि तुझ्या संतानाची इच्छा धरून ह्या खांचेपाशीं येऊन लोंबत आहांत १६. हे अगस्त्या, तूं जर आमच्याकरितां उत्कृष्ट अपत्य उत्पन्न करिशील तर ह्या नरकापासून आमची मुक्तता होईल आणि, हे पुत्रा, तुलाही सद्गति प्राप्त होईल " १७. ह्याप्रमाणें त्यांनीं सांगितल्यावर सत्य आणि धर्म ह्यांविषयीं तत्पर असलेला तो तेजस्वी मुनि त्यांना ह्मणाला " हे पितरहो, मी तुमची इच्छा शेंवटास नेईन; तुमच्या मनाला आतां रुखरुख नको " १८. तदनंतर अविच्छिन्न संतति प्राप्त होण्याविषयीं भगवान् अगस्त्य ऋषि विचार करूं लागले असतां आपल्या संतानाकरितां योग्य अशी स्त्री त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येईना १९. तेव्हां ज्या ज्या प्राण्यांचे ठिकाणीं जो जो अवयव उत्कृष्ट होता तो तो घेऊन त्यांच्यासारख्या अवयवांनीं एक उत्कृष्ट स्त्री त्यांनीं निर्माण केली २० आणि विदर्भदेशचा राजा जो पुत्राकरितां तपश्चर्या करीत होता त्याला त्या महातपस्वी मुनींनीं स्वतःकरितां निर्माण केलेली ती स्त्री दिली २१. तेव्हां

जमाना वपुषा व्यवर्धत शुभानना २२ जातमात्रां च तां दृष्ट्वा वैदर्भः पृथिवीपतिः । प्रहर्षेण द्विजातिभ्यो न्यवेदयत भारत २३ अभ्यनन्दत तां सर्वे ब्राह्मणा वसुधाधिप । लोपामुद्रेति तस्याश्च चक्रिरे नाम ते द्विजाः २४ ववृधे सा महाराज बिभ्रती रूपमुत्तमम् । अप्स्विवोत्पलिनी शीघ्रमग्नेरिव शिखा शुभा २५ तां यौवनस्थां राजेन्द्र शतं कन्याः स्वलंकृताः । दास्यः शतं च कल्याणीमुपातस्थुर्वशानुगाः २६ सा स्म दासीशतवृता मध्ये कन्याशतस्य च । आस्ते तेजस्विनी कन्या रोहिणीव दिवि प्रभा २७ यौवनस्थामपि च तां शीलाचारसमन्विताम् । न वव्रे पुरुषः कश्चिद्भयात्तस्य महात्मनः २८ सा तु सत्यवती कन्या रूपेणाप्सरसोऽप्यति । तोषयामास पितरं शीलेन स्वजनं तथा २९ वैदर्भी तु तथायुक्तां युवतीं प्रेक्ष्य वै पिता । मनसा चिन्तयामास कस्मै दद्यामिमां सुताम् ३०

चमकणारी विद्युल्लताच कीं काय अशी आपल्या स्वरूपानें चमकत असलेली ती भाग्यवती व सुमुखी स्त्री त्या राजाच्या भार्येचे ठिकाणीं उत्पन्न होऊन वृद्धिंगत होऊं लागली २२. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, त्या कन्येला उत्पन्न होतांक्षणीं अवलोकन करून पृथ्वीपति विदर्भराजानें हर्षपूर्वक ती गोष्ट ब्राह्मणांना निवेदन केली २३. तेव्हां, हे पृथ्वीपते धर्मराजा, सर्व ब्राह्मणांनीं तिचें अभिनंदन केलें आणि त्या द्विजांनीं लोपामुद्रा असें तिचें नांव ठेविलें २४. हे महाराजा, उदकामध्यें वृद्धिंगत होणाऱ्या कमलिनीप्रमाणें अथवा अग्नीच्या उत्कृष्ट ज्वालेप्रमाणें सर्वोत्कृष्ट रूप धारण करणारी ती लोपामुद्रा सत्वर वृद्धिंगत होऊं लागली २५. (असें होतां होतां) हे राजाधिराज, ती यौवनावस्थेला येऊन पोंचली असतां तिच्या इच्छेप्रमाणें वागणाऱ्या शंभर दासी व उत्कृष्ट अलंकार धारण करणाऱ्या अशा शंभर कन्या त्या कल्याणी लोपामुद्रेच्या सेवेमध्यें तत्पर राहूं लागल्या २६ व शंभर दासींनीं परिवेष्टित असलेली ती तेजस्विनी कन्या लोपामुद्रा स्वर्गांतील मूर्तिमंत प्रभा जी रोहिणी तिच्याप्रमाणे त्या शंभर कन्यांमध्ये शोभू लागली २७. ती कन्या यौवनावस्थेला जरी आली होती आणि शील व आचार ह्यांनीं जरी ती सपन्न होती तरी त्या महात्म्या राजाच्या भीतीनें कोणताही पुरुष तीला मागणी घालीना २८. सत्यावर अवलंबून असणाऱ्या त्या कन्येनें रूपाच्या योगानें अप्सरांनाही मागें टाकिलें होतें व आपल्या सुशीलपणानें ती आपल्या पित्याला व आपल्या माणसांना संतुष्ट करीत होती २९. तेव्हां त्याप्रमाणें शील आणि आचार ह्यांनीं युक्त असलेल्या त्या तरुणी लोपामुद्रेला अवलोकन करून " ही कन्या मी आतां कोणाला द्यावी " म्हणून तिचा पिता विचार करूं लागला ३०.

[४०९०] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायां अगस्त्योपाख्याने षण्णवतितमोऽध्यायः ॥ ९६ ॥

लोमश उवाच ॥ यदा त्वमन्यतागस्त्यो गार्हस्थ्ये तां क्षमामिति । तदाभिगम्य प्रोवाच वैदर्भं पृथिवीपतिम् १ राजन्निवेशे बुद्धिर्मे वर्तते पुत्रकारणात् । वरये त्वां महीपाल लोपामुद्रां प्रयच्छ मे २ एवमुक्तः स मुनिना महीपालो विचेतनः । प्रत्याख्यानाय चाशक्तः प्रदातुं चैव नैच्छत ३ ततः स भार्यामभ्येत्य प्रोवाच पृथिवीपतिः । महर्षिर्वीर्यवानेष क्रुद्धः शापाग्निना दहेत् ४ तं तथादुःखितं दृष्ट्वा सभार्यं पृथिवीपतिम् । लोपामुद्राभिगम्येदं काले वचनमब्रवीत् ५ न मत्कृते महीपाल पीडामभ्येतुमर्हसि । प्रयच्छ मामगस्त्याय त्राह्यात्मानं मया पितः ६ दुहितुर्वचनाद्राजा सोऽगस्त्याय महात्मने । लोपामुद्रां ततः प्रादाद्विधिपूर्वं विशाम्पते ७ प्राप्य भार्यामगस्त्यस्तु लोपामुद्रामभाषत । महार्हाण्युत्सृजैतानि वासांस्याभरणानि च ८ ततः सा दर्शनीयानि महार्हाणि तनूनि

ह्याप्रमाणें० वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वापैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं अगस्त्य मुनींच्या उपाख्यानाविषयीं शहाण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ ९६ ॥

लोमश ह्मणतातः— ती लोपामुद्रा गृहस्थाश्रमाला योग्य आहे असें जेव्हां अगस्त्य मुनींना वाटलं तेव्हां ते भूपति विदर्भराजाकडे जाऊन त्याला ह्मणाले १ " हे राजा, पुत्रप्राप्तीकरितां विवाह करण्याचें माझ्या मनांत आहे. ह्यास्तव, हे भूपाला, मी तुझ्यापाशीं मागणें मागतों लोपामुद्रा मला दे " २. ह्याप्रमाणें अगस्त्य मुनींनी विनंति केली असतां त्या भूपालाला कांहींच सुचेनासें झालें; तो त्यांना नाहीं ह्मणण्यासही समर्थ होईना आणि त्यांना कन्या देण्याचेंही त्याच्या मनांत येईना ३. तेव्हां तो पृथ्वीपति आपल्या भार्येकडे येऊन तिला ह्मणाला " हा महर्षि मोठा सामर्थ्यवान् आहे, तेव्हां हा क्रुद्ध झाला असतां शापरूप अग्नीनें हा आपणांला दग्ध करून टाकील " ४. ह्याप्रमाणें भार्येसहवर्तमान तो भूपति चिंताक्रांत झाला आहे असें अवलोकन केल्यावर लोपामुद्रा वेळेवर समीप येऊन त्याला ह्मणाली ५ " हे भूपाला, माझ्याकरितां आपणांला दुःख प्राप्त होणें योग्य नाहीं. हे तात, आपण मला अगस्त्य मुनींना द्या आणि माझ्या योगानें आपलें रक्षण करून घ्या " ६. ह्याप्रमाणें कन्येनें सांगितल्यानंतर तिच्या सांगण्यावरून, हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, त्या राजानें ती आपली कन्या लोपामुद्रा महात्म्या अगस्त्य मुनींना दिली ७. तेव्हां भार्या प्राप्त झाल्यावर अगस्त्य मुनि लोपामुद्रेला ह्मणाले " हीं मोठमोठीं मौल्यवान् वस्त्रें व भूषणें

च । समुत्ससर्ज रम्भोरूर्वसनान्यायतेक्षणा ९ ततश्चीराणि जग्राह
वल्कलान्यजिनानि च । समानव्रतचर्या च बभूवायतलोचना १०
गङ्गाद्वारमथागम्य भगवानृषिसत्तमः । उग्रमातिष्ठत तपः सह पत्न्यानुकू-
लया ११ सा प्रीता बहुमानाच्च पतिं पर्यचरत्तदा । अगस्त्यश्च परां
प्रीतिं भार्यायामचरत्प्रभुः १२ ततो बहुतिथे काले लोपामुद्रां विशाम्पते ।
तपसा द्योतितां स्नातां ददर्श भगवानृषिः १३ स तस्याः परिचारेण
शौचेन च दमेन च । श्रिया रूपेण च प्रीतो मैथुनायाजुहाव ताम् १४
ततः सा प्राञ्जलिर्भूत्वा लज्जमानेव भाविनी । तदा सप्रणया वाक्यं भगव-
न्तमथाब्रवीत् १५ असंशयं प्रजाहेतोर्भार्यां पतिरविन्दत । या तु त्वयि

टाकून दे " ८. ह्याप्रमाणें अगस्त्य मुनींनीं सांगितलें असतां पहाण्यासारिखीं व
मोठमोठीं मौल्यवान् अशीं सूक्ष्म वस्त्रें, कदलीप्रमाणें मांड्या आणि दीर्घ नेत्र ह्यांनीं युक्त
असलेल्या त्या लोपामुद्रेनें, टाकून देऊन ९ सालीं, वल्कलें आणि अजिनें घेतलीं व दीर्घ
नेत्रांनीं युक्त असलेली ती लोपामुद्रा आपल्या पतीप्रमाणें व्रत व आचरण करूं लागली १०
तदनंतर भगवान् ऋषिश्रेष्ठ अगस्त्य हरिद्वारीं गेले आणि अनुकूल अशा पत्नीसहवर्तमान
उग्र तपश्चर्या करूं लागल ११. लोपामुद्रा प्रसन्न होऊन बहुमानपूर्वक पतीची सेवा करूं
लागली व प्रभु अगस्त्य मुनींही भार्येवर उत्कृष्ट प्रेम करूं लागले १२. तदनंतर बराच
काळ लोटल्यावर, हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, तपानें जिच्या अंगीं तेज आलें आहे अशी
ती लोपामुद्रा ऋतुस्नात झाल्याचें भगवान् अगस्त्य मुनींच्या दृष्टोत्पत्तीस आलें १३.
तिची शुश्रूषा, शुचिर्भूतपणा, मनोनिग्रह, कांति आणि रूप ह्यांच्या योगानें ते अगस्त्य
मुनि प्रसन्न झाले आणि त्यांनीं तिला समागमाकरितां हांक मारिली. १४. तेव्हां
लाजल्यासारिखें करून व हात जोडून ती स्त्री विनयपूर्वक त्या भगवान् अगस्त्य मुनींना

---

१ शहाण्णवाव्या अध्यायातील २६ आणि ३० हे श्लोक काहीं लोक "पूर्वी ऋतु प्राप्त झाल्या-नंतर मुलींचे विवाह होत असत " अशा आपल्या विचित्र मताला आधार ह्मणून देत असतात; परंतु, सत्याण्णवाव्या अध्यायातील तेराव्या श्लोकाकडे लक्ष्य दिलें असतां आणि धर्मशास्त्र-विचारांत घेऊन ह्याच अध्यायातील २३ आणि २४ ह्या श्लोकांकडे लक्ष्य दिलें असतां लोपा-मुद्रेला विवाह झाल्यानंतर पुष्कळ दिवस लोटल्यावर रजोदर्शन झाल्याचें सिद्ध होत आहे. शहाण्णवाव्या अध्यायांत " यौवनस्थां " आणि " युवतीं " अशीं पदें आहेत; परंतु, स्त्रियांची शुद्ध बाल्यावस्था आठ वर्षांपर्यंतच असून आठ वर्षांनंतर यौवनावस्थेला प्रारंभ होत असल्यामुळें लोपा-मुद्रेचें वय आठ वर्षांवर झालें होतें इतकेंच शास्त्रीनें ह्मणतां येईल. स्तनोद्भेदप्रभृति यौवनव्यंजक चिन्हें रजोदर्शनापूर्वी दोन तीन वर्षें स्त्रियांचे ठिकाणीं उद्भवूं लागतात. स्त्रियांना रजोदर्शनापूर्वी पदर घालण्याचा परिपाठ आपणांतही आहे. सारांश, यौवनावस्था रजोदर्शनापूर्वीं प्राप्त होत असते हें निर्विवाद आहे.

मम प्रीतिस्तामृषे कर्तुमर्हसि १६ यथा पितुर्गृहे विप्र प्रासादे शयनं मम।
तथाविधे त्वं शयने मामुपैतुमिहार्हसि १७ इच्छामि त्वां स्रग्विणं च
भूषणैश्च विभूषितम् । उपसर्तुं यथाकामं दिव्याभरणभूषिता १८ अन्यथा
नोपतिष्ठेयं चीरकाषायवासिनी। नैवापवित्रो विप्रर्षे भूषणोयं कथंचन १९
अगस्त्य उवाच ॥ न ते धनानि विद्यन्ते लोपामुद्रे तथा मम। यथावि-
धानि कल्याणि पितुस्तव सुमध्यमे २० लोपामुद्रोवाच ॥ ईशोसि
तपसा सर्वं समाहर्तुं तपोधन । क्षणेन जीवलोके यद्वसु किंचन
विद्यते २१ अगस्त्य उवाच ॥ एवमेतद्यथात्थ त्वं तपोव्ययकरं तु तत् ।
यथा तु मे न नश्येत तपस्तन्मां प्रचोदय २२ लोपामुद्रोवाच ॥ अल्पाव-
शिष्टः कालोयमृतोर्मम तपोधन । न चान्यथाहमिच्छामि त्वामुपैतुं
कथंचन २३ न चापि धर्ममिच्छामि विलोप्तुं ते कथंचन। एवं तु मे
यथाकामं संपादयितुमर्हसि २४ अगस्त्य उवाच ॥ यद्येष कामः सुभगे

ह्मणाली १५ " संतानाकरितां पतीनें भार्या मिळविलेली असते हें निःसंशय आहे; परंतु, हे मुने, आपल्या ठिकाणीं जें माझें प्रेम आहे त्याचें आपण सार्थक करा १६. हे विप्र, पित्याच्या राजवाड्यामध्यें जशी माझी शय्या असे त्या प्रकारच्या शय्येवर आपण माझ्याशीं ह्या ठिकाणीं समागम करा १७. सारांश, आपण उत्तम प्रकारच्या माळा व भूषणें धारण करावीं आणि मीही यथेष्ट दिव्य अलंकार घालून आपली सेवा करावी अशी माझी इच्छा आहे १८. असें जर होत नसेल तर वल्कलें व काषाय वस्त्रें परिधान करून आपली सेवा करण्याची माझी इच्छा नाहीं. कारण, हे ब्रह्मर्षे, तपस्वी लोकांचें भूषण असलेला हा वल्कलादि वेष समागमानें यत्किंतुही अपवित्र होऊं नये " १९. अगस्त्य ह्मणतातः— हे सुंदरि, हे कल्याणि, हे लोपामुद्रे, तुझ्या पित्यापाशीं जशी संपत्ति आहे तशी तुझ्यापाशीं नाहीं व माझ्यापाशींही नाहीं २०. लोपामुद्रा ह्मणतेः— हे तपोधन, ह्या जगतामध्यें जें कांहीं द्रव्य असेल तें सर्व तपानें आणण्यास आपण समर्थ आहांत २१. अगस्त्य ह्मणतातः— तूं ह्मणतेस ह्याप्रमाणें ही गोष्ट खरी आहे; परंतु, तें तपाचा नाश करणारें आहे. तेव्हां माझ्या तपाचा नाश न होईल असें कांहीं तूं मला सांग २२ लोपामुद्रा ह्मणतेः— हे तपोधन, माझ्या ऋतूचा काल आतां थोडा राहिलेला आहे. (सोळा दिवस संपूर्ण होण्याला आतां फार दिवस नाहींत.) तथापि, माझ्या सांगण्याप्रमाणें व्यवस्था न होईल तर आपणांशीं समागम करण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं २३; परंतु, आपल्या धर्माचा कोणत्याप्रकारें लोप करण्याचीही माझी इच्छा नाहीं. माझ्या इच्छेप्रमाणें आपण हें अशाप्रकारचें माझें ह्मणणें शेवटास

तव बुद्ध्या विनिश्चितः । हर्तुं गच्छाम्यहं भद्रे चर काममिहस्थिता २५
[४११५]इति श्रीमहाभारते॰ारण्यके पर्वणि तीर्थयात्रापर्वणि लोमशतीर्थयात्रायामगस्त्योपाख्याने सप्तनवतितमोऽध्यायः ॥ ९७ ॥

लोमश उवाच ॥ ततो जगाम कौरव्य सोगस्त्यो भिक्षितुं वसु । श्रुतर्वाणं महीपालं यं वेदाभ्यधिकं नृपैः १ स विदित्वा तु नृपतिः कुंभयोनिमुपागतम् । विषयांते सहामात्यः प्रत्यगृह्णात्सुसत्कृतम् २ तस्मै चार्घ्यं यथान्यायमानीय पृथिवीपतिः । प्राञ्जलिः प्रयतो भूत्वा पप्रच्छागमनेर्थिताम् ३ अगस्त्य उवाच ॥ वित्तार्थिनमनुप्राप्तं विद्धि मां पृथिवीपते । यथाशक्त्यविहिंस्यान्यान्संविभागं प्रयच्छ मे ४ लोमश उवाच ॥ तत आयव्ययौ पूर्णौ तस्मै राजा न्यवेदयत् । अतो विद्वन्नुपादत्स्व यदत्र वसु मन्यसे ५ तत आयव्ययौ दृष्ट्वा समौ सममतिर्द्विजः । सर्वथा प्राणिनां पीडामुपादानादमन्यत ६ स श्रुतर्वाणमादाय व्रध्नश्वमगमत्ततः ।

त्यावें २४. अगस्त्य ह्मणतातः—हे भाग्यवति, ही इच्छा सिद्धीस नेण्याचा जर तूं मनामध्यें निश्चयच केला आहेस तर, हे कल्याणि, मी द्रव्य आणण्याकरितां जातों; तूं आश्रमामध्यें राहून (मी आल्यानंतर) आपली इच्छा परिपूर्ण करून घे २५. ह्याप्रमाणें॰ वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांपैकीं लोमशतीर्थयात्रेसंबंधीं अगस्त्यमुनींच्या उपाख्यानाविषयीं सत्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ ९७ ॥

लोमश ह्मणतातः—हे कुरुवंशज धर्मराजा, तदनंतर श्रुतर्वा भूपति इतर राजांपेक्षां अधिक धनसंपन्न आहे असें समजून ते अगस्त्य मुनि त्याच्याकडे द्रव्य मागण्याकरितां गेले १. तेव्हां अगस्त्यमुनि समीप आल्याची बातमी लागल्यावर अमात्यांसहवर्तमान श्रुतर्वा राजा सीमेवर त्यांना सामोरा गेला आणि सत्कारपूर्वक त्यानें त्यांचें आदरातिथ्य केलें २. तदनंतर त्यांचें यथाविधि पूजन केल्यावर हात जोडून आणि आज्ञा होईल ती मान्य करण्याविषयीं सिद्ध होऊन त्या भूपतीनें त्यांना आगमनाचें कारण विचारिलें ३. अगस्त्यमुनि ह्मणतातः—हे भूपते, मी द्रव्याकरितां येथें आलों आहे असें तूं समज आणि इतरांना पीडा न देतां यथाशक्ति द्रव्याचा विभाग तूं मला दे ४. लोमश सांगतातः—(हे धर्मराजा) तदनंतर संपूर्ण जमाखर्च राजानें त्यांच्यापुढें ठेविले आणि ह्यांतून जें कांहीं द्रव्य आपणांला पाहिजे असेल तें, हे विद्वन्, आपण घ्या " असें राजानें त्यांना निवेदन केलें ५. तेव्हां जमा व खर्च हीं सारखींच आहेत असें अवलोकन केल्यावर त्या समबुद्धि द्विज अगस्त्यांना " याच्यापासून आपण द्रव्य घेतल्यास प्रजेला निःसंशय पीडा होईल " असें वाटलें ६. तदनंतर

दैत्येन्द्र इल्वलः प्रहसन्निव ५ अगस्त्य एव कृत्स्नं तु वातापिं बुभुजे ततः । भुक्तवत्यसुरोह्वानमकरोत्तस्य चेल्वलः ६ ततो वायुः प्रादुरभूदधस्तस्य महात्मनः । शब्देन महता तात गर्जन्निव यथा घनः ७ वातापे निष्क्रमस्वेति पुनःपुनरुवाच ह । तं प्रहस्याब्रवीद्राजन्नगस्त्यो मुनिसत्तमः ८ कुतो निष्क्रमितुं शक्तो मया जीर्णस्तु सोसुरः । इल्वलस्तु विषण्णोभूद्दृष्ट्वा जीर्णं महासुरम् ९ प्राञ्जलिश्च सहामात्यैरिदं वचनमब्रवीत् । किमर्थमुपयाताः स्थ ब्रूत किं करवाणि वः १० प्रत्युवाच ततोगस्त्यः प्रहसन्निल्वलं तदा । ईशं ह्यसुरविद्मस्त्वां वयं सर्वे धनेश्वरम् ११ एते च नातिधनिनो धनार्थश्च महान्मम । यथाशक्त्यविहिंस्यान्यान्संविभागं प्रयच्छ नः १२ ततोभिवाद्य तमृषिमिल्वलो वाक्यमब्रवीत् । दित्सितं यदि वेत्सि त्वं ततो दास्यामि ते वसु १३ अगस्त्य उवाच ॥ गवां दशसहस्राणि राज्ञामेकैकशोसुर । तावदेव सुवर्णस्य दित्सितं ते महासुर १४ मह्यं ततो वै द्विगुणं रथश्चैव हिरण्मयः । मनोजवौ वाजिनौ च दित्सितं ते

महर्षि अगस्त्य सर्वांचे वर आसन घालून बसले असतां दैत्यराज इल्वलानें हसत हसत त्यांना वाढिलें ५ व एका अगस्त्य मुनींनीच तो सर्व वातापि भक्षण करून टाकिला. अगस्त्य मुनींनीं भोजन केल्यावर इल्वल दैत्यानें त्या वातापीला हाक मारिली ६. परंतु, बा धर्मराजा, गर्जना करणाऱ्या मेघाप्रमाणच कीं काय प्रचंड ध्वनीसहवर्तमान त्या महात्म्यांचा अधोभागांतून वायु सरला ७. नंतर " हे वातापि, बाहेर ये " ह्मणून तो इल्वल वारंवार त्याला हांक मारू लागला असतां, हे राजा, मुनिश्रेष्ठ अगस्त्य हास्य करून त्याला ह्मणाले ८ " तो आतां बाहेर येण्यास कोठून समर्थ होणार, तो दैत्य मी जिरवून टाकिला " असें अगस्त्य मुनींनीं सांगितल्यावर महादैत्य वातापि जिरल्याचें अवलोकन करून इल्वल खिन्न झाला ९ आणि अमात्यासहवर्तमान हात जोडून त्यांना ह्मणाला " आपण कशाकरितां आलां आहांत व आपणांकरितां मीं काय करावें हें मला सांगा " १०. हें ऐकून अगस्त्य हंसत हंसत त्या वेळीं इल्वलाला ह्मणाले " हे असुरा, आह्मी सर्व तुला समर्थ धनाध्यक्ष समजत आहोंत ११. ह्यांच्यापाशीं विशेषसें धन नाहीं आणि धनाचें तर मला मोठें काम आहे. तर्‍हां इतरांना पीडा न देतां तू आह्मांला यथाशक्ति द्रव्याचा वाटा दे " १२. असें अगस्त्य मुनींनीं सांगितल्यानंतर इल्वल त्या ऋषींना अभिवंदन करून म्हणाला " मी किती देणार आहें हें जर आपण मला सांगाल तर मी आपणाला द्रव्य देईन " १३. अगस्त्य ह्मणतातः—हे असुरा, हे महादैत्या, दहा हजार गाई आणि तितकेंच सुवर्ण

महासुर १५ जिज्ञास्यतां रथः सद्यो व्यक्त एष हिरण्मयः । ततः प्रव्यथितो
दैत्यो ददावभ्यधिकं वसु १६ विरावश्च सुरावश्च तस्मिन्युक्तौ रथे हयौ १७
ऊहतुः सवसूनाशु तावगस्त्याश्रमं प्रति । सर्वात्राज्ञः सहागस्त्यान्निमेषादिव
भारत १८ अगस्त्येनाभ्यनुज्ञाता जग्मू राजर्षयस्तदा । कृतवांश्च मुनिः
सर्वं लोपामुद्राचिकीर्षितम् १९ लोपामुद्रोवाच ॥ कृतवानसि तत्सर्वं भग-
वन्मम काङ्क्षितम् । उत्पादय सकृन्मह्यमपत्यं वीर्यवत्तरम् २० अगस्त्य
उवाच ॥ तुष्टोहमस्मि कल्याणि तव वृत्तेन शोभने । विचारणामपत्ये तु
तव वक्ष्यामि तां शृणु २१ सहस्रं तेऽस्तु पुत्राणां शतं वा दशसंमितम् ।
दश वा शततुल्याः स्युरेको वापि सहस्रजित् २२ लोपामुद्रोवाच ॥ सह-
स्रसंमितः पुत्र एकोऽप्यस्तु तपोधन । एको हि बहुभिः श्रेयान्विद्वान्साधु-
रसाधुभिः २३ लोमश उवाच ॥ स तथेति प्रतिज्ञाय तया समभवन्मुनिः

तूं एकेका राजाला देण्याचें मनामध्यें योजिलें आहेस १४ व, हे महादैत्या, मला त्यापे-
क्षांही तूं दुप्पट देणार असून शिवाय सुवर्णमय रथ व मनाप्रमाणें वेगवान् अश्व देण्याचें
तूं मनांत योजिलें आहेस १५. तूं काय तें समज; हा सुवर्णमय रथ आतांच्या आतां
देण्याचें तूं मनांत आणिलें आहेस. असें अगस्त्य मुनींनीं सांगितलें असतां तो इल्वल
दैत्य भयभीत झाला आणि त्यानें त्यापेक्षांही अधिक द्रव्य त्यांना दिलें १६. विराव
आणि सुराव असे दोन अश्व त्या रथाला जोडिलेले होते व त्या अश्वांनीं द्रव्य आणि
अगस्त्यमुनि ह्यांसहवर्तमान त्या सर्व राजांना एका निमिषामध्यें अगस्त्य मुनींच्या आश्र-
माला ओढून नेलें १७, १८. तदनंतर अगस्त्य मुनींनीं अनुज्ञा दिल्यावर ते राजर्षि
परत गेले आणि नंतर लोपामुद्रेच्या इच्छेप्रमाणें त्या मुनींनीं सर्व कांहीं केलें १९.
लोपामुद्रा ह्मणते:—हे भगवन्, आपण माझ्या इच्छेप्रमाणें तें सर्व कांहीं केलें आहे.
आतां माझे ठिकाणीं आपण एकदां अतिशय वीर्यवान् असें अपत्य उत्पन्न करा २०.
अगस्त्य ह्मणतात:—हे कल्याणि, हे शोभने, मी तुझ्या आचरणानें संतुष्ट झालों
आहे. आतां अपत्यासंबंधानें तुला विचार सांगतो तो तूं श्रवण कर २१. तुला
हजार पुत्र होतील; पाहिजे असल्यास दहा दहांच्या योग्यतेचा एक एक असे शंभर पुत्र
होतील; हवे असल्यास शंभरांच्या तोडीचा एक एक असे दहा पुत्र होतील अथवा
इच्छा असल्यास हजारांना जिंकणारा असा एकच पुत्र होईल २२. लोपामुद्रा
ह्मणते:— हे तपोधन, हजारांच्या तोडीचा असा एकच पुत्र असूं द्या. कारण,
पुष्कळ दुष्ट पुत्र असण्यापेक्षां विद्वान् व सज्जन असा एकच पुत्र असणें चांगलें २३.
लोमश सांगतात:— (असें तिनें ह्मटल्यावर) " ठीक आहे " ह्मणून त्यांनीं तिला

समयं समशीलिन्या श्रद्धावाञ्छ्रद्दधानया २४ तत आधाय गर्भं तमगमद्वनमेव सः। तस्मिन्वनगते गर्भो ववृधे सप्तशारदान् २५ सप्तमेऽब्दे गते चापि प्राच्यवत्स महाकविः। ज्वलन्निव प्रभावेन दृढस्युर्नाम भारत २६ सांगोपनिषदान्वेदाञ्जपन्निव महातपाः। तस्य पुत्रोऽभवदृषेः स तेजस्वी महाद्विजः २७ स बाल एव तेजस्वी पितुस्तस्य निवेशने। इध्मानां भारमाजह्रे इध्मवाहस्ततोऽभवत् २८ तथायुक्तं तु तं दृष्ट्वा मुमुदे स मुनिस्तदा। एवं स जनयामास भारतापत्यमुत्तमम् २९ लेभिरे पितरश्चास्य लोकान्राजन्यथेप्सितान्। तत ऊर्ध्वमयं ख्यातस्त्वगस्त्यस्याश्रमो भुवि ३० प्राह्लादिरेवं वातापिरगस्त्येनोपशामितः। तस्यायमाश्रमो राजन्रमणीयैर्गुणैर्युतः ३१ एषा भागीरथी पुण्या देवगन्धर्वसेविता। वातेरिता पताकेव विराजति नभस्तले ३२ प्रतार्यमाणा कूलेषु यथा निम्नेषु नित्यशः। शिलातलेषु संत्रस्ता पन्नगेन्द्रवधूरिव ३३ दक्षिणां वै

वचन दिलें आणि त्या श्रद्धावान् मुनींनीं श्रद्धा बाळगणाऱ्या व शीलानें स्वतःप्रमाणें असलेल्या त्या पत्नीशीं समागम केला २४. तदनंतर त्या गर्भाची स्थापना करून ते अगस्त्य मुनि वनांतच चालते झाले व ते वनांत गेल्यावर तो गर्भ सात वर्षेपर्यंत वाढत राहिला २५. सातवेंही वर्ष लोटल्यानंतर प्रभावानें जसा कांहीं जळत असलेला तो महाज्ञानी उदरांतून बाहेर आला आणि, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, दृढस्यु ह्या नांवानें तो प्रसिद्ध झाला २६. त्या ऋषींचा तो महातपस्वी व तेजस्वी महाब्राह्मण पुत्र उत्पन्न होतांक्षणींच षडंगें आणि उपनिषदें ह्यांसहवर्तमान वेदाध्ययन करीत आहे असा दिसूं लागला २७. तो तेजस्वी पुत्र बाल असतांनाच त्या पित्याच्या निवासस्थानामध्यें इध्म्यांचा (ह्मणजे काष्ठांचा) भारा आणीत असे; ह्मणून इध्मवाह असें त्याचें नांव पडलें २८ व अध्ययनादिकांविषयीं तत्पर असलेल्या त्या आपल्या पुत्राला अवलोकन करून त्या मुनींना आनंद झाला. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, ह्याप्रमाणें त्या मुनींनी उत्कृष्ट अपत्य उत्पन्न केलें २९. तेव्हां, हे धर्मराजा, त्यांच्या पितरांना इच्छेप्रमाणें लोक प्राप्त झाले व तेव्हांपासून हा अगस्त्यमुनींचा आश्रम पृथ्वीवर प्रसिद्ध झाला ३०. हे राजा, प्रल्हादवंशज वातापि ज्या अगस्त्य मुनींनीं नाहींसा केला त्या अगस्त्य मुनींचा हा आश्रम मनोहर गुणांनीं युक्त आहे ३१. ही भागीरथी पुण्यनदी आहे; देव आणि गंधर्व ह्यांनीं हिचा आश्रय केलेला आहे आणि वाऱ्यानें हालणाऱ्या पताकेप्रमाणें ही आकाशामध्यें झळकत आहे ३२. अगाध तीरांचे ठिकाणीं हिच्यामध्यें नेहमीं नावा चाललेल्या असतात व खडकावरून ज्या ठिकाणीं ही वहात असते

दिशं सर्वां प्लावयन्ती च मातृवत् । पूर्वं शंभोर्जटाभ्रष्टा समुद्रमहिषी प्रिया । अस्यां नद्यां सुपुण्यायां यथेष्टमवगाह्यताम् ३४ युधिष्ठिर निबोधेदं त्रिषु लोकेषु विश्रुतम् । भृगोस्तीर्थं महाराज महर्षिगणसेवितम् ३५ यत्रोपस्पृष्टवान्रामो हृतं तेजस्तदाप्तवान् । अत्र त्वं भ्रातृभिः सार्धं कृष्णया चैव पाण्डव ३६ दुर्योधनहृतं तेजः पुनरादातुमर्हसि । कृतवैरेण रामेण यथाचोपहृतं पुनः ३७ वैशम्पायन उवाच ॥ स तत्र भ्रातृभिश्चैव कृष्णया चैव पाण्डवः । स्नात्वा देवान्पितॄंश्चैव तर्पयामास भारत ३८ तस्य तीर्थस्य रूपं वै दीप्ताद्दीप्ततरं बभौ । अप्रधृष्यतरश्चासीच्छात्रवाणां नरर्षभ ३९ अपृच्छच्चैव राजेन्द्र लोमशं पाण्डुनन्दनः ४० भगवन्किमर्थं रामस्य हृतमासीद्वपुः प्रभो । कथं प्रत्याहृतं चैव एतदाचक्ष्व पृच्छतः ४१ लोमश उवाच ॥ शृणु रामस्य राजेन्द्र भार्गवस्य च धीमतः । जातो दशरथस्यासीत्पुत्रो रामो महात्मनः ४२ विष्णुः स्वेन शरीरेण रावणस्य वधाय वै । पश्यामस्तमयोध्यायां जातं दाशरथिं ततः ४३ ऋचीकन-

---

तेथें नागिणीप्रमाणें ही संतप्त झाल्यासारिखा भास होतो ३३. मातेप्रमाणें सर्व दक्षिण दिशा ही भिजवीत असून पूर्वी शंकराच्या जटेंतून निघालेली ही गंगा समुद्राची प्रिय भार्या आहे. ह्यास्तव, ह्या अत्यंत पवित्र नदीमध्यें यथेष्ट स्नान होऊं द्या ३४. हे युधिष्ठिरा महाराजा, महर्षींचे समुदाय ज्याचा आश्रय करून राहिले आहेत असें हें त्रैलोक्यविख्यात भृगुतीर्थ तूं आतां श्रवण कर ३५. ह्या ठिकाणीं स्नान करून परशुरामाला रामानें हरण केलेलें तेज पुनरपि प्राप्त झालें. तस्मात्, हे पांडुपुत्रा, भ्राते आणि द्रौपदी ह्यांसहवर्तमान तूं ह्या ठिकाणीं स्नान कर ह्मणजे रामानें हरण केलेलें तेज त्याच्याशीं वैर धारण केलेल्या परशुरामाला जसें पुनरपि प्राप्त झालें तसें दुर्योधनानें हरण केलेलें तेज तुला पुनरपि प्राप्त होईल ३६,३७. वैशंपायन सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्या ठिकाणीं पांडुपुत्र धर्मराजानें भ्राते आणि द्रौपदी ह्यांसहवर्तमान स्नान करून देवांचें व पितरांचें तर्पण केलें ३८. तेव्हां, हे पुरुषश्रेष्ठा जनमेजया, त्या तीर्थाचें रूप अधिकच उज्ज्वल झालें व तो धर्मराजही शत्रूंना अत्यंत अजिंक्य झाला ३९ आणि, हे राजाधिराज, तो पांडुपुत्र लोमश मुनींना ह्मणाला ४० " हे भगवन्, हे प्रभो, परशुरामाचें तेज कशाकरितां रामानें हरण केलें होतें व त्याला तें पुनरपि कसें प्राप्त झालें हें मी विचारीत आहें तर आपण मला कथन करा " ४१. लोमश ह्मणतातः—हे राजाधिराज युधिष्ठिरा, राम आणि विचारी परशुराम ह्यांचा वृत्तांत आतां श्रवण कर. महात्म्या दशरथाला राम पुत्र झाला होता ४२. विष्णूंनीं रावणाच्या वधाकरितां स्वतःच्या शरीरानें अवतार धारण